म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
२१२५

सिंहबंदीशाळा

REFBK-0015955

द.म.सुतार

Divided
६५८३६
29/3/69.
2924

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

प्रासाद आम्हा बंदीशाळा

...ाडा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. सन्मान
अनुक्रम ७५८३६..... दिः .....
क्रमांक २२२५..... वोः दिः 29/3/07

प्रासाद आम्हा बंदीशाळा

द. म. सुतार

सोमैया पब्लीकेशन्स् प्रायव्हेट लि. मुंबई १४

© द. म. सुतार (१९६७)

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ,
पुणे २

प्रकाशक :
कृ. रा. सामंत
कार्यकारी संचालक,
सोमैया पब्लीकेशन्स् प्रा. लि.
मुंबई १४

रु ५-००

मनोगत

एकोणीसशे तीस सालचा मिठाचा सत्याग्रह, चाळीस सालचा वैयक्तिक सत्याग्रह आणि बेचाळीस सालचे 'छोडो भारत' आंदोलन या साऱ्यांची गणना भारताच्या स्वातंत्र्यसंगरातील एका महापर्वात करावी लागेल. या काळात प्रथम एक सामान्य स्वयंसेवक म्हणून व पुढे एक कार्यकर्ता म्हणून काम करताना अनुभवलेले जीवन त्या त्या कार्यकर्त्यांचा एक अनमोल ठेवा आहे. त्या आंदोलनांचे नेतृत्व महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांच्याकडे होते. महात्माजी हे केवळ राजकारणी नेते नव्हते तर ईश्वरी शक्तीवर श्रद्धा असलेले, सनातन मानवी मूल्यांचे जतन करू पाहणारे, श्रेष्ठ संतपुरुषही होते आणि त्यामुळेच त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची छाप जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत पडली होती. लोखंडाचे कण लोहचुंबकाकडे जितक्या सहजतेने ओढले जातात तद्वतच सार्वजनिक कामाची ओढ असलेले कार्यकर्ते आपोआपच काँग्रेसच्या तिरंगी झेंड्याखाली गोळा झाले होते.

आज शतकानुशतके हृदयात विठ्ठलाची भक्ती, जिभेवर पांडुरंगाचे नाव आणि खांद्यावर भगवी पताका अशा थाटात वारकऱ्यांच्या दिंड्या आषाढी—कार्तिकीला पंढरपूरच्या दिशेने चालू लागतात नि जाताना आपल्या भोवतालचे वातावरण नामाच्या गजराने निर्माण होणाऱ्या सात्त्विक भावनांनी भारून टाकतात अगदी त्याच धर्तीवर सत्याग्रही आंदोलनाच्या काळात स्वातंत्र्यभक्तांची पंढरी जागोजाग दुमदुमत असे आणि भोवतालचे सारे वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारून जाऊन चैतन्यमय होत असे. वारकऱ्यांच्या समुदायात जात-पात, श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अशिक्षित हे सारे भेद हरिनामाच्या गजरात विलयास जातात. तोच प्रकार त्या काळातील स्वातंत्र्यभक्तांनी अनुभवला. एका वेगळ्याच धुंदीत सारे वावरत होते.

स्वातंत्र्याचे लढे अनेक देशांत झाले, होत आहेत नि होतील. पण या साऱ्या देशांच्या स्वातंत्र्याच्या लढ्याहून भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचे स्थान आगळेच आहे. महात्मा गांधींचे नेतृत्व हे या आगळेपणाचे कारण आहे. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम हा इतर देशांच्या स्वातंत्र्याच्या लढ्याप्रमाणे भारतीयांच्या सामूहिक दास्यविमोचनासाठी होता तसाच आणखी एका कारणासाठी होता. स्वातंत्र्य-संगरात भाग घेतलेल्याच्या जीवनात वैयक्तिक पातळीवर आमुलाग्र क्रांती घडवून आणावी असा प्रयत्न महात्माजींनी केला. भारतीयांच्या अद्वैत-वेदांतावर आधार-लेल्या सत्य, प्रेम, अहिंसा, अनासक्ती आदि गुणसमुच्चयाला स्वतःच्या जीवनात स्थान देऊन त्या जीवन-मूल्यांची दीक्षा सामूहिक रीत्या स्वातंत्र्यसैनिकांना देण्याचा एक लोकविलक्षण असा अभिनव प्रयोग म. गांधींनी केला. त्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या आंदोलनात सहभागी झालेल्यांपैकी अनेकांना देशाच्या स्वातंत्र्याच्या उद्दिष्टाइतकेच किंबहुना अधिकच आकर्षण त्यांच्या या दीक्षेचे, स्वातंत्र्यप्राप्तीच्या नव्या मार्गाचे होते. साध्यसाधन-विवेक नि विधायक कार्याची दृष्टी या म. गांधींच्या धोरणामुळे राजकारण हा आपल्या जीवनाचा एकमेव उद्देश न मानणारे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या भोवती गोळा झाले. तीव्र स्वरूपाचे राजकीय आंदोलन सुरू झाले की, त्यात सामील व्हावयाचे व ते संपले की, पुन्हा गांधीप्रणित विधायक कार्यात अगर आपल्या व्यक्तिगत उद्योगात रमून जाणारे असंख्य लोक त्या काळात होते. प्रस्तुत लेखक हा अशांपैकीच एक होता. संग्रामाची तुतारी ऐकली की, आघाडीवर व संग्राम संपल्यावर पुन्हा वृत्तपत्रव्यवसायात, असे त्यांचे जीवन होते आणि आहे. 'प्रासाद आम्हा बंदीशाळा' या पुस्तकामागील मनोगत हे असे आहे.

विशिष्ट कालखंडात घडलेल्या व स्वतः अनुभवलेल्या काही घटना शब्दांकित करण्याचा हा अल्पसा प्रयत्न माझे हितचिंतक श्री. ग. बा. नेवाळकर व सोमैया पब्लीकेशन्सचे चालक यांच्या सहकाराने साकार झाला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

लोकसभेच्या निवडणुकीच्या ऐन धामधुमीत हे सारे लिखाण नजरेखाली घालून निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर ताबोडतोब उत्कृष्ट प्रस्तावना लिहिल्याबद्दल खासदार साथी एस. एम. जोशी यांचा मी फार आभारी आहे.

मुंबई
२६ मार्च १९६७

द. म. सुतार

स्वातंत्र्यसंग्रामांत सहभागी झालेल्या सर्व सत्याग्रहींस समर्पण

— द. म. सुतार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
क्रमांक ७५८३६ ..... दिः ..... निर्लंबी
२११५ ..... बोः दिः ..... २१३।८७

प्रास्ताविक

आपल्या देशातील विद्यमान सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीबाबत ठिकठिकाणी आणि निरनिराळ्या थरांत चर्चा चालू असल्याचे आढळून येते. जो तो आपापल्या परीने सांप्रतच्या दुरवस्थेचे निदान करीत असतो; परंतु सर्वांच्या निदानांमध्ये एका गोष्टीवर भर दिलेला जाणवतो. नैतिकदृष्ट्या आपल्या जीवनाला उतरती कळा लागली आहे याची जाणीव सर्वांना असल्याचे दिसून येते. खऱ्या-खोट्याची चाड न बाळगता आपले खिसे भरण्याची प्रवृत्ती बळावत असल्याची तक्रार सतत कानावर येते. आपली काही सामाजिक कर्तव्ये आहेत आणि वेळप्रसंगी स्वार्थत्याग करूनही ती पूर्ण करावी लागतात, असे कोणी सांगितले तर 'तो जुना जमाना गेला, तुम्ही आम्हांला त्यागाच्या गोष्टी सांगू नका' अशी त्याची संभावना होते. असत्य केल्याशिवाय आजच्या जगात टिकाव लागणे शक्य नाही, असे सर्वंग तत्त्वज्ञान सांगितले जाते. स्वाभाविकच उच्च आदर्शांकडे दुर्लक्ष होऊन त्यागाऐवजी भोगाचीच महती वाढत जाते. हे असे का व्हावे? देशापुढे प्रचंड स्वरूपाची आव्हाने आणि दुःख-दारिद्र्याच्या आणि सामाजिक अप्रतिष्ठेच्या रौरव नरकात खिचपत पडलेल्या कोट्यवधी जनतेचे

भीषण दृश्य सतत डोळ्यांपुढे असताना पुरुषार्थाची प्रेरणा तरुण पिढीच्या अंतःकरणात प्रभावी का होऊ नये?' असा प्रश्न मनाला एकसारखा सतावीत रहातो. स्वातंत्र्यलढ्यामध्ये बिनदिक्कत उडी घेण्याची ईर्ष्या तरुणांच्यामध्ये निर्माण झालेली ज्यांनी अनुभविली आहे त्यांना या गोष्टीची राहून राहून खंत वाटते. अशा वेळी मागे वळून त्या कालखंडाकडे दृष्टिक्षेप करावासा वाटतो. त्यामध्ये आपल्याला सतावणाऱ्या प्रश्नाचे उत्तर कदाचित् सापडेल अशी आशाही मनात पालवल्याशिवाय रहात नाही. अशाच भावनेने स्वातंत्र्यलढ्यातील एक निष्ठावंत कार्यकर्ते मित्रवर्य द. म. सुतार यांनी आपल्या गतकालीन जीवनातील काही स्मृतिचित्रे 'प्रासाद आम्हा बंदीशाळा' या लेखमालेच्या द्वारा 'धनुर्धारी' साप्ताहिकामध्ये रंगविली; ती स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या असंख्य सैनिकांना रोचक वाटली. पुस्तकरूपाने ती आता प्रसिद्ध होत आहेत.

या पुस्तकाला मी प्रस्तावना लिहावी अशी सूचना मिळाली म्हणून ती लेखमाला निवडणुकीच्या भाऊगर्दीमध्येसुद्धा आगगाडीच्या प्रवासात वाचून काढली. स्मृतिचित्रे मला आवडली आणि ज्यांनी ज्यांनी कारावास भोगला आहे त्यांना ती कमी अधिक प्रमाणात आवडतील. ती स्मृतिचित्रे वाचताना जुन्या आठवणी जागृत झाल्या, मनाला विरंगुळा वाटला; परंतु लगेच तो कालखंड संपला, इतिहासजमा झाला, आपण वर्तमानकाळातील नैतिक अराजकाच्या आणि सामाजिक अधोगतीच्या कालखंडात वावरत आहोत, याची आठवण होऊन मन उदास झाले. सुतारांच्या पुस्तकाला प्रस्तावना काय लिहावी आणि कशी लिहावी ते सुचेनासे झाले. निवडणूक-प्रचाराच्या गडबडीत निवांतपणे बसून लिहायला जमलेही नाही. एका दृष्टीने निवडणुकीच्या निकालाआधी प्रस्तावना-दाखल चार शब्द लिहिले नाहीत हेच बरे झाले असे आज वाटत आहे. कारण निवडणुकीच्या निकालांनी एक नवीन चित्र उभे केले आहे. मनाचा हिय्या करून जनतेने आपले राज्यकर्ते निवडण्याचा हक्क बजावला आणि विद्यमान राज्यकर्त्यांना ठिकठिकाणी पदच्युत केले आहे. जुनी घडी मोडून नवी घडी घालण्याबाबतची आपली आकांक्षा मतदानाने जनतेने व्यक्त केली आहे. किमानपक्षी भ्रष्टाचाराबाबतचा आपला राग त्यांनी कृतीने बोलून दाखविला आहे. त्यामुळे ह्या नव्या कालखंडाला आता सुरवात झाली आहे. अर्थात् त्यामध्ये धोके आहेत आणि जबाबदाऱ्या आहेत; परंतु धोका पत्करून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची

ईर्ष्या बाळगणे हाच पुरुषार्थाचा राजमार्ग आहे. तरुण पिढी त्या मार्गाचा अवलंब करील, अशी आशा आज पुनः पालवली आहे.

परकीय सत्तेला आव्हान देऊनच आपल्या दिवंगत महान् राष्ट्रीय नेत्यांनी स्वातंत्र्यलढ्याची उभारणी केली. ती एक दीर्घमुदतीची तपस्या होती. १८५७ पासून तो १९४७ पर्यंत ती सातत्याने चालू होती. मोठी कामे चार-दोन दिवसांत पूर्ण होत नाहीत; त्याला वर्षानुवर्षे सतत परिश्रम करावे लागतात. त्यागाचे आणि सेवेचे खतपाणी घालावे लागते. एकामागून एक अशा अनेक तरुण पिढ्यांची मने ह्या ध्येयवादाने भारून त्यांना कार्यप्रवण करावे लागते. पुरुषार्थाची आणि त्यागाची एक महान् परंपरा उभी करावी लागते. स्वातंत्र्य-लढ्याच्या पर्वातील आमच्या नेत्यांनी आपल्या उदाहरणांनी तशी परंपरा निर्माण केली. आजही चीनने आक्रमण केले आणि पाकिस्तान्यांनी युद्ध पुकारले तेव्हा आमच्या समाजामध्ये जागृतीची लाट उसळली, अपूर्व चेतना संचारली; परंतु ती फारच थोडा वेळ टिकली; क्षणजीवी ठरली. हे असे का झाले? दोष कोणाचाही का असेना, परंतु असे व्हायला नको होते हे निश्चित. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनमानसातील पुरुषार्थाची ईर्ष्या मतदानाच्या द्वारा व्यक्त झाली आहे, ती जागविली पाहिजे, जोपासली पाहिजे, तिचे सातत्य टिकवले पाहिजे. त्या निमित्ताने एका नव्या पर्वाला प्रारंभ केला पाहिजे. पुढाऱ्यांनी त्याबाबतची आपली जबाबदारी उचलली पाहिजे. तसे होईल तर भारताची प्रतिमा पुन्हा तेजःपुंज होईल आणि जनतेचे भवितव्य उज्वल होऊ शकेल.

श्री. द. म. सुतार यांनी रेखाटलेली स्मृतिचित्रे वाचली म्हणजे १९३० पासून सुरू झालेल्या सत्याग्रही जनांदोलनामध्ये, स्वातंत्र्यलढ्यांमध्ये भाग घेणाऱ्या सहाखावधी स्वातंत्र्यसैनिकांची जीवने कशी घडवली गेली ते लक्षात येते. त्यातूनच प्रतिकाराची, त्यागाची आणि सेवेची परंपरा निर्माण झाली. त्या लढ्यांमध्ये कारागृहांत जाऊन ज्यांनी देहदंड सोसले आणि आत्मक्लेश भोगले त्यांच्या मनाची घडण उत्तरोत्तर कशी बनत गेली ते पाहण्यासारखे आहे. चळवळीमध्ये भाग घेऊन वेळोवेळी तुरुंगाची वाट धरणारी सत्याग्रह्यांची सेना त्या वेळी 'गांधींची जमात' म्हणून ओळखली जाई. श्री. सुतार एके ठिकाणी लिहितात : "सत्याग्रहींची पार्टी आज येरवड्याहून विसापूरला जाणार अशी

बातमी आधीच लोकांना कळली असल्याने अनेक लोक प्लॅटफॉर्मवर हजर होते. त्यापैकी फारच थोडे आम्हा कैद्यांच्या ओळखीचे होते. पण 'गांधींचे लोक' ही एक वेगळीच जमात त्या काळात ओळखली जात असे. सत्याग्रही कैदी हीच ती जमात. त्या जमातीवर प्रेम करणारी जनता आमच्या अवतीभोवती उभी होती. रक्ताचे नातेबाईक जसे त्यांचे आमच्यांत नव्हते तसे आमचेही त्यांच्यांत नव्हते." देशाच्या स्वातंत्र्यासाठी व्रतधारी बनलेल्या या मंडळींच्याकडे लोक प्रेमादराने पाहत असत. तो अनुभव आज येत नाही म्हणून स्वातंत्र्यसैनिकांच्या मेळाव्यात हळहळ व्यक्त होताना आपण पाहतो आणि ह्या भूतकाळात जमा झालेल्या कालखंडाकडे त्यांची मने ओढ घेऊ लागतात. ती प्रेरणा पुन्हा एक वेळ आमच्या लोकांमध्ये प्रभावी व्हावी म्हणून त्यांची मने आसुसल्यासारखी दिसतात.

त्या वेळची कारागृहे म्हणजे जणु एक प्रकारची विद्यापीठेच बनून गेली होती. तुरुंगात जावे, वर्ष दोन वर्ष सत्याग्रही कैद्यांच्या बरोबर रहावे, चर्चा करावी, वाचन करावे, बौद्धिके ऐकावीत आणि एका महान् उद्दिष्टासाठी होत असलेल्या सामुदायिक प्रयत्नामध्ये सहभागी झाल्यामुळे होणारे उच्च संस्कार घेऊन परत यावे. पुन्हा काही वेळाने तीच यात्रा आणि तशीच पर्वणी व्हावी असे हे सत्र वर्षानुवर्षे अखंडपणे चालले होते. तरुणांची अंतःकरणे कोमल परंतु त्याच बरोबर कर्तव्यनिष्ठुर बनविणाऱ्या बौद्धिकांचे पाठ देऊन त्यांना डोळस ध्येयवादी बनविणाऱ्या या कालखंडांत हजारो नव्या मनूचे पाईक निर्माण झाले. श्री. सुतारांनी एके ठिकाणी लिहिले आहेः—

"अन्न, वस्त्र, आणि निवारा याची प्रत्येकास गरज आहे. ही गरज किती कमी साधनांत नि किती कमी पैशांत भागू शकते हे अजमावण्यासाठी तुरुंगातील 'क' वर्ग हे एक उत्कृष्ट प्रयोगालय आहे. कार्यकर्त्याने या प्रयोगालयात जाणीवपूर्वक पाठ घेतला की मग त्याला बाहेरच्या जगात समाजाकडून अगदी कमीत कमी घेऊन म्हणजेच साधी राहाणी पत्करून, समाजाला जास्तीत जास्त देण्याचा कर्मयोग सहज अनुसरता येतो. सत्याग्रहींना वारंवार तुरुंगाच्या यात्रा घडविण्यात सज्जनांना होणारे क्लेश पाहून, सामान्य जनतेत होणाऱ्या राजकीय जागृतीबरोबरच, अन्यायाविरुद्ध उभे राहाण्याच्या प्रेरणेबरोबरच, त्या सत्याग्रही कार्य-

कर्त्याला साध्या राहणीचे आणि उच्च विचारसरणीचे जे धडे मिळाले त्याचा परिणाम राजकीय जागृतीच्याच दृष्टीने नव्हे तर समाजपरिवर्तनाच्या दृष्टीनेही चांगलाच झाला. ''

सत्याग्रही जनांदोलनाचा हा कालखंड म्हणजे आंदोलनामध्ये सक्रिय भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या जीवनामध्ये आंतरबाह्य बदल घडवून आणण्यासाठी केलेली सामुदायिक जीवनसाधनाच होती. त्यायोगे सर्व समाजामध्ये ध्येयवादाबद्दल आदराची आणि कौतुकाची भावना निर्माण होऊन सामाजिक उत्थानाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. आज अधिकाराच्या जागी पोचलेल्या आणि पोचू इच्छिणाऱ्या लोकांच्यामध्ये साध्या रहाणीबद्दल आस्था नाही. तेच डामडौल आणि चैनीच्या रहाणींत दंग झालेले पाहिले म्हणजे दैन्य–दारिद्र्याने पिचलेल्या जनतेच्या मनात संतापाची लाट उसळली नाही तरच आश्चर्य. देशाच्या विद्यमान परिस्थितीत समाजाकडून कमीत कमी घेऊन म्हणजे साधी रहाणी पत्करून समाजाला जास्तीत जास्त देण्याचा कर्मयोग आचरणाऱ्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्याशिवाय एका मागसलेल्या समाजाची आर्थिक आणि सामाजिक उन्नती लोकशाहीच्या मार्गाने करून दाखविण्याचे ध्येय साध्य होऊ शकणार नाही. त्या कालखंडामध्ये तुरुंगामध्ये जाऊन कार्यकर्त्यांनी कर्मयोगाचे धडे गिरवले. आज जमाना बदलला आहे. या बदलत्या जगामध्ये तरुण पिढीच्या इच्छा–आकांक्षा आणि तिची आधुनिकतेबद्दलची ओढ लक्षात घेऊनच तिच्या मनावर आवश्यक ते संस्कार करावे लागतील. लोकनेत्यांनी आपल्या उदाहरणाने आणि तरुण पिढीच्या हृदयाला स्पर्श करतील अशा कार्यक्रमांनी तरुणांच्या जीवनाला वळण दिले पाहिजे.

प्रियमित्र द. म. सुतार यांनी लिहिलेली ही स्मृति–चित्रे वाचताना त्यांच्या स्वभावाची आणि कोमल अंतःकरणाची ओळख पटते. एक वेळ क्षणिक रागाच्या भरात त्यांनी एका खट्याळ मुलाने त्रास दिल्यावरून त्याच्या गालावर एक चापट लगावली. परंतु त्यामुळे त्यांच्या मनाला किती त्रास झाला आणि अंतःकरण कसे व्यथित झाले ते वाचताना वाचणाराचे मनही क्षणभर अस्वस्थ झाल्याशिवाय राहाणार नाही. फुलांबद्दलची त्यांची आवड, त्यासाठी कष्ट करण्याची तयारी आणि आपल्याला मिळणाऱ्या आनंदात इतरांना सहभागी करून घेण्याची वृत्ती विलोभनीय

बातमी आधीच लोकांना कळली असल्याने अनेक लोक प्लॅटफॉर्मवर हजर होते. त्यापैकी फारच थोडे आम्हा कैद्यांच्या ओळखीचे होते. पण 'गांधींचे लोक' ही एक वेगळीच जमात त्या काळात ओळखली जात असे. सत्याग्रही कैदी हीच ती जमात. त्या जमातीवर प्रेम करणारी जनता आमच्या अवतीभोवती उभी होती. रक्ताचे नातेवाईक जसे त्यांचे आमच्यांत नव्हते तसे आमचेही त्यांच्यांत नव्हते." देशाच्या स्वातंत्र्यासाठी व्रतधारी बनलेल्या या मंडळींच्याकडे लोक प्रेमादराने पाहत असत. तो अनुभव आज येत नाही म्हणून स्वातंत्र्यसैनिकांच्या मेळाव्यात हळहळ व्यक्त होताना आपण पाहतो आणि ह्या भूतकाळात जमा झालेल्या कालखंडाकडे त्यांची मने ओढ घेऊ लागतात. ती प्रेरणा पुन्हा एक वेळ आमच्या लोकांमध्ये प्रभावी व्हावी म्हणून त्यांची मने आसुसल्यासारखी दिसतात.

त्या वेळची कारागृहे म्हणजे जणु एक प्रकारची विद्यापीठेच बनून गेली होती. तुरुंगात जावे, वर्ष दोन वर्ष सत्याग्रही कैद्यांच्या बरोबर रहावे, चर्चा करावी, वाचन करावे, बौद्धिके ऐकावीत आणि एका महान् उद्दिष्टासाठी होत असलेल्या सामुदायिक प्रयत्नामध्ये सहभागी झाल्यामुळे होणारे उच्च संस्कार घेऊन परत यावे. पुन्हा काही वेळाने तीच यात्रा आणि तशीच पर्वणी व्हावी असे हे सत्र वर्षानुवर्षे अखंडपणे चालले होते. तरुणांची अंतःकरणे कोमल परंतु त्याच बरोबर कर्तव्यनिष्ठुर बनविणाऱ्या बौद्धिकांचे पाठ देऊन त्यांना डोळस ध्येयवादी बनविणाऱ्या या कालखंडांत हजारो नव्या मनूचे पाईक निर्माण झाले. श्री. सुतारांनी एके ठिकाणी लिहिले आहे:—

"अन्न, वस्त्र, आणि निवारा याची प्रत्येकास गरज आहे. ही गरज किती कमी साधनांत नि किती कमी पैशांत भागू शकते हे अजमावण्यासाठी तुरुंगातील 'क' वर्ग हे एक उत्कृष्ट प्रयोगालय आहे. कार्यकर्त्याने या प्रयोगालयात जाणीवपूर्वक पाठ घेतला की मग त्याला बाहेरच्या जगात समाजाकडून अगदी कमीत कमी घेऊन म्हणजेच साधी राहाणी पत्करून, समाजाला जास्तीत जास्त देण्याचा कर्मयोग सहज अनुसरता येतो. सत्याग्रहींना वारंवार तुरुंगाच्या यात्रा घडविण्यात सज्जनांना होणारे क्लेश पाहून, सामान्य जनतेत होणाऱ्या राजकीय जागृतीबरोबरच, अन्यायाविरुद्ध उभे राहाण्याच्या प्रेरणेबरोबरच, त्या सत्याग्रही कार्य-

कर्त्याला साध्या राहणीचे आणि उच्च विचारसरणीचे जे धडे मिळाले त्याचा परिणाम राजकीय जागृतीच्याच दृष्टीने नव्हे तर समाजपरिवर्तनाच्या दृष्टीनेही चांगलाच झाला."

सत्याग्रही जनांदोलनाचा हा कालखंड म्हणजे आंदोलनामध्ये सक्रिय भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या जीवनामध्ये आंतरबाह्य बदल घडवून आणण्यासाठी केलेली सामुदायिक जीवनसाधनाच होती. त्यायोगे सर्व समाजामध्ये ध्येयवादाबद्दल आदराची आणि कौतुकाची भावना निर्माण होऊन सामाजिक उत्थानाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. आज अधिकाराच्या जागी पोचलेल्या आणि पोचू इच्छिणाऱ्या लोकांच्यामध्ये साध्या रहाणीबद्दल आस्था नाही. तेच डामडौल आणि चैनीच्या रहाणींत दंग झालेले पाहिले म्हणजे दैन्य-दारिद्र्याने पिचलेल्या जनतेच्या मनात संतापाची लाट उसळली नाही तरच आश्चर्य. देशाच्या विद्यमान परिस्थितीत समाजाकडून कमीत कमी घेऊन म्हणजे साधी रहाणी पत्करून समाजाला जास्तीत जास्त देण्याचा कर्मयोग आचरणाऱ्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्याशिवाय एका मागसलेल्या समाजाची आर्थिक आणि सामाजिक उन्नती लोकशाहीच्या मार्गाने करून दाखविण्याचे ध्येय साध्य होऊ शकणार नाही. त्या कालखंडामध्ये तुरुंगामध्ये जाऊन कार्यकर्त्यांनी कर्मयोगाचे धडे गिरवले. आज जमाना बदलला आहे. या बदलत्या जगामध्ये तरुण पिढीच्या इच्छा-आकांक्षा आणि तिची आधुनिकतेबद्दलची ओढ लक्षात घेऊनच तिच्या मनावर आवश्यक ते संस्कार करावे लागतील. लोकनेत्यांनी आपल्या उदाहरणाने आणि तरुण पिढीच्या हृदयाला स्पर्श करतील अशा कार्यक्रमांनी तरुणांच्या जीवनाला वळण दिले पाहिजे.

प्रियमित्र द. म. सुतार यांनी लिहिलेली ही स्मृति-चित्रे वाचताना त्यांच्या स्वभावाची आणि कोमल अंतःकरणाची ओळख पटते. एक वेळ क्षणिक रागाच्या भरात त्यांनी एका खट्याळ मुलाने त्रास दिल्यावरून त्याच्या गालावर एक चापट लगावली. परंतु त्यामुळे त्यांच्या मनाला किती त्रास झाला आणि अंतःकरण कसे व्यथित झाले ते वाचताना वाचणाराचे मनही क्षणभर अस्वस्थ झाल्याशिवाय राहाणार नाही. फुलांबद्दलची त्यांची आवड, त्यासाठी कष्ट करण्याची तयारी आणि आपल्याला मिळणाऱ्या आनंदात इतरांना सहभागी करून घेण्याची वृत्ती विलोभनीय

आहे. चहाचे महात्म्य ऐकावयाचे असेल तर आमचे मित्र सुतार यांच्याच कडून ऐकले पाहिजे. त्यांना चहा पिण्याची तलफ आली म्हणजे एकट्याने पिऊन ती भागत नाही. चार दोन मित्र त्यांत सहभागी झाले तरच त्यांना खरा आनंद होणार. सुतारांचा हा गुण जर ब्रुकबॉंड सारख्या एकाद्या कंपनीला समजला तर ते त्यांना त्यांच्या अटीवर आपला एजंट करून टाकतील असे वाटल्यावाचून रहात नाही!

कारागृहांतील आठवणींचे हे पुस्तक अगदी योग्य वेळी प्रसिद्ध होत आहे. स्वातंत्र्यालढ्यामध्ये आणि साधनेमध्ये ज्यांनी भाग घेतला ती मंडळी आता वृद्धावस्थेच्या नजीक येऊन पोचली आहेत. या आठवणी वाचून त्यांच्या जिवाला विरंगुळा वाटेलच, परंतु १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालामुळे झालेली उलथापालथ आणि ढवळून निघालेले समाजजीवन लक्षात घेता हे पुस्तक वाचकांना उद्‌बोधक वाटेल अशी खात्री वाटते.

सदाशिव पेठ, पुणे २
दि. १०-३-१९६७

एस्. एम्. जोशी

प्रासाद आम्हा बंदीशाळा

१

१ गोड प्रसंग नि कडू औषध

औषधोपचार व शुश्रूषा यांत रुग्णालयाच्या प्रतीप्रमाणे आणि रोग्याच्या दर्जाप्रमाणे फरक पडतो, हा सर्वांचा अनुभव आहे. पण एक गोष्ट मात्र सामान्यपणे सर्वच रुग्णालयात आढळते आणि ती म्हणजे निवांतपणा. विश्रांती हा रोग बरा होण्याचा एक प्रमुख उपाय आहे हे तत्त्व साऱ्या वैद्य–हकिमांनी, आधुनिक डॉक्टरांनी मान्य केले आहे. या विश्रांतीसाठीच बाहेरचा गोंगाट, आरडाओरड यापासून इस्पितळ अलिप्त असावे म्हणून इस्पितळांच्या बाहेर रस्त्यावर देखील 'शांतता राखा; इस्पितळ पुढे आहे' अशा पाट्या आढळतात. १९३० सालच्या ऑक्टोबर महिन्यात मी ज्या अशाच एका रुग्णालयात पडलो होतो त्याच्या

आसपास अशा पाट्या नसतानाही शांतता होती. ही शांतता भयाण होती. तेथील सबंध वातावरणात कमालीचा रुक्षपणा, व प्रेमळपणाऐवजी भयानक उदासपणा होता. रुग्ण–परिचर्या हे भूतलावर कोमलतेचा सौजन्यशील, अदबशीर, वागणुकीचा जणू मक्ता घेतलेल्या स्त्रीजातीचे एक खास काम समजण्यात येते. पण या इस्पितळाच्या इमारतीच्या आतच काय, पण परिसरात देखील स्त्री जातीचे पाऊल पडणे शक्य नव्हते. ते इस्पितळ येरवडा तुरुंगातील होते !

गेल्या चार दिवसांत घटना अशा काही वेगाने घडून येत होत्या की त्यासंबंधी विचार करायला सवडच मिळाली नव्हती आणि विचार करायचा तो आधीच केला असल्याने त्या घटनांचे रहाटगाडगे किती वेगाने फिरले इकडे लक्षच नव्हते. आपल्या हातून घडणाऱ्या गोष्टीचे कर्तृत्व आपल्या हाती कमी असते. आपण त्या घटनांना कसे निमित्तमात्र झालेले असतो याचा अनुभव या काळात आला होता. एका मोठ्या भकास हॉलमधील नवारीने विणलेल्या लोखंडी कॉटवर वरच्या आड्याकडे लक्ष लावून अर्धवट गुंगीत मी पडलो होतो. अनिच्छेने एक एक दृश्य मनापुढून सरकत जात होते. माझ्या आजूबाजूच्या खाटांवरील चेहेरे माझ्याकडे कुतूहलाने पहात होते. ओळखीचे चेहेरे मला दुरावले होते. हळुहळू माझ्या ध्यानात येऊ लागले की, आदल्या दिवशीच्या तुरुंगातील जेवणात जे हरभऱ्याच्या डाळीचे वरण होते त्यातल्या लसणीच्या उग्र वासाने मला उलट्या झाल्या व अंगात सडकून ताप भरून बेहोष झाल्याने मला येथे आणले होते. आता ताप उतरला होता. वांत्या थांबल्या होत्या. अशक्तपणा कमालीचा असल्याने दोनतीन दिवस असेच खाटेवर पडून रहावे लागणार होते. नजर ओळखीचा कोणी दिसतो का म्हणून भिरभिरतच होती. ज्या तुकडीतून मी या तुरुंगात आलो त्या तुकडीची नि माझी ताटातूट या आजाराने केली होती. मला एकटेपणाची भयानकता एकदम जाणवली. आजारपणामुळे तुरुंगात दुर्मिळ असणारी काही सुखे येथे असली तरी ती कायमची नव्हती. आजार बरा होताच मला अनोळखी कैद्यांच्या तुकडीत सामील व्हावे लागणार नि मग आपले कसे काय जमणार, याची धाकधूक वाटू लागली. याच विचाराच्या तंद्रीत मला एक विचार सुचला नि पुनःपुन्हा तोच विचार मनात

आल्याने स्थिरावला. मग एक प्रकारचा निश्चितपणा वाटू लागला. भावना-प्रधान मनाला विचाराने हटकले. विचार मनाला म्हणाला, येथे तू तुरुंगात आहेस. स्वतःच्या इच्छेने, होणाऱ्या परिणामाकडे लक्ष देऊन आला आहेस. आता ज्या गोष्टी करणे तुझ्या हातात आहे अशाच गोष्टींचा विचार कर. ज्या गोष्टी घडणे शक्य नाही अशांबाबत विचार करून व्यर्थ मनःक्षोभ मात्र पदरी पडेल. या विचाराच्या तंद्रीतच केव्हां झोप लागली ते कळले नाही.

एक पोरगेलासा डॉक्टर, त्याच्याबरोबर दोनतीन शिपाई, काही औषधाच्या बाटल्या घेतलेला मोठ्या वाटोळ्या पिवळ्या पगडीचा वॉर्डर नि त्याच्याबरोबर एक कैद्याच्या वेषातील माणूस—दामोदर गोपाळ पंडित—माझ्या खाटेच्या रोखाने येत होते. मी उठून बसलो. त्या वॉर्डरच्या बरोबरचा माणूस कडू औषधाचा डोस माझ्या घशात ओतण्यासाठी पुढे आला नि लगेच क्षणभर थबकला. त्याने मला ओळखले नि मीही त्याला ओळखले. मी काही बोलणार तोच त्याने मला गप्प राहण्याची खूण केली. ती सारी फलटण पुढे गेल्यावर मी त्या माझ्या मित्राकडे पाहू लागलो. तोही मागे वळून पहात होता. आम्ही दोघे इतके जवळ येऊनही एकमेकांशी काही बोलू शकलो नाही. तीस सालच्या सत्याग्रहात सामील होण्याचा निर्णय त्याच मित्राच्या पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहातील खोलीत तो, मी आणि आमचा आणखी एक मित्र अशा तिघांनी घेतला होता. या निर्णयाला एक प्रकारच्या गुप्त मसलतीचे स्वरूप आले होते. कारण आम्हा तिघांनाही वडिलांकडून सत्याग्रहाला परवानगी मिळणे शक्य नव्हते. आणि म्हणून वडीलधाऱ्या माणसांना न विचारता सत्याग्रहाच्या आंदोलनात सामील होण्याचा आम्ही निर्णय घेतला होता. एखादी गोष्ट गुप्तपणाने करण्यात साहसी वृत्तीचा एक वेगळाच आनंद अनुभवास येतो. आपल्या मनातील बेत, योजना, आपल्या निकटवर्तीयांना माहीत नसता, तो बेत पार पडल्यावर त्यांना काय वाटेल याची कल्पना मनाच्या उत्साहाला एक वेगळेच उधान आणीत असते. याच उधान पाण्याच्या लाटात आम्ही पुण्यात दोन दिवस वावरत होतो. तेव्हा आम्ही तिघांचा एकत्र फोटो काढून घेतला. नाटकात विशेष गम्य नसतानाही गंधर्व नाटक मंडळीच एक नाटकही पाहिले आणि मग आपापल्या ठिकाणी परतलो. केलेले संकल्प सिद्धीस गेल्याची पावती

म्हणूनच की काय, माझ्या त्या मित्राने अशा विचित्र परिस्थितीत माझ्या तोंडात एक औंस कडू औषधाचा डोस ओतला होता. तो यूथ लीगचा डिक्टेटर म्हणून पुण्यातून पकडला गेला होता आणि मी—विलेपार्ले छावणी बेकायदा ठरविण्यात आल्यानंतर धर्मानंद कोसंबींच्या नेतृत्वाखालील त्या छावणीतले सर्व सत्याग्रही पकडले गेले त्यांत मी होतो !

२ दैत्यांची आश्रमावर धाड !

गेल्या चार दिवसांतील घडामोडींची उकल माझ्या मनाला आता स्पष्ट होत होती. विलेपार्ले येथील घोडबंदर रोडवरची सत्याग्रहींची छावणी त्या वेळी साऱ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध होती. आमची धरपकड होण्याच्या आदल्या रात्री बऱ्याच उशिरा काही महत्त्वाच्या घडामोडी होणार असल्याची कुणकुण लागली होती. काही हालचाली सुरू होत्या. पण हे सारे वरच्या पातळीवर ! आम्ही स्वयंसेवक रोजच्या प्रमाणे रात्री झोपलो होतो.

मध्यरात्रीनंतर अडीच तीन वाजण्याच्या सुमारास बुटांचे खाड खाड आवाज आमच्या भोवती होऊ लागले. सगळीकडे पोलिसांच्या बॅटऱ्यांचा प्रकाश पडू लागला. आश्रमाची शांतता भंग पावली. दैत्यांनी आश्रमावर धाड घातली होती. झोपेतून जागे होताच आम्हास तसेच अलवाणी व काही बरोबर न घेता आश्रमाच्या ध्वजवंदनाच्या मोकळ्या पटांगणात नेऊन बसवण्यात येत होते. आदल्या रात्री हाताने घातलेले आंथरूण गोळा करण्यासही सवड दिली नाही. ते आंथरूण त्यापुढे नजरेस पडलेही नाही. ते सरकारजमा झाले होते. जणू पुढचे सारे जीवनच आंथरुणाच्या रूपाने गुंडाळले गेले ! कोणताही सत्याग्रह न करता, कसलाच कायदा न मोडता, सत्ताधाऱ्यांनी आमचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते नि ते देखील रात्रीच्या

घन अंधारात. अंगणात आल्यावर सभोवार पाहिले तो सत्याग्रही छावणीस असंख्य पोलिसांचा वेढा पडला होता. बाहेर रिकाम्या मोठ्या मोटारी उभ्या होत्या. एकाने दुसऱ्यास, दुसऱ्याने तिसऱ्यास सांगता सांगता कुजबुज कानावर आली की आश्रमाची कसून झडती घेत आहेत. पण लौकरच समजले की सारा आश्रम, सारी छावणी जप्त करण्यात आली होती व आम्हा सर्वांस सामुदायिकरीत्या अटक करण्यात आली होती. आमचे कपडे, आमचे तुटपुंजे सामान आम्हास मिळणार नव्हते. आश्रमाचे नोकर असलेले आचारी, वाढपी, दरवान, दिवाबत्ती करणारे, झाडलोट करणारे सर्वांना अटक करण्यात आली असून मोटारीत जाऊन बसण्याचा हुकूम करण्यात आला. आमचे नेते धर्मानंद कोसंबी व इतर पदाधिकारी पोलिस अधिकाऱ्यांशी बोलत होते. हा सगळा प्रकार होईपर्यंत आश्रमाची नेहमीची प्रार्थनेची वेळ झाली. 'आमची प्रार्थना होईल नि मग आम्ही तुमच्या मोटारीत बसू' असे अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. त्या वेळची ती पोलिसांच्या पाहऱ्यातील प्रार्थना अजूनही स्मरणात आहे. त्या वेळी म्हटलेला तुकारामांचा अभंग मुळातच प्रेरक व स्फूर्तिदायक नि त्यात अशा गंभीर वातावरणाचा भर पडल्याने तो चिरस्मरणीय ठरावा हे स्वाभाविकच आहे. तो अभंग असा :

भक्त ऐसे जाणा जे देही उदास ॥ गेले आशापाश निवारूनी ॥ विषय तो त्यांचा झाला नारायण ॥ नावडे धन–जन मातापिता ॥ निर्वाणी गोविंद असे मागेपुढे ॥ काहीच साकडे पडो नेदी ॥ तुका म्हणे सत्यकर्मा व्हावे साह्य ॥ घातलिया भय नरका जाणे ॥

प्रार्थना संपल्यावर सत्याग्रहींच्या मोटारी पोलिस पहाऱ्यात वांद्रा येथील कोर्टाच्या आवारात आणण्यात आल्या. तेव्हा चांगलेच उजाडले होते. लोकांचे थवे कोर्टाच्या बाहेर गोळा झाले होते. वृत्तपत्रात सरकारने मध्यरात्री काढलेल्या वटहुकुमाची बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीत म्हटले होते की सरकारने सत्याग्रही छावण्या या बेकायदा संस्था ठरवल्या असून त्या संस्थांची सर्व मालमत्ता सरकारजमा करण्यात येईल व त्या संस्थेच्या आवारातील सगळ्यांना बेकायदा संस्थेचे सदस्य म्हणून अटक

करण्यात येईल. सरकारचा हा वटहुकूम प्रसिद्ध झाल्याचे आम्हास व इतर कोणासही समजण्याच्या आत त्याची अंमलबजावणी आमच्यावर करण्यात आली होती. सत्याग्रहाचे आंदोलन सरकारला चांगलेच बोचू लागत असल्याची ही खणूच होती. अटकेचे कारण समजले तरी सत्याग्रहींनी न्यायालयात आपला बचाव करायचा नाही, होईल ती शिक्षा निमूटपणे सोसायची, असा दंडक असल्याने कायद्याचा कीस काढून अटकेतून सोडवून घेण्याचा प्रश्नच नव्हता. त्या छावणीतील सुमारे ६५ लोकांना अटक करण्यात आली होती. या सत्याग्रहींत काही स्त्रियाही होत्या. प्रश्न होता तो आश्रमात नोकर म्हणून काम करणारांचा. त्यांच्यातर्फे ते नोकर असल्याचा बचाव देण्यात आला व ते सुटलेही. आम्हां बाकीच्यांवर अटकेचे कलम लावून, नावगाव विचारून आरोपपत्रिका भरण्यास सुरुवात झाली. त्याच्या आधी इतरत्र सत्याग्रहींना ज्या शिक्षा झाल्या त्यांत दंडाच्याही शिक्षा देण्यात येत. हा दंड सत्याग्रहींच्या घरची मालमत्ता विकूनही वसूल केल्याची उदाहरणे घडली होती. ही सारी चर्चा आमच्यावर आरोपपत्रिका भरण्यात येत असताना होत होती.

३ दैत्यांच्या राज्यात पाऊल

कोर्टातला हा सारा वेळ फार कंटाळवाणा गेला. पहाटे अटक केल्यानंतर खाण्यासही काही दिले नव्हते. कोर्टात दुपारी चणेकुरमुऱ्याचा भत्ता देऊन वेळ भागवली होती. सायंकळी सगळ्या आरोपींवरील खटल्याचा निकाल लागल्यावर आम्हा सर्व कैद्यांना ठाणा तुरुंगात रवाना करण्यात आले. सहा महिन्यांसाठी आता आम्ही सरकारचे पाहुणे झालो होतो. हा पाहुणा सरकारच्या दृष्टीने सन्माननीय नसून गुन्हेगार होता !

ठाणे तुरुंगात आम्ही पोचलो तेव्हा रात्र झाली होती. तुरुंगातील सैपाकघरास सायंकाळीच कुलूप लागत असल्याने आमची खाण्यापिण्याची काहीच सोय नव्हती. सकाळपासून जेवण असे मिळालेले नव्हते. तुरुंगाचा भयाणपणा त्या वेळी जाणवला नाही. कारण आम्ही पन्नाससाठ जण एकदम आलो होतो. एवढ्यांची सोय करण्यासाठी जेलरची धावपळ सुरू झाली. तुरुंगात सत्याग्रहींचा असा मोठा जथ्था आला की त्याची वर्दी तेथे आधीच जाऊन बसलेल्यांना लगेच मिळे. आमच्या आधी तेव्हा ठाण्याच्या तुरुंगात बडे बडे पुढारी गेले होते. त्यांनी जेलरशी रदबदली केली. आम्हास काही खाण्यास दिले पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. तेव्हा जेलच्या अधिकाऱ्यांनी बाहेरून बाजारातून भेळ-कुरमुरे आणून आमची भूक भागवली. तो सारा दिवस नि ती रात्र मोठ्या धांदलीची गेली. मिळेल ते तुरुंगातील आंथरूण-पांघरूण घेऊन आम्ही झोपण्यासाठी आंथरुणावर पडलो. पण जाड्याभरड्या, अंगास बोचणाऱ्या काथ्याची चटई नि कुबट घाण येणारे पांघरूण पाहताच झोप उडाली.

दुसरे दिवशी सकाळी तुरुंगाच्या आवाराचे दर्शन घडले. पण त्या तुरुंगात सर्व जागा भरल्याने आमची रवानगी त्याच दिवशी पुण्याच्या येरवडा तुरुंगात करण्यात येणार असल्याची बातमी आम्हा कैद्यांच्या घोळक्यात पसरली. प्रवास हा जसा बाहेरच्यांना तसाच तुरुंगातील कैद्यांनाही मोठा आनंदाचा वाटतो. प्रवासामुळे बाहेरच्या जगाचा संबंध जडतो. हा कैद्याच्या दृष्टीने मोठा लाभ! आम्ही कैदी म्हणून रुळण्याच्या आतच आम्हाला प्रवास घडणार होता. आमची तिकिटे काढणे, वाहनांची सोय करणे या साऱ्या गोष्टी आमच्या यजमानाकडून व्हायच्या असल्याने आम्हाला कसलीच तयारी करायची नव्हती. तसेच केवळ अंगावरच्या कपड्यानिशी आम्हाला अटक झाली असल्याने कैद्याचे असे सामानही आमच्याजवळ नव्हतेच.

कैद्यांना, विशेषतः राजकीय कैद्यांना एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात नेताना त्यांना कुठे नेण्यात येत आहे याबाबत गुप्तता पाळण्यात येते. कैद्यांच्या येण्याजाण्याची वार्ता प्रसिद्ध झाल्यास लोक त्या त्या स्टेशनवर कैद्यांना

भेटण्यासाठी गर्दी करतील या धास्तीने ही गुप्तता पाळण्यात येत असे. ही गुप्तता कितीही पाळली तरी तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना सत्याग्रहींबद्दल वाटणाऱ्या आपुलकीच्या झऱ्यातून ती बातमी बाहेर झिरपत असे. आमच्या कैद्यांचा जथा मोठा असल्याने बातमी लगेच बाहेर गेली होती. स्टेशनवर पुढे वाटेत आमच्यासाठी काही खाण्याच्या वस्तू लोकांनी आपणहून पाठवल्या. पंढरीच्या भाविक वारकऱ्यांकडे सामान्य जनता जशी आदराने, कौतुकाने पहाते तशीच पोलिसांच्या पहाऱ्यातील सत्याग्रहींकडे पाहण्याची दृष्टी त्या वेळी जनतेची होती. हे लोक गांधीचे आहेत, ते देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपणहून तुरुंगात जात आहेत अशी कृतज्ञतेची भावना आम जनतेची होती. या कौतुकाच्या नजरा आपल्याकडे वळल्या आहेत असे दिसून येताच साऱ्याच सत्याग्रहींना आपण कोणीतरी असल्याची जाणीव होई. ही जाणीव न होणारा एखादा स्थितप्रज्ञ असेलही. पण तो विरळाच. पोलिसांच्या पाहऱ्यात प्रवास करण्याचा हा पहिलाच प्रसंग. पण तोही इतर पुष्कळ सत्याग्रहींबरोबर होत असल्याने आम्ही कैदी नसून एखादी विजयी तुकडीच एखादा गड सर करून आली आहे अशीच आमची मनोवृत्ती होती.

खडकी स्टेशनवर आम्हाला उतरवून घेण्यात आले नि मग मात्र आमच्या प्रवासातील कौतुकाचा भाग संपल्याची जाणीव झाली. तेथे आलेल्या पोलिसांच्या बंद गाड्यांतून आम्ही येरवडा तुरुंगाकडे, त्या काळातील सत्याग्रहींच्या भाषेत सांगायचे म्हणजे येरवडा मंदिराकडे निघालो. मुंबई राज्यात येरवडा व साबरमती हे मोठे तुरुंग मानले जात. त्यातल्या त्यात येरवड्याचा लौकिक कडक शिस्तीसाठी व कैद्यांच्या छळासाठी प्रसिद्ध होता. या शिस्तीच्या व छळाच्या गोष्टी ऐकत असताही आपण मोठ्या तुरुंगात जाणार याचेच महत्त्व मनाला वाटत होते. सुरीची धार, मग ती पोलादाची असो, वा सोन्याची असो, सारखीच घातक असली तरी सोन्याच्या सुरीचे आकर्षण जास्त वाटते, त्यातलाच हा प्रकार होता.

येरवडा तुरुंगाबाहेर आमच्या मोटारी थांबल्या. ठाण्याहून निघताना तेथील तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी आमच्याबरोबर दुपारचा भत्ता म्हणून भाकरी दिल्या होत्या व वाटेत पाणी पिण्यासाठी मातीची मडकी दिली

होती. त्या भाकऱ्या जेलच्या जेवणाचा प्रसाद म्हणून वाटेत स्टेशनवर भेटलेल्यांना आमच्यापैकी काहींनी दिल्या होत्या. जेलमधील जीवनाबद्दल केवळ जेलमध्ये जाणाऱ्यापेक्षा बाहेरच्यांनाच फार उत्सुकता तेव्हा वाटत असे आणि म्हणून जेलची भाकरी तेव्हा कौतुकाचा विषय होऊन राहिली होती. बाहेरच्यांच्या कौतुकाचा विषय बनलेले हे कैद्यांचे जीवन अंगीकृत व्रताचा एक भाग म्हणून आता अनुभवण्यास मिळणार या कल्पनेत दंग असताना पोलिसाच्या करड्या आवाजातले हुकूम जेलची तोंडओळख करून देत होते. आमची ' गिनती ' सुरू झाली. हवालदार, वॉर्डर यांच्या अनेक कामात गिनतीला फार महत्त्व असल्याचे पुढे वारंवार दिसून आले. तरी या पहिल्या गिनतीचा प्रकार काही वेगळाच होता व ही आठवण चांगलीच राहिली आहे. तुरुंगाचे दार बाहेरून फार मोठे दिसते. पण ते सताड कधीच उघडे असत नाही. सन्माननीय अधिकारी अगर सामानाची नेआण करणारी गाडी आली तरच ते संबंध महाद्वार खुले होते. नेहमीच्या कैद्यांच्या येण्याजाण्यासाठी मोठ्या दाराच्या एका फळीला बारीकशी चोरदरवाजासारखा लहान दिंडी–दरवाजा असतो. या दिंडी-तून जायचे म्हणजे डोके खाली वाकवून अंग किंचित दुमडूनच आत जावे लागते.

या बारीक दिंडी दरवाजाच्या आत कोणी उभे असेल याची कल्पना बाहेरून येत नाही. मी मोठ्या उत्सुकतेने मान खाली वाकवून ओणवा होऊन दरवाजाच्या आत पाऊल टाकले, तोच मानेवर एक हात पडून त्या हाताच्या मालकाने तोंडाने हिंदी भाषेत गिनतीचा क्रमांक मोठ्याने उच्चारला. मानेवर पडलेला हात म्हणजे एक गचांडीच होती. त्या गचांडीने डोळ्यापुढे क्षणभर काजवे चमकले व आपण तुरुंगात दैत्यांच्या राज्यात पाऊल टाकल्याची जाणीव झाली. त्या दिवशी सायंकाळचे जेवण झाले. तुरुंगातील साग्रसंगीत 'क' वर्गाचे असे ते पहिलेच जेवण होते. दोन जाड्या भाकऱ्या नि एका थाळीत भाजी, असे ते जेवण पाहून हातातील अन्न तोंडात जाण्याच्या आधीच भूक नाहीशी झाली. तेच अन्न बळे बळे खात असताना लसणीच्या उग्र वासाने उलटी झाली. रात्री अंगात ताप भरला. दोन दिवसांपूर्वी विलेपार्ले छावणीत अपरात्री अटक झाल्यापासून जो

सरकारी पाहुणचार सुरु झाला होता त्यापुढे प्रकृतीने हार खाल्ली नि तुरुंगातील सारे सोपस्कार होण्याअगोदरच तेथील इस्पितळात दाखल व्हावे लागले. तुरुंगात आजार आला तरी इस्पितळात रवानगी सहजासहजी होत नाही. उलट्या झाल्या तर पोट साफ झाले, चांगले झाले, असे मानतात, इस्पितळात जाण्यासाठी मुद्दाम उलट्या केल्या असेही वॉर्डरशिपाई मानतात. खरेपणा नि विश्वास या गोष्टी तुरुंगाच्या आवारात कैद्यांच्या व शिपायांच्या बाबतीत क्वचितच आढळतात. मला उलट्या होऊन ताप भरताच लगेच इस्पितळात नेले हे माझे भाग्यच होते असे माझ्या बरोबरच्या कैद्यांना वाटले. मलाही इस्पितळात भाग्य वाटले. पण ते आजारीपणात मिळणाऱ्या सवलतीपेक्षा तेथे माझा मित्र दिसला या घटनेचे !

५ तुरुंगांतील कडक शिस्त

माझे आजारपण दोन–तीन दिवसांत संपले नि आता पुढें काय होणार याची हुरहुर मनाला लागली. तुरुंगात येण्याची ही पहिलीच वेळ आणि येरवडयाच्या कडक शिस्तीबद्दल आधीच पुष्कळ ऐकलेले. या कडकपणाचा प्रत्यय जेलच्या दरवाजातून आत प्रवेश करतांना मानेवर पडलेल्या थपडेने आलाच होता. तुरुंगात पाऊल टाकताच आजारी पडल्यामुळे आत आल्यावर कैद्यावर होणारे सारे सोपस्कार माझ्या बाबतीत अजून व्हायचे होते. तुरुंगातील वातावरणाचा परिचय होण्याच्या अगोदर जी हुरहुर वाटत असते, तीत कुतूहलापेक्षा भीतीचाच भाग जास्त असतो. साधारण बरे वाटताच मला 'क' वर्गाच्या कैद्यांच्या बराकीत नेण्यात आले. अंगावरचे कपडे काढून त्यांचे गाठोडे बांधून त्यावर नाव लिहून कैद्याचे कपडे अंगावर चढताच भोवतालचे सर्वच जण आडव्या

प्रथा काळ्या पट्ट्यांच्या मांजरपाटी पोशाखात वावरत असल्याने मीही यातलाच एक झालो. मुंडेछाट अर्ध्या हातांचे दोन शर्ट, दोन टोप्या, दोन चड्ड्या, दोन लंगोट्या, एक रुमाल हे आमचे कपड्यांचे वैभव. कपडे धेतल्यावर कोठीच्या दालनातून सुमारे नऊ इंच उंचीचे एक जस्ताचे उभट भांडे नि एक थाळीवजा वाडगा अशी दोन भांडी मिळाली. अंगावरचे कपडे सुताड्यासारखे जाड तशीच ही भांडी जाडजूड व भक्कम होती. लोखंडाच्या रंगाशी स्पर्धा करणारी ही भांडी घासून घासून आरशासारखी चकाकतात. वीस वीस वर्षांची शिक्षा झालेले तुरुंगातील वतनदार मिरासदार कैदी ही भांडी विटकरांची माती कुट्टून त्या मातीने घासून लख्ख ठेवीत व सोमवार सकाळच्या सुपरिटेंडेंट-जेलर-आरोग्याधिकारी यांच्या साप्ताहिक फेरीत त्या चकाकणाऱ्या भांड्यांच्या सान्निध्यांत उभे राहात.

तुरुंगात ज्या अनेक गोष्टी खटकल्या त्यांत कपड्यांच्या दारिद्र्यापेक्षा भांड्यांचे दारिद्र्य फारच जाणवले. सकाळच्या शौचविधीसाठी वेगळे पाण्याचे भांडे नसल्याने याच भांड्यातून पाणी घेऊन जावे लागे व तेच भांडे स्वच्छ घासून पुसून जेवताना पाणी पिण्यासाठी द्यावे लागे. दिवसभराच्या सर्व व्यवहारात ही दोनच भांडी वापरायची. याला कोणी अतीव साधेपणा म्हणेलही. पण या साधेपणाचे अंतिम टोक मनांला पाणी पिताना वाटणाऱ्या ओंगळपणापर्यंत जाते हे अनुभवानेच पटते; आणि पुन्हा गंमत ही की परिस्थितीने ही गोष्ट एकदा सक्तीने लादल्यावर मग तीमधील ओंगळपणाही अंगवळणी पडतो, ही जेलमधील 'क' वर्गीय कैद्यांच्या जीवनाची एक काळी छटा आहे. मला शिक्षा सक्तमजुरीची होती. कैद्याला तुरुंगात कोणतेही काम द्यायच्या अगोदर त्याची मुख्य आरोग्याधिकाऱ्याकडून शारीरिक तपासणी होते. या तपासणीसाठी दुसऱ्या दिवशी हातात कैद्याची ओळख पत्रिका (History Ticket) देऊन अनोळखी कैद्यांच्या रांकेत मला बसवण्यात आले. तुरुंगाच्या दारात पाऊल टाकताच मला आलेल्या आजाराचा एक परिणाम असा झाला की पकडल्यापासून आम्हा सर्वांचा जो एक जथा होता त्या जथ्यातून मी अलग पडलो. आपल्या आजूबाजूस आपल्या परिचयाची माणसे असणे हे आनंदाच्या प्रसंगी एरवी जितके आनंद वाढण्यास कारणीभूत

होते त्यापेक्षाही तुरुंगाच्या भिंतींच्या आत आपल्यावरोबर ओळखीचे स. कारी असणे फार उत्साहवर्धक ठरते. हॉस्पिटलच्या बाहेर पडल्यापासून भोवताली माणसे असूनही मी एकटा पडलो होतो. सतत सावध चित्त, डोळ्यांत कुतूहल नि अस्थिर वृत्ति यांनी घेरलेल्या अवस्थेत मी त्या आरोग्य अधिकाऱ्यापुढे मोठ्या रांकेत बसलो होतो. आजूबजूस निरखून पाहू लागलो. त्या अधिकाऱ्याच्या मागे पुढे मोठ्या वाटोळ्या पिवळ्या टोप्या घातलेले वॉर्डर व पोलिस शिपाई उभे होते. जरा अंतरावर मोकळ्या जागेत एक मोठे तिकाटणे होते. लहानपणी आमच्या खेड्यातील शाळेत तिकाटण्यावर भला मोठा काळा फळा असे. या तिकाटण्यावर तसा फळा नव्हता. जरा चौकशी केल्यावर फटके मारण्याची शिक्षा झालेल्या कैद्यास या तिकाटण्या-वर त्याची पाठ वरच्या वाजूस करून त्याचे हात नि पाय घट्ट बांधतात नि मग त्याच्या पाठीवर विरविरीत फडके टाकून वर मिठाच्या पाण्यात बुडवलेले वेत सपासप ओढतात, अशी माहिती मिळाली. ते भकास नि भयप्रद वातावरण नि त्यात ते भेसूर तिकाटणे पाहून या नव्या जगात आणखी काय काय चिजा असतील याचा विचार मनात सुरू झाला. बऱ्याच वेळाने माझी तपासणी झाली. छातीला स्टेथॉस्कोप लावून डॉक्टराने त्रुजबी शरीरतपासणी केली व त्याच्या पुढे ठेवलेल्या माझ्या तिकिटाच्या मोठ्या जाड कार्डावर काही शब्द खरडले. माझी रवानगी परत जेलच्या बराकीत झाली.

रात्री मोठ्या लांबच लांब अशा त्या बराकीत आंथरुणावर पडल्यावर किती तरी वेळ झोप आली नाही. त्या दिवशीचे संध्याकाळचे भाकरी-भाजीचे जेवण यथातथाच झाले. पन्नास पाउणशे कैद्यांची पंगत असल्याने जेलचे कदान्न काही तरी पोटात जाते. पण झोपेचे तसे नाही. शेजारचा माणूस स्वस्थ झोपलेला पाहून आपल्याला लौकर झोप येण्यास काही मदत होत नाही. या बाबतीत ज्याचा तो असतो. त्या दिवशी रात्री त्या लांबच लांब आणि अंधुक प्रकाशाच्या बराकीत मी आंथरुण पसरले. आंथरुण म्हणजे अडीच फूट रुंद व सहा फूट लांब असे एक जाडे काथ्याचे तरट, त्यावर जाड सुताड्याची चादर व पांघरायला ब्लँकेट. या आंथरुणावरून माणसाच्या देहाला किती जागा लागते हे समजून येते. ऐसपैस लोळण्याला

प्र[illegible] जागा नसतेच, पण उशाला देखील 'हात असता आपणापाशी मग कशास पाहिजे उशी' या चरणाचे प्रात्यक्षिकच अनुभवास येते. हे सारे आंथरुण धड मिळणेही तेव्हा कैद्यांच्या मोठ्या संख्येमुळे दुर्मिळ होते. प्रथम काही दिवस रात्री झोप येत नाही. कारण बाहेरच्या आठवणीच्या चिमण्या याच निवांत समयी मनात किलबिल करू लागतात. कडक शिस्त तर एवढी की शेजारच्या कैद्याशीही बोलण्यास मनाई. आपले आंथरूण सोडून हिंडता फिरताही येत नाही. लघवीस जायचे असेल तर त्यासाठी वॉर्डरची परवानगी घ्यावी लागते. लंघवीची सोय बराकीच्या कोपऱ्यातच आतून बाहेरून रोज डांबर लावीत असलेल्या पिंपांतून केलेली असे. सकाळी पाच वाजता बराकीत हालचाल सुरू होई. 'लपेट बिस्तरा' असा वॉर्डरचा खड्या सुरात हुकूम होताच आंथरुण गुंडाळून त्याच्या बाजूला उकिडवे बसायचे. सगळ्या कैद्यांची मोजणी झाली की 'जोडी जोडी चलना' असा हुकूम होताच आपापली आंथरुणे घेऊन ती बराकीबाहेरच्या मोकळ्या जागेत मांडायची असतात. नंतर शौचविधीच्या कार्यक्रमाची सुरुवात. ज्याला त्याला आपल्या मर्जीप्रमाणे संडासाकडे जाता येत नसे. येथेही रांका संडासाच्या दिशेने लागलेल्या असायच्या. संडासाला पुढे दार नसायचे. असा हा शौचविधी झाल्यावर आवारातील पाण्याच्या हौदावर कैद्यांना नेण्यात येई. तेथे गेल्यावर हौदातील पाण्याने तो एकदम तोंड धुणे व आंघोळ करील तर वॉर्डरच्या शिव्या नि प्रसंगी शिपायाचा बडगा पाठीत बसलाच म्हणून समजावे. हौदावर वॉर्डर प्रयागच्या पंड्याच्या रुबाबात संकल्प सांगायला सुरुवात करतो, 'पकड थालीपॉट, वाक नीचे, लेव पाणी' हा संकल्प कानी पडल्यावरच त्या हौदातल्या पाण्याला स्पर्श करायचा. ही कडक शिस्त येरवडा तुरुंगांप्रमाणे इतरत्रही त्या वेळी होती.

सत्याग्रहींसाठी म्हणून येरवड्यास मुख्य तुरुंगाबाहेर ज्या तंबूंच्या बराकी होत्या त्यांत शिस्त जरा कमी प्रमाणात आढळे. माझ्या कैदी तिकिटावर आरोग्याधिकाऱ्याने 'अशक्त हृदय' (Heart Weak) असा शेरा मारला होता आणि म्हणून चक्की पिसण्याच्या कडक कामाला मी अपात्र ठरलो होतो आणि म्हणूनच की काय, माझी बदली लगेच येरवडा तुरुंगाबाहेरील तंबूंच्या कापडी बराकीत झाली. ज्या दारातून आत जाताना

मानेला गचांडी मिळाली होती, त्याच दारातून बाहेर जाताना 'सुटू एकदाचा' असे वाटले. वास्तविक बाहेरचाही तुरुंगच होता. नोव्हेंबर डिसेंबर थंडीचे दिवस. या दिवसात त्या माळावरील तंबूत थंडीवारा जास्त हे माहीत असूनही दगडी पक्क्या बराकीतून बाहेरच्या तुरुंगात जाण्याची उत्सुकता सत्याग्रही कैद्यांत आढळे. तसा प्रयत्न काहींकडून होत असे असे नंतर समजले. मला आपसूखच बाहेर जाण्यास मिळाले. याला मदत माझ्या त्या आजाराचीच झाली होती. त्या आजाराने माझे वजन बरेच कमी झाले होते. नंतर शारीरिक तपासणी झाली. प्रारंभी वाटणारे संकट हे पुकष्ळदा उपकारक ठरते, हा अनुभव माझ्या या आजारपणाने आणून दिला. बाहेरच्या तंबूंच्या वातावरणात आलो. ते तंबू काटेरी तारांच्या कुंपणाचे होते. कानाला अपशब्दाचा नि पोटाला कदान्नाचा खुराक येथेही होताच. पण सगळे कैदी सत्याग्रही असल्याने वातावरण उमेदीचे होते.

तुरुंगात कडक शिस्तीप्रमाणे आरोग्याच्या नियमांचेही पालन बाह्यतः तरी कडक असते. बाहेरून आत आलेला कैदी इतर कैद्यांत मिसळण्याच्या अगोदर त्याला देवीचे व्हॅक्सीन, कॉलरा, टायफॉइडचे इंजेक्शन देण्यात येते. वेगळे ठेवण्यात येते. या बराकींना 'क्वारंटाईन यार्ड' म्हणत. मला तंबूत आल्यावर ही इंजेक्शने देण्यात आली. आजाराने आलेल्या अशक्तपणामुळे या इंजेक्शनची प्रतिक्रिया जोराची झाली. जगाचा भलाबुरा अनुभव येण्याच्या आधीच तुरुंगात जाण्याची पाळी आणि तीही घरच्या माणसांना न कळवता यावी आणि त्यातही आजाराने गाठावे म्हणजे मनस्थिति फारच चमत्कारिक होते. या अवस्थेत मनाला एक मोठा आधार नि समाधान असते ते आपण हे सारे देशाकरिता, आपल्या स्वतःच्या मनाने करीत आहोत या जाणिवेचे. पहांटे अगर मध्येच केव्हा जाग आली की बाहेर येऊन आकाशाकडे पाहण्याची मौज मात्र या तंबूंच्या बराकीत अनुभवली. या तंबूबाहेर चोहो बाजूस थोडे अंतर सोडून काटेरी तारांचे कुंपण होते. दगडी भिंतीचे तट नि काटेरी तारांचे कुंपण ही कैद्यांना बाहेर जाऊ न देण्याचे आपले काम चोख बजावतात. तरी दगडी भिंत नि काटेरी तारांचे कुंपण यांपैकी तारांचे कुंपण कैद्याला अधिक पसंत पडते. दगडी भिंतीने नजर अडते. काटेरी तारा तसे तरी करीत नाहीत.

अनुक्रम ७५८३६ वि: ....
अंक ४११५ बो: वि: ....

५ अखेर दगडफोड्या झालो !

बाहेरचे वातावरण मोकळे असले तरी ते तुरुंगातील वातावरण होते. माझी कैद सक्तमजुरीची होती. या सक्तमजुरीतील 'सक्त' शब्दाला कैद्यांच्या मोठ्या संख्येने बोथटपणा आला असला तरी काम न दिले तर तो तुरुंग कसा राहणार ? आणि म्हणूनच देण्यासारखे काम नसताना आम्हांला काथ्याच्या दोऱ्या वळण्याच्या कामावर बसविण्यात येत होते. सक्तमजुरी कैद्याला दिली आणि त्याला देण्यासारखे काम तुरुंगाधिऱ्यांकडे नसले म्हणजे त्यांची कशी पंचाईत होते हे येथे चांगलेच अनुभवास आले. काथ्याच्या तंतूंचा पसारा आमच्यापुढे आणून टाकल्यावर तंतूंपासून दोरी कशी वळावयाची, हे मला आजवर कधीच माहीत नव्हते. दुकानात काथ्याच्या दोऱ्यांची लहान-मोठी वेटोळी लहानपणापासून पहात आलो होतो. खेडेगावात काथ्याच्या दोरीचा उपयोग पदोपदी होत असे. माताची पोती बांधणे, मांडवाचे वासे एकास एक जोडणे, शेतकऱ्यांच्या झोपड्या उभारणे, रहाटासाठी मोठा दोरखंड हे सारे काथ्यापासून विणतात हे पुस्तकी ज्ञान पाठ होते. पण येथे येरवड्याच्या तंबूत तो काथ्याचा ढिगारा समोर ठेवून लहानपणी मराठी शाळेत पुस्ती काढण्यासाठी उपडी मांडी घालून जसे बसत असू तसे बसायचे आणि काथ्याचे दोर तळहाताने मांडीवर वळू लागायचे. तीस ते चाळीस हात दोरी वळावी असा संकेत असला तरी प्रत्यक्षात ती पाच-दहा हातही होत नसे आणि ती तितकी भरते की नाही हेही त्या कामावर नेमलेले अधिकारी पहात नसत. यात राजबंद्यांबद्दल वाटणारी सहानुभूती असे असेच म्हणता येणार नाही. एवढ्या राजबंद्यांना दोरी वळण्यासाठी पुरेसा काथ्याच तेव्हा तुरुंगाधिकाऱ्यांकडे नसे ! पुष्कळदा अशीही शंका येई की काथ्याच्या वळलेल्या

दोऱ्या उलगडून तयार झालेला काथ्या आमच्या पुढ्यात सक्तमजुरीच्या श्रमासाठी ठेवला जात आहे ! हाताने काथ्याच्या दोऱ्या वळताना तोंडानें गप्पा सुरू असायच्याच. सक्त मजुरीच्या कैद्यांनी स्वस्थ बसू नये, झोपू नये, खेळू नये याच हेतूने असली काहीतरी कामे कैद्यांपुढे ठेवण्यात येत.

या काथ्याच्या दोऱ्या वळतांना काथ्याचे तंतू एकमेकांशी कसे जोडले जातात याची मोठी गंमत वाटे. चार-पाच इंच व कधी त्याहूनही लांब असलेले चरबट, राकट असे ते काथ्याचे तंतू एकात एक मिसळून त्यांची दोरी बनण्याची किमया कशामुळे होते हे लक्षात आल्यावर पीळ या शब्दाचा अर्थ उलगडत गेला. तंतू एकमेकांत मिसळतात ते वळले जात असताना निर्माण होणाऱ्या पिळाच्या प्रक्रियेने. हा पीळ डोळ्यांना दिसत नाही. पण समोरच्या एकमेकापासून अलग असलेल्या काथ्याच्या तंतूंना एकमेकाशेजारी मांडीवर ठेवून हाताने ते तंतू वळवले म्हणजे एकत्र येतात तेच मुळी दोरीच्या रूपात ! या दोरीच्या शेवटी असलेल्या मोकळ्या तंतूंच्या टोकात दुसऱ्या अशाच तंतूंची गुंफणी या क्रियेनें होत असते. कसलाही गोंद व इतर तत्सम पदार्थ न वापरता हे तंतू एकमेकाशी कसे घट्ट बसतात याचे उत्तर 'पिळामुळे' असे येते. हा पीळ डोळ्यांना दिसत नाही,पण त्याच्या अस्तित्वाचा पुरावा दोरीच्या रूपाने पुढे दिसत होता. मी सहज माझ्या अवतीभवती नजर टाकली. माझ्या परिचयाच्या नसलेल्या असंख्य लोकांमध्ये मी येऊन पडलो होतो. यांचे माझे कसलेच नाते नव्हते. तरीपण आम्हा सर्वांमध्ये विस्कळीत रूपात असलेल्या काथ्याची दोरी बनावी तशी एकरूपता, तात्पुरती का होईना आली होती. या एकरूपतेला एकत्र येण्यालाही असाच एक अदृश्य पीळ कारणीभूत झाला होता. त्या पिळाचे नांव राष्ट्रभक्ती. दोरी वळता वळता, माणसामाणसांच्या एकत्र येण्याला एखाद्या समान पिळाची कशी आवश्यकता असते ते लक्षात येऊन मोठी मौज वाटली. तुरुंगातील कंटाळवाणा काळ आनंदी भासतो तो अशा प्रकारच्या कल्पनाविलासानेच. या कल्पनाविलासाला कुठल्याच बाह्य स्वरूपाच्या बंदीचा, काटेरी तारांचा वा दगडी भिंताडाचा, अडथळा येत नाही. सुंभ जळाला तरी पीळ राहतो, या म्हणीतला शाश्वत स्वरूपाचा पीळ आपण काथ्याला देत आहोत नि त्या पिळामुळे विस्कळीत काथ्या दोरीच्या रूपाने माणसाच्या उपयोगी हरतऱ्हेने

प्राप्त पडतो हे सारे लक्षात येऊ लागले. अंतःकरण पिळवटून येणे, अंतःकरणाला व पीळ पडणे हा सारा काय प्रकार असतो हे लौकिक अर्थाने काथ्याच्या दोऱ्या वळणाऱ्याच्या लक्षात कधीच येणार नाही. ते तसे लक्षात येण्यासाठी मानी मनाच्या महापुरुषांच्या सन्निध्यात रहावे लागते. ते भाग्य न लाभले तर त्यांची चरित्रे तरी वाचावी लागतात.

काथ्या संपला म्हणून म्हणा किंवा आम्हाला तंबूच्या छायेत वार्ताविलाप करीत मजेत वेळ घालवीत असल्याचे पाहून ते न आवडल्यामुळे म्हणा, काथ्याच्या दोऱ्या करण्याच्या कामातून आमची लौकरच मुक्तता झाली. काथ्याच्या दोऱ्या वळण्याचे काम बंद झाल्यावर आम्हाला कोणते काम देतात याबाबत उत्सुकता सहजच वाढली. कोणत्याही गोष्टीत बदल होण्याची शक्यता निर्माण झाली म्हणजे साहजिकच कुतूहल वाढते. बाहेरच्या जगातहि ही मनःस्थिती अनुभवास येते. तुरुंगात तर त्याच त्याच परिस्थितीचा कंटाळा येस असल्याने कोणताही बदल होण्याची शक्यता ही तुरुंगात आपसांतील गप्पांना तशीच तर्क-कुतर्कांना खूप उधान आणते. आम्हांला कोणते काम मिळणार याची चर्चा चालू असताच एके दिवशी सकाळी कंजी पिऊन झाल्यावर आम्हांला बाहेरच जोडी जोडीने बसविण्यात आले नि एकेकाच्या हातात खडी फोडण्याचे हातोडे देण्यात आले ! दगड फोडण्याच्या कामावर आमचा फैल–तुरुंगातील टोळी या शब्दाचा प्रतिशब्द–पाठविण्यात येणार होता. दगड फोडण्याच्या कामाची धास्ती वाटली नाही. उलट त्या निमित्ताने तंबूच्याही तुरुंगाबाहेर काही काळ रोज जाण्यास मिळणार याचाच आनंद वाटला.

शिपाई नि वॉर्डर यांच्या लवाजम्यासह हातांत दगड फोडण्याचे छोटे हातोडे घेऊन आम्ही तुरुंगाजवळील एका दगडी खाणीच्या रोखाने निघालो. एका ठिकाणी सुरुंग लावून फोडलेल्या मोठ्या दगडांच्या राशी होत्या तिथे आम्हांला नेण्यांत आले. आमच्या आसपास बाभळीची झाडे भरपूर होती. धारदार दगडांच्या राशीतून रस्त्यावर पसरतात तशी बारीक खडी करण्यास आम्हांला सांगण्यात आले. जीवनातला हा नवीनच अनुभव होता. डोक्यावर सावली नाही, सभोवार जिकडे तिकडे खाणीतले

अखेर दगडफोड्या झालो !

दगड. त्या दगडांवर हातातल्या त्या हातोडीने प्रहार करावयाचा आणि एकात्म असलेल्या मोठ्या दगडातून अनेक छोटे दगड खडीच्या रूपाने तयार करायचे. उत्साहाच्या भरात आणि भोवतालच्या मोकळ्या वातावरणामुळे हे काम प्रथम फार चांगले वाटले नि मोठ्या हुरूपाने आमच्या हातोड्यांचा दगडांवर घाव पडू लागला. खडी बाजूला गोळा होत होती. बरोबरचे शिपाई नि वॉर्डर बाजूस बसून देखरेख करीत होते. आमचे हात जरा मंदावले की ते म्हणत, 'आवाज करो--' म्हणजेच हातोड्या दगडावर आपटा!

प्रथम नावीन्यामुळे खडी फोडण्याच्या कामात वाटणारा हुरूप सूर्य जसजसा वर येत गेला नि आसमंतातील वातावरण तापू लागले, डोक्यावर उन्हाचा मारा होऊ लागला तसा कमी झाला. आणि तेव्हाच या कामाचा आणि उन्हाचा सबंध किती जवळचा आहे हे लक्षात आले. त्याच वेळी या कामातील जिकीर नि तोच तोच आवाज ऐकण्यामुळे येणारी बधिरता याचा परिणाम हा मोकळेपणा नको नि दगडफोडी नको, असे वाटू लागण्यात होत होता. बाहेरच्या जगात रस्त्यावरून हिंडत असताना दगड फोडण्याचे काम करणारे वडार लोक उन्हातान्हात विश्रांती न घेता भर दुपारी दगड का फोडतात हे खडी फोडण्याचे काम करतांना आम्हांला समजले. उन्हात तापलेला दगड हातोडीच्या घावाने लौकर फुटतो, हा अनुभव येताच वडाऱ्यांच्या दुपारच्या वेळी भर उन्हात काम करण्यामागील हेतू अनुभवास येतो. तंबूत बसून काथ्याच्या दोऱ्या वळण्याच्या कामात विस्कळीत असलेला काथ्या पिळाच्या रूपाने एकत्र आणण्याचे म्हणजेच जोडण्याचे काम होत होते. आता तंबूबाहेर उन्हात निसर्गानेच घट्ट केलेल्या दगडात विस्कळितपणा आणण्याचे, मोडतोडीचे काम चालू होते. आमच्याकडून करून घेण्यात येणाऱ्या या दोन्हीही कामांबाबत आमच्यावर देखरेख करणारे अधिकारी उदासीन असत. कैद्यास सश्रम कारावास असला तर त्याला देण्यात येणाऱ्या कामातून काही उपयुक्त अशी निर्मिती व्हावी इकडे तुरुंगाधिकाऱ्यांचे विशेष लक्ष असत नाही. सक्तमजुरीच्या कैद्यांना देण्यात येणारे काम हे शिक्षेत जमा होत असल्याने त्यातून काही अर्थनिष्पत्ती व्हावी हा मुख्य हेतू नसतो. पण तरीही ते काम चांगले झाले व त्यातून काही

प्रातंश झाला तर तो तुरुंगखात्याला नको असतो असें नाही आणि तशी वाल्या कामाची दृष्टी लांब मुदतीच्या कैद्यांना देण्यात येणाऱ्या कामाबाबत आढळून येतेही. दगड फोडण्याच्या आमच्या या कामामुळे कोणताही नवा कैदी होत असलेला पाहताना मला १९३० साली येरवड्याच्या माळावर हातोडीने दगड फोडण्याचे काम केल्याची आठवण जागी होते नि मी त्या रस्त्यावर पसरलेल्या खडीकडे वेगळ्याच आपुलकीने पाहू लागतो. सक्त-मजुरी म्हणून केलेल्या दोरी वळण्याच्या कामाने तळहाताची कातडी घट्ट होत आहे असा भास होत असताच हातात दगड फोडण्याची हातोडी आली. दगड फोडण्याचे काम उत्साहाने केल्याचा परिणाम दोन-तीन दिवसांतच तळहाताला फोड येण्यात झाला. अर्थातच नंतर ते काम मंदावले. एक गोष्ट मात्र खरी. दोऱ्या वळणे, दगड फोडणे अशासारख्या कामांनी श्रमकरीवर्गाशी माणसाचे भावनात्मक तादात्म्य मात्र जरूर होते. खोटा मोठेपणा सारा गळून पडतो.

६ सत्याग्रही : गांधींची जमात

तुरुंगात एक मोठे समाधान असते. जे एकाला तेच दुसऱ्याला. 'क' वर्गात दाखल झालेला कैदी घरचा कितीही पैसेवाला असला, त्याची राहाणी, जेवणाखाण्याच्या सवयी, कपडालत्ता बाहेर कसाही उंची प्रकारचा असला तरी एकदां तो तुरुंगात आला म्हणजे त्याचा सारा मानमरातब तुरुंगाच्या दाराच्या बाहेरच राहतो. रोज जेवताना, काम करतांना, स्नान करताना रिकामपणाच्या वेळी सुद्धा त्याला आपल्या सुस्थितीचा वेगळेपणा मिरवण्याला अवसरच असत नाही. जेवताना सगळ्या कैद्यांना एकाच तऱ्हेची, एकाच मापाची भाकरी व आमटी, कांजीची चव सर्वांना एकच, भांडी सर्वांना सारखी, यामुळें

एकमेकांशी वागताना सहजच बरोबरीचे नाते जास्त प्रमाणात निर्माण होते. जेवणाच्या पदार्थांत पंक्तिप्रपंच तुरुंगात होत नाही. पण यालाही एक अपवाद आहे.

तुरुंगाच्या खाण्यासंबंधीच्या कडक शिस्तीला बगल देऊ शकणारी एक व्यक्ती प्रत्येक लहान-मोठ्या तुरुंगात असते आणि तिचे नांव डॉक्टर. डॉक्टरांच्या सूचनेनुसार आजारी माणसाच्या अन्नात बदल होतो. डॉक्टरांच्या शिफारशींप्रमाणे आजारी माणसांना भाकरीऐवजी भातच काय, पण दूध-पावही मिळत असे. बाहेरच्या जगात तीस-पस्तीस वर्षांपूर्वी अगदी सामान्य गणल्या जाणाऱ्या या वस्तू तुरुंगात फार मोलाच्या असत. येरवडा जेलमध्ये प्रवेश करताच तेथील कदान्नाने-विशेषतः भाजीच्या उग्र वासाने मी आजारी झालो होतो. त्यामुळेच का काय असाच एक दिवस खडी फोडण्याच्या कामावरून परत येत असता हॉस्पिटलवाल्यांना म्हणून देण्यात येणारा दूध-पावाचा भत्ता पाहून पाय पुढे जात असताना माझे मन मागेच रेंगाळत होतें. ज्यांना हा दूध-पावाचा भत्ता मिळत होता ते काही आजारी दिसत नव्हते. आणि म्हणूनच माझे मन त्या दूधावर नि पावावर लोभावले होते. नुसत्या कल्पनेने दूध-पाव मला पक्कान्नासारखा वाटला. त्या वेळी मला जर कोणी 'वरं ब्रूहि' म्हणता तर मी त्याच्याकडून दूध–पावच नक्की मागितला असता. पण परिकथेतला देवदूत माझ्यासमोर तेव्हा नव्हता. वॉर्डर–हवालदाराची करडी नजर होती. 'सीधा चलो' असा हुकूम रेंगाळणाऱ्या पायांना झाला. अन्नाला परब्रह्म म्हणतात. ब्रह्मप्राप्तीचा आनंद हा सर्व आनंदांत श्रेष्ठ गणला जातो. सुग्रास अन्न आणि तुरुंगाच्या मुदपाकखाना हे शब्द एकत्र येणे कधीच शक्य नसल्याने तुरुंगात अन्न हे पूर्ण ब्रह्म म्हणून केवळ कल्पनाविलासाच्या क्षेत्रातच प्राप्त होणारी वस्तू, या सदरातच मोडते.

या कदान्नाच्या जगात जरा खोलवर पाहू लागताच आणखी एक चमत्कार आढळला. कंजी, भाकरी, पालेभाजी, डाळीची आमटी यांवर वर्षानुवर्षे गुजराण करणारे लांब मुदतीचे कैदी नुसते आरोग्यसंपन्नच नव्हे तर तगडे जवान आढळले. याचे कारण तुरुंगातील नियमितपणा.

प्रातःकाळी कंजी, साडेदहा वाजता दुपारचे जेवण, सायंकाळी साडेपाच वाजता रात्रीचे जेवण, मधल्या काळात भरपूर पाणी पिणे आणि रात्री आठ ते सकाळी साडेपाचपर्यंत बाहेरच्या कोणत्याही कारणाने भंग न पावणारी सक्तीची विश्रांती नि झोप, विश्रांती नि झोप; यांस आरोग्य-साधनेत महत्त्वाचे स्थान असून जेलमध्ये ती सहजप्राप्य असतात. ज्यांच्या मनाला कसली चिंता नाही, बाहेरच्या व्यवसायाचे पाश नाहीत, मनाला बाहेर नेणाऱ्या काळज्या वा आशा नाहीत, अशांना सुखाची झोप त्या चरबट-राकट काथ्याच्या तरटावरही येते नि तुरुंगाचे कदान्नही पचते. तसेच ज्याच्या विचारांना कर्तव्याचा स्पर्श झालेला नाही, सामाजिकता ज्याच्या मनाला शिवलेली नाही असे अल्पमती, अल्पसंतुष्ट, अज्ञानी जीव या तुरुंगाच्या कदान्नानेही चांगले सशक्त बनलेले पाहिल्यावर निकृष्ट गणले जाणारे अन्नही माणसाचे शरीरस्वास्थ्य उत्तम टिकवू शकते, हे दिसून आले आणि तशीच वेळ पडली तर किती कमी पैशांत माणसाची देहधारणा होऊ शकते याचा प्रत्यय आला. 'ताजी भाकर अथवा शिळी । देवा देई भुकेच्या वेळीं' या मागणीमागील आर्तता तुरुंगातच समजते. देहधारणेच्या दृष्टीने, अन्न, वस्त्र आणि निवारा यांची प्रत्येकास गरज आहे. ही गरज किती कमी साधनांत नि किती कमी पैशांत भागू शकते, हे अजमावण्या-साठी तुरुंगातील 'क' वर्ग एक उत्कृष्ट प्रयोगालय आहे. कार्यकर्त्याने या प्रयोगालयात जाणीवपूर्वक पाठ घेतला की मग त्याला बाहेरच्या जगात समाजाकडून अगदी कमीत कमी घेऊन, म्हणजेच साधी राहाणी पत्करून, समाजाला जास्तीत जास्त देण्याचा कर्मयोग सहज अनुसरता येतो. सत्याग्रहींना वारंवार तुरुंगाच्या यात्रा घडवण्यात, सज्जनांना होणारे क्लेश पाहून सामान्य जनतेत होणाऱ्या राजकीय जागृतीबरोबर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची जी प्रेरणा झाली, तिच्याबरोबरच त्या सत्याग्रही कार्य-कर्त्याला साध्या राहणीचे नि उच्च विचारसरणीचे धडे मिळाले नि त्याचा परिणाम राजकीय जागृतीच्याच दृष्टीने नव्हे, तर समाजपरिवर्तनाच्या दृष्टीनेही चांगलाच झाला.

येरवड्याच्या माळावरील कापडी बराकीतील तंबूतील आमचे ठरीव ठशाचे कैदी-जीवन सुरू असतानाच तेथून आमची बदली होण्याच्या वार्ता येऊ

लागल्या. बदलीची वार्ता ही तुरुंगातील जीवनात एक खळबळजनक घटना असे. बदल हा माणसाला नेहमीच हवा असतो. आणि बदली हा बदल घडवून आणणारा जणू परीस असतो. भोवतालच्या साऱ्या वातावरणाचा बदल बदली या शब्दात सामावलेला असतो. आणि म्हणून बदली हा शब्द ऐकण्यास तुरुंगातील सगळ्यांचे कान उत्सुक असतात. माणसाच्या साऱ्या हालचालींचे उगमस्थान त्याचा मेंदू–मन हे असते त्याचप्रमाणे तुरुंगातील कैद्याच्या हालचालीची सारी सूत्रे तुरुंगाधिकाऱ्याच्या कचेरीत असतात. या कचेरीत काही राजबंदी कामाला जात असत. त्यांना अशा वार्तांचा सुगावा लागत असे. बदलीची वार्ता त्यांच्याच मार्फत आली होती. माणसाला बदल हवा असतो तो केवळ बदल म्हणून नाही तर सद्यःस्थितीपेक्षा त्या बदलात काही फायदे असतील तर तो बदल त्याला हवा असतो. तोटे असलेला बदल तो टाळू पाहतो. तुरुंगही या नियमाला अपवाद नाही. बाहेरून सत्याग्रहींची रीघ लागल्याने येरवडा तुरुंगाचे मुख्य कारागार नि त्याबाहेर उभारलेले कापडी बराकीचे तात्पुरते तंबूतुरुंग भरले, तरी सत्याग्रही कैदी येतच होते. काही बराकी रिकाम्या करून तेथील कैदी विसापुरला धाडण्यात येणार, हे समजताच विसापूरची रोगट हवा ही कुप्रसिद्ध असल्याने हा बदल अनेकाना नकोसा वाटला. पण एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगांत जायचे की नाही याचा निर्णय कैद्याने द्यायचा नसून तुरुंगाधिकाऱ्याने द्यायचा असल्याने एके दिवशी सायंकाळी विसापूरला जाणाऱ्या तुकडीतील कैद्यांची नावे सांगण्यांत आली. त्यांत माझे नाव होते. नजरेपुढे कल्पनेतले विसापूर दिसू लागले. या कल्पनेला आधार काही जाणकारांनी दिलेल्या माहितीचा. मला विसापूरला जायला मिळणार. यात आनंद वाटत होता तो वेगळे काही बघायला मिळेल या गोष्टीचा. ठाण्याहून येरवडा आणि आता येरवड्याहून विसापूरला म्हणजे सहा महिन्यांच्या तुरुंगवासात माझी त्रिस्थळी यात्रा होणार होती. पुणे–विसापूर रेल्वे प्रवासात बाहेरच्या जगाशी अल्पकाळ का होईना संबंध येणार, हा बंदिस्त जीवनात वाटणारा मोठा आनंद होता. त्या आनंदात येरवड्याच्या त्या माळरानावरील तुरुंगातील शेवटची रात्र काढली. उद्याची रात्र विसापूर तुरुंगात जाणार, तो तुरुंग कसा असेल, याची मनोमन चित्रे रंगवीत असतानाच झोप आली.

सुटसुटीत प्रवास हा कैद्याचा, त्यातल्या त्यात 'क' वर्गीय कैद्याचा असतो. त्याच्या जवळ त्याचे काही सामान नसते. सामान्य गुन्हेगार कैदी जेव्हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यात येतात तेव्हा त्यांच्या एका हातात हातकडी असून ती दुसऱ्या कैद्याच्या एका हातात बांधलेली असते नि त्या सगळ्या कैद्यांना एका दोरीने एकत्र जोडलेले असते. आम्हा सत्याग्रही कैद्यांना बेडीचा-हातकडीचा स्पर्श झाला नाही. मागेपुढे पोलीस शिपाई नि मध्ये कैद्यांची रांग, असा आमचा क्रम असे. येरवडा जेलमधून पुण्याच्या स्टेशनवर पोलिसांच्या मोटारीतून आल्यावर प्लॅटफॉर्मवर आमचा घोळका एकत्र बसला. सत्याग्रहींची पार्टी आज येरवड्याहून विसापूरला जाणार, अशी बातमी लोकांना आधीच कळली असल्याने अनेक लोक प्लॅटफॉर्मवर हजर होते. त्यांपैकी फारच थोडे आम्हा कैद्यांच्या ओळखीचे होते. पण 'गांधींचे लोक' या नांवाची एक वेगळीच जमात त्या काळात ओळखली जाई. सत्याग्रही कैदी हीच ती जमात. या जमातीवर प्रेम करणारी जनता आमच्या अवतीभवती उभी होती. रक्ताचे नातेवाईक जसे जनतेचे आमच्यात नव्हते तसे आमचेही जनतेत नव्हते.

त्या काळात रेल्वे स्थानकावर, जेलच्या बाहेर, कोर्टाच्या आवारात राष्ट्र-प्रेमाने प्रेरित होऊन सत्याग्रहींच्या उपयोगी पडावे या इच्छेने अनेक लोक नियमितपणे उपस्थित असत, मला यात तसे आश्चर्य वाटले नाही. कारण सत्याग्रही म्हणून ठाण्याच्या तुरुंगात प्रवेश करण्याअगोदर तेथील तुरुंगा-बाहेरच्या मारुतीच्या देवळाच्या पारावर बसून तुरुंगातील सत्याग्रहींना भेटा-वयास येणाऱ्या त्यांच्या आप्तेष्टांसाठी पिण्याचे पाणी देणे, तुरुंगाच्या कचे-रीत त्यांच्या चिठ्ठ्या नेऊन पोचवणे, शहरातले त्यांचे एखादे काम करणे, यासाठी जी काही दहा-पाच तरुण मुले तेथे असत त्यांपैकी मी एक होतो. सत्याग्रहात स्वतः भाग घेण्याची तीव्र जाणीव हि अशा प्रकारे तेथे बसलो अस-तानाच उत्पन्न झाली नव्हे करून दिली गेली. तो प्रसंग मोठा उद्‌बोधक होता. विलेपार्ल्याहून काही मंडळी जेलमधील आपल्या आप्तांना भेटण्यास आली होती. त्यांना कांहीं हवे का वगैरे विचारून, त्यांची चिठ्ठी आत पाठ-वून, नेहमीप्रमाणे रिकाम्या वेळात पिंपळाच्या प्रशस्त पारावर मी माझ्या मित्रांबरोबर बुद्धिबळे खेळत होतो. त्या आलेल्या मंडळींपैकी एक मुलगी

आमच्या जवळ येऊन उभी राहिली. बुद्धिबळाचा खेळ शांतपणे तसेच मन लावून खेळण्याचा खेळ आहे. त्यात रस घेऊन आपला खेळ ती मुलगी पहात आहे असाच माझा ग्रह झाला. पण काही वेळ खेळ पाहिल्यावर तिने विचारले, 'इतर सत्याग्रही देशाकरिता पालिकडच्या बंदीशाळेत शिक्षा भोगताहेत अन् तुम्हाला येथे खेळ सुचतो तरी कसा.' या प्रश्नास उत्तर देता आले असते. पण प्रश्नामागील भावना लक्षात येऊन म्हणा अगर मुलीने अनपेक्षितपणे विचारलेला प्रश्न म्हणून म्हणा, आम्ही उत्तर काहीच दिले नाही. पण तो प्रश्न माझ्या मनात खोल जाऊन बसला होता.

पुणे स्टेशनवर व पुढे दौंड स्टेशनवर देखील सत्याग्रहींबद्दल सहानुभूती बाळगणारांनी आमच्यासाठी खाण्याचे पुष्कळ पदार्थ आणले होते. आमच्याबरोबर असलेल्या अधिकाऱ्यांच्या अंगी असलेल्या माणुसकीच्या व सौजन्याच्या वृत्तीमुळे ते पदार्थ आमच्यापर्यंत आले. विसापूर स्टेशनवर उतरताच ते भकास दिसणारे स्टेशन पाहून तिथल्या तुरुंगाची नि वातावरणाची कल्पना आली. विसापूरचा तलाव हा प्रसिद्ध आहे. त्या तलावाच्या काठावर जनावरांचे गोठे शोभतील अशा बैठ्या बराकी बांधलेल्या त्याभोवती भलेमोठे कुंपण दृष्टीस पडले. विसापूर स्टेशनवरून तुरुंगाची वाटचाल करताना तो सारा प्रदेश रूक्ष ओसाड नि उदास वाटला.

७. स्नानाला तलाव पण पाण्यात काटेरी तारा

विसापूर स्टेशनाबाहेर पडून आम्ही आमच्या बदललेल्या बिनभाड्याच्या घराकडे चालू लागलो. पुढे शिपाई मागे शिपाई नि मधे आम्ही सत्याग्रही. स्टेशनबाहेरही सर्वत्र

उदासपणा भासत होता. सर्व वातावरणातच तो भरून राहिला होता. तुरुंगाच्या आवारात आल्यावर मात्र आम्ही आमच्या लोकांत येऊन पोचलो असे वाटले. कारण आमच्या अगोदर पुष्कळ सत्याग्रही तेथे आले होते. विसापूर तुरुंगाचे अधिकारी कडक शिस्तीचे असले तरी येरवड्याच्या शिस्तीच्या मानाने हा कडकपणा पुष्कळच कमी होता. आमच्या बराकीत आम्ही पाऊल टाकताच ग्रामीण हिंदुस्थानच्या ग्रामीण तुरुंगात आल्याची खात्री पटली. आमच्या बराकी बैठ्या आकाराच्या असून भिंती कच्च्या विटामातीच्या नि सारवलेल्या होत्या. जमीनही मातीचीच. तिला शहरी लादीचा किंवा सिमेंटच्या कोब्याचा स्पर्श झालेला नव्हता आणि तीवर जाड सारवणाचा हात फिरला नसल्याने आत पाऊल टाकताच मातीचा उग्र दर्प नाकात शिरला. विसापूरच्या या मातीला तिकडे खकाणा म्हणत. रात्री आंथरुणावर झोपल्यावर देखील हा खकाणा श्वासाबरोबर नाकात जाई. तो तसा जाऊ नये म्हणून डोक्यावरुन पांघरूण घ्यावे लागे. शहरी वातावरणांतून ओसाड माळरानावरील पडक्या वाड्याच्या पडवीत रहायला गेल्यावर मनाची जी अवस्था व्हावी, तशीच विसापूरला गेल्यावर झाली.

विसापूरच्या या उदास वातावरणात एक गोष्ट फार मोलाची नि मनाचा उत्साह वाढविणारी होती; आणि ती म्हणजे तुरुंगाला लागून असलेल्या तलावावर सकाळी कैद्यांना स्नानाला घेऊन जात. तळ्यावर आंघोळीला नेले तरी फार वेळ डुंबू देत नसत. पोहता येणाऱ्या कैद्यांनी फार दूरवर जाऊ नये, प्रसंगी हवालदार–वॉर्डरच्या हातावर तुरी देऊ नये, म्हणून तळ्याच्या पाण्यात काही अंतरावर काटेरी तारा टाकलेल्या होत्या. या तळ्याच्या पाण्यात आंघोळ करताना काही धर्मश्रद्ध कैदी कंबरभर पाण्यात उभे राहून सूर्यास अर्घ्य देताना आढळत, तर काही कर्मठ ब्राह्मण जानव्यात अंगठा धरून गायत्री मंत्रही म्हणताना दिसत. अथांग जल-सागरातील पाण्याचा स्पर्श हा मानवी मनाला किती प्रसन्नता आणतो, याचा अनुभव विसापूरला प्रत्यही येत होता. हा आनंद निवांतपणे व निर्बंधपणे मिळू नये म्हणून बरोबरचे शिपाई आणि वॉर्डर सारखे पाण्यातून बाहेर येण्याचा तगादा लावीत असत. विसापूरला खाण्याच्या अन्नात जरा बदल झाला होता. सकाळची कंजी येथेही मिळे. पण कोणाला भाकरीऐवजी भात

पाहिजे असल्यास तो तेथे सहज मिळे. तसेच तुरुंगातील पालेभाजी व आमटी अनेक पांढरपेशा सत्याग्रहींना फार तिखट लागे. अशांसाठी विनतिखटाची फिकी भाजीही येथे मिळू लागली. विसापूरला तुरीच्या व हरभऱ्याच्या डाळीचे वरण, गोवारी, तांबडा भोपळा यापैकी एक कोणती तरी भाजी असायची. यापैकी तांबडा भोपळा किंवा गवारी हटकून रोज असायची. भाज्यांच्या आवडी–निवडी जर कोणाला असतील तर त्या चोखंदळ माणसाच्या सर्व आवडीनिवडी तुरुंगात संपूर्ण नाहीशा होतात. भुकेचा जठराग्नी एकदा भडकला नि त्याला अमुकच प्रकारचें अन्न पाहिजे असे म्हणण्याचे स्वातंत्र्य नसले म्हणजे मिळेल त्या हविर्द्रव्याचे हवन त्या अग्निकुंडात होऊ लागते. परिस्थितीच्या अपरिहार्यतेपुढे सगळ्या आवडीनिवडी तेथे खलास होतात.

विसापूरला स्नान आणि भोजन यांत जरा इष्ट असा बदल झाला तसाच तो कामातही झाला. कैद्याबरोबरच त्याचे ओळखपत्रही एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात जात असते. त्यामुळे बदलून आलेल्या कैद्याला कोणते काम देता येण्यासारखे आहे हे ठरविणे तुरुंगाधिकाऱ्यांना सोपे जाते. सत्याग्रहींच्या वाढत्या संख्येला काम कोणते द्यावयाचे हा प्रश्न येरवड्याप्रमाणे येथील तुरुंगाधिकाऱ्यांपुढेही होताच. पण विसापूर तलावाने आणि तुरुंगाच्या अवतीभवती असलेल्या ओबडधोबड, साफसूफ न केलेल्या जमिनीने हा प्रश्न तात्पुरता तरी सोडवलेला होता. रोज सकाळी कंजी पिऊन झाल्यावर आम्हांला हातात खुरपणी देऊन तुरुंगाच्या आवारातील मोकळ्या जागेत उगवलेले दुर्वांसारखे तण उपटून काढण्याचे काम दिले होते. तेथे काम किती करायचे हा प्रश्न नव्हता. कैद्याला सक्तमजुरीची शिक्षा असल्याने त्याला रिकामा बसू देणे ही कायद्याची उघड उघड अवज्ञा ठरली असती हे तुरुंगाधिकारी जाणून होते आणि म्हणून कैद्याला सकाळ–दुपार उन्हात बसवून, त्याच्याकडून नावापुरते काहीना काही काम ते करून घेत असत. इकडची माती तिकडे नेऊन टाका, तिकडचे दगड इकडे आणा, अशासारखी न संपणारी ही कामे असत. त्यामुळे काम करणाराचे कामाकडे कधीच लक्ष लागणे शक्य नव्हते. तुरुंगातील कंटाळवाणा असा हा काळ होता. या तुरुंगवासात माझी अवस्था कैदी या नात्याने निरीक्षकाची होती.

तुरुंग म्हणजे काय याची कल्पना शाळेत असतांना त्यावेळी 'केसरी'तून प्रसिद्ध झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या 'माझी जन्मठेप' या लेखमालेवरून आली होती. त्या लेखांतून वर्णन केलेली तुरुंगाची कडक शिस्त माझ्या वाट्याला आली नव्हती. याचे एक मुख्य कारण स्वातंत्र्यवीर व त्यांचे अनुयायी यांचे स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग आणि साधने आणि म. गांधीप्रणीत स्वातंत्र्याचे मार्ग आणि साधने यात असलेली तफावत हे एक होते. कोणत्याही दर्जाचा सत्याग्रही हा सशस्त्र क्रांतिकारकासारखा सरकारला भयप्रद असा कधीच वाटला नाही. सत्याग्रहीला केवळ अटक करून ठेवले की आपले काम संपले, अशीच सरकारची तेव्हा धारणा होती. विसापूरचा तुरुंग ही अशा सत्याग्रहींची छावणी होती.

विसापूरचा हा तुरुंगवास अगदी कंटाळवाणा असा होता. तुरुंगांत वाचनासारखा सोबती नि विचाराला खाद्य पुरविणारा दुसरा सोयरा कोणी नसतो. पण तुरुंगाच्या या पहिल्याच अनुभवात वाचनाची काही सोय तेथे असू शकते किंवा आपण घरची पुस्तके नेऊन वाचू शकतो, याची काहीच कल्पना नव्हती. उजाडला दिवस कसा आणि केव्हा मावळेल, याचा विचार करीत सकाळी कांजी प्यायची, स्नान करायचे, जेवायचे, हातात खुरपणे घेऊन उन्हात बसून जमिनीत रुतून बसलेले दुर्वांकुराचे किंवा तसल्याच सरपटणाऱ्या वनस्पतीचे तण काढायचे नि दिवसाच्या प्रथमार्धात वाढत्या उन्हाकडे नि उत्तरार्धात वाढत्या सावल्यांकडे पहात बसायचे, असे कंटाळवाणे दिवस जात होते. संध्याकाळच्या जेवणानंतर बराकीतून बंद होण्याचे अगोदर काही वेळ बराकीच्या बाहेर पण तारेच्या कुंपणाच्या आत, फेऱ्या मारीत राहायचे नि मग बराकीत जाऊन तरटाच्या काथ्यावर झोपेची आराधना करीत पडायचे. विसापूरच्या त्या उजाड वातावरणाने झोपही उडाली होती. एकदा तर बाहेरच्या आठवणींनी, झोपेतच पडलेल्या भयंकर स्वप्नांनी मी भयभीत होऊन जागा झालो. ही जाग येण्याच्या अगोदर मी झोपेतच ओरडलो होतो, असें माझ्या शेजारच्या सत्याग्रहीकडून कळले. मला अस्वस्थ वाटू लागले. या काळांत भगवद्गीतेचे पुस्तक माझ्या हातांत आले. शाळेत असल्यापासूनच भगवद्गीतेचे वाचन करण्याची गोडी लागली होती. सर्व श्लोकांचा अर्थ न कळला तरी भगवद्गीता आपल्याला पाठ

यावी असे वाटत होते. अनायासे तुरुंगात तशी संधी मिळाली. मी नेमाने भगवद्गीतेचे वाचन सुरू केले नि काही कालाने गीतेचे सर्व अध्याय तोंड-पाठ झाले. दोन तीन महिन्यांच्या अवधीत ठाणे, येरवडा आणि बिसापूर अशी तुरुंगाची त्रिस्थळी झाल्यामुळें एके ठिकाणी मन स्थिरावले नव्हते. तुरुंग ही काय चीज आहे हे पहात राहण्यांतच वेळ चालला होता. निजणे, उठणे, हिंडणे, फिरणे, जेवणखाण करणें, स्नान करणे, काम करणे यावर सतत कोणाचे तरी लक्ष आहे ही गोष्ट तुरुंगात फार जाणवते. आपला स्वतःचा असा वेळ नाहीं, आपणांस वाटेल ती गोष्ट करण्याचे स्वातंत्र्य नाही हे सारे संस्कारी मनाला फार ताप देते. बाहेरच्या जगांत वेळ अपुरा वाटतो तर तुरुंगात तो कसा झरझर जाईल इकडे लक्ष लागते नि हे लक्ष लागल्यामुळे की काय त्याची चाल फार हळू पावलाने होते.

कालगणना ही सतत चालूच असते. तुम्ही तुरुंगात असा अगर कुठेही असा, घड्याळाचे काटे सुरूच असतात. 'घटका गेली, पळे गेली, तास वाजे झणाणा ॥ यांतील तास तुरुंगात दर साठ मिनिटांनी कानांवर पडत असतो. ठाण्याच्या तुरुंगांतील अगदी पहिली रात्र होती. झोप येत नव्हती. साऱ्या आठवणी डोक्यात गर्दी करीत होत्या. अर्धवट झोपेत, अर्धवट गुंगीत असताना 'ऑलवेल' हे कसेतरी मोठ्या आवाजात, हेल काढून उच्चारलेले शब्द कानांवर आले. हे शब्द काय होते ते त्यावेळी समजलेच नाही. दुसऱ्या दिवशी हे शिपायांचे ओरडणे कोणत्या शब्दांत होते हे विचारल्यावर समजले की तो रात्रीच्या गस्तीचा शब्द होता ! या शब्दानंतर आणखी काही आवाज येतात की काय याचा मन शोध घेऊ लागल्यावर तासांचे ठोके ठराविक अंतराने ऐकू येऊ लागले. जेलमध्ये महिने-न् महिने तुमच्या डोळ्यांना घड्याळ दिसणार नाही. तुरुंगाच्या कचेरीत गेल्यावरच डोळ्यांना तेथील भिंतीवरील मोठे घडयाळ दिसेल तेवढेच. पण हा घंटेचा, तासाचा आवाज दिवस असो वा रात्र असो, होतच राहाणार. एक तास मागे लोटला की, तेवढाच वेळ बाहेर पडण्याच्या दृष्टीने कैद्याला जवळचा वाटू लागतो.

पहिले काही दिवस हा तासाच्या आवाजाकडे लक्ष देण्याचा मनाचा खेळ चालतो व त्यात गोडीही वाटते. पण पुढे ही कालगणना दिवसांवर

व नंतर आठवड्यांवर जाते. रविवार हा बाहेरच्या जगाप्रमाणे तुरुंगातही सुट्टीचा दिवस असतो. या दिवशी सक्तमजुरीचे काम नसते. पण इतर गोष्टी करायच्या असतात. कैद्याला आपले कपडे धुण्याला हाच दिवस मोकळा असतो. 'क' वर्गातील कैद्यांपैकी जे मांसाहारी असतील त्यांना रविवारी जेवणात मटन मिळे, शाकाहारी कैद्यांना त्याऐवजी गूळ देत असत. हा गूळभाकरीचा चुरा करून त्यात पाणी कालवून त्याचे लाडू काही कैदी करीत. विसापूरातील बराकीमधील जमिनी मातीच्या असल्याने त्या रविवारी सारवण्यात येत. त्यामुळे कैद्याला आपला बिछाना घेऊन बाहेर बसावे लागत असे. रविवारी दुपारनंतर तुरुंगाची शिस्त जरा दगडापेक्षा वीट मऊ या प्रमाणात ढिली होते. कारण सुपरिंटेंडेंट, जेलर हे आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांवर कारभार सोपवून घरगुती किंवा अशाच इतर कामात गुंतलेले असतात. रविवार हा तुरुंगातही किती मौजेचा दिवस असू शकतो हे मला पुढे समजणार होते, अनुभवास येणार होते. पण ते विसापूरच्या तुरुंगातील कंटाळवाणे र[illegible] कधी संपतात असे वाटे.

८. आईची भेट

तुरुंगातील जीवनात काबाडकष्ट, कदान्न, अधिकाऱ्यांची म्हणण्यापेक्षा शिपायांची कडवट वागणूक, या सर्व गोष्टी पदोपदी जाणवत असतात नि त्या विशेषत: 'क' वर्गीय कैद्यांच्या वाटणीला येतात. या सर्व गोष्टीत तुरुंगाच्या इमारती नि आजूबाजूचे ओकेबोके वातावरण यांची भर पडली म्हणजे तर मग विचारुच नका. दिवस जाता जात नाही. तोच तोचपणा हे तुरुंगाचे एक सर्वसाधारण आढळणारे वैशिष्ट्य सांगता येईल. लहानपणी लांडगा आला रे आला अशी आरोळी उगीच मारणाऱ्या गुराख्याची वाचलेली गोष्ट तुरुंगात आठवते. त्या कथेच्या

लेखकाने तुरुंगवासाचा अनुभव घेतला असता तर 'मला बदल हवा होता' या गुराख्याच्या वाक्यावरच ती गोष्ट संपली असती. विसापूर तुरुंगाच्या आवारातील जमिनीवर डोकावणारी हिरवळ तिथून निपटून टाकण्याची कामगिरी रोज रोज करीत असताना अनेक विचार मनात यायचे. ज्या गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य बाह्य परिस्थितीने हिरावून घेतलेले असते त्या गोष्टी माणूस मनाने करीत असतो. भूगोलाची पुस्तके वाचून चार भिंतीच्या बाहेर कधीही न पडलेला अचाट कल्पनाशक्तीचा लेखक उत्कृष्ट प्रवास-वर्णने लिहू शकतो, त्याच चालीवर मनाच्या वारूवर आरुढ होऊन कैदी तुरुंगाबाहेर भटकत असतो.

न बदलणाऱ्या अशा या कंटाळवाण्या वातावरणामुळे कोणतीही अनपेक्षित घटना ही तुरुंगात एका अर्थाने वरदान वाटत असते. माझ्या या काही महिन्यांच्या अल्पमुदतीच्या कारावासात तसे म्हटले तर कंटाळा येण्यासारखा काळ कोणत्याच तुरुंगात लोटलेला नव्हता. पहाटे अंथरुणांतून उठवून अटक जशी अनपेक्षित झाली त्याचप्रमाणे ठाण्याहून येरवड्याला धाडले तेही आकस्मिकच. येरवड्यास उणेपुरे दोन महिने होतात न होतात तोच विसापुरास बदली झाली. आता विसापूरास मला कंटाळा वाटू लागला होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाने तुरुंगात आलेले सगळे परस्परांशी बंधुभावाने वागत असले तरी तो बंधुभाव एकमेकांबद्दल जिव्हाळा, आपुलकी, आत्मीयता वाटण्याइतपत नव्हता. वेगळ्या भाषेत सांगायचे तर अनोळखी असून ओळखीच्या माणसांसारखे आम्ही होतो व ओळखीचे होऊनही मनाने, भावनांनी एकमेकांपासून दूर होतो. अशा या कंटाळवाण्या काळात एके दिवशी जमिनीवरील हिरवळ उपटीत असता ऑफिसचा शिपाई माझ्याकडे आला आणि 'ऑफिसात बोलावलाय, तिकडे लाकर चला' असे सांगू लागला. तुरुंगात ऑफिसचे बोलावणे कारणाशिवाय येत नसते. रोजच्या वागणुकीत काही कमी जास्त झाले नि शिपायाने वर तक्रार केली असली तर ऑफिसात बोलावणे येते. हे बोलावणे का आले याचा मी विचार करीत आहे असे पाहताच, "चला लौकर, भेट आली आहे" असे त्याने सांगितले. भेट ही तुरुंगातील एक आनंदाची घटना असते. आपल्या घरच्या माणसाची अगर ज्या कार्याच्या ओढीमुळे आपण

कारावासात आपणहून आलो त्या कार्यात गुंतलेल्या माणसाची भेट ही तुरुंगात सर्वांना हवी हवीशी वाटणारी गोष्ट असते. पण ही भेट सहसा एकाएकी आणि अनपेक्षित असत नाही. आधी पत्रव्यवहार करूनच माणसे भेटीस येतात. कारण तीन महिन्यांनी एक भेट असल्याने एक भेटून गेल्यावर लगेच कोणी दुसरा आला तर त्याला कैद्याला भेटू न देता तसेच परत पाठवतात. माझ्या बाबतीत भेट हा शब्द आश्चर्यकारक होता. कारण मी घरून निघताना काहीच कोणाला सांगितले नव्हते. नावासह माझ्या अटकेची वार्ता प्रसिद्ध होण्याइतके पुढारीपण माझ्या वाट्याला आले नव्हते. राजकीय सहकारी कोणी येतील तर तीही शक्यता नव्हती.

हे सारे विचार त्या शिपायाच्या मागून कचेरीचा रस्ता आक्रमीत असता डोक्यात येत होते. तुरुंगात बाहेरच्या माणसांची भेट घेण्याचा हा पहिलाच प्रसंग. भेटीस कोण आले असणार याची काहीच कल्पना नव्हती. तेवढ्यात एका जाळीच्या दाराशी मला शिपायाने आणून उभे केले नि दारापलीकडे आई भेटायला आलेली उभी होती ! माझा तो 'क' वर्ग कैद्याचा पोशाख पाहून तिला रडेच कोसळले. "कसं काय ? बरं आहे ना ? प्रकृतीला जप" यापलीकडे ती काही बोलली नाही. मी काही उलट बोलू शकत नव्हतो. एक तर ती भेट अनपेक्षित होती. आणि जिची परवानगी न घेता घर सोडले होते ती जन्मदात्री आई तुरुंगात भेटायला आली होती. तिला मला नुसते पहावयाचे होते. तिला कसलीच चर्चा करावयाची नव्हती. भेटणे, पहाणे, बोलणे, चर्चा करणे या साऱ्याच गोष्टी एका दृष्टीक्षेपात होत असतात. एकमेकांना डोळे भरून पहाणे, या शब्दांचा अर्थ तुरुंगाच्या आवारात होणाऱ्या अशा भेटीच्या वेळीच समजून येतो. या भेटीत आई आणि मी यात जाळीचा दरवाजा होता. आईने माझ्यासाठी काही वस्तू आणल्या होत्या. त्यापैकी साबणाची वडी मला मिळाली. आई परत जाताना सारखी मागे वळून पहात होती. "संभाळून रहा" हे तिने जाताना कसेबसे उच्चारलेले शब्दच पुन्हापुन्हा ती आपल्याशी उच्चारीत असावी. माझ्याबरोबरच्या हवालदाराने मला परत आमच्या कर्मभूमीकडे, हिरवळ उपटण्याच्या

कामाकडे नेले. त्या काही मिनिटांच्या अवधीत मला माझे घर एकदम डोळ्यांपुढे दिसू लागले. मी एकटा नाही. माझी चौकशी करणारी, माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेली माणसे बाहेर आहेत. त्यांना माझ्या या सत्याग्रहाचे व स्वातंत्र्य लढ्याच्या तंत्राचे फारसे काही माहित नसले तरी आपला मुलगा चांगल्या कार्यासाठी तुरुंगात गेला आहे हे ती माणसे जाणून आहेत, हे सारे विचार माझ्या मनात गर्दी करू लागले.

त्या दिवशी एक गोष्ट मात्र मला पूर्ण पटली की मायेच्या माणसानीं तुरुंगात नातेवाईकांची भेट घेणे ही दोन्ही पक्षी मनस्तापाची घटना ठरते. आपल्या घरच्या मुलाने राजकारणात पडू नये, नोकरी करून घरात काही पैसा आणावा, इतर चारचौघांसारखे असावे, अशा समाज चाकोरीत वावरणाऱ्या घरातील मुलगा राजकारणात पडला व तुरुंगात गेला तर त्याची मनःस्थिती मोठी चमत्कारिक होते. आई-वडिलांचे आपल्यावर प्रेम आहे, पण आपण जे काम करीत आहो ते त्यांना आवडत नाही, फारसे पसंत पडत नाही याची टोचणी अशा भेटीने मनाला पुन्हा सुरू होते. पण हा संघर्ष समाजात पूर्वापार काळापासून चालत आला आहे. चारचौघांसारखे जीवन न जगण्याऱ्या, समाजाने रूढ मानलेल्या चाकोरीबाहेरचे सार्वजनिक हिताचे जीवन जगूं पाहणाऱ्या, प्रत्येक लहानमोठ्या कार्यकर्त्याला हा अनुभव येतच असतो. पण सर्वच समान आवडी निवडीची माणसे ज्या कुटुंबांत बहुतांशाने आहेत त्या समाजाचा विकासही होत नाही. आई तुरुंगांतून भेटून गेली त्या दिवशी एक विचार पुन्हा पुन्हा मनात आला आणि तो म्हणजे मुलाकडून घरासंबंधी ज्या अपेक्षा आई-वडिलांच्या असतात त्या आपण पुऱ्या केल्या नाहीत व पुढेही त्या पुऱ्या करण्याची फारसी शक्यता नाही. संध्याकाळी ऑफिसातून शिपायाने एक साबणाची वडी आणून दिली. आईने भेटीला येताना तुरुंगात कैद्याला काय काय वस्तू देता येतात याची चौकशी केली होती. तिने बरोबर काही फळे व खाण्याचे पदार्थ आणले होते. पण 'क' वर्गाच्या नियमानुसार कैद्याला फळे व इतर खाण्याच्या वस्तू देता येत नसल्याने त्या तिने परत नेल्या व परतीच्या प्रवासात इतरांना वाटून टाकल्या असे मला पुढें कळले.

माझ्या हातात आलेल्या त्या साबणाच्या वडीकडे मी विशेष आपुलकीने पाहू लागलो. तुरुंगात आम्हाला साबण मिळत असत. सत्याग्रहींच्या वापरासाठी विलेपार्ले सत्याग्रही छावणीचे हितचिंतक साबण, तेल याचा पुरवठा नियमितपणे करीत असत. पण या घरच्या आलेल्या साबणाचे मला विशेष महत्त्व वाटले. तो पीअर्स ट्रॅन्सपरंट ग्लिसरिन सोप होता. आमच्या घरी असा साबण मी कधी पाहिला नव्हता. आईने कोणाला तरी माझ्यासाठी साबण आणायला सांगितले असावे आणि तुरुंगातला कैदी म्हणजे खरोखरच प्रासादात राहणारा राजबंदी समजून त्याला शोभेल असा हा परदेशी उंची साबण त्याने आणून दिला असावा. त्या वेळेपासून पीअर्स ग्लिसरीन ट्रॅन्सपरंट सोप हे नाव माझ्या स्मृतिपटलावर कायमचे कोरले गेले आहे. विसापूरच्या तळ्यावर स्नानाला गेल्यावर कित्येक वेळा तो अंगाला लावण्याचे अगोदर सूर्यकिरणात त्याचा रंग कसा दिसतो ते मी पहात असे. तुरुंगाच्या नियमात स्वच्छतेला देण्यात आलेल्या महत्वामुळे अंगाला लावण्याचा साबण हा माझ्या हाती येऊ शकला, नाहीतर तोही फळांबरोबर बाहेरच राहिला असता. बाहेर असताना जो परकी साबण मी विकत घेऊन अंगाला लावला नसता, तो मी आता रोज कौतुकाने वापरीत होतो.

९ अनपेक्षित सुटका

आई विसापूरला येऊन भेटून गेल्यानंतर बरेच दिवस माझ्या मनात अस्वस्थता नांदत होती. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर मी नोकरीच्या दृष्टीने आई–वडिलांच्या मनाप्रमाणे प्रयत्न केले नाहीत. त्यांच्या मनाप्रमाणे लग्नाच्या बोहोल्या-वरही उभा राहिलो नाही. कॉलेज शिक्षण सहजासहजी झेपण्यासारखे नसल्याने त्याबद्दलही आग्रह धरला नाही. मॅट्रिकनंतर वर्षा-दीड वर्षांचा

काळ असाच काही तरी करण्यात म्हणजेच एक दोन शिकवण्या करून वाचन गप्पा यांत वेळ घालवला होता. पुढे मिठाचा सत्याग्रह सुरू झाल्यावर स्वयंसेवक या नात्याने त्यात भाग घेतला होता. त्या वेळी दारूच्या दुकानांवर पिकेटिंगही केले होते. पुढे विलेपार्ले येथे सत्याग्रह छावणी उघडण्यात आल्यावर एक दिवस त्या छावणीत आई-वडिलांस न विचारता दाखल झालो नि महिना दीड महिन्याच्या आत विलेपार्ले छावणीतूनच पकडला गेलो. हा सारा इतिहास आईच्या भेटीने पुन्हा पुन्हा मनासमोर येऊ लागला. तुरुंगातून सुटका झाल्यावर पुढे काय हाही प्रश्न आपोआपच मनाच्या अंगणात हुतूतूचा खेळ खेळू लागला. यापुढे बाहेर पडल्यावर सरकारी नोकरी करायची नाही, हे जसे मनोमन ठरले तसेच आपल्या चरितार्थाचा भार वडिलांवर टाकायचा नाही, हेही ठरवून टाकले. या मनोव्यापाराचा नि जेलमधल्या दैनंदिन कार्यक्रमाचा अर्थात् काही संबंध नव्हता. ते कार्यक्रम विसापूर जेलमध्ये पाऊल टाकल्यापासून जसे होते तसेच चालू राहिले. त्या जेलच्या वातावरणाशी मी कधी समरस झालो नव्हतो. तेथील अस्वच्छता—तो मातीचा वास—रविवारी सारवलेल्या जमिनीचा वास नाकात भरून राहिला होता. रोजच्या जेवणातल्या तांबडया भोपळ्याच्या व गोवारीच्या शेंगांच्या भाज्यांनी तर जेवणही संकट वाटू लागले होते. पण यालाच तुरुंग म्हणतात, असे म्हणून उजाडला दिवस मावळण्याची वाट पहात राहाण्यापलीकडे काही करता येत नव्हते. कैद्याच्या तिकिटावर लिहिलेल्या सुटकेचा दिवस दर चोवीस तासांनी जवळ येत होता.

एके दिवशी दुपारी नित्यासारखा उन्हात मोकळ्या आवारात जमिनीवर इतस्ततः पडलेले लहान मोठे खडे एका ढिगाऱ्यात रचून ठेवण्याचे, अगदी अक्षरशः काही तरी या सदरात मोडणारे काम करीत असता, एकदम माझ्या आजूबाजूच्या सहकाऱ्यात काही वेगळ्याच उत्साहाची लाट आलेली दिसली. त्या शांत वातावरणात जरा मोठ्या आवाजात कुजबूज सुरू झाली होती. ऑफिसातून सांकेतिक शब्दांत कोणास तरी निरोप आला होता की, विलेपार्ले सत्याग्रही छावणीतील अटक झालेल्यांची सुटका करण्याचा वरचा हुकूम आला आहे. असा हुकूम येण्याची फारशी शक्यता नसल्याने कोणी त्या बातमीवर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते.

सत्याग्रहींची सुटका त्यांची मुदत भरण्याच्या अगोदर होण्याचा एकच प्रकार तेव्हा फारच थोड्या अपवादाच्या प्रमाणात आढळत होता आणि तो म्हणजे सत्याग्रहीने आपणहून "मी चुकलो, अजाणता भावनाविवश होऊन सत्याग्रह केला. पुन्हा अशा फंदात पडणार नाही," असे माफीवजा लिहून देणे अगर एखाद्या अल्पवयीन सत्याग्रहीच्या पालकाने त्याच्या वतीने हमी घेणे. आणखी एक प्रकार अनपेक्षित सुटकेचा म्हणजे गंभीर स्वरूपाचा आजार. या कोणत्याच कोष्टकात न बसणारे आम्ही लोक असल्याने या अकल्पित सुटकेच्या वार्तेची एक 'चांगली थाप' अशी कार्हीनी संभावना केली. पण पंधरावीस मिनिटांच्या अंतराने जेलचा सुभेदार येऊन सांगू लागला की, विलेपार्ले फैलातील कैद्यांनी बराकीत जाऊन आपल्या ताटवाट्या नि बिस्तरा घेऊन ऑफिसात ताबडतोब यावे. एवढेच मोघम न बोलता त्याने प्रत्येक कैद्याचे नावही घेतले. माझे नाव त्या यादीत होतेच. गोळा केलेल्या त्या दगडाच्या राशीकडे एकवार पाहून मी बराकीकडे गेलो. तेथील ते तरटाचे आंथरूण, एक थाळी नि एक भांडे या आम्हा कैद्यांना देण्यात आलेल्या, जीवनाला अत्यंत आवश्यक अशा सरकारी मालकीच्या वस्तू घेऊन कचेरीत गेलो. तेथे सगळेच वातावरण सुटकेचे होते.

आमच्याजवळचा बिस्तरा नि भांडी जेलच्या कारकुनाने ताब्यात घेतली नि लगेच दुसऱ्या कोठडीतील आमच्या घरच्या कपड्यांची बांधून ठेवलेली बोचकी आमच्यापुढे आणून टाकण्यात आली. जेलचे कपडे अंगावर घालताना घरचे अंगावरचे कपडे एकत्र करून त्यांचे गाठोडे बांधून, त्यावर कैद्याचा रजिस्टर नंबर व नाव शाईने लिहून ते कपडे सुरक्षित ठेवलेले असतात. जेव्हा कैद्याच्या ओळखकार्डावर लिहिलेल्या तारखेप्रमाणे त्याची सुटका होते तेव्हा सुटका होण्याच्या आदल्या दिवशी ते कपड्यांचे गाठोडे कैद्यास देण्यात येते. मग तो ते कपडे स्वच्छ धुवून, घड्या घालून दुसऱ्या दिवशी बाहेर जाताना घालण्यासाठी ठेवून देतो. आमची सुटका अनपेक्षित झाल्याकारणाने न धुतलेले कपडेच अंगावर घालण्याची पाळी आली होती. हे कपडे धुवून, आज रात्री तुरुंगात राहून उद्या येथून जाऊ असे कोणी म्हणताच हा तुरुंग आहे, येथे सुटकेचा हुकूम हातात पडताच कैद्याला तुरुंगाबाहेर पाठवणे हे आमचे काम आहे असे तुरुंगाधिकाऱ्याने सांगितले.

अर्थात् धुतलेले कपडे घालायला मिळावे असे कितीही वाटत असले तरी तुरुंगात त्यासाठी राहण्यास कोणी तयार नव्हते हेही तितकेच खरे होते. जो कोणी असे बोलला होता तो केवळ 'फुकाचे मुखी बोलता काय वेचे' याच अर्थाने बोलत होता. घरचे कपडे घातल्यावर पकडल्यानंतर आमच्या जवळचे पैसे व इतर मौल्यवान वस्तू तुरुंगातील अधिकाऱ्याने रीतीप्रमाणे कचेरीत ठेवल्या होत्या त्या ज्याच्या त्याला परत करण्यात आल्या. पकडताना आंथरुणातून उठवून पकडले होते. तेव्हा नुसती आश्रमाची झडती घेतील अशीच कल्पना असल्याने अंगावरचे नेसू धोतर नि सदऱ्यानिशी मी खाली अंगणात आलो होतो. जवळचे पैसे, इतर कपडे आंथरुणातच होते. ते सारे पोलिसांनी जप्त केले होते. खिशात असलेले आठ बारा आणे माझ्या नावाने तुरुंगात जमा झाले होते. तेवढे मला मिळाले. विसापूर तुरुंगाच्या कचेरीत हे सारे बाहेर पडण्याचे विधी होत असता आमची सुटका हायकोर्टाच्या हुकुमान्वये होत आहे एवढेच समजले. तुरुंगाधिकाऱ्यांना अधिक काही माहीतही नव्हते व ती माहिती करून घेण्याच्या फंदात मीही पडलो नाही. तुरुंगातून सुटका होण्याचा मानसिक आनंद काही वेगळाच असतो. जितका तुरुंग कष्टाचा तितका हा आनंद जास्त असे प्रमाण असते. तुरुंगाधिकाऱ्याचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनी इतरांप्रमाणे मला पकडलेल्या ठिकाणचे म्हणजे विलेपार्ले येथपर्यंतचे रेल्वेचे तिकीट दिले होते.

विसापूर तुरुंगातून बाहेर पडताना त्या जागेचा अखेरचा निरोप घेतला तेव्हा याच जगात पुन्हा बारा वर्षांनी यावे लागणार आहे अशी मनात कल्पनाही नव्हती. आता स्टेशनवर जाताना मागेपुढे पोलीस शिपाई नव्हते. फक्त संध्याकाळच्या गाडीने पुण्यास जाण्याचे बंधन होते. कारण तिकीट त्याच तारखेचे होते. विसापूर गावात पहण्यासारखे काही नसल्याने इतरांबरोबर मी थेट स्टेशनवर आलो. संध्याकाळ होऊन गेली होती. शुक्लपक्षांतील दशमीच्या आगेमागे असलेली कोणती तरी ती तिथी असावी. कारण आकाशात चंद्र दिसत होता. स्टेशनवर आल्यावर प्रथम कोणती गोष्ट केली असेल तर खिशातील तुटपुंजा पैशांतून एकदोन आणे खर्च करून चहाचा कप हातात घेऊन सावकाश चहा पिण्याचा आनंद घेतला. त्या चहाच्या घोटांची चव काही वेगळीच होती. कोणत्याही रुचीच्या अर्थाने तो चहा चांगला

नव्हता; तरी पण अडीच महिन्यानंतर ते पृथ्वीवरचे सामान्य माणसाचे अमृत माझ्या जिभेवर पडत होते. इतके दिवस अप्राप्य असलेला चहा मला आता मिळाला होता. मी स्वतंत्र झालो होतो. परतंत्रता नि स्वतंत्रता यांतील फरक तुरुंगवास भोगल्याशिवाय कळणार नाही. तुरुंगवास कांही महिन्यांचा नि वर्षानुवर्षांचा यात कालगणना नि हालअपेष्टांच्या दृष्टीने तुलना करता येण्यासारखा पुष्कळच फरक असला तरी तुरुंग या शब्दाने मुख्य अर्थ 'परतंत्रता' हाच अभिप्रेत असतो व तो अर्थ काही महिन्यांचाच नव्हे तर काही दिवसाच्या अनुभवानेही प्रतीत होऊ शकतो. विसापूर स्थानकावर पुण्याकडे जाणाऱ्या गाडीची वाट पहात असता तुरुंगातील काही वेचक स्मृती मनात गोळा होऊ लागल्या. मनाचा एक मजेदार धर्म आहे की ते चांगल्याची तशीच वाईटाची स्मृती सारख्याच साक्षेपाने जतन करते.

पण या वेचक स्मृतींना मागे सारून मनाने वर्तमानकालाच्या स्वातंत्र्याचा आस्वाद घेण्याचे ठरविले. विसापूरला येताना बरोबर शिपाई होते. आता तुरुंगातून सुटल्याचा विसापूर तुरुंगाच्या मुख्य अधिकाऱ्याचा दाखला नि विलेपार्लेपर्यंतचे तिकीट याशिवाय तुरुंगाचा साक्षात संबध असणारे माझ्याबरोबर काही नव्हते. सुटका अनपेक्षित झाली. जशी अटक तशी सुटका. पुण्यास गाडी पोचण्यापूर्वी दौंड जंक्शनवर ती जास्त वेळ उभी राहिली. तेथे पुन्हा चहाच घेतला. हातात सामान असे काही नव्हतेच. डोक्यावर टोपी नाही, नि खिशात पाचसहा आण्याच्या आतबाहेर असलेला खुर्दा. पण या साऱ्या नन्नाच्या पाढ्यात न सामावणारे एक अस्तिपक्षी धन मजजवळ होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मी आपणहून भाग घेतला होता व तुरुंगवासाचा अनुभव घेऊन जगाची खरी ओळख करून घेण्याच्या मार्गावरचा वाटसरू बनलो होतो. लौकिक संपत्ती नि आंतरिक समाधान यामधील निश्चित मर्यादा मला त्या वेळी उमगल्या नव्हत्या, पण त्या मर्यादा समजावून घेण्याच्या वाटेवरून मी मार्ग आक्रमीत होतो. विसापूराहून सुटल्यावर उगीच या वाटेला वळलो, आता घरी गेल्यावर चारचौघां मित्रांसारखा वागेन, असा विचार चुकूनही मनात आला नाही. पुणे स्टेशनावर गाडी आली. तिकीट थेटचे होते. पण पोटातील भुकेने पुढे जाण्याचे नाकारले. स्टेशनवरच काही खाईन

तर खिशात पैसे नव्हते. तिकीट कलेक्टरला जेलकडून मिळालेले तिकीट दाखवून मला गावात जाऊन मग दुपारच्या गाडीने मुंबईकडे जाता येईल का असे विचारले. त्याने माझा एकंदर अवतार पाहून म्हणा किंवा नियमानुसार म्हणा, मला गावात जाण्यास परवानगी दिली !

पुण्यात एका आप्ताकडे गेलो. प्रथम स्नान केले. नवे स्वच्छ कपडे घातले. बऱ्याच दिवसांनी घरचे जेवण मिळाले. मी तेव्हा सगळ्यांच्या कौतुकाचा विषय झालो होतो. माझी आई पुण्यास मला भेटण्यासाठी म्हणून आली ती तेथेच उतरली होती. तिने माझ्या आप्तांबरोबर येरवडा तुरुंगात जाऊन चौकशी केली. तेथून ती पुढे विसापूरला आली. हा सारा वृत्तांत मला येथे समजला. पुण्याच्या मंडळींचे मी मत पुण्यांत काही दिवस रहावे असे होते. पण खिशात मुंबईचे तिकीट नि घरच्या माणसांना भेटण्याची ओढ यामुळे मी परत पुणे स्टेशनवर येऊन मुंबईच्या गाडीत बसलो. विसापूरच्या थंडीने शरीरावर बराच परिणाम केला होता. पायास कातरे पडले होते. कोरड्या हवेने व कदान्नाने शरीरावर आजारपणाची अवकळा आली होती. गाडीत मिळालेल्या जागेवर मी बसलो होतो नि इतक्यात माझ्या नाकातून रक्ताची धार वाहू लागली. विसापूरच्या उष्णतेचा हा परिणाम असावा. तुरुंगातून सुटलेला सत्याग्रही असा माझा परिचय भोवतालच्या उतारूंना झालेलाच होता. त्यांच्यापैकी एकाने सहानुभूतीने मला लगोलग खाली उतरवून स्टेशनाबाहेर असलेल्या एका दवाखान्यात नेऊन डॉक्टरकडून काही इलाज करवून परत गाडीत बसवले. नाकातून रक्त येण्याचे तोपर्यंत थांबले होते. ठाण्यास गाडी आल्यावर मी खाली उतरलो व घरी गेलो. विलेपार्ले येथे जाण्याची काही गरज नव्हती. आमच्या आकस्मिक सुटकेचे कारण मला वर्तमानपत्रात वाचायला मिळाले. विलेपार्ले येथील आश्रम सरकारने रात्री बारा वाजता बेकायदा ठरवून त्या आश्रमातील सत्याग्रहींना पकडले व मालमत्ता जप्त केली. पहाटे साडेतीन वाजता सत्याग्रही आश्रम बेकायदा ठरल्याचे सत्याग्रहींना कळवण्यात येऊन त्यांना तेथून निघून जाण्याची संधी देण्यात आली नव्हती, या मुद्यावर मुंबईच्या बार कौन्सिलने हायकोर्टात अर्ज केला व हायकोर्टाच्या हुकुमाने आमची सुटका झाली होती !

o o o

प्रासाद आम्हा बंदीशाळा

२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ७५८३६ वि: ....हिंदुस्तान
दिनांक २१२५ नों: वि: २१३७१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र: १५९५५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१०. एक वर्ष चार महिने

माझ्या तुरुंगवासाच्या बाबतीत, अटकेतला अनपेक्षितपणा हा पहिल्या वेळेसारखाच दुसऱ्याही वेळी अनुभवास आला.

१९४० सालचा ऑक्टोबर महिना होता. त्या दिवशी सकाळीच एका मित्राबरोबर बुद्धिबळाचा डाव मांडून बसलो होतो. ठाणे येथील टेंभी नाक्यावर, तेव्हा मी एका दुमजली इमारतीत एका हॉटेलच्यावर राहात होतो. त्या जागेच्या व्हरांड्यात आमचा डाव पडला होता. डाव चालू असताच तो मोडावा लागण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. एक गणवेषातील पोलिस इन्स्पेक्टर, दोनतीन शिपाई नि त्याच भागात राहणारा

एक माणूस असे तेथे आले. त्यांनी येतांच "तुमच्या जागेची झडती द्यायची आहे" असे सांगितले. तीन-चार दिवसांपूर्वी ठाणे शहर काँग्रेस समितीचा चिटणीस या नात्याने मी एक सायक्लोस्टाइल पत्रक काढले होते. स्थानिक मुलींच्या सरकारी हायस्कूलतर्फे एक नाटक युद्धाच्या मदतीसाठी व्हायचे होते. या नाटकाची तिकिटे विकत घेऊन युद्धाला मदत करू नका, कारण काँग्रेसचा या युद्धाला विरोध आहे, अशा आशयाचे ते पत्रक होते. ते शहरात ठिकठिकाणी भिंतीवर लावण्यात आले होते. तसेच श्री. नाथ ताम्हणे यांनीं ते मुलींच्या हायस्कूलसमोर वाटलेही होते. हे पत्रक सरकारने आक्षेपार्ह ठरवले व त्याच्याच शोधासाठी ही मंडळी आली होती. सुमारे अर्धा तास झडती झाल्यानंतर पोलिसांनीं हवे ते पत्रक सापडले असे म्हणून त्याचा पंचनामा केला. तेथून जाण्यापूर्वी पोलिस इन्स्पेक्टरनीं मला सांगितले, "तुम्ही अकरा वाजता फौजदार कचेरीत या" मी विचारले, "मला अटक केली आहे का?" त्यांनी सांगितले, "तुम्ही या तर खरे, तुम्हाला काही गोष्टी विचारायच्या आहेत."

माझ्या येथे झालेल्या या झडतीची वार्ता शहरात पसरली. मी बाहेर पडताच अशाच झडत्या आणखी पाच सहा ठिकाणी घेण्यात आल्याचे समजले. ज्या सायक्लोस्टाइल मशीनवर ही पत्रके काढण्यात आली ते मशीन पोलिसांना हवे होते. पण ते त्यांना मिळाले नाही. श्री. नाथ ताम्हणे यांच्याहि घरी पोलिसांनी भेट देऊन झडती घेतली होती व त्यांनाही माझ्याप्रमाणे फौजदार कचेरीत बोलाविले होते. अकरा वाजेपर्यंत अडीच तीन तासाचा अवधी होता. मला लगेच पकडतील अशी कल्पना नव्हती. मी माझ्या काही निकट परिचयाच्या मित्रांच्या घरी जाऊन त्यांना भेटलो. काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाच्या ज्या सभासदांना ही झडतीची वार्ता समजली ते जास्त चौकशी करण्यासाठी माझ्याकडे आले होते. त्यांच्या व माझ्या काही मित्रांचा सल्ला पडला की जर माझ्यावर पत्रक-प्रकरणी खटला भरण्यात आला तर मी माझा बचावासाठी वकील द्यावा. असा वकील देण्याने युद्धाबाबतचा काँग्रेसचा दृष्टीकोन स्पष्टपणे मांडण्यास मदत होईल. काँग्रेसतर्फे सुरू होणाऱ्या अधिकृत सत्याग्रहाच्या अगोदर मला अटक झाल्याने सत्याग्रहीला लागू होणारे नियम मला बंधनकारक नव्हते. तसेच

माझ्या आक्षेपार्ह पत्रकात युद्धविरोधाबरोबरच आणखी एक मुद्दा होता. शाळेच्या स्नेहसंमेलनप्रसंगी होणाऱ्या नाटकाचा उपयोग युद्ध मदतीसाठी करण्याचे मुलींच्या सरकारी शाळेच्या प्रमुखांनी ठरवले होते. शाळेतील वरच्या वर्गातल्या मुलींचा व त्यांच्यापैकी कांही मुलींच्या पालकांचा या गोष्टीस विरोध होता. शाळेतील विद्यार्थिनींना युद्ध प्रयत्नासाठीं त्यांच्या इच्छे-विरुद्ध राबवू नये, असा तो मुद्दा होता. तो मुद्दा जनतेपुढे व सरकारपुढेही णे आवश्यक असल्याने हा खटला लढवण्याचा निर्णय घेतला होता.

फौजदार कचेरीत अकराच्या सुमारास मी व माझे सहकारी श्री. नाथ ताम्हणे हजर होताच आम्हां दोघांस अटक करण्यात आल्याचे सांगून फौजदार कचेरीतून कलेक्टर कचेरीत नेऊन कलेक्टरसाहेबांपुढे उभे करण्यात आले. झडतीच्या हुकूमाबरोबरच आमच्या अटकेचाही हुकूम देण्यात आला होता. दोन अडीच तास गावात हिंडण्याफिरण्याची मिळालेली मोकळिक ही पोलीसांनी काही हेतूने दिली असावी. कलेक्टरसाहेबांनी भारत संरक्षण कायद्यान्वये युद्धमदतीला विरोध केल्याच्या आरोपावरून आमचा खटला चालवण्याचा हुकूम दिला. आमचे वकील व स्थानिक काँग्रेस नेते श्री. सी. टी. रणदिवे आमच्याबरोबर होतेच. प्रांतसाहेबांसमोर आमचा खटला उभा राहिला. आमच्या अटकेची व सुरू झालेल्या खटल्याची हकीकत गावात कळताच कार्यकर्ते व शाळेच्या वरच्या वर्गातील विद्यार्थी यांनी कोर्टात गर्दी केली. आम्हाला जामीनावर सोडण्याची मॅजिस्ट्रेटने तयारी दाखवली, पण आम्ही जामीन न देता तुरुंगातच जाण्यास तयार असल्याचे सांगितले.

त्या दिवशी संध्याकाळी ठाणे तुरुंगात दुसऱ्यांदा प्रवेश केला. मधला दहा वर्षांचा काळ गेला तरी तुरुंग होता तसाच होता. अंडरट्रायलवाल्यांचा एक वेगळाच विभाग तुरुंगात असतो. त्यांना कैद्याचे नियम लागू नसतात. कोर्टातील खटल्याचे त्या दिवशीचे काम संपले की त्यांना तुरुंगात पोचवण्यात येते व पुन्हा खटल्याची तारीख लागली असेल त्या तारखेस त्यांना कोर्टात हजर केले जाते.

त्या रात्री डोक्यात अनेक प्रसंगांच्या आठवणींची गर्दी उसळली होती. सगळ्या घटनांची संगतवार उकल लावण्याची मनाची धडपड चालली होती.

प्रथम अटक झाल्याचे कारण मन शोधू लागले. ही अटक तशी अनपेक्षित नव्हती; नव्हे ती एका अर्थाने ओढवून घेतली होती. दुसरे जागतिक युद्ध हे साम्राज्यवादी युद्ध आहे व साम्राज्याच्या हितासाठी चाललेल्या या युद्धात त्याच साम्राज्याच्या अंकित असलेल्या भारतीय जनतने भाग घेऊ नये असे काँग्रेसने जाहीर केले होते. पण त्याच वेळी या युद्धात इंग्लंडने भाग घेऊन हिटलर–मुसोलिनीच्या फॅसिस्ट–हुकूमशाही सत्तेविरुद्ध लढा पुकारला असल्याने तेवढ्यापुरती भारताला इंग्लंडविषयी सहानुभूती होती आणि म्हणून भारतीयांचे या युद्धाबाबतचे धोरण स्पष्टपणे सांगण्याचे भाषणस्वातंत्र्य काँग्रेसला हवे होते. हे मर्यादित स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी होणारा सत्याग्रह सर्वस्वी म. गांधीचे तंत्राने व्हायचा होता. त्यावेळी काँग्रेस संघटनेत काँग्रेस सोशॉलिस्ट हा गट होता. या गटाच्या नेत्यांना काँग्रेसकडून युद्धविरोधी आंदोलनाच्या बाबतीत चाललेला विलंब सहन होत नव्हता. काँग्रेसमधील काँग्रेस सोशॉलिस्टांनी या साम्राज्यवादी युद्धाचे स्वरूप जनतेसमोर मांडण्याची संधी घ्यावी, अशी माझी भूमिका मी काँग्रेस सोशॉलिस्ट पक्षाचा असल्यामुळे होती. या भूमिकेमुळेच त्या सरकारी मुलींच्या शाळेतील युद्ध मदतीसाठी तिकिटे लावून होणाऱ्या कार्यक्रमाची हकिकत कळताच माझ्या नावाने आक्षेपार्ह ठरलेले पत्रक काढून ते ठिकठिकाणी भिंतीवर डकवून मी व माझे सहकारी श्री. दत्ता ताम्हणे अलिबागेस दोन दिवस गेलो होतो. अलिबागेहून मी परत आल्यावर एक दोन दिवसांत हा अटकेचा प्रकार घडला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी दहा वाजता आम्हाला कोर्टात घेऊन जाण्यासाठी पोलिस तुरुंगाच्या आवाराबाहेर हजर होते. ठाण्याच्या रस्त्यावरून कोर्टात खटल्यासाठी आरोपीना नेत असताना मी अनेकवेळां पाहिले होते. कारण ठाणा तुरुंग नि कोर्ट यांच्या वाटेवर खेळण्याची मैदाने नि फिरायला जाण्याचे रस्ते आहेत. कोर्टाकडे निघालेल्या या कैद्यांच्या हातात बेड्या असत नि असे कैदी पुष्कळ असले तर त्यांना पुन्हा एका दोरीने बांधलेले असे व त्या दोरीचे टोक पोलिसाच्या हातात दिसे. पण हे सारे गुन्हेगार कैद्यांच्या बाबतीत असते. राजकीय कैद्यांना सहसा बेड्या घालीत नाहीत, हे मला माहीत होते. पण तुरुंगाचा छोटा दरवाजा उघडून तुरुंगातील पोलिसांनी आम्हांला

बाहेरच्या पोलीसांच्या स्वाधीन करताच त्यांच्या जमादाराने बेडी पुढे करून तिच्या एका कडीत माझा एक हात व दुसऱ्या कडीत श्री. नाथ ताम्हणे यांचा हात अडकवला. बेड्या घालण्याबाबत त्या पोलिसाला विचारता आमच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आम्ही करीत आहो, हे उत्तर आले. तीस साली 'क' वर्गीय सक्तमजुरीच्या कैद्याचे कपडे अंगावर चढविले होते. त्या वेळी या बेडीचे सोपस्कार व्हायचे राहिले होते.

राजकीय कैद्यांनी बेडी घालून घेण्याविरुद्ध सतत लढे दिले आहेत. इतर गुन्हेगार कैदी व राजबंदी यांत सरकारने फरक करणे जरूर आहे, असे नुसत्या राजबंद्यांचेच नव्हे तर समंजस त्रयस्थ माणसाचेही मत होते. पण त्या साऱ्या मतप्रणालीचा व समंजसपणाचा येथे काही उपयोग नव्हता. वस्तुस्थिती अशी होती की आम्हा दोघांस बेडी घालून ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या नोकरांनी आमच्या गावातील रस्त्यावरून चालवले होते. कोर्टाच्या आवारांत आज जास्तच गर्दी होती. आम्ही तेथे पोचण्यापूर्वीच नातेवाईक मंडळी, कार्यकर्ते, वकील हे हजर होते. पोलिसांनी आमच्या हातांत बेड्या घातल्या आहेत हे पाहताच आमच्या वकिलांना राग आला. त्यांनी मॅजिस्ट्रेटसाहेबांकडे याबाबत तक्रार केली. आमच्या हातांतील बेड्या पाहताच काही आप्तेष्टांच्या डोळ्यांत पाणी आले. अपमान करण्याच्या बुद्धीने हेतुपुरस्सर बेड्या घालण्यात आल्या, असेच त्यांस वाटले असावे. पोलिसांच्या दृष्टीने ते गुन्हेगारांत कोणताच फरक करीत नसल्याने कैद्याने पळून जाऊ नये म्हणून नेहमी घेण्यात येणाऱ्या दक्षतेनुसार त्यांनी बेड्या घातल्या होत्या. हातांतील या बेडीने सत्तेपुढे शहाणपण नाही या म्हणीचा पाशवी अर्थ लक्षात आला एवढे मात्र खरे.

आमच्या खटल्याचे वेळी कोर्टाच्या आवारांत खूप गर्दी झाली होती. युद्धप्रयत्नांस अडथळा आणण्याच्या आरोपावरून भरण्यात आलेला व लढविला गेलेला तो ठाणे जिल्ह्यातील पहिलाच खटला असावा. आमच्या वकिलांनी भाषण करताना काँग्रेसची युद्धविषयक भूमिका मांडली होती. आमच्यासाठीही त्यांनी एक निवेदन तयार करून आणले होते. ते वाचून आम्ही कोर्टापुढे सादर केले. बचाव देण्यामागील

भूमिका होणारी शिक्षा टाळणे किंवा ती कमी करण्याचा प्रयत्न करणे ही नव्हती; तर उलट, या दुसऱ्या जागतिक युद्धाबाबतच्या काँग्रेसच्या भूमिकेचा प्रचार व्हावा हीच होती. त्यामुळे वकिलांचे भाषण व आमचे निवेदन हे सर्व झाल्यावर मॅजिस्ट्रेटसाहेब श्री. रावळ यांनी खटल्याचा निकाल सांगून आम्हांला एक वर्ष सक्तमजुरी, दोनशे रुपये दंड, दंड न दिल्यास आणखी चार महिने कैद, अशी शिक्षा दिली. माझे सहकारी श्री. नाथ ताम्हणे हे वकील असल्याने व मी त्या वेळी 'आशा–प्रमोद' या साप्ताहिकाचा संपादक असल्याने आम्हाला तुरुंगात 'ब' वर्ग देण्यात यावा, अशी मॅजिस्ट्रेटनी शिफारस केली. एका सायक्लोस्टाइल पत्रकासाठी एवढी शिक्षा होईल असे कोणासच वाटले नव्हते. मला स्वतःला तर शिक्षा किती दिली हे ऐकूच आले नव्हते. नंतर मला परत तुरुंगात जाताना शिक्षा किती झाली ते माझ्या सहकाऱ्याकडून कळले.

अटक, खटला, खटल्यात दिलेला बचाव, कोर्टात असलेली गर्दी, हातात बेड्या घातल्याने झालेला मनःक्षोभ यामुळे भोवतालचे वातावरण तीन दिवस गरम होत होते. आमच्या व आमच्याशी समानशील असलेल्यांच्या भावनांना एक प्रकारचे उधान आले होते. खटल्याचा निकाल लागून शिक्षा सांगताच हे सारे उधान जणू शांत होत होते. खटला चालवल्याने युद्धविरोधी पत्रक काढण्यामागील प्रचाराचा हेतू साधला, हा निश्चित फायदा झाला. एक वर्षापेक्षा अधिक काळ तुरुंगाच्या भिंतीच्या आत घालवायचा होता. कोर्टाच्या आवारात जमलेल्यांचा निरोप घेऊन त्रिंबकजी डेंगळ्याच्या वास्तव्याने ऐतिहासिक बनलेल्या त्या ठाण्याच्या तुरुंगाकडे रक्षकांच्या पाहऱ्यात आमची पावले संथपणे पडत होती. मित्र-परिवार साश्रूनयनांनी निरोप देत होता.

११ नाशिकरोडला प्रस्थान

ठाण्याच्या तुरुंगात दहा वर्षांनंतर पुन्हा आलो होतो. अंडरट्रायल म्हणून काढलेले दिवस संपले. आता एक वर्ष आणि चार महिन्यांची सजा डोक्यावर होती. खरी शिक्षा एक वर्ष. वरचे चार महिने दंड न दिल्यास भोगावी लागणारी शिक्षा. दंड भरण्याचा अर्थात प्रश्नच उद्‌भवत नव्हता. तीस साली मिठाच्या सत्याग्रहाच्या काळात झालेल्या शिक्षेतही ५० रुपये दंडाऐवजी भोगाव्या लागणाऱ्या शिक्षेची मुदत दिली होती. पण त्या वेळी मूळ शिक्षा भोगण्याच्या आधीच हायकोर्टाच्या हुकुमाने सुटका झाल्यामुळे दंड भरण्याची किंवा दंडाऐवजी शिक्षा भोगण्याची पाळी आली नव्हती.

या खेपेस तुरुंगात प्रवेश करताच दुसऱ्या वर्गाचे कैदी या नात्याने आम्हांला बऱ्याच सवलती मिळाल्या. स्वतंत्र खोली, सकाळी चहा, पाव आणि लोणी, दुपारच्या जेवणात चपात्या व एक जादा भाजी, दुपारी चहा, अशी बडदास्त सुरू झाली. हीहि शिक्षा सक्तमजुरीची दिल्याने अंगावरचे कपडे सरकारी मिळाले. या खेपेस राहण्यास मिळालेल्या खोल्यांपुढे मोकळी जागा होती. काम तसे काहीच नव्हते. ठाणे तुरुंगात दुसऱ्या वर्गाचे कैदी ठेवण्याची कायमची व्यवस्था नसल्यामुळे दुसऱ्या दिवसापासूनच आम्हांला नाशिकला किंवा पुण्याला पाठवणार, अशा बातम्या येऊ लागल्या. दुसऱ्या वर्गाच्या कैद्याचा भत्ता, त्याला मिळणारी वर्तमानपत्रे यांच्या सोयी ठाण्याच्या तुरुंगात कायम स्वरूपाच्या नव्हत्या. त्यामुळे ठाणे तुरुंगातून बदलीच हवी होती. ही बदली येरवड्याऐवजी नाशिकलाच मिळेल तर फार बरे होईल, असे मला राहून राहून वाटत होते. एकतर येरवड्याचा तुरुंग मी मागे पाहिला होता. एकदा पाहिलेले ठिकाण पुन्हा कशाला बघा, आणि तेही जेलचा कैदी म्हणून ! त्याशिवाय आणखी दुसरीकडे जाण्यास मिळाले

तर वेगळा अनुभव येईल असे वाटे. आणि त्यातच नाशिक मनात भरण्याचे कारण तुरुंगातील शिपाई व त्यांच्या वरचे अधिकारी नाशिकच्या हवेची व तेथील तुरुंगातल्या स्वच्छतेची, मोकळेपणाची माहिती देत. येरवडा व नाशिक हे दोन्ही मोठे तुरुंग असले तरी येरवड्याला तुरुंगखात्याचे अधिकारी रहात असल्याने तेथे शिस्त नेहमीच कडक असे. नाशिकरोड तुरुंगात त्या मानाने शिस्त कमी. नाशिक रोड तुरुंगाचे आणखी आकर्षण वाटण्याचे कारण आमचे त्या वेळच्या काँग्रेस सोशलिस्ट पक्षाचे बरेच कार्यकर्ते नाशिकरोड तुरुंगात होते. आमच्या आधी काही महिने साथी एस्. एम्. जोशी, केशव गोरे व माधव लिमये नाशिकलाच 'ब' वर्गात गेले होते. पण आम्ही तुरुंगातील कैदी असल्याने कोठे जावयाचे हे आमच्या मतावर बिलकूल अवलंबून नव्हते आणि म्हणूनच एक तऱ्हेची हुरहूर नि अपेक्षा यांत दिवस जात होते.

एके दिवशी दुपारी कचेरीत बोलावणे आले. माझ्याकडे आपुलकीच्या भावनेने पाहणारे व राजकीय मते न जुळताही मला वेळप्रसंगी मदत करणारे माझे एक उदारमनस्क स्नेही माझ्या वडिलांना बरोबर घेऊन मला भेटण्यास आले होते. ही भेट जेलरच्या कचेरीत खुर्चीवर बसून झाली. दहा वर्षांपूर्वी विसापूरच्या तुरुंगात तुरुंगाच्या तारांच्या दाराआड्न आईची भेट उभ्या उभ्या झाली होती त्याची आठवण या वेळी होणे स्वाभाविक होते. या भेटीत तसे बोलणे काहीच झाले नाही. कारण बोलण्यासारखे काही नव्हतेच. मला तुरुंगात काय काय वस्तू हव्या आहेत याची चौकशी माझ्या-स्नेह्यांनी केली. त्या वेळी अंडरट्रायल म्हणून तुरुंगात आलो असल्याने माझ्याजवळ असलेले घड्याळ तुरुंगाधिकाऱ्यांच्या ताब्यात होते. ते घड्याळ माझ्याजवळ राहू शकेल का असे मी अधिकाऱ्यांस विचारताच कोणतीही मूल्यवान वस्तू कैद्याजवळ ठेवता येत नाही आणि तुरुंगात दर तासाला ठोके पडत असल्याने घड्याळाची गरज नाही असे त्याने म्हणताच माझ्या मागणीचा वेडगळपणा माझ्या ध्यानात आला.

या खेपेस दुसरा वर्ग मिळाल्यामुळे स्वतंत्र खोली, रात्री भरपूर प्रकाश देणारा विजेचा दिवा, लिहिण्यावाचण्याची सवलत या गोष्टी आता आपो-

आपच आल्या. तुरुंगाचा तुरुंगपणा यामुळे पुष्कळच नष्ट झाला होता. आपण काही विशेष केले आहे, ब्रिटन युरोप-खंडात पोलंडच्या स्वातंत्र्य-रक्षणासाठी लढत असले तरी भारताला गुलामगिरीतून मुक्त करण्यास तयार नाही नि म्हणून आमचा या युद्धास विरोध आहे, अशा आशयाचे पत्रक काढल्यामुळे झालेली शिक्षा ही मुळात शिक्षाच वाटत नव्हती. यामुळे या शिक्षेतून निर्माण झालेली बंधने, बंधने भासलीच नाहीत. वडील आणि ते स्नेही भेटून गेल्यावर मी माझ्या खोलीत परतलो. या खोल्या कोठड्या नव्हत्या. त्यांना गज होतें. पण ठाणे तुरुंगाच्या सर्वच इमारती इतिहासकालीन असल्याने सर्वत्र कोंदटपणा, उदासपणा भासत होता. मी घरून मागविलेल्या वस्तूंत चरखा, पेळू व काही पुस्तके, तसेच चहाचा थर्मासही मागविला होता. सगळा जामानिमा कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्याला शोभणारा होता !

आमच्या ठाण्याच्या वास्तव्यातच त्या वर्षाची दिवाळी आली. आमच्यावर देखरेख करणारा पोलीस अधिकारी एके दिवशी घरचे शंकरपाळे घेऊन आला. म्हणाला, "आज बाहेर दिवाळी आहे. (ही माझी तुरुंगातील दुसरी दिवाळी होती.) सगळे घरी गोडधोड खात आहेत. तुमच्यासाठी मी घरचे थोडे शंकरपाळ आणले आहेत." 'ब' वर्गाच्या कैद्यांच्या जेवणात सकाळी पावाबरोबर लोणी असते. एकदा लोणी बाजारातून आणण्याचे राहून गेले; त्या दिवशी जेलरने आपल्या घरचे तूप पाठवल्याचे आठवते. खाण्यापिण्याचे बाबतीत अगर कसल्याच बाबतीत आपल्या हक्काबद्दल जागरूक राहण्याची माझी वृत्ती प्रथमपासूनच नव्हती. जेलमध्येच नव्हे तर बाहेरही माझे काही हक्क आहेत नि ते मला मिळालेच पाहिजेत, असा आग्रही स्वभाव नसल्याने बाहेरच्याप्रमाणे तुरुंगातही अधिकाऱ्यांबरोबर तंटा झाल्याचे माझ्या स्मरणात नाही. ठाण्याच्या तुरुंगातील आमचे वास्तव्य काही दिवसांचेच आहे, अशी आम्हांला जाणीव करून देण्यांत आल्याने मी दररोज नाशिक-रोड की येरवडा याची मनातल्या मनात ओलीसुकी करीत होतो. शेवटी कौल नाशिकरोडचा आला. हा नाशिकरोडचा प्रवास सरकारी खर्चानेच आम्ही कैदी असल्याने पोलिसच्या पहाऱ्यातूनच होणार होता. तीस साली

ठाणा, येरवडा नि विसापूर असे तुरुंग झाले. आता ठाण्याहून नाशिक रोड आणि तेथून मात्र पुढे कोठे जाण्याची शक्यता नव्हती.

ठाण्याहून आम्हांला अमुक गाडीने नाशिकच्या तुरुंगात नेणार असल्याची बातमी बाहेर कळली होती. ठाण्याचा तुरुंग सोडून निरोप घेताना मी एकदा मागे वळून पाहिले. घरातून बाहेर प्रवासाला जाताना देवांना नमस्कार करून देवापुढे सुपारी ठेवून जाण्याची घरी पद्धत होती. तुरुंगातून प्रवासाला जाताना असे कोण करणार ? पण ती इमारत सोडून जाताना मागे वळून पाहण्याची जी क्रिया घडली तीत, त्या ठिकाणी लाभलेल्या, मर्यादित का होईना, स्नेहाबद्दलची कृतज्ञताच व्यक्त होत होती. स्टेशनवर येताच माझे सहकारी श्री. ताम्हणे यांच्या घरच्या माणसांची एकच गर्दी जमलेली आढळली त्यांच्या नातेवाईकांनी घरून अनेक खाण्याचे पदार्थ व कॉफी आणली होती. आम्ही कैदी आहोत नि आता वर्षापेक्षा अधिक काळ तुरुंगात राहणार आहोत, हे सारे माहीत असूनही आमच्याबरोबरचे पोलीस त्या परिस्थितीची जाणीव क्षणाक्षणाला करून देत असताही, तेथे खेदाचे, दुःखाचे कसलेच वातावरण नव्हते. जणू काही आम्ही दूरच्या ठिकाणी सहज गमतीचा प्रवास म्हणून निघालो असून फार दिवस भेट होणार नसल्याने ही सारी मंडळी जमली होती ! स्टेशनवरचा हा निरोपसमारंभ कैद्यांच्या एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात होणाऱ्या बदलीने होऊ शकतो हे खरे असले तरी तो सगळ्यांच्याच वाट्याला येतो असे मात्र नाही. अखेर ठाणे स्टेशनवरून गाडी सुटली आणि स्थानकावरची माणसे मागे राहिली. जेलच्या नियमांनुसार ' ब ' वर्गाचे कैदी म्हणून आमचा प्रवास ' इंटर ' च्या वर्गाने चालला होता.

आता शरीराची नि मनाची दोहोंची गती चालू झाली. माझ्या मनाने दहा वर्षांपूर्वीच्या ठाणे स्टेशनावरून येरवड्याच्या बाजूने होणाऱ्या प्रवासाची व या वेळेची तुलना करण्यास सुरवात केली. दहा वर्षांपूर्वी मी एक साधा स्वयंसेवक होऊ घातलेला तरुण होतो. तेव्हा कोणत्याही राजकीय संघटनेचा सभासद नव्हतो म्हणण्यापेक्षा सभासद होण्याची कल्पनाही मनात नव्हती. त्या वेळच्या मिठाच्या सत्याग्रहात मनातील भावनांनी मी ओढला

गेलो होतो. तेव्हा सत्याग्रहात सामील होण्याचा निर्णय मी माझ्या त्या वेळच्या बरोबरीच्या मित्रांसह आईवडिलांना न कळविता घेतला होता. या खेपेस तसा निर्णय घेण्याची आवश्यकताच नव्हती. गेली दहा वर्षे काँग्रेस संघटनेत काम करून या वेळी मी ठाणे शहर काँग्रेस कमिटीचा एक सेक्रेटरी होतो. दहा वर्षांपूर्वी मी नोकरीधंदा कोणताच करीत नव्हतो. एक-दोन शिकवण्या मिळाल्या होत्या. त्या संभाळून नुसते वाचन व गप्पा यांत वेळ घालवीत होतो. आता या मधल्या दहा वर्षांच्या काळात मी प्रथम 'नवाकाळ'चा ठाणे जिल्ह्याचा बातमीदार, पुढे काही काळ पुण्याच्या 'केसरी'चा बातमीदार, महाराष्ट्र थिऑसॉफिकल सोसायटीच्या 'धर्म-जागृति' मासिकाचा व्यवस्थापक, मुंबईच्या त्या वेळच्या 'चित्रा' साप्ता-हिकात व नंतर श्री. रांगणेकर-काणेकर यानी काढलेल्या 'आशा' साप्ताहिकात काम केले होते. पकडला गेलो त्या वेळी ग. वि. पटवर्धन यांनी चाल-विलेल्या 'आशा–प्रमोद' साप्ताहिकाचा संपादक होतो. दहा वर्षांपूर्वी विले-पार्ले छावणीतून मध्यरात्रीनंतर अटक झाल्यावर मी कुठे आणि कोणत्या तुरुंगात आहे हे घरच्या माणसांना कित्येक दिवस कळले नव्हते. या खेपेस पकडल्याची बातमी वृत्तपत्रांत आली इतकेच नव्हे, तर खटल्याचे वृत्तही छापून आले होते. ज्याचा मी संपादक होतो त्या साप्ताहिकाने झालेल्या शिक्षेवर अग्रलेख लिहिला नि 'फ्री प्रेस जर्नल'मध्येही लेख आला होता. सांपत्तिकदृष्ट्या त्या वेळच्या व आताच्या परिस्थितीत फारसा फरक नसला तरी माझा दर्जा थोडाफार वाढल्याचा पुरावा तुरुंगात 'ब' वर्ग मिळाल्याने दिसून आला होता.

हे सगळे विचार मनात येत असताना स्टेशने येत होती व मागे जात होती. पण कोणत्याही स्टेशनवर खाली उतरण्याचे स्वतंत्र्य नव्हते हे लक्षात येताच आपले हे वैयक्तिक स्वातंत्र्य आणखी तेरा-चौदा महिने नाहीसे झालेले आहे, याची जाणीव होत होती. दंड न भरता शिक्षा सोळा महिन्यांची असली तरी तुरुंगाच्या नियमांप्रमाणे चांगल्या वर्तणुकीबद्दल मिळणारी शिक्षेतील सूट वजा जाता तेरा-चौदा महिन्यांनी सुटका होणार, हे ठाण्यातच तुरुंग-नियमांच्या जाणकारांनी सांगितले होते. जसजसे नाशिक जवळ येऊ लागले तसतसे बंदिस्त जीवन थोडी दहशत दाखवू लागले.

ठाण्यात त्या वेळी माझे बाहेरचे हिंडणे फिरणे-सायकलवरून पुष्कळ होई. चांदण्या रात्री सायकलवरून जाणे अगर मित्रमंडळींसह मैदानात बसणे, निरनिराळ्या विषयांवर चर्चा करणे, अपरात्री ठाण्याच्या रेल्वे स्टेशनवर जाऊन चहा पिणे या साऱ्या गोष्टींना पायबंद पडणार हे लक्षात येताच कैदी जीवनाची आतापर्यंत मनावर पकड बसवू न शकलेली बाजू हळूहळू लक्षात येऊ लागली. भूतकाळात वावरणारे मन वर्तमानकाळात झटकन आले. देवळाली स्टेशन आल्यावर तर 'अति समीप सावधान' असा विचार मनात येऊन नाशिकरोड तुरुंग कसा असेल, तीस साली येरवडा जेलमध्ये प्रवेश करताच मानेवर थप्पड बसून कोलांट्या खायची पाळी आली तशी गिणती येथे होणार नाही ना ? असे मनात आले. पण त्याचबरोबर दुसराही एक विशेष अनुभव पदरी पडला होता. १९३० ते १९४० या दहा वर्षांच्या काळात १९३५ साली पास झालेल्या प्रांतिक स्वायत्ततेनुसार ठिकठिकाणच्या प्रांतिक निवडणुकीत काँग्रेसने भाग घेऊन अनेक ठिकाणी बहुमत मिळविले होते व काँग्रेसने दीड वर्ष बहुमताच्या जोरावर मर्यादित सत्तेचे का होईना, राज्य केले होते. आणि आमची नाशिकला रवानगी होत असतानाच काँग्रेसने सत्तात्याग करून वैयक्तिक सत्याग्रह केला होता. कालचे मंत्री आज जेलमध्ये आले होते. हेच लोक पुन्हा बाहेर गेल्यावर मंत्री होण्याची शक्यता होती आणि या राजकीय स्थित्यंतराचा परिणाम तुरुंगांतर्गत शिस्तीवर झाला होता. १९३० व १९४० मधील हा महत्त्वाचा फरक होता.

१२ ध्येयनिष्ठांची सोबत

नाशिकरोड तुरुंगात प्रवेश करताच तुरुंगाच्या इमारतींसंबंधाने ठाणे, येरवडा आणि विसापूर यांना खोटे पाडणारा अनुभव आला. तुरुंगाच्या इमारती जुनाट, कुंद, उदास

अशा वातावरणाला पोषक असतात असाच माझा ग्रह झाला होता. नाशिकचा तुरुंग तसा नव्हता. इमारती नव्या होत्या. आत प्रवेश केल्यावर सर्वत्र मोकळी जागा, रेखीव असे आखलेले रस्ते आणि दूर दूर अंतरावर कैद्यांच्या नव्याने बांधलेल्या बराकीवजा इमारती होत्या. मागे दहा वर्षांपूर्वी येरवडा जेलमध्ये प्रवेश करताच मानेवर अनपेक्षित अशी जोराची थप्पड बसली तशी येथे बसली नाही. एखाद्या आरोग्यधामात आपले नाव नोंदवून तेथे जावे तसाच काहीसा प्रकार नाशिकरोड तुरुंगात प्रवेश करताना झाला. आम्ही—मी आणि माझ्याबरोबरचे श्री. नाथ ताम्हणे—कैदी होतो व आम्हांला पोचवण्यास ठाण्याहून शिपाई आले होते हे सारे खरे असले तरी मनात उल्हास असल्याने तुरुंगाचे तुरुंगपण भासले नाही.

पोलिसांनी आमच्या तुरुंगवासासंबंधीचे कागदपत्र नाशिक रोडच्या तुरुंगाधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिले. ठाण्याहून आमची रवानगी करताना आम्ही नाशिकरोडला येत असल्याची बातमी ठाण्याच्या तुरुंगाधिकाऱ्याकडून नाशिकरोड तुरुंगात गेली असल्याने आम्ही जेवणाची वेळ होऊन गेल्यानंतर तेथे पोहोचलो असताही आमचे 'ब' वर्गाचे जेवण तेथे झांकून ठेवले होते. तुरुंगाच्या कचेरीतून 'ब' वर्गाच्या सक्तमजुरीच्या कैद्यांच्या विभागात नेत असता माझी नजर तुरुंगाच्या आतल्या आवाराचे निरीक्षण करीत होती. या तुरुंगाभोवती फार मोठ्या उंचीच्या भिंती नाहीत. ही मोठ्या उंचीची उणीव विटांच्या भिंतीवर तारा लावून भरून काढली आहे. ऑफिस सोडून जरा अंतर चालल्यावर उजव्या हाताकडे असलेला एक मोठा पत्र्याचा दरवाजा उघडला गेला. तेथे जेलचा शिपाई होता. आमच्याबरोबरच्या शिपायाने आम्हाला आत नेले. आत प्रवेश करताच अगदी अनपेक्षितरीत्या गुलाबाच्या फुलांनी माझे स्वागत झाले. रसिक मनाचा आणि सदा भावनांनी उचंबळलेला बंडू ऊर्फ केशव गोरे याने गुलाबाची फुले देऊन आमचे स्वागत केले. बराकीच्या त्या चाळीत प्रवेश करताच हातात कल्पना नसताही पडलेल्या त्या टपोऱ्या गुलाब-पुष्पांनी माझे नंतरचे सुमारे चौदा महिन्याचे तुरुंगातले वास्तव्य अक्षरशः सुगंधमय करून टाकले. आम्हाला तेथे ठाण्याहून आणणार असल्याची बातमी आमच्या मित्रांना कचेरीतून समजली होती.

जेवण सुरू असताच आमच्या भोवती परिचित-अपरिचित अशा राजबंदींचा मेळावा जमला. 'ब' वर्गाच्या कैद्याना रोज वर्तमानपत्रे मिळत असली तरी वृत्तपत्रातून न येणाऱ्या अशा अनेक बातम्या व आलेल्या बातम्यांवर प्रकाश टाकणारी अशी माहिती या मंडळींना हवी होती. राजकीय कार्यकर्त्यांचे आतमंडळ म्हणचे काय असते याचा अनुभव मी गेली दहा वर्षे घेतच होतो. जन्म देणारे माता–पिता आणि आपले रक्ताचे नातेवाईक यांच्याशी आपण पूर्वऋणानुबंधाने बांधलेले असतो. आपुलकीच्या आत्मीयतेने आणि नित्य सहवास व कर्तव्यभावनेने या कौटुंबिक नात्यापासून त्या त्या माणसाच्या वागणुकीनुसार आपणांस सुख किंवा दुःख होत असते. जी गोष्ट नात्याच्या माणसांची तीच आपण निवडलेल्या व आपल्या झालेल्या राजकीय वा इतर समान ध्येयाच्या पातळीवर जमलेल्या भ्रातृमंडळाची. रक्ताचे नाते हा एक समान दुवा असला तरी घराच्या भिंतीच्या आत सख्खे, आते-मामे, मावस-चुलत, चुलत-चुलत असे भ्रातृ–भावात फरक असतात, तसेच ते राजकीय ध्येयाने एकत्र येऊन तुरुंगाच्या भिंतीआड जमणारातही असतात. काँग्रेस, काँग्रेस सोशालिस्ट, फॉरवर्ड ब्लॉक, कम्युनिस्ट आणि कम्युनिस्टातही पुन्हा पोटभेद असे विविध प्रकारचे नेते व कार्यकर्ते माझ्याभोवती होते. बाहेरून आलेल्या माणसाबद्दल तुरुंगाच्या आत असलेल्यांना विशेष आकर्षण वाटते. बाहेरच्या मोकळ्या जगाची विविध माहिती या नवागतांकडून त्यांना मिळू शकते.

विविध विषयांवरच्या गप्पा झाल्यानंतर संध्याकाळी जेलच्या कचेरीत नेण्यात आले. तेथे कैद्याचे कपडे व भांडी मिळाली. 'ब' वर्गाच्या कैद्याचे कपडे 'क' वर्गापेक्षा निराळे असतात. 'ब' वर्गाच्या कैद्याला जर साधी शिक्षा असेल तर त्याला घरचे कपडे वापरता येतात. आम्हाला सक्तमजुरीची शिक्षा असल्याने जेलचे कपडे मिळाले. काळ्या–जांभळ्या चौकडया असलेले सदरे व धोतरे आणि एक टॉवेल असे कपडे, थाळी-पॉट व जेवणासाठी अल्युमिनियमचे ताट व तशाच मोठ्या वाट्या मिळाल्या. आंथरुणातही बदल झाला होता. काथ्याची गादी व तीवर चादर मिळाली. सुमारे दहा फूट रुंदीची व अकरा फूट लांबीची स्वतंत्र खोली राहाण्यास होती. या खोलीच्या मागच्या भिंतीत खूप उंचीवर एक खिडकीवजा झरोका नि

खोलीला भक्कम गजांचे लोखंडी दार होते. खोलीपुढे प्रशस्त असा सामुदायिक व्हरांडा नि त्यासमोर मोकळी जागा होती. क्वारंटाईन यार्ड नावाने ओळखल्या जाणाऱ्या आमच्या त्या भागांत एकामागे एक अशा तीन चाळी, सभोवार मोकळी जागा व चोहोबाजूंनी मोठा तट होता. आवारातच एका बाजूस सिमेंटचा बांधून काढलेला लांब आकाराचा पाण्याने भरलेला हौद, हौदावरच सिमेंटचा कोबा असून तेथेच आंघोळीची व कपडे धुण्याची सोय होती. हौदाच्या बाजूला कपडे धुण्याची भट्टी लावण्यासाठी मोठा चुला व बांधलेले धुराडे, आवाराच्या दुसऱ्या बाजूस संडास व लघवीची सोय आणि जेलचा तुरुंगपणा घालवणारी, मनातल्याप्रमाणेच बाहेरच्याही वातावरणात सुगंध पसरवणारी मोगरीची नि गुलाबाची पुष्कळ झाडे त्या आवारात होती. एका कोपऱ्यात आंब्याचे एक कलमही वाढत होते. अशा या आश्रमसदृश वातावरणांत पंचवीस तीस राजबंद्यांची जणू एक वसाहत त्या ठिकाणी नांदत होती आणि या वसाहतीत चौदा महिने राहण्याची शिक्षा नव्हे परवाना घेऊन मी आलो होतो.

नाशिकरोड जेलच्या या 'ब' वर्गीय राजबंदींच्या भ्रातृमंडळात सर्वांचे आवडते व सगळ्यांना हवे हवेसे वाटणारे सेनापती बापट-आमचे तात्या-हे प्रमुख होते. कुणाच्या अध्यात मध्यात नसलेले, स्नानसंध्याशील असे नाशिकचे नेते दादासाहेब गद्रे होते. याशिवाय ठळकपणे लक्षात राहिलेल्या मंडळीत एस. एम्. जोशी, एस. एस. मिरजकर, विनायकराव भुस्कुटे, भाऊसाहेब हिरे, कॉ. जांभेकर, रघुनाथ कऱ्हाडकर, नगरकर, गोविंदराव देशपांडे, वसंतराव नाईक, वामनराव यार्दी, माधवराव जानोरकर, बंडू गोरे, एम्. डी. विभूते, माधव लिमये होते. साने गुरुजी एक दोन दिवस आमच्यात होते; पण लगेच त्यांची बदली धुळे जेलमध्ये झाल्याने त्यांचा सहवास लाभला नाही. ही आमच्या वॉर्डातील मंडळी होती. जेलच्या इतर भागांत मुंबईतून सारे स्थानबद्ध केलेले कम्युनिस्ट, तसेच वैयक्तिक सत्याग्रह करण्याअगोदरच पकडलेले मुंबईचे व इतर ठिकाणचे काँग्रेसचे स्थानबद्ध नेते होते. यात कॉ. डांगे, एस्. के. पाटील, युसुफ मेहेरअल्ली, रावसाहेब पटवर्धन, नगीनदास टी. मास्तर, दत्तोपंत घारपुरे, वामन बापट असे अनेक नेते व कार्यकर्ते होते. देशाच्या स्वातंत्र्य-संगरातील

या थोर रथी–अतिरथींच्या समुदायात राहण्या–वावरण्यास मिळाले हा माझ्या जीवनातील मोठा भाग्यदायी असा कालखंड होता. या सर्वांचा सहवास सातत्याने मिळाला असे नाही. जे आमच्या विभागात होते ते सर्व दिवसाचे बारा तास आम्ही एकत्र असू. बाकीच्यांच्या गाठीभेटी रुग्णालयांत व इतरत्र प्रसंगपरत्वे होत असत.

तुरुंगातील नियमबद्ध कार्यक्रम हा कैद्यांच्या आरोग्याला उपकारक ठरतो, हा माझा दहा वर्षांपूर्वीचा अनुभव होता. कोणास काही विशेष आजार असेल तर ती गोष्ट वेगळी व अपवाद म्हणून समजावी. पण सामान्यपणे तुरुंगात तब्येत बिघडण्याचे काही कारण नसते. आणि याला कारण नियमितपणा, मिताहार व भरपूर विश्रांती. आम्ही सकाळी सहाच्या सुमारास आमच्या खोल्यांची दारे शिपायानी उघडली की, बाहेर पडत असू. शौचमुखमार्जन उरकून जरा इकडे तिकडे हिंडून काही चौकशा कराव्या इतक्यात चहा, पाव आणि पावाबरोबर लोणी येत असे. बरेचजण सकाळी मिळणारे लोणी पावाला न लावता दुपारच्या जेवणाच्या पोळीला लावण्यासाठी मुदपाकखान्यातील आमच्या प्रतिनिधीच्या स्वाधीन करीत. दूध वेगळे मिळत असे. मांसाहार न करणाराला दूध जास्त मिळे. चहा झाल्यानंतर सक्तमजुरीच्या कामाची कवायत होत असे. आमच्या पुढे मोठाले चरखे आणून ठेवले जात. खोल्यांपुढील व्हरांडा मोठा होता. तेथे बसून या चरख्यांवर कच्च्या सुताच्या दोन धाग्यांना पीळ देऊन त्याची आम्ही एक दोरी वळीत असू. हे काम जिकीरीचे नसे. साडेदहा वाजता दुपारचे जेवण येई. साडे अकरा–बारा वाजेपर्यंत जेवण झाल्यावर वाचन व बहुशः वामकुक्षी अथवा दुपारची झोप. दीड वाजता दुपारचा चहा येई आणि त्याच वेळी वृत्तपत्रे मिळत.

हे वृत्तपत्र वाचन नि चहापान मोठ्या गमतीने चाले. यानंतर पुन्हा वाचन अगर उगीचच चालणाऱ्या गप्पा. साडेपांच वाजतां संध्याकाळचे जेवण झाल्यावर बहुतेक सर्व राजबंदी आवारात फेऱ्या घालीत गप्पा मारीत असत. कोणाचा काही मामुली आजार असल्यास हॉस्पिटलमध्ये जाण्याची वेळ सायंकाळचीच असायची. हे सर्व झाल्यावर सूर्यास्ताच्या वेळेला जेलचे

पोलिस किल्ल्यांचा जुडगा खुळखुळवीत आमच्या आवारात येत नि एकेकाला त्याच्या त्याच्या खोलीत बंद करून बाहेरून मोठे टाळे लावीत आणि निघून जात. मग बारा तास जो तो आपआपल्या खोलीत एकटा असे. रात्री झोप येईपर्यंत वाचन चाले. काहीजण नियमितपणे पेटीचरख्यावर सूत कांतीत असत. रात्रीच्या गप्पा या तुरुंगात आमच्या आवारात कधीच झाल्या नाहीत. कारण एकच. गप्पा या कमीत कमी दोन माणसात होतात. खोलीतल्या एकट्या माणसाला रात्री दिसणारा दुसरा माणूस म्हणजे गस्त घालीत व्हरांड्यांतून जाणारा हवालदार. शुक्लपक्षात पौर्णिमेच्या आगेमागे खोलीबाहेर टिप्पूर चांदणे असायचे. अशा वेळी लोखंडी दारातून बाहेर नुसते पहात बसायचे. रात्रीच्या प्रहरी कधी कधी खोलीच्या मागील भिंतीला असलेल्या झरोक्यातून चंद्र दिसायचा. सकाळ झाली की पुन्हा दिनक्रमाचे तेच तेच रहाटगाडगे सुरू व्हायचे.

१३ फुलांच्या सहवासात

तुरुंगाच्या आमच्या त्या आवाराशी व आतील माणसांशी माझा आस्ते आस्ते परिचय होत होता. काही मंडळी आधीची ओळखीची होती, तर काहींचा परिचय नव्याने होत होता. माणसांच्या ओळखीपेक्षा आवाराचा परिचय जास्त लौकर झाला. जेलच्या जागेत नि खुद्द कैद्यांच्या निवासस्थानासमोर गुलाब आणि मोगऱ्याची झाडे असतात असे मला कोणी बाहेर सांगितले असते तर त्यावर माझा विश्वास बसला नसता. आणि विश्वास न बसण्यासारखेच ते दृश्य होते. तुरुंगाच्या आवारात भाजीपाल्याच्या व फळाफुलांच्या बागा असतात. पण त्या कैद्यांच्या राहण्याच्या आवारात नसतात. ठाण्याच्या तुरुंगात 'काळा पाणी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात

काही मोगऱ्याची झाडे आढळली. पण या नाशिकच्या तुरुंगातील आमच्या भागात असलेली झाडे पुष्कळच होती. मुद्दाम लावल्यासारखी दिसत होती. जास्त चौकशी करता काही वर्षापूर्वी–१९३२ साली कोणी काँग्रेसचे थोर पुढारी या ठिकाणी कैदेत असताना त्यांनी ती लाविली होती असे कळले.

काही दिवसातच माझ्या लक्षात आले की या झाडांची मुद्दाम अशी कोणी काही निगा राखीत नाही, निसर्गक्रमाने ती वाढत आहेत व त्याजवर फुले येत आहेत; जरा अधिक काळजी घेऊन या झाडांना पाणी घातले तर फुलबाग चांगलीच बहरेल. 'ब' वर्गाच्या कैद्यांशी पुष्कळसे अधिकारी आपला अधिकार बाजूला ठेवून मोकळेपणाने वागत. मी या मोकळेपणाचा फायदा घेऊन जेलरला सांगून झाडांना पाणी घालण्याची परवानगी मिळवली. या परवानगी-बरोबरच झाडांना पाणी घालण्यासाठी मोठी झारीहि मिळाली. झाडा-खालची माती सारखी करून तेथे पाणी राहाण्याजोगे आळे करण्यासाठी फावडेही मिळाले. लादलेले काम नि आपणहून मागितलेले काम करण्यात किती फरक असतो हे माणसाच्या अनुभवाला येतेच. लादलेले काम कर्तव्यबुद्धीने कितीही चांगले केले तरी त्यात तितकी आत्मीयतेची भावना आढळत नाही. आमच्या आवारात मी गुलाब–मोगऱ्यांच्या ताट्व्यांना पाणी घालण्याची परवानगी घेतल्यानंतर रोज संध्याकाळी त्या झाडांना पाणी देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. पाणी देण्याचे अगोदर त्या ताट्व्यांच्या बुंध्याजवळची माती जरा खोल करून भोवती मातीचाच छोटासा बंधारा करावा लागे. त्यात मग पाणी घालायचे. येथे वेळेच बंधन नसे. झाडांना पाणी घातल्यानंतर त्या झाडाच्या वाढीकडे आपोआपच लक्ष लागे. सकाळच्या वेळी तुरुंगाचे सक्तमजुरीचे म्हणून जे काम आम्ही करीत होतो त्या कामात आत्मीयता नसल्याने आम्ही पीळ देऊन तयार केलेल्या सुताच्या गुंड्यांचे पुढे काय करतात हेही जाणून घेण्याची फारशी उत्सुकता मी दाखवली नव्हती. पण झाडांना पाणी घातल्यावर ते झाड टवटवीत होते की नाही, त्यावर कळ्या धरल्या की नाही, पानांचे कोंवळे अंकुर दिसतात की नाही इकडे मात्र माझे आपोआपच लक्ष लागू लागले.

कोणतेही काम तुम्ही निरपेक्ष बुद्धीने करू लागलात की तुमची अपेक्षा असो वा नसो, तुम्हाला त्या कामाचे फळ हे मिळतेच. मी फुलझाडांना

नियमाने पाणी घालू लागताच झाडांवर फुलें जास्त प्रमाणात येऊ लागली. संध्याकाळी खोल्यांतून बंद होण्यापूर्वी मोगऱ्याच्या टपोऱ्या कळ्या खुडून मगच खोलीच्या गजाआड व्हायचे, असा माझा अलिखित नियमच झाला. फुले खुडण्याची कुणालाच तशी बंदी नसे. पण आमच्याच आवारातील एका बराकीत राहणारे संध्याशील वयोवृद्ध गृहस्थ कोणती कळी उमलेल याचा विचार न करतां सरसकट कळ्या खुडत असत. मग या कळ्या तशाच बाहेर टाकून देत. तेव्हा त्यांना अप्रत्यक्षरीत्या सुचवावे लागले की, कळ्या खुडायच्याच तर ज्यांची फुले रात्री फुलतील अशाच मोगऱ्याच्या कळ्या खुडाव्या. ही गुलाब–मोगऱ्याची झाडें झुडपांसारखी होती आणि म्हणून स्नान केल्यावर सहज आपला अंग पुसण्याचा पंचा झाडावर वाळत टाकण्याची अनेकांना सवय लागली होती. हे ओले कपडे झाडांवर तासन तास राहिल्यामुळे झाडांची वाढ तर खुंटतेच पण त्याचबरोबर कळ्यांची वाढ नीट होत नाही, असें दिसून आले. अशा रीतीने कपडे वाळत टाकणारांना भेटून तसे न करण्याची मी त्यांना विनंती केली आणि मग सहसा कोणी ओले कपडे झाडांवर टाकीनासा झाला. या फुलांनी थोड्याफार प्रमाणांत नाशिकच्या तुरुंगवासाच्या सर्व काळात साथ दिली. पण जेव्हां या फुलांच्या हंगामाचा काळ येई, तेव्हां मोगरीची फुलें ' अनंत हस्ते कमलावराने । देता किती घेशिल दो कराने ' या काव्यचरणाची आठवण करून देत.

आमच्या वॉर्डातील कोणाला घरची भेट आली म्हणजे कोणी त्यांच्या भेटीस आले-तर क्वचित कोणी त्यांना फुले देत असत. मला तर फुलांचे जणू वेडच लागले होते. संध्याकाळी बंद होण्यापूर्वी मोगऱ्याच्या पुष्कळशा कळ्या खुडून त्या मी पाण्याने भरलेल्या तसराळ्यात किंवा उभट जस्ती भांड्यात ठेवी. रात्री त्या कळ्या उमलल्या की तसराळ्यातल्या पाण्यात तरंगताना अपूर्व शोभा दिसे नि ती छोटीशी खोली सुवासाने भरून जाई. फुलांचे दृश्य आणि त्यांचा वास यामुळें मनाला न कळत किती उल्हास वाटतो याचा प्रत्यय मला रोज येत असे. आनंदप्राप्तीसाठीं अनुकूल बाह्य वस्तूंची अपेक्षा असते खरी, पण त्यापेक्षा आनंदाला अनुकूल अशा मनोवृत्तीची जास्त गरज असते. वृत्ती आनंदाला अनुकूल असल्या की प्राप्त साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करून आनंदी राहाण्याचा मन प्रयत्न करते नि या प्रयत्ना-

पासूनच आनंदाचे नवे नवे मार्ग सापडतात. तोच तोचपणा व त्यामुळे येणारा कंटाळा घालवण्याच्या शोधात माणसाचे मन नेहमीच गुंतलेले असते. मनाला तुरुंगाच्या भिंतीचेच काय, कसल्याही परिस्थितीचे बंधन आडकाठी आणू शकत नाही. त्या उभंट भांड्यातील मोगऱ्याच्या कळ्या उमलल्यावर त्या पाण्यात मोगऱ्याचा वास भरून राही. एक दिवस सकाळी कल्पना आली की हेच पाणी तोंड धुवायला घ्यायला काय हरकत आहे? विचार लगेच अमलात आला. हा विचार येथेच थांबला नाही. हेच शिल्लक राहिलेले सुवासिक पाणी मग दाढी करताना मी वापरू लागलो!

निरोगी मनाचा आनंद हा त्या त्या माणसापुरता मर्यादित राहू शकत नाही. माझ्या या सुवासिक पाण्याची जाहिरात लगेच झाली. आणि मग माझ्या शेजारच्या खोलीत राहणारे एक रसिक नि कलावंत कॉमरेड कधी कधी दाढी करताना या सुवासिक पाण्याची मागणी करीत. फुलांच्या नि वासाच्या मोहाने लोभावल्याने काही काळ आपण तुरुंगात आहो या गोष्टीचा विसर पडे.

आमच्यापैकी एकाने एक दिवस गुलाब-मोगरीची बरीचशी फुले गोळा करून त्यांचा पुष्पगुच्छ बनवून तो सहज दिसेल अशा रीतीने आपल्या खोलीत ठेवला. त्या दिवशी जेलर-सुपरिंटेंडंटची फेरी व्हरांड्यातून जात असता त्यांच्या नजरेस ते फ्लॉवरपॉट व त्यातील फुले पडली. ती फुले आणि त्यांची सजावट म्हणजे त्यांच्या दृष्टीला तुरुंगाच्या वातावरणाला एक आव्हानच भासले. तुरुंगांतील कैद्याने दुःखीकष्टी, दीनवाणेच असले पाहिजे. आनंदीवृत्तीला तुरुंगात मज्जाव असतो. त्यांनी एक क्षण त्या फ्लॉवरपॉटकडे पाहिले नि बाहेर फुललेल्या गुलाब-मोगऱ्यांच्या झाडाकडे पाहिले. ती कोमल फुले त्या करुद्ध नजरेने कोमेजली नि त्याच संध्याकाळी आम्हांला खोल्यांतून बंद केल्यावर त्या गुलाब-मोगऱ्यांच्या झाडांची छाटाछाट करण्यात आली.

ही तोडलेली झाडे पुन्हा वाढली. पुन्हा फुले येऊ लागली. आता आम्ही सावधपणाचा धडा शिकलो. तुरुंगात आनंद वाटण्यासारखे प्रसंग किंवा परिस्थिती निर्माण करायची झाली तरी ती लपून केली पाहिजे;

णा लागता कामा नये, हा आधीच माहीत असलेला धडा मनाने पुन्हा पक्का केला. आमच्यावर लक्ष ठेवणाऱ्या शिपायांचे, वॉर्डरांचे नेहमी हेच सांगणे असे की "साहेब आले असताना जरा कैद्यासारखे वागा, ते बाहेर गेल्यावर यार्डाचे दार बंद झाले की राज्य तुमचेच आहे!" पण हे दार बंद असले म्हणजे चाऱ्ही दिशा मोकळ्या असत असे मात्र नव्हते. फुलाच्या वासाप्रमाणेच आवाज हाही वातावरणात दूरवर पसरतो. आमच्या गप्पा व राजकीय भांडणे सुरू झाली की बोलण्याचा स्वर आपोआपच वाढत जाई. स्थलकालाची जाणीव अशा वेळी स्वाभाविकतःच नष्ट होत असे आणि मग आमच्या बोलण्याचा आवाज जेलच्या कचेरीपर्यंत जाऊन पोचला म्हणजे हवालदार–वॉर्डर आम्ही तुरुंगात असल्याची जाणीव करून देण्यासाठी "जरा हळू आवाजात" अशा सूचना देत. रात्री बंद झाल्यावर अनेकांना नुसते गुणगुणण्याची नव्हे, तर चांगले मोठ्याने ओरडून गाण्याची लहर येत असे. याही आवाजाची तुरुंगाच्या रक्षकांकडून दखल घेतली जात असे. तुरुंगात वेळ घालवण्याचे एक अमोल साधन म्हणजे गप्पा. या गप्पा वैयक्तिक हेव्यादाव्यापासून तो गगनाला गवसणी घालणाऱ्या अद्वैत वेदांताच्या, राजकीय घडामोडींच्या, साहित्याच्या पण मुख्यत्वेकरून तुरुंगातून बाहेर पडल्यावर कोणते कार्य करायचे याबाबत असत. कितीही लांब मुदतीची शिक्षा असली तरी एक दिवस आपण या तुरुंगातून सुटणार आहो, याची जाणीव प्रत्येकाला असल्याने भविष्यकाळातील बाहेरची स्वप्ने रंगवणे नि ती आपल्या परिचयातील माणसांकडे बोलून दाखवणे, हा उद्योग तुरुंगात नेहमीच चालतो. या उद्योगाची गणना "उचलली जीभ लावली टाळ्याला" या कोटीत पुष्कळदा होत असली तरी त्यावरून त्या त्या कार्यकर्त्यांच्या वृत्तीचा कस लागत असे.

१४ तुरुंग की राजकारणी आखाडा ?

सोय कुठेही आणि कोणत्याही प्रकाराने झाली तर माणसाला बरे वाटते. आणि त्यातही सोय अनपेक्षितपणे झाली तर आणखी सुख होते. नाशिकचा तुरुंग स्वच्छ असला तरी रात्री चिलटे, क्वचित् डास आणि खोलीतील दिव्यावर झेप घेणारी पाखरें यांचा त्रास होत असे. 'ब' वर्गाच्या कैद्यांना मिळणाऱ्या सवलतीत घरची मच्छरदाणी वापरण्याची परवानगी होती, पण मला घरून मच्छरदाणी मागवून घेण्याची आवश्यकता नव्हती. कारण माझ्यासाठी मीच ती अगोदर पाठवून ठेविली होती ! साथी एस्. एम्. जोशी, बंडू ऊर्फ केशव गोरे, माधव लिमये हे नाशिक जेलमध्ये येण्याअगोदर ठाणे येथे 'ब' वर्गात होते. ठाण्यास डास फार असल्याने त्या तिघानाही मी मच्छरदाण्या पाठविल्या होत्या. नाशिकला आल्यावर एस्. एम्. जोशींना त्यांच्या घरून मच्छरदाणी आल्याने त्यांनी मी पाठविलेली मच्छरदाणी दुसऱ्या एका 'ब' वर्गाच्या राजबंदीला दिली होती. मी नाशिकला गेल्यावर त्याने मला ती दिली. मच्छरदाणीमुळे झोप निवांत येऊ लागली.

नाशिकच्या तुरुंगात रात्री खोलीत मोगऱ्याच्या फुलांचा सुवास दरवळत असे हे सांगितलेच आहे. या फुसांच्या सुवासात आणखी एका आवडीच्या गोष्टीची भर पडत असे. ती गोष्ट म्हणजे चहा. अगदी काही खास चहाभक्तांसाठी रात्री थर्मासमणला चहा रात्रपाळीच्या हवालदारामार्फत जेलच्या एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात असे. हे चहा वाटपाचे काम आमच्या लोखंडी गजाच्या बंद दारातून होत असे. हवालदाराची या कामी सहानुभूती असल्यानेच हे शक्य होई. माझ्याजवळ चहाचा थर्मास होताच. थर्मासमधील चहा बराच वेळ राहिल्यावर त्या

चहाला थर्मासच्या बुचाचा वास येत असे. तो येऊ नये म्हणून मी सकाळी आम्हाला मिळणाऱ्या पोलसन लोण्याभोवती असणारा बटर पेपर त्या बुचाभोवती गुंडाळीत असे. जेलच्या वातावरणांतील तुरुंगपणा म्हणून म्हणतात तो घालवणाऱ्या अनेक साधनांत हा रात्रीचा चहा हे एक साधन होते. अर्थात हे साधन आणि चहाची ही आवड सार्वत्रिक नव्हती. रात्री पोलिसामार्फत होणाऱ्या या चहाच्या देवघेवीप्रमाणे क्वचित कोणाला काही पुस्तक वा एखादी महत्त्वाची चिठ्ठी द्यायची असली तर तीही देवघेव रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांमार्फत होत असे. तुरुंगाचे मुख्य लक्षण म्हणजे बंद करून ठेवलेल्या माणसाच्या हालचालींवर कडक बंधने. पण कोणत्याही परिस्थितीत उत्साही आणि प्रयत्नशील राहणारा माणूस माणसा-माणसातील ही देवघेव चालूच ठेवतो आणि ही देवघेव जितक्या जास्त प्रमाणावर राहील, तितक्या प्रमाणात तुरुंगाची बंधने ढिली पडतात.

रात्री पोलिसांमार्फत एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाणाऱ्या वस्तूंत प्रसंगवशात काही महत्त्वाच्या गोष्टीही पाठविल्या जात. ठाणे शहर काँग्रेस कमिटीचा चिटणीस या नात्याने मी जे युद्धविरोधी पत्रक काढले होते व ज्यामुळे मी आणि माझे सहकारी श्री. नाथ ताम्हणे हे तुरुंगात आलो होतो त्या पत्रकावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत बरीच चर्चा झाली असल्याचे श्री. भाऊसाहेब हिरे यांजकडून आम्हांला कळले होते. भाऊसाहेब हिरे नाशिक जिल्ह्यातून सत्याग्रही म्हणून तुरुंगात आले होते व माझ्या शेजारच्याच खोलीत होते. त्यांना हे पत्रक पाहायला हवे होते. बाहेरून हे पत्रक कसे मागवायचे ते आम्ही ठरविले. चरख्यावर सूत कातण्याची आम्हांला परवानगी होती व बहुतेक सर्व काँग्रेस सत्याग्रहींजवळ पेटी चरखा असे. माझ्याजळही तसा चरखा होता. सूत काढण्यासाठी लागणारे पेळू घरून मागविता येत असत. या पेळूंच्या पुड्यांतून हे पत्रक एक दिवस बाहेरून आत आले. पण हे पुडे अनेक असल्याने नेमके कोणत्या पुडयात ते आहे हे समजणे कठीण होते. भाऊसाहेबांना हवा असलेला एक पेळूचा पुडा रात्री त्यांच्याकडे धाडण्यांत आला आणि योगायोग असा की सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरलेल्या त्या पत्रकाची प्रत त्याच पुड्यात होती. मग त्या पत्रकांतील मजकुरासंबंधाने बरीच चर्चा झाली.

'मधूननमधून सतावणारे एखादे दुखणे माणसाला असले तर त्याचा त्रास बाहेर असताना होतो, त्यापेक्षा तुरुंगात जास्त होतो. पण कोणतीही गोष्ट सर्वस्वी वाईट असत नाही; तीत काही चांगुलपणाचा, फायद्याचा भाग लपलेला असतो याचा प्रत्यय मधून मधून छळणाऱ्या कानाच्या दुखण्याने मला या तुरुंगवासात आणून दिला. लहानपणापासून या कानाच्या आजाराने मला पीडले आहे. कान वाहात असल्यामुळे बधिरपणा आला होताच. नुसता बधिरपणा हे काही दुखणे नव्हे, पण माझ्या डोक्याचा कानाच्या मागील भाग हलका झाला होता. जरा जास्त वाचन झाले अगर एखाद्या गंभीर विषयाचे खोल चिंतन केले की त्या भागात दुखू लागे, अस्वस्थता निर्माण होई. कानाचे हे माझे दुखणे मी जेलच्या डॉक्टरांना, तसेच दर सोमवारी तुरुंगाची पाहणी करण्यासाठी बाहेरून येणाऱ्या सिव्हिल सर्जनना सांगितले होते. नाशिकच्या थंड हवेमुळे हा कानाचा त्रास जास्त होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तो कमी व्हावा म्हणून कानांवरून गुंडाळण्यासाठी लोकरीचा स्कार्फ, तसेच गंजीफ्रॉक वापरण्याची त्यानीं मला खास परवानगी दिली आणि मुख्य म्हणजे आंघोळीसाठी गरम पाणीही देण्यास सांगितले.

या मामुली सवलतींनी बरा होण्यासारखा हा आजार नव्हता. कानाचे दुखणे जास्त झाले म्हणून डॉक्टरांनी मला काही इंजेक्शन्स दिली. ही इंजेक्शने ते संध्याकाळी देत. असेच एकदा इंजेक्शन दिल्यानंतर नेहमीप्रमाणे आम्हांला आमच्या खोल्यांतून बंद करण्यात आले. रात्री इंजेक्शन फार दुखू लागले. ठणका असह्य होऊ लागला व अंगात तापही भरू लागला. खोलीच्या दाराला बाहेरून मोठे कुलूप अडकवून पोलीस निघून गेले होते. सारा तुरुंग बंद झाला होता. दुखणे असह्य झाल्यामुळे मी कण्हू लागलो. माझा कण्हण्याचा आवाज ऐकून शेजारच्या खोल्यांतील राजबंदींनी मोठ्याने हाका मारण्यास सुरवात केली. त्यांत कम्युनिस्ट कार्यकर्ते अमीरखान यांचा आवाज, त्यांना माझ्याविषयी वाटणाऱ्या आपुलकीमुळे बराच चढलेला होता. हा सारा गलबला कसला हे पहाण्यास रात्रपाळीचा सुभेदार आला. त्याला राजबंद्यांनी सांगितले की सुतारांना ताबडतोब जेलच्या इस्पितळात न्यायला हवे. त्याने वरिष्ठांची परवानगी आणून माझ्या खोलीचे कुलूप रात्री उघडले. हॉस्पिटलमधून स्ट्रेचर आणवला नि त्या स्ट्रेचरवरून माझी

रवानगी इस्पितळात झाली. त्या दुखण्याच्या नि तापाच्या अवस्थेतही स्ट्रेचरवरून आमच्या वार्डातून इस्पितळाकडे जाताना माझे लक्ष आकाशातील चंद्राकडे गेले नि काही क्षण मी माझे दुखणे विसरलो. बंदिस्त जीवनात कोणत्या गोष्टीला किती महत्त्व येते हे तेव्हां समजले. बाहेरच्या जगात चांदण्याची ओढ असली तरी ते दुर्मिळ नसल्याने त्याचे तेवढेसे महत्त्व वाटत नाही. पण अनेक दिवस नि महिने तुरुंगाच्या खोलीत संध्याकाळ ते सकाळ अडकून पडावे लागले आणि अनपेक्षित चंद्रदर्शन घडले की होणारा आनंद काही वेगळाच असतो !

त्या इंजेक्शनमुळे आलेल्या तापाच्या तंद्रीत मी काहीतरी गुणगुणत होतो. असले दुखणे एकट्याने भोगावे लागले, ते दुःख सांगण्यास जवळ कोणी नसले, म्हणजे मला वाटते–हे गुणगुणणे सुरू होते ! मरण आणि दारिद्र्य यांची तुलना करून एका कवीनें मरण बरे पण दारिद्र्य नको असे म्हटले आहे. त्या चालीवर मी काही ओळी तेव्हा गुणगुणत होतो-' मरण नि सुई यांतुनि, मरण बरे परंतु सुई खोटी ॥ मरणात दुःख थोडे, परी सुईची व्यथा असे मोठी ॥ तापात वा दुःखात माणूस कण्हू लागला की भोवतालच्यांना त्या कण्हणाऱ्या माणसाबद्दल जास्त काळजी वाटते नि क्वचित रागही येतो, हे त्या कण्हणाऱ्याला कळते. पण त्या कण्हण्याने, थोडेतरी आपले दुःख कमी होते हे पटल्यामुळे तो कण्हत असतो. कानाच्या या दुखण्याने मला इस्पितळात आणि तेहि आपरात्री आणल्याने दुसऱ्या दिवशी इस्पितळातील सगळ्या मंडळीनी माझी चौकशी केली. युसुफ मेहेरअल्ली, नगीनदास टी. मास्तर हे त्या वेळी इस्पितळांत होते. माझ्या कानाच्या आजाराची त्यांनी माहिती करून घेतली व डॉक्टरांना माझी काळजी घेण्यास सांगितले. युसुफ मेहरअल्लींचा जवळून असा परिचय जेलच्या इस्पितळांत झाला. ते तडफदार राजकीय नेते होते. पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे ते एक सज्जन माणूस होते. सदैव दुसऱ्याला मदत करण्यास तयार असत. तरूण राजकीय कार्यकर्त्यांनी खूप वाचन करावे इकडे त्यांचे लक्ष असे. चांगली चांगली किंमतवान् पुस्तके ते मुक्त हस्ताने वाचायला देत. याच इस्पितळांत कॉ. डांगे यांच्याशीं अगोदर झालेली ओळख दृढ झाली. मुंबई प्रदेश काँग्रेसचे अधिकारी व सॉलिसिटर नगीनदास मास्तर यांच्या-

शीही येथेच चांगला परिचय झाला. गोड स्वभाव आणि मिष्टास वाणी हे त्यांचे वैशिष्ट्य. इस्पितळात काही खास अशा सवलती असत. रात्री सर्वजण एकाच वॉर्डात असल्याने येथे आम्ही रात्री एकत्र असू, मग गप्पावाचन व क्वचित बुद्धिबळाचा डाव खेळायला मिळे. इस्पितळ हे 'ब' वर्गाचे राजबंदी आणि स्थानबद्ध यांना एकत्र भेटण्याचे ठिकाण होते. यामुळे कित्येक वेळा आजार फायद्याचाच ठरे.

जेलमधल्या निवांतपणाचा वाचनाकडे व राजकारणाचा पाया बौद्धिकदृष्ट्या पक्का करण्याकडे काँग्रेस कार्यकर्ते फार कमी लक्ष देत. त्यांचे नेतेच मुळी चरख्यावर सूत काढण्यात व इतर अवांतर गप्पागोष्टींत, पत्ते खेळण्यात वेळ घालवीत. बौद्धिक चर्चा नि प्रसंगी विरोधी मतांची खडाजंगी कम्युनिस्ट नि काँग्रेस सोशालिस्ट यांत होत असे. या दोन्ही गटांच्या नेत्यांनी तुरुंगात आलेल्या व या दोन पक्षांपैकी कोणत्याच पक्षाचा गंडा न बांधलेल्या उत्साही तरुण कार्यकर्त्यांस आपल्या पक्षात आणण्याचे अप्रत्यक्ष असे प्रयत्न सतत केले. त्यासाठी आवश्यक ते वाङ्मय ते जिज्ञासूला पुरवीत व वादग्रस्त प्रश्नासंबंधी बौद्धिकेही घेत. राष्ट्रकार्य करावे, त्यासाठी त्याग करावा, स्वातंत्र्यासाठी चाललेल्या यज्ञात आपणही काही समिधा टाकाव्या, अशा प्रांजल बुद्धीने तुरुंगांत आलेल्या सुखवस्तू घरातील तरुणांना आपल्याकडे ओढण्याचे या पक्षनेत्यांचे चाललेले प्रयत्न पुष्कळदा विकोपाला जात. मी काँग्रेस सोशालिस्ट पक्षाचा म्हणून सर्वांना माहीत असल्याने माझ्या बाबतीत हा रस्सीखेचीचा प्रयत्न अर्थातच झाला नाही. कडक पक्षनिष्ठा अशी मी कधीच पाळली नाही. ते माझ्या स्वभावातच नव्हते. सर्वांशी मोकळेपणाने वागायचे, सर्वांचे म्हणणे ऐकून ध्यायचे ही माझी रीत असल्याने काही कम्युनिस्ट नेते मला एक 'चांगला समाजवादी' असे म्हणत. मी पक्का पक्षनिष्ठ बनलो नाही याचे कारण मी समजू लागल्यापासून पत्रकार होतो हेच आहे. पत्रकार हा सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न करतो नि त्यामुळेच प्रत्येक पक्षातील उणीवा त्याला समजतात.

१५ मेहेरअल्लींचा संदेश

स्वातंत्र्यपूर्वकालातील राजकारण आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे राजकारण यांत मूलतः फरक असला तरी एका गोष्टीत सारखेपणा आहे, आणि तो म्हणजे सर्व वेळ राजकारण करणारे कार्यकर्ते नि प्रसंगविशेषी–लढ्याच्या प्रसंगी–आपला नेहमीचा व्यवसाय बाजूस ठेवून लढ्यात उतरणारे कार्यकर्ते तेव्हां होते नि आजहि आहेत. सर्व वेळ राष्ट्रकार्यार्थ खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांची श्रेणी तेव्हा नि आताही श्रेष्ठ मानली जाते. नाशिकच्या तुरुंगात माझ्या अवतीभवती असणाऱ्या पुढाऱ्यांत व कार्यकर्त्यांत एस. एम्. जोशी, कॉ. कऱ्हाडकर, कॉ. जांभेकर, कॉ. मिरजकर, विनायकराव भुस्कुटे हे सर्व वेळ देशकार्य करणारे होते. आम्हा सर्वांना आदरणीय असे सेनापती बापट, आम्हा सर्वांचे 'तात्या' हे तर समर्पित जीवनाचे चालतेबोलते उदाहरण होते. मी स्वतः तीस सालापासून काँग्रेसचे काम करीत असलो तरी ते एक हौशीचे काम होते. वृत्तपत्रव्यवसाय हा माझा मुख्य पेशा व निर्वाहाचे साधन होते. अर्थातच कार्यकर्त्यांत माझी श्रेणी दुय्यमच होती. केशव गोरे, माधव लिमये हे सर्ववेळ कार्यकर्ते या नात्याने माझ्यापेक्षा वरच्या श्रेणीत मोडणारे होते. घराद्वाराचे कौटुंबिक पाश तोडून, निर्वाहापुरते अन्नवस्त्र कोठूनतरी मिळवून, राजकीय संघटनेस सर्ववेळ देणारे असंख्य कार्यकर्ते त्या काळात होते. बाहेरच्या राजकारणांत या सर्ववेळ कार्यकर्त्यांचा जसा मोठा अधिकार असे तसाच तो तुरुंगातही असे. याही कार्यकर्त्यांत पुन्हा कमीजास्त श्रेणी असत. 'कीं घेतलें व्रत न हे आम्हि अंधतेनें । बुद्ध्याच वाण धरिले । करि हें सतीचें' या निर्धाराने जाणूनबुजून सारे आयुष्य ध्येयासाठी वाहिलेल्यांपासून तो भावनोत्कटतेने मागचा पुढचा फार विचार न करता

सर्ववेळ राष्ट्रकार्यार्थ देण्याचा संकल्प करणाऱ्यांपर्यंतच्या कोटीत मोडणारे कार्यकर्ते यात असत.

तुरुंगात काय नि बाहेरच्या राजकारणात काय, या दोन्ही प्रकारच्या कार्यकर्त्यांतील ध्येयवादी एकवाक्यता सोडून दिली तर इतर वागणुकीत पुष्कळच फरक पडे व मतभिन्नता दिसून येई. सर्ववेळ देशकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वागणुकीत एक प्रकारचा धार्मिक कर्मठपणा आढळे. धर्माच्या प्रांतात जसे अनेक पंथ आणि पीठे आहेत तशीच ती भारताच्या स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांत होती नि आजही आहेत. नाशिकच्या आमच्या त्या छोट्याशा पंचवीसतीस कार्यकर्त्यांच्या वसाहतीत काँग्रेस, काँग्रेस सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट, फॉर्वर्ड ब्लॉकिस्ट आणि कोणत्याच पक्षात नसलेले पण स्वातंत्र्यप्रेमी असे विविध पंथ नि त्या पंथाचे कर्मठ अनुयायी होते. आपापल्या पक्षातील कार्यकर्त्यांशी ते जितक्या समरसतेने, मोकळेपणाने वागत तितक्या सहजतेने इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांशी वागत नसत. कार्यकर्ते या सामान्य भूमिकेवरून सगळेच सगळ्याशी चांगले वागत. पण जेथे काही खास असा आपुलकीचा, जिव्हाळ्याचा प्रश्न येई तेव्हा सामान्यपणे कार्यकर्ते म्हणून ओळखल्या जाणाऱ्यांतील या पक्षभेदाच्या रेषा ठसठशीत दिसून येत. यामुळे सर्वांशीच चांगुलपणाने वागणाऱ्या, कोणत्याच पक्षाचा टिळा कपाळी नसलेल्या राजबंद्यांची अवस्था कधी कधी मोठी चमत्कारिक व्हायची. अशा अपक्ष कार्यकर्त्यांला आपल्या पक्षात खेचून घेण्याचे पाताळयंत्री प्रयत्न अनेक पक्षकार्यकर्त्यांकडून एकाच वेळी होत असत आणि मग त्या ओढाताणीचा विषय बनलेल्या कार्यकर्त्यांची मोठी चमत्कारिक अवस्था व्हायची. स्वातंत्र्याच्या लढ्यात भावनेच्या भरात उडी घेणारे अनेक तरुण कार्यकर्ते होते आणि तुरुंगात येणाऱ्यात अशांची संख्या मोठी असे. या कार्यकर्त्यांना आपल्या राजकारणाच्या आखाड्यात सामील करून घेण्यासाठी त्या त्या आखाड्याच्या महंतांकडून चाललेले प्रयत्न दुरून पाहताना मोठी गंमत वाटायची.

पक्षोपपक्षांची जाळी आपणांभोवती विणण्यात येत आहेत, याचा सुगावा लागून सावध होण्याइतपत जे शहाणे असत ते सांगून टाकीत की, आपला पक्ष स्वातंत्र्यवाद्यांचा; आपण काँग्रेस मानतो, इतर पक्षोपपक्षांशी आपणास काही कर्तव्य नाही. पण एवढे म्हटल्याने त्याची सुटका होत

नसे. कारण आपण काँग्रेसचे आहोत म्हणजे नक्की कोण आहोत याची जाणीव फारच थोड्याना असे. म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाने, नेतृत्त्वाने, प्रभावित होऊन असंख्य लोक तुरुंगात आले. म. गांधींच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचे आकलन त्यांना कधीच झाले नाही. ते नुसता चरखा फिरवीत बसले. काही जण हरिजनोद्धार, ग्रामोद्योग, गोसेवा यासारख्या विधायक कार्यक्रमांची चर्चा करण्यात दंग होत. सामान्य कार्यकर्ते या कार्यक्रमात व चर्चेत रस घेत नसत. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, कामगार क्रांती, शेतकरी संघटना, युवक संघटना, या विषयांची चर्चा, त्यावरील पुस्तकांचे वाचन व नेत्यांची त्यावर होणारी बौद्धिके यात तरुणवर्ग गर्क असे. नाशिकच्या तुरुंगात त्या वेळी कम्युनिस्ट व काँग्रेस सोशॅलिस्ट या दोन्ही पक्षांचे मान्यवर नेते असल्याने या साऱ्या प्रश्नांवरची पुस्तकेही तेथे वाचायला मिळत. ही पुस्तकांची देवघेव नि तासन्‌तास चालणाऱ्या चर्चा पाहिल्या की वाटे, हा तुरुंग नसून राजकीय प्रश्नांचा अभ्यास चालविणारे हे एक विद्यापीठच आहे ! सामान्य परिस्थितीतून झगडणाऱ्या कार्यकर्त्याला बाहेर निवांतपणे वाचन करण्याला वेळ मिळत नसे. अशांना तुरुंग ही मोठी पर्वणीच वाटली. तुरुंगाच्या नियमानुसार पुस्तके, वह्या, लेखनसामुग्री ही सारी आपल्या खर्चाने आणता येत असल्याने कच्चे विचार पक्के करण्याचे तुरुंग हे एक मोठे साधन बनले होत.

चौदा महिन्यांच्या नाशिकच्या कारावासात तात्त्विक विचारांची, राजकारणाची, विविध माहितीची, अशी शंभरापेक्षा जास्त पुस्तके मी वाचली ब त्या पुस्तकांवरच्या काढलेल्या टिप्पणांनी वह्या भरून गेल्या. नाशिक तुरुंगातील लेखनवाचनला भरपूर नि स्वयंस्फूर्त अशी मदत बंडू (केशव) गोरे याने केली. मेहेरअल्लींकडून पुस्तके मागवून त्याने मला दिली इतकेच नव्हे तर ती पुस्तके वाचल्यानंतर त्यातील विषयावर चर्चा करण्यात त्याला नेहमीच उत्साह वाटत असे. वाचलेल्या पुस्तकांतून मी व्यवस्थित टिपणे घेत आहे हे पाहिल्यावर त्याने माझ्या एका वहीच्या प्रारंभीच्या पानावर कार्ल मार्क्सचे एक सुंदर रेषाचित्र काढून ठेविले आहे. बंडू म्हणजे खळखळणाऱ्या भावनांचा, विचारांचा, प्रेमाचा जिवंत झरा होता. उन्माद हा त्या काळातील ध्येयवादी तरुणांचा एक स्थायीभावच होता. पण मला वाटते, बंडूमध्ये

या उन्मादाची मात्रा अधिकच होती. नुसत्या स्वातंत्र्यप्राप्तीच्याच नव्हे तर समाजवादाच्या प्रस्थापनेच्या ध्येयाने भारून जाऊन घर सोडलेल्यांच्या जमातीत तो आपण होऊन दाखल झाला होता. बंडूने घर सोडले होते; पण आप्तस्वकीयांविषयींचा त्याचा जिव्हाळा ओतप्रोत होता. ह्या त्याच्या आप्तस्वकीयांच्या गोतावळ्यात केवळ रक्ताच्या नात्याची माणसे नव्हती. ती तर होतीच; पण त्यांच्या जोडीला त्याने ध्येयवादाच्या रज्जूने इतर अनेकांना आणून बसविले होते. त्याच्या भावनोत्कटतेमुळे त्याने एकदा ज्याला आपले म्हटले त्याला तो आपल्या अंतःकरणाचा कोपरान् कोपरा दाखवीत असे. घरच्या सगळ्या माणसांची, त्याच्या घरच्या, कोकणातल्या वातावरणाची, पुण्यातील समवयस्क सोबत्यांची स्पष्ट शब्दचित्रे त्याने गप्पांच्या ओघात सहज गुंफली होती. पुण्यातील दिवाळीच्या सणातील किल्ले आणि रांगोळ्या यांची सुरस वर्णने त्याने केली होती. पत्ररूपाने मैत्रीचे सातत्य टिकविणे हा त्याचा एक गुणविशेष होता. याचा प्रत्यय तो जेलमधून माझ्या आधी सुटून गेल्यावर त्याने पाठवलेल्या पत्रावरून मला आला होता.

बंडू वाचनाचा तसेच बुद्धिबळाच्या खेळाचा शोकिन होता. पण तुरुंगात उघडपणे कोणताच खेळ खेळता येत नसे. मग बुद्धीबळे आत कशी येणार? कल्पक बंडूने साबणाच्या बाराचे बारीक बारीक तुकडे करून, थंडीने घट्ट झालेल्या त्या तुकडयांना बुद्धिबळांतील राजा, वजीर, उंट, घोडे, हत्ती व प्यादी यांचे आकार दिले. एका बाजूपासून दुसरी बाजू वेगळी दिसण्यासाठी बारिक बारीक खडे त्याने दुसऱ्या बाजूच्या बुद्धिबळात बसवले. एका चौरस आकाराच्या जाड कागदावर रेषा आखून पट तयार केला. तुरुंगातील वेळ चांगल्या रीतीने घालवण्याच्या दृष्टीने बुद्धिबळाच्या या खेळाला खूपच महत्त्व आले होते.

बुद्धीबळाचा खेळ दोघांनाच खेळता येई व तो सावलीत बसून खेळण्याचा खेळ होता. त्याला कायदेशीर परवानगी नसल्याने तो जपूनच खेळावा लागे. त्या वेळी व्यायामाची आवश्यकता तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना पटवून देऊन आम्ही रिंग टेनिसचा खेळ खेळण्याची खास परवानगी मिळवली होती. नंबर दोन व तीन चाळींच्या मधल्या मोकळ्या जागेत जाळे लावून हा खेळ चालत असे. रविवारी तर या खेळाच्या स्पर्धा होत.

बॅडमिंटनपेक्षा कमी खर्चाचा पण पुष्कळ व्यायाम देणारा हा खेळ पाळी-पाळीने सर्वच राजबंदी खेळत असत. या खेळाने वेळ चांगल्या रीतीने जाणे व आरोग्य राखणे या दोन्ही गोष्टी साध्य झाल्या. या खेळात अंपायरची गरज लागे. त्याच्या निर्णयावरून कधी कडाक्याची भांडणेही होत.

माधवराव जानोरकर हे नाशिकांतील नावांजलेले वकील. कोणत्याच पक्षाची बिरुदावली त्यांनी पक्षनिष्ठेने मानलेली नव्हती. सर्वसाधारण काँग्रेसनिष्ठा पण गटबाजीच्या राजकारणापासून अलिप्त असल्यामुळे ते तुरुंगात सगळ्यांना हवेहवेसे वाटत. गप्पा-गोष्टीत मोकळेपणा, वागणुकीत प्रांजलपणा, आणि नेत्यांबद्दल आदर यामुळे सर्वांशीच त्यांचे जमत असे. त्यांच्या रसिक आणि आनंदीवृत्तीने ते सर्वत्र वावरत. काँग्रेस पक्ष एक असला तरी त्यांतील कार्यकर्त्यांत हेवेदावे, मत्सर, गट करून वागण्याची वृत्ती सर्वत्र होती. नाशिक जिल्हा त्याला अपवाद नव्हता. या गटबाजीचा जास्त उपद्रव ज्यांचा राजकारण हा सर्व वेळेचा छंद वा उद्योग होऊन बसला होता त्यांनाच होत असे. जानोरकर हे सर्ववेळ कार्यकर्ते नसल्याने त्यांच्या बोलण्यात हातचे राखून बोलणे नसे आणि म्हणून त्यांच्याशी गप्पा मारायला फार बरे वाटे. वकिलीच्या धंद्यांतल्या गमती सांगण्या-बरोबर इतरही अनेक गोष्टी ते सांगत. कोणत्याच गटात सामील नसलेल्या माणसाच्या ओटीवर सगळ्याच गटांतल्या माणसांचे येणे–जाणे असते. जानोरकर हे अशांपैकी एक होते. तुरुंगात कोणी नवीन माणूस आला म्हणजे बाहेरच्या गोष्टी समजून घेण्याच्या कुतूहलाने त्याच्या भोवती माणसांचा गराडा पडे. तसेच कोणी सुटून जाण्याची वेळ आली की, त्या बाहेर जाणाऱ्या माणसाचे महत्त्व आंतील लोकांना विशेषच वाटे. कागदो-पत्री लिहून न होणारी कामे या जाणाऱ्या माणसाबरोबर निरोप देऊन करता येत असत. आता आपण तुरुंगातून सुटून घरच्या माणसात जाणार किंवा हाती घेतलेले कार्य पुन्हा पुढे चालविण्याची संधि मिळणार म्हणून बाहेर जाणाराही उत्साही मनाने जाई आणि त्याला निरोप देणाराही उत्साही मनानेच निरोप देत असे. बाहेर जाताना तुरुंगातील आपल्या संवगड्यांना भेटून त्यांचे पुनः पुन्हा निरोप घेण्याचे काम हा एक जिव्हाळ्याचा प्रकार असे. मोठ मोठ्या पुढाऱ्यांची स्वाक्षरी

आपल्या जवळ असावी अशी आकांक्षा बाहेर जाणाराची असे. जानोरकर सुटले त्या वेळी त्यांनी मुसुफ मेहेरअल्लींचा संदेश व स्वाक्षरी मागितली होती. तो संदेश माझ्या लक्षात कायमचा राहिला आहे. 'Live Dangerously' असें लिहून मेहेरअल्लींनी त्या खाली सही केली.

१६ माझी जात माणूस

कोणताही कालखंड घेतला तरी त्या कालखंडात वावरणाऱ्या माणसांच्या दृष्टीने तो महत्वाचा असतो. पण कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासातील सारेच कालखंड सारख्या महत्वाचे नसतात. राष्ट्राच्या स्वातंत्र्य–लढ्याचा कालखंड हा नेहमीच विशेष महत्त्वाचा मानला जातो आणि त्याला कारणेही तशीच असतात. ज्या घटनांनी सबंध राष्ट्राच्या जीवनात बदल घडून येत असतो अशा घटनांच्या काळालाच संक्रमणावस्थेचा स्वातंत्र्याचा काळ म्हणतात. राष्ट्राच्या व व्यक्तीच्या जीवनात संक्रमण घडवून आणणाऱ्या घटनांत महत्त्वाचा भाग घेण्याची ज्यांना संधी लाभते ते इतिहासात थोर पुरुष म्हणून गणले जातात. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील १९३० ते १९४७ हा कालखंड त्या अर्थाने संक्रमणावस्थेचा काळ होता. या कालखंडांत अनेक थोर नेते पुढे आले व त्यांनी भारताच्या व पर्यायाने जगाच्या इतिहासास वळण लावले. या असामान्य नेतृत्वाच्या काळात त्या नेत्यांचे अनुयायी या नात्याने वावरण्याचे भाग्य ज्यांना लाभले त्यांनी स्वतांस धन्य मानावे यात काहीच आश्चर्य नव्हते. स्वातंत्र्याच्या लढ्याचा कालखंड हा माणसाच्या अंतर्यामातील श्रेष्ठ प्रवृत्तींना उधान आणणारा काळ असतो आणि म्हणून त्या काळातील थोर नेते, त्यांचे अनुयायी, इतकेच काय, प्रत्यक्ष लढ्यात भाग न घेणारे पण त्या काळात वावरणारेही धन्य गणले जातात. अशा त्या ऐतिहासिक महत्त्वाच्या काळात

आणि ते सुद्धा स्वातंत्र्यसैनिकांच्या मेळाव्यात वावरत असताना माणसाच्या श्रेष्ठ गुणांची ओळख पदोपदी व्हावी हे साहजिकच होते.

कम्युनिस्ट पक्षातील कार्यकर्त्यांच्या त्यागाबाबत, त्यांच्या काम करण्याच्या चिकाटीबाबत, आदर असूनही त्यांच्या पक्षाबद्दल मला कधीच आपुलकी वाटली नाही. विचार हा कुठूनही आला तरी तो स्वीकारावा, या मताचा मी असल्यामुळे कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यास, रशियन क्रांतीची पुस्तके वाचण्यास मी नेहमीच उत्सुक असे. पण भारतात चाललेल्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांचा सतत उपहास करून, या स्वातंत्र्य चळवळीच्या नेत्यांचा उल्लेख प्रतिगामी म्हणून पदोपदी करणारे भारतीय कम्युनिस्ट नेते मला प्रथमपासून दुसऱ्या कोणत्या तरी राष्ट्राचे भारतातील दलाल आहेत, असेच वाटत आले आहे. अर्थात् याचा परिणाम कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशी व्यक्तिगत चांगले स्नेहसंबंध ठेवण्यावर कधीच झाला नाही. नाशिकच्या तुरुंगात आमच्या बराकीत कम्युनिस्ट नेते अनेक होते. कॉ. रघुनाथ कऱ्हाडकर हे त्यांच्या मोकळ्या स्वभावाने माझे मित्र बनले. त्यांच्याशी बोलताना कामगार चळवळीतील त्यांच्या अनुभवांचा उल्लेख येई. आयुष्याच्या ऐन उमेदीच्या काळात तेव्हां अनेक तरुणांनी वैयक्तिक स्वार्थाच्या वाटेकडे न जाता गोरगरिबांच्या हालअपेष्टा दूर करण्याच्या कामाला वाहून घेतले होते.

कम्युनिस्ट कार्यकर्ते हे कामगार-शेतमजूर या गरीब पददलित वर्गात संघटनेचे काम करीत असले तरी त्यांचे काम या गरीबांना केवळ चार पैसे जास्त मिळवून देण्याचे, भूतदयेच्या स्वरूपाचे नसते. त्यांच्या कार्यात समाजाची सारी अर्थव्यवस्था बदलून टाकण्याचे, कामगारक्रांतीचे तंत्र असते. "जगातील कामगारानो, एक व्हा; तुमच्या गुलामीच्या शृंखला ऐक्याने तटातट तुटतील" या मार्क्सच्या चैतन्यदायी आदेशाने साऱ्या जगभर ज्या असंख्य तरुणांची मने भारावून गेली व ज्यांनी आयुष्यभर कम्युनिस्ट तत्त्वानुरूप क्रांति घडवून आणण्याचे सतीचे वाण हाती घेतले त्यात भारतीय तरुणांचाही मोठा वाटा आहे.

कोणत्याही नव्या कामाला आरंभ केल्यावर प्रारंभी येणारे अनुभव हे फार मोलाचे असतात. त्यातल्या त्यात सुखी जीवनाचा आपणहून त्याग करून आपले ध्येयवादाचे स्वप्न साकार करण्यासाठी जेव्हा तरुण

घराचा आसरा सोडून बाहेर पडतो तेव्हा त्याच्या अंगच्या साऱ्या सात्त्विक सुप्त शक्ती विकसित होण्याच्या मार्गावर असतात. या काळात माणूस स्वार्थाचा विचार करीत नाही. दुसऱ्याचा स्वार्थ हाच त्याचा स्वार्थ बनलेला असतो. कॉ. कन्हाडकर यांनी त्यांच्या सोलापूरच्या कामगार संघटनेच्या कार्यात आलेले विविध अनुभव सांगितले. कामगारांचे भाकरीचे लढे लढत असता कार्यकर्त्यास दारिद्र्यावस्थेत दिवस काढावे लागतात ह्याचे कार्यकर्त्यांना काहीच वाटत नसते. आपला लढा यशस्वी झाला व कामगारांना पगारवाढ मिळाली की, त्या कार्यकर्त्याला किती आनंद होतो याची कल्पना सुखासीन उच्चवर्णीय माणसाला येत नाही. या कार्यकर्त्यांच्या बरोबरीचे शाळा-कॉलेजातील विद्यार्थी धोपट मार्गाने विद्या पुरी करून बड्या सरकारी नोकरीत असले तर त्यांना त्यांच्या शाळेतील सहाध्यायी हा अंगी पात्रता असूनही दारिद्र्याचे जिणे जगतो आहे हे पाहून वाईट वाटते; नि संधि मिळेल तेव्हा, दारिद्र्याला जवळ करून बसलेल्या व अशा कार्यकर्त्याला तो आपल्याकडे जेवायला बोलावतो. त्या कार्यकर्त्याला आपल्या मित्राची सदिच्छा समजते. पण त्याच वेळी आपण दरिद्री असलो तरी दुःखीकष्टी नाही, हे तो आपल्या बड्या सुखासीन मित्राच्या लक्षात आणून देतो. एखादा भानगडीचा संप मिटला म्हणजे त्या तडजोडीचा परिणाम म्हणून कामगारांना जी पगारवाढ मिळते त्यामुळे लाभणारे मानसिक समाधान हे स्वतःच्या मोटारीतून हिंडण्याच्या आनंदापेक्षा श्रेष्ठ दर्जाचे असते, हा साऱ्याच तळमळीच्या कार्यकर्त्यांचा अनुभव असतो. गरीबांच्या सुखावरील समाधानात स्वतःची श्रीमंती अनुभवण्याचे हे तत्त्वज्ञान कॉ. कन्हाडकर यांनी आपल्या एका मित्राला ऐकवल्याचे मला वेगळ्या शब्दांत सांगितले होते. सच्चा दिलाचा नि नेकीचा कार्यकर्ता म्हणून कॉ. कन्हाडकरांकडे मी त्या दिवसापासून पाहू लागलो.

विनायकराव भुस्कुटे हे आमच्यापेक्षा वयाने मोठे. कार्ल मार्क्सचे त्यांनी मराठी भाषेत चरित्र लिहिले आहे. भुस्कुटे म्हणजे त्यागी देशभक्तीचे एक जिवंत उदाहरण होते. त्यांचे विचार स्पष्ट होते नि विशेष म्हणजे विचारानुसार आचार, हा त्याचा त्यांचा स्थायीभाव होता. साधी पण स्वाभिमानी राहणी हा त्या काळच्या देशभक्तांचा खाक्या असे.

ते बुद्धिबळे खेळण्यात भाग घेत, चर्चाही करीत, नि आम्हा मंडळीत मिसळून वागत. त्यांची विशेष आठवण एका प्रसंगाने माझ्या मनावर कायमची कोरली गेली आहे. १९४१ सालच्या खानेसुमारीच्या वेळी आम्ही नाशिक तुरुंगात होतो. खानेसुमारीचे काम सरकारी पातळीवरून चालते आणि तुरुंगाच्या भिंती त्या कामाला अटकाव करू शकत नाहीत. खानेसुमारीचे तक्ते माहिती भरून देण्यासाठी आमच्या यार्डात पाठविण्यात आले होते. या माहितीच्या सदरात नावापुढे जातीचे एक सदर होते. मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती या जातीची नोंद केवळ धर्म कोणता हे लिहून होत असे. हिंदू धर्माचे तसे नाही. जात हिंदू लिहून भागत नसे. पोटजात म्हणून आणखी एक सदर असे. विनायकराव भुस्कुटे यांनी शिरणगतीचा तक्ता भरताना या जाती–पोटजातीच्या सदराला चक्क सुरूंगच लावला. त्यांनी आपली जात 'माणूस' सांगितली! ते हिंदू म्हणते तर पुन्हा पोटजातीचा प्रश्न स्वाभाविकच आला असता. पण या सदरापुढे 'माणूस' म्हटल्यानंतर बाकीचे प्रश्न व सदरे आपोआपच असून नसल्यासारखी झाली. भुस्कुटयांनी 'माझी जात माणूस' हे क्षणैक विचाराच्या झटक्यात उद्गार काढले नसून त्यामागे त्यांच्या खोल चिंतनाचा पाया होता. माणसाने माणसांमाणसांत केलेले धर्मानुसार भेद हे त्यांना मान्य नव्हते. माणूस इथूनतिथून सारा एक. माणसांमाणसांत कृत्रिम भेद पाडण्याचे कार्य या धर्मांनीं केले आहे आणि त्याची कटू फळे शतकानुशतके भोगावी लागत आहेत. या मानवनिर्मित भेदांपलीकडे जाऊन 'मानव तितुका एकच आहे.' हा सिद्धांत त्यांनी आपली जात 'माणूस' असे खणखणीतपणे सांगून खरा ठरविला होता. तर्कशुद्ध विचार नि त्या विचारांमागे असलेले मनोधैर्य यामुळेच अशी धीरोदात्त कृति घडत असते.

आम्हां राजबंद्यांना शारीरिक हालअपेष्टांचा प्रत्यय तुरुंगात आला नाही. मात्र एकदा फटक्यांच्या शिक्षेचा अमानुष प्रकार कानांवर आला नि कसेसेच झाले. हॉस्पिटलमधून आमच्या यार्डात येणाऱ्या वाटेवरील मोकळ्या जागेत एके दिवशी सायंकाळी एक तिकाटणे उभे असलेले मी पाहिले. असले तिकाटणे मी तीस साली येरवडा तुरुंगांत पाहिले होते. शाळेत फळा ठेवण्यासाठी असे तिकाटणे वापरीत एवढेच मला त्या वेळेपर्यंत माहीत होते.

पण येरवडा तुरुंगात त्या तिकाटण्यावर फटक्याची शिक्षा झालेल्या कैद्याला पाठ दिसेल असा हातपाय बांधून उभा करीत व फटक्यांची शिक्षा देत, अशी माहिती कळली होती. नाशिकच्या तुरुंगात ते तिकाटणे पाहाताच त्या माहितीची आठवण झाली नि अंग शहारले. दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या यार्डापासून जवळच असलेल्या त्या तिकाटण्याच्या जागेकडून माणूस जनावरासारखा रडत ओरडत असल्याचा आवाज आला नि पोटात एकदम खोल खड्डा पडून अगतिकेची भावना चमकून गेली. फटक्यांच्या शिक्षेची अंमलबजावणी बाहेर चालली होती. ते रडणे ओरडणे लगेच थांबले. कारण या तीन चार फटक्यांतच सामान्य माणूस बेशुद्ध होतो. हे फटके देणे संपल्यावर बाजूस असलेल्या स्ट्रेचरवरून त्या कैद्याला जेलच्या इस्पितळात नेऊन डॉक्टरी देखरेखेखाली उपचार सुरू होतात. काही निगरगट्ट कैदी हे फटकेही सहन करू शकतात असे सांगण्यात आले. काही घृणास्पद गुन्ह्यांसाठी फटक्यांची शिक्षा असावी, म्हणजे गुन्हेगार सरळ येतात असे कोणी कितीही सांगितले तरी, खाऱ्या पाण्यात भिजवलेल्या वेताने उघड्या पाठीवर विरविरीत वस्त्रावरून मारलेल्या फटक्यामुळे माणसाच्या तोंडून निघणारे जनावरसदृश विव्हळणे कानी पडले म्हणजे 'पश्चात्तापेन शुध्यति' हेच गुन्हेगाराचे मन पालटविण्याचे मानवी साधन आहे असे पटते. त्या दिवशी आमच्यापैकी काही जणांनी, त्या फटक्यांमुळे तात्पुरत्या आजारी झालेल्या कैद्याची विचारपूस केली. या शिक्षेच्या इष्टानिष्टतेची चर्चाही बरीच झाली.

१७ आरसा फुटल्याचे दुःख

तुरुंगातील ठरीव ठशाच्या वातावरणात बदल घडवून आणणाऱ्या ज्या थोड्या गोष्टी अगर घटना असतात त्यात बाहेरून कोणीतरी भेटायला येणे याला पुष्कळच महत्त्व असते.

तुरुंगातील सर्व दिवसभराच्या जीवनावर सामुदायिकपणाची दाट सावली पडलेली असल्याने कोणाहि कैद्याला घरून कोणी भेटण्यास आले की, त्या राजबंद्यांच्या साऱ्या निकट परिचितांना बाहेर माहिती कळण्याची संधी मिळते. या भेटीच्या बाबत सगळेंच भाग्यवान नसतात. ज्याच्या त्याच्या बाहेरच्या सुस्थितीवर, कौटुंबिक माणसांना कैद्याबद्दल वाटणाऱ्या आपुलकीवर या भेटींची संख्या अवलंबून असते. ज्या कारणासाठीं राजबंदी तुरुंगात आलेला असतो त्या राजकारणात रस घेणारे कोणी भेटीस आले तर ती भेट विशेष महत्त्वाची ठरते. माझ्या वाटणीला अशा फारशा महत्त्वाच्या भेटी आल्या नाहीत. कोणत्याही तुरुंगातील माणसाला बाहेरच्या माणसाने भेटीस यायचे म्हणजे त्या बाहेरच्या माणसाला पुष्कळच यातायात करावी लागते. अगोदर जेलच्या अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून कैद्याच्या मुलाखतीचा दिवस ठरवून घ्यावा लागतो. कैद्याला ठराविक दिवसांनींच भेट घेता येते. थोड्या दिवसाच्या अंतराने लागोपाठ भेटी घेता येत नाहींत. भेटायला येणाऱ्या माणसाचे राहाण्याचे ठिकाण व तुरुंग यामध्ये बरेच अंतर असल्यास या भेटी वारंवार होऊ शकत नाहीत. माणसाच्या आर्थिक सुस्थितीचा फरक जसा जेलबाहेर दिसून येतो तसाच तो आतही असतो. सुस्थिति मग ती धनाची असो वा स्नेहाची असो बहुशा लाभदायकच ठरते. त्यातल्या त्यात पैशापेक्षा स्नेहाचे मोल केव्हांही अधिकच.

नाशिक तुरुंगातील माझ्या चौदा महिन्यांच्या वास्तव्यात भेटी अशा फारशा झाल्याच नाहीत. एकदा माझे ठाण्याचे स्नेही, सध्या सरकारी नोकरीत बडया हुद्दयावर असलेले, मला भेटण्यास आले. त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नीही होत्या. नंतर एकदा असेच माझ्याविषयी आपुलकी बाळगणारे दुसरे एक स्नेही आणि राजकारणातील एक सहकारी वकील आले होते. तुरुंगात माझ्या कानाच्या दुखण्याचा त्रास बराच होत असल्याचे बाहेर समजले होते. त्यामुळे त्याबद्दलची चौकशी भेटीत प्रथम होत असे. हवापाणी नि प्रकृतिस्वास्थ्य यांना कुठल्याही भेटीच्या प्रसंगी अग्रहक्काचा मान मिळत असतो. जेलमधील भेटी या नियमाला अपवाद नसत.

एक अनपेक्षित भेट मला नाशिक जेलमध्ये मिळाली. त्या गृहस्थांची आणि माझी तशी चांगली ओळख. त्यांच्या सगळ्या कुटुंबीय माणसांशी माझा

परिचय. तरी पण मला ते भेटण्यासाठी मुद्दाम येतील असे मला वाटले नव्हते. आधीं पत्र वगैरे येऊन ही भेट ठरली नव्हती. मी असाच दुपारचा वाचता वाचता झोपलो होतो. तोच दारावरच वॉर्डर "भेट आलीय" म्हणून सांगत आला. तुरुंगात भेटीला व नेहमीच्या हिंडण्याला कपडे एकच असायचे. मी तसाच भेटण्याच्या ठिकाणी गेलो. तेव्हा मुळचे ठाण्याचे पण त्या वेळी नाशिकला राहणारे नाशिक मेडिकल स्टोअर्सचे भागीदार मालक आल्याचे दिसले. ते नुसतेच भेटीस आले नव्हते, तर त्यांनी चांगली भेटही आणली होती. कोकोला नावाचा एक उंची हेअर ऑईलचा मोठा शिसा त्यांनी आणला होता. खिशातील अत्तराची कुपी काढून ते मला देऊं लागले. तेव्हा मी कैदी असल्याची त्यांना आठवण करून दिली. त्यांची आणि तुरुंगाच्या अधिकाऱ्यांची चांगली ओळख होती. अपेक्षित माणसे भेटीला येण्याने कैद्याला आनंद होतोच. पण त्यापेक्षा अनपेक्षित व्यक्ती भेटीला आल्या की तो दिवस विशेषच उत्साहात जातो. आपण कोणीतरी असल्याची जाणीव आपल्या मनात निर्माण होते. त्या कोकोला हेअर ऑईलच्या वासाने आधीच गुलाब–मोगऱ्याच्या पसरलेल्या सुगंधात भर पडली !

सहवासाने आपुलकी उत्पन्न होते नि ही आपुलकी मित्रपरिवाराप्रमाणे निर्जिव वस्तूंबद्दलही वाटू लागते. बाहेरच्या पत्रव्यवहारांत नाशिक तुरुंगाचा उल्लेख करतांना 'आमचा जेल' 'माझी खोली' असा उल्लेख होऊ लागला. सहवासाने माणूस तुरुंगालाहि ' आमचा तुरुंग ' म्हणू लागला म्हणजे तो तेथील वातावरणाशी समरस झाला असेच म्हणायला हवे. मात्र नाशिक तुरुंगाच्या वातावरणाशी आम्ही समरस झालो तरी तो तुरुंग होता हे अधून मधून घडणाऱ्या घटनांनी चांगलेच जाणवत असे.

माझ्याजवळच्या दाढीच्या सामानात एक षट्कोनी आकाराचा बिलोरी आरसा होता. तो एके दिवशी कोणाकडून तरी फुटला नि त्या एका आरशाचे असंख्य छोटे छोटे आरसे–अर्थात् फेकून देण्यालायक अशा काचा झाल्या. त्या आरशाने तुरुंगात माझी सोबत केली होती. नाशिकला आम्हांला एकेकट्याला स्वतंत्र खोलीत सायंकाळी सूर्यास्तानंतर बंद करीत नि सकाळी

सूर्योदयापूर्वी दारे उघडित असत. सबंध रात्रीत दुसरा माणूस म्हणून दिसत नसे. समोरच्या व्हरांड्यातून साऱ्या रात्रभर हवालदारांच्या गस्तीच्या काय फेऱ्या होतील तितकाच दुसऱ्याचा पायरव कानी येत असे. संध्याकाळी साडे सहा–सातला बंद झाल्यावर वाचनाला सुरुवात करायची. नऊ साडे-नऊपर्यंत वाचन झाल्यावर त्या दहा फूट रुंद नि अकरा फूट लांबीच्या खोलीत फेऱ्या घालायच्या. या फेऱ्या घालतांना भिंतीवर टांगलेल्या त्या छोट्या आरशात आपलेच प्रतिबिंब पाहून थांबायचे नि जणू काय दुसरा माणूस भेटला असे समजायचे. क्वचित् खोलीच्या मागच्या बाजूने महिन्या-तून ठराविक दिवशी आकाशातून संथपणे चालणाऱ्या चंद्राचे प्रतिबिंब त्या आरशात दिसायचे. कधी कधी सकाळी एखाददुसरी चिमणी त्या आरशाच्या काचेवर आपली इवलीसी चोच आपटताना दिसे. आरसा हे चिमण्यांच्या क्रीडाविहाराचे एक हक्काचे ठिकाण असते हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण तुरुंगाच्या भिंतीवरील छोट्या आरशावर चिमण्यांनी झेप घेतलेली पाहणे याला विशेष महत्व आहे. नेहमी त्याच त्याच वस्तू व माणसे पाहून कंटाळा आलेल्या कैद्याला चिमणीचे ते आरशासमोरील बागडणे आल्हाददायक वाटते. आरसा फुटल्याचे लक्षात येताच किती गोष्टींना आपण अंतरलो हे लक्षांत आले. बाहेरून स्वतःच्या पैशाने मी दुसरा आरसा आणविला पण त्या पहिल्या षट्कोणी आरशाची शान त्या साध्या आरशाला नव्हती.

आमच्या बराकीत खान नावाचे कम्युनिस्ट कार्यकर्ते होते. या खानांची गंमत अशी की ते केवळ बुद्धिवादी कम्युनिस्ट नव्हते, तर त्यांची वृत्ती साम्यवादी विचारसरणीवर आधारलेली होती. त्यांनी विविध देशांत प्रवास केला होता आणि रशियाला भेट दिली होती. या पर्यटनांनी ' केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार । शास्त्र-ग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ॥ ' या श्लोकात वर्णन केलेले चातुर्य खानांच्या अंगी बाणले होते. मराठी बोलण्याचा प्रयत्न खान करू लागले की मोठी गंमत होई. त्यांनी सहज इकडचा शब्द तिकडे जोडला किंवा मधला एखादा खाऊन टाकला की अर्थ साफ बदलून जाई नि हास्याचा मळा पिके. ' हसा आणि लठ्ठ व्हा ' या वाक्याच्या जोडीला आनंदी वृत्तीचे कैदी ' हसा आणि तुरुंग विसरा ' हे वाक्य बिनदिक्कत ठेवतील. खान

आपल्या मोडक्या मराठी भाषेत युरोपमधील देशांच्या दौऱ्यात आलेले अनुभव सांगू लागले कीं त्यांच्या भोवती लोकांचे कडे पडे.

हलक्या फुलक्या गप्पा-सप्पा तुरुंगात सुरू झाल्या कीं त्यांत बाई या विषयाला हटकून स्थान मिळे. थंड प्रदेशांतील गोऱ्या मुली, आशिया-खंडातून तिकडे गेलेल्या रेखीव चेहरेपट्टी पण काळी कातडी असलेल्या माणसाचे विशेष कौतुक करतात; त्याचा काळा हात आपल्या हातात घेऊन कौतुकाने न्याहाळतात अशी माहिती त्यांनी देताच, काळ्या वर्णाचे कौतुक भारतात नाही तरी जगाच्या पाठीवर कोठे तरी नि तेही गोऱ्या लोकांच्या देशात होते म्हणून सावळ्या वर्णाच्या पुष्कळांना बरे वाटले.

अन्याय घडला की खऱ्या कम्युनिस्टांचे रक्त उसळते, हा अनुभव खान यांच्या वागणुकीत वारंवार दिसून येई. तुरुंगाच्या पोलिसांनी कोणावर अन्याय केला, किंवा कैद्याला रास्त वागणूक मिळाली नाही की आपल्या पहाडी आवाजात खानसाहेब घोषणा देत. मला दिलेल्या इंजेक्शनच्या त्रासाने मी रात्री कण्हू लागल्यावर सारी बराक डोक्यावर घेण्याइतका ओरडा याच खानांनी केला होता. दणकट शरीर आणि निरोगी मन हे त्यांचे वैशिष्ट्य होते. कम्युनिझमच्या पढिक पांडित्याचे कसलेही अवडंबर जवळ न बाळगणारे खान हे खऱ्या साम्यवादाचे चालते बोलते उदाहरण होते. नाशिकच्या तुरुंगाचे तुरुंगपण घालविण्यास ज्या अनेक व्यक्तींचा हातभार लागला त्यांत आमचे कॉम्रेड खान यांची गणना केली पाहिजे.

"मन एव मनुष्याणाम् कारणं बंधमोक्षयो ॥" या वचनाचा प्रत्यय चिंतनशील माणसाला नेहमीच येतो. पण तो तुरुंगाच्या चार भिंतीच्या आत विशेष यथार्थत्वाने कळतो. मी तुरुंगात वाचलेल्या अनेक पुस्तकांपैकी एका पुस्तकातील एक वाक्य माझ्या मनात घर करून बसले आहे. त्या इंग्रजी वाक्यात म्हटले आहे की, माणूस तुरुंगात असला म्हणजे कुलुपाच्या आड बंदिस्त असतो आणि त्याला पाहिजे असणाऱ्या वस्तू बाहेर मोकळ्या असतात; तो तुरुंगातून सुटला की स्वतः कुलुपाबाहेर येऊन स्वतंत्रपणे हिंडू फिरू लागतो, पण त्याला हव्या असलेल्या वस्तू कुलुपाआड असतात.

मिळून माणूस तुरुंगात असला काय वा तुरुंगाच्या बाहेर असला काय, परिणाम एकच असतो आणि तो म्हणजे माणूस आणि त्याला हव्या असणाऱ्या गोष्टी यांची कायमची ताटातूट ! या वाक्याचा अर्थ स्वतंत्र वातावरणात ते वाक्य वाचताना जितका कळतो त्यापेक्षा कितीतरी पटीने तुरुंगात कळतो. आयुष्यात कोणत्याही प्रसंगी उपयोगी पडणारे जे अनुभवाचे धन माणसाच्या हाती पडते ते अशा बंदिस्त जीवनातच. ते दिवस दुसऱ्या जागतिक युद्धाचे होते आणि प्रारंभी हिटलरची सरशी होत होती. भारतावरही हिटलरचा वैमानिक हल्ला होण्याची शक्यता लोक बोलून दाखवीत होते. 'ब्लॅक आऊट' चे प्रयोग चालू होते. अशा त्या काळात 'मन चिंती ते वैरी न चिंती' याही म्हणीचा प्रत्यय येत असे. आमच्या साऱ्या खोल्यांना कुलुपे लावून त्या सगळ्या किल्ल्यांचा जुडगा खुळखुळवीत रात्रपाळीचा सुभेदार जायचा आणि त्या किल्ल्या जेलसाहेबांच्या कचेरीत नेऊन ठेवायचा. आम्हांला बंद करून तो निघून गेल्यावर मनात अनेकदा विचार येत की जर या नाशिक भागावर बाँब हल्ला झाला तर आपल्या खोल्या उघडल्या जाणार नाहीत नि आपणास जागच्या जागी तडफडावे लागेल. मनाची ही मोठी गंमत आहे की एकदा एखाद्या विचाराचे सूत हाती धरले की मग तो विचार मन अगदी शेवटपर्यंत नेते. तर्काच्या शक्यतेच्या प्रांतात ज्या घटनांचे चुकूनही पाऊल पडणार नाही त्या घटना कल्पनाक्षेत्रात नुसता हैदोस घालीत असतात. त्यातलाच हा प्रकार होता.

१८ राममंदिराच्या पुजाऱ्याला सवाल

आम्हां राजबंद्यांना गुन्हेगारांच्याच तुरुंगात पण स्वतंत्रपणे ठेवले असल्याने गुन्हेगार कैद्यांशी आमचा दिवसभर सातत्याने संबंध येत नसे. जो काही संबंध येई तो आमच्या खोल्यातून साफसफाईचे काम करणारे कैदी, वॉर्डर म्हणून शिपायांच्या

हाताखाली काम करणारे, हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तेथे लहानसहान कामे करणारे कैदी, अशांबरोबर येत असे. या कैद्यांना आमच्याबद्दल फार आदर वाटे. आम्हांला राजबंदी वगैरे नावांनी ओळखण्यापेक्षां ते 'गांधींचे लोक' म्हणून ओळखत. खोल्यांतील व संडासांतील कुंडा साफ करणारे, बाहेरचे अंगण, व्हरांडा, खोल्या झाडणारे हे कैदी ठराविक वेळी येऊन आपापलीं कामें करून जात. व्हरांड्याचा खालचा भाग झाडताना हे दीनवाण्या चेहऱ्याचे कैदी आमच्यापैकी सिगरेट ओढणाऱ्यांनी टाकलेली थोटके प्रथम गोळा करीत नि मग तो भाग झाडीत. विडीसिगरेट ओढण्याचे व्यसन जडलेला माणूस व्यसनपूर्तीसाठीं दुसऱ्याची उष्टी थोटके गोळा करताना पाहिल्यावर त्या माणसावर रागवावे की त्याची कींव करावी हा प्रश्न पडे. त्या व्यसनी माणसावर जर रागवायचे तर आमच्यापैकीं जे कार्यकर्ते रोज एकेक रुपयाचा धूर केवळ धोक म्हणून करीत त्यांचे काय म्हणून कौतुक करायचे, असा प्रश्न पडे. गुन्हेगार कैद्यांना तेव्हा राजरोसपणे विडी ओढण्याची परवानगी नसे. ते विड्या ओढीत अधिकाऱ्यांच्या नजरा चुकवून किंवा रात्री बराकीत बंद झाल्यावर. ही त्यांची विडीची तलफ लक्षांत घेऊन आमच्यापैकी अनेक लोक या कैद्यांना विड्या-सिगरेटी बक्षिशीच्या निमित्ताने देत असत.

विडी हे तुरुंगातील चलन असे. अनेक वॉर्डर शिपायांशी संधान बांधून बाहेरून विड्या आणवून त्या गुप्तपणे कैद्यांना पुरवीत असत. विडीप्रमाणे साबणाचा तुकडा हाही या गरीब गुन्हेगार कैद्यांना हवाहवासा वाटे. कपड्याचा साबण ते अंगाला लावण्याच्या साबणासारखा वापरीत. मी स्वतः विडी–सिगरेटपासून अलिप्त असल्याने या कैद्यांना विडी–सिगरेट देण्यास माझा विरोध असे. विडी हे व्यसन माणुसकीला कमीपणा आणणारे आहे, असा माझा समज आहे. विडी–सिगारेट ओढणारे नाकातोंडातून धुराचे फवारे सोडून आजूबाजूच्या लोकांच्या नाकावर आक्रमण करतात आणि मग स्वतःला काय हवा तो आनंद घेतात. शेजारच्या माणसाला आपल्या आनंदापासून त्रास होत असेल तर तो आनंद निर्भेळ नसून तसा आनंद आपण घेता कामा नये, काहीतरी चाळा म्हणून सिगारेट ओढणारे चॉकोलेट का चघळत नाहीत, असेही पुष्कळदा मला वाटते. आमच्या यार्डात काम कर-

णाऱ्या कैद्यांना मी अर्थातच सिगरेट देत नसे. पण त्यांना काहीतरी द्यावे असे मात्र मला वाटे. या कैद्यांना साबण हवा असतो हे समजल्यावर टर्किश-बाथ सोपच्या लहान वड्या आणवल्या व त्या या कैद्यांना देऊ लागलो.

गुन्हेगार कैदी नि राजबंदी ही माणसासारखी माणसे असून त्यांना मिळणाऱ्या वागवणुकीतील तफावत तुरुंगात फार ठळकपणे दिसून येई. विशेषतः कुंडा साफ करण्याचे काम तुरुंगातसुद्धा त्या विशिष्ट जमातीच्या कैद्यांनाच देण्यात येई. माणसाच्या साऱ्या दैनंदिन जीवनात जेवणाला, खाण्या-पिण्याला जितके महत्त्व आहे तितकेच ते पचवल्यावर अन्नाचा अवशिष्ट भाग बाहेर टाकण्याला आहे. अन्न पोटात घेण्याची क्रिया जितकी शोभादायक होईल तितकी करण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. पण त्यामुळेच निर्माण होणारी बहिर्दिशेची क्रिया अमंगल गणली जाते आणि सगळ्यात अन्यायाची परिसीमा जर कुठे होत असेल तर ही घाण वाटेला लावण्याचे काम एका विशिष्ट जातीवर सक्तीने लादले जाते. राजकीय अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी काही असामान्य, हळूवार मनाच्या नि न्यायप्रेमी नेत्यांच्या लक्षात हा अन्याय आलेला आहे.

तीस सालच्या मिठाच्या सत्याग्रहात तुरुंगवास भोगल्यानंतर मी अहमदाबादेस महात्मा गांधींच्या सत्याग्रहाश्रमात गेलो असता मला एक गोष्ट जाणवली आणि ती म्हणजे तेथे रस्ते झाडायला नि संडास साफ करायला विशिष्ट जमातीचे लोक नोकर या नात्याने ठेवले नव्हते. आश्रमवासी आपापल्या ठरलेल्या पाळीप्रमाणे ते काम करीत. आमच्याबरोबर नाशिकच्या तुरुंगात असलेले सेनापती बापट यांनी त्यांच्या रत्नागिरी तुरुंगाच्या वास्तव्यात आपल्याला भंगीकाम द्यावे अशी मागणी केली असता "तुमची जात ते विशिष्ट करणाराची नसल्याने तुम्हास ते काम देता येत नाही," असे त्यांना सांगण्यात आले होते. सेनापतींनी त्यांच्या राहत्या गावी पारनेर येथे रस्ते सफाईचे काम करताना हे भंगीकाम स्वेच्छेने केले होते. तुरुंगातील चर्चेत सामाजिक समता, स्वातंत्र्य, सर्वांस समान संधी, उच्चनीचतेस विरोध अशा लंब्याचौड्या चर्चा होत. त्या चर्चेचा पोकळ फुगा या विशिष्ट जमातीवर सक्तीने लादलेल्या भंगीकामाचा उल्लेख येताच फुटे. स्वातंत्र्याच्या

आंदोलनांत पुढे पुढे जाताना सामाजिक विषमता जर आम्ही नष्ट करू शकलो नाही तर आमच्या समानतेच्या गप्पा तर फोल ठरतीलच पण खुद्द स्वातंत्र्याच्या आंदोलनालाही यावी तितकी प्रखरता येणार नाही, हे आमच्या तेव्हां लक्षातच येत नव्हते.

हा भंगीकामाचा आणि सामाजिक विषमतेचा, तसाच स्वच्छतेचा प्रश्न स्वतःच्या आचरणाने धसास लावणारे सेनापती बापट आमच्यात होते. वितंडवादाच्या चर्चेत ते कधीच रस घेत नसत. अगदी परस्परविरुद्ध अशा दोन बाजू घेऊन कोणी त्यांच्याशी वाद घालायला गेला तर त्याची त्यांच्यापुढे काही डाळ शिजत नसे. साऱ्या बिकट प्रश्नांना त्यांचे एक उत्तर असे. कोणत्याही प्रश्नाची उकल ते 'श्रीहरी' या तीन अक्षरी शब्दाने करीत. "रामाला बुद्धी देणारा श्रीहरी नि रावणाला बुद्धी देणाराही श्रीहरीच," असे म्हणून ते कोणत्याही अतिरेकी वादाच्या मुद्याचा सफाईने निकाल लावीत. बालकाच्या निरागस नि निष्पाप वृत्तीने आमच्यात वावरणाऱ्या या महर्षीने आमचे तुरुंगातील जीवन अनेक प्रकारे उल्हसित केले होते. अनुष्टुप छंदातील काव्यरचना हा आमच्या तात्यांचा हातचा मळ असे. आमच्या यार्डात कोणी काही विशेष पराक्रम केला, एखादी उल्लेखनीय कामगिरी केली की सेनापती अनुष्टुप छंदात काव्य लिहून त्याचा गौरव करीत. सोलापूरचे काँग्रेस कार्यकर्ते श्री. एम्. डी. विभूते हे आमच्याबरोबर तेव्हा होते. त्यांची भक्कम शरीरयष्टी नि युयुत्सु वृत्ती पाहूनच की काय, त्यांना आमच्या बराकीच्या वतीने तुरुंगाच्या मुदपाकखान्यावर प्रतिनिधी नेमले होते. त्यांना सेनापती बापट यांनी 'पाकानंद' ही पदवी दिली होती. अनेक कारणांमुळे अनेकांना होणाऱ्या या पदवीदानाचा दिवस नक्की ठरलेला नसे; पण वेळ मात्र चहापानाची असे. बराकीच्या व्हरांड्यात गप्पा-गोष्टी-समवेत होणाऱ्या चहापानाची लज्जत मधूनमधून त्याच वेळी होणाऱ्या या पदवीदानाने आणखीच वाढत असे.

या पदवीदानात एकदा माझाही नंबर लागला. मुलींच्या शाळेत युद्ध-मदर्तासाठी होणाऱ्या नाटकाबाबत मी पत्रक काढले व त्या पत्रकामुळे मला

व माझे सहकारी श्री. नाथ ताम्हणे यांना एक वर्ष चार महिन्यांची शिक्षा झाली, हा सारा इतिहास सेनापतींना माहीत झाला. मी तुरुंगात आल्यावर आपणहून तेथील गुलाब-मोगऱ्यांच्या झाडांना पाणी घालू लागलो हेही त्यांनी पाहिले. या साऱ्या घटनांचा उल्लेख करून त्यांनी अनुष्टुप छंदातील बारा ओळींचे एक काव्य रचिले. त्या बारा ओळी अशा :

कुमार्ग सोडुनि सुमार्ग धरणे हे शिक्षणसार ।
सुमार्ग दावी सुशिक्षकांचा सुंदर व्यवहार ॥ १ ॥
मनें मुलींची कुशिक्षकानी स्थानिक हैस्कुलीं ।
कुव्यापारा युद्ध मदतीच्या प्रवृत्त जैं केलि ॥ २ ॥
लक्ष शीघ्र तैं सूज्ञ मुलींचे तिकडे वेधियले ।
सेवक भावे तत्शुभचिंतक पत्रक काढियले ॥ ३ ॥
वाट पत्रकी शुद्ध दाविली युद्धविरोधाची ।
नंतर सहजचि येथ मिळविली खोली हक्काची ॥ ४ ॥
दया मुलींची दया फुलांची जुळ्या भावना या ।
सुरम्य फुलझाडांना लाविति पाणी घालाया ॥ ५ ॥
ताप मुलींना ताप फुलांना होता पाहूनी ।
रचि उपाया ताप हराया तो नर रसिकमणी ॥ ६ ॥

या बारा ओळीतील सारी पहिली अक्षरे एकत्र केली तर 'कुसुमकुलसेवानंद सुतार' असा अर्थबोध त्यांतून होतो. नाशिकच्या तुरुंगात फुलझाडांना घातलेल्या पाण्याने सुवास तर भरपूर मिळालाच; नि त्याच्या जोडीला हे पदवीदानही लाभले.

गप्पागोष्टी, नर्म विनोद, उगीचच एखादा वाद उकरून काढणे, या साऱ्या गोष्टीना अनुकूल अशी जी स्थळे असतील त्यांत तुरुंगाचा समावेश केला पाहिजे ! मात्र तो तुरुंगही नाशिकसारख्या ठिकाणचा, 'ब' वर्गीय कैद्यांचा, म्हटली तर सक्तमजुरी, म्हटला तर आराम, अशा प्रकारचा व ध्येयवेडया युवकांनी भरलेला असावा. नाशिकच्या गोऱ्या रामाच्या देवळाचे पुजारी सत्याग्रह करून काही महिन्यांच्या शिक्षेसाठी आमच्यात

आले होते. रामाच्या देवळाचे ते पुजारी असल्याने त्यांच्याबरोबर होणाऱ्या गप्पा स्वाभाविकच रामचरित्राभोवती गुंफलेल्या असायच्या.

चर्चेला विशेष धार यावी या उद्देशाने मी त्यांच्याबरोबर वेगळ्याच मुद्यावर एके दिवशी वाद मांडला. सीतेला रावणाने पळवून नेली नसून ती वनवासाला कंटाळून अगोदरच संगनमत करून रावणाबरोबर पळून गेली, असे मी विधान केले. माझ्या विधानाला पुरावा द्या म्हणून मागणी येताच मी म्हटले, " अहो, परकरी मुलगी सीता ज्या परशुरामाच्या धनुष्याचा खेळातला गाडा म्हणून उपयोग करी आणि ते धनुष्य सहज ओढीत नेई तेच धनुष्य रावणाला धड पेलता आले नाही आणि ते त्याच्या अंगावर पडले ! पोरसवदा सीता ज्या धनुष्याशी घोडा घोडा म्हणून खेळ करी ते धनुष्य ज्याला धड उभेही करता आले नाही अशा रावणाने सीतेला, ती मोठी झाल्यानंतर, म्हणजेच तिची शक्ती लहान वयातल्यापेक्षा वाढल्यावर, तिच्या इच्छेविरुद्ध पळवून नेले हे तर्काला पटत नाही. वनवासात अनवाणी चालून पायात काटे बोचून त्रासलेल्या सीतेने आपणहून रावणाबरोबर जाण्याचे ठरवले हेच त्यावेळच्या इतर पुराव्यावरून पटते ! लक्ष्मण जवळ रक्षणाला असता त्याच्यावर भलता आळ घालून त्याला सीतेने तेव्हा दूर पाठवले, इतकेच नव्हे तर लक्ष्मणाने सीतेला घालून दिलेली लक्ष्मणरेषाही तिने जाणूनबुजून ओलांडली, या साऱ्या घटना पाहता सीतेला रावणाने पळवली नसून ती आपणहून त्याजबरोबर गेली हेच खरे असावे. आणि रामाच्याही मनात असाच काहीसा आंदेशा असल्यामुळे पुढे अयोध्येचा राजा झाल्यावर एका धोब्याने सीतेच्या अशोकवनांतील वास्तव्याबाबत घेतलेल्या शंकेचं निमित्त करून तिला ती गर्भार असताना रामाने लक्ष्मणाकरवी अरण्यात सोडून दिले. " हे सारे मुद्दे त्या रामाच्या भक्तासमोर मांडल्यावर तो वाद चांगलाच रंगला. रावणाने परशुरामाच्या धनुष्याला हात घालताच धास्तावलेल्या सीतामाईने ईश्वराच्या केलेल्या प्रार्थनेमुळे धनुष्य तेव्हा जड झाले व रावणाला ते पेलता आलं नाही, हा या कथेतील मला विरोधी असणारा भाग चर्चेला रंग चढावा म्हणून मी सोयीस्करपणे मागे ठेविला होता.

१९ तुरुंगात स्थळांची चौकशी

एकोणीसशे चाळीस–एकेचाळीसचा काळ हा वैयक्तिक सत्याग्रहाच्या लढ्याच्या होता. काँग्रेसने या सत्याग्रहाला जनता आंदोलनाचे स्वरूप दिले नव्हते. दुसऱ्या जागतिक युद्धाबाबतची काँग्रेसची ब्रिटिश विरोधी भूमिका भाषण स्वातंत्र्यापुरती मर्यादित होती. नात्सीवादाला व फॅसीझमला विरोध; पण त्याच वेळी नात्सीवादाविरुद्ध, हिटलर–मुसोलिनीविरुद्ध लढणाऱ्या ब्रिटनच्या साम्राज्यवाद्यांकडे संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी आणि हे स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय हिटलरविरोधी लढाईत भाग न घेण्याची घोषणा, असे त्या वेळचे काँग्रेसचे प्रचारतंत्राचे सूत्र होते. " आम्ही तुम्हाला हिटलरविरोधी लढाईत मदत करण्यास तयार आहोत; पण प्रथम आमच्या पायांतील गुलामगिरीची बेडी काढा " अशा स्वरूपाची आपली युद्धविरोधी भूमिका स्पष्ट करणारी संयमी भाषणे तेव्हाच्या सत्याग्रहींनी करायची होती. ही भाषणे करण्याची जागा आणि वेळ त्यांनीं आपल्या भागांतील सरकारी अधिकाऱ्यांना कळवायची होती. हा सत्याग्रह कोणी करायचा याची यादी प्रांतिक काँग्रेस कमिटीकडून महात्मा गांधींच्या संमतीकरता जायची व गांधीजींची संमती मिळाली म्हणजे मग तो कार्यकर्ता आपल्या सत्याग्रहाची सूचना स्थानिक अधिकाऱ्यांना द्यायचा. पहिला सत्याग्रही होण्याचा मान तेव्हां आचार्य विनोबा भावे यांना मिळाला. दुसरा सत्याग्रही पं. जवाहरलाल नेहरू होते. काही ठिकाणच्या सत्याग्रहींनी सत्याग्रहाची सूचना देतांच त्यांना अगावू पकडण्यात येई, तर काहींनी भाषण केल्यानंतर त्यांना अटक होत असे. या वैयक्तिक सत्याग्रहाचे अधिष्ठान नैतिक स्वरूपाचे होते. पूर्व युरोपांतील राष्ट्रांना हिटलरच्या आक्रमणापासून सोडवण्याचा प्रयत्न करणारे ब्रिटन आपल्या साम्राज्यांतील लोकांना स्वातंत्र्य देतानाही ही गोष्ट जगाच्या

वेशीवर टांगण्याचे काम या सत्याग्रहाने केले. अमेरिकेसारख्या राष्ट्राची सहानुभूती भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला मिळवून देण्याचे कार्य या सत्याग्रहाने साधले.

सत्याग्रहींची निवड करण्याच्या या योजनेमुळे वैयक्तिक सत्याग्रहात शिक्षा होऊन तुरुंगात आलेले बहुतांश सत्याग्रही काँग्रेसचे सच्चे अनुयायी होते. काँग्रेस ही मूलतः स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारती-यांनी स्थापन केलेली संघटना होती. पण म. गांधींचे नेतृत्व काँग्रेस संघटनेनें स्वीकारल्यानंतर स्वातंत्र्यप्राप्ती हे काँग्रेसचे धोरण कायम राहिले तरी काँग्रेसच्या एकंदर संघटनेवर महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमाची जी जबरदस्त छाया पडली तीमुळे काँग्रेस ही नुसती राजकारणी संस्था न राहता व्यक्तीमात्रात अंतर्बाह्य बदल घडवून आणू पाहणाऱ्या आश्रमीय संस्थेचे स्वरूप तिला बाह्यात्कारी प्राप्त होत होते. तुरुंगात येणाऱ्या प्रत्येक वैयक्तिक सत्याग्रहीच्या हातातील चरखा हे या आश्रमीय संस्थेचे एक प्रतीक होते. म. गांधींची एकंदर विचारसरणी नि राजकारणाला त्यांनी दिलेली विधायक दृष्टी ही केव्हाही बहुमोल असली तरी राजकारणाचा विचार नि आचार सत्तास्पर्धेचा खेळ म्हणूनच करणाऱ्यांनी म. गांधींच्या विधायक कार्यक्रमांचा नुसता खेळखंडोबा केला. सूतकताई नि खादीच्या कपड्यांचा वापर वरपांगी करून आपले विविध स्वार्थ साधणाऱ्या धूर्त राजकारणी लोकांचे जीवन जवळून पहायाला मिळाल्याने नैतिक नि राज-कारणी मूल्यांची गांधीजानी केलेली गल्लत भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फार मोठ्या प्रमाणावर नडली हे मान्य करावे लागते.

मी स्वतः तसा सूतकताईच्या विरुद्ध नव्हतो व नाहीही. तीस सालच्या मिठाच्या सत्याग्रही आंदोलनानंतर तुरुंगांतून सुटून आल्यावर स्वावलंबी जीवन जगून राष्ट्रकार्य करण्याचे साधन म्हणून खादीचे कापड विणण्याची कला शिकण्यासाठी मी साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमांत जाऊन राहिलो होतो व तेथेच मी सूत काढण्यास शिकलो. वैयक्तिक सत्याग्रही या नात्याने मी तुरुंगात आलो नसलो तरी पेटी चरख्यावर मला चांगले सूत कातता येत असे व मी तुरुंगात चरखाही आणला होता. रिकाम्या वेळी सूत कातण्यास मला

आनंद वाटे. नाशिकच्या कारावासात पुस्तके वाचून कंटाळा आला की मग मीही नेमाने सूत कातीत असे. तुरुंगातून बाहेर पडताना छप्पन्न गुंड्यांचे सूत, म्हणजे सुमारे चौदा वार कपडा विणता येईल इतके सूत, माझ्याबरोबर होते. पण सूतकताईला अवास्तव महत्त्व देणे मला कधीच रुचले नाही. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याचे आपण एक विनीचे स्वयंसेवक अगर नेते असून त्या दृष्टीने आपण आपली मानसिक व वैचारिक प्रगती साधली पाहिजे, ही जाणीव या चरखा-निष्ठ कार्यकर्त्यांत आढळली नाही. आमच्या बराकीतील काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी जणू सुताची गिरणी चालू केल्याप्रमाणे रोज एक किंवा जास्त गुंडी सूत काढण्याचा उपक्रम सुरू केला होता. एकंदर जागतिक राजकारणाची चर्चा तर राहूद्याच, पण खुद्द भारताचे राजकारण, काँग्रेसचे धोरण, इतर राजकीय पक्षांचे धोरण व मार्ग याबाबत काहीही चर्चा करण्यास ते तयार नसत! सदासर्वकाळ चरख्याची घरघर त्यांच्या खोलीत वा खोलीबाहेरील व्हरांड्यात सुरू असे. स्पष्ट विचारसरणीचा व संघटनाकौशल्याचा जो सार्वत्रिक अभाव काँग्रेससंघटनेत दिसून येतो त्याचे मूळ कार्यकर्त्यांचा मेंदू बधिर करणाऱ्या या सूतकताईत सापडते! म. गांधींनी चरखा चालविला तरी त्यांच्या वैचारिक व इतर कोणत्याच गोष्टीत एकांगीपणा आला नाही. पण त्यांच्या अनुयायांनी सूतकताईचा अगर इतर विधायक कामाचा स्वीकार अगदी एकांगी पद्धतीने केला. महात्माजींच्या इतर साऱ्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू चरखा होता.

सूत कातणे, कापड विणणे याप्रमाणे हरिजनोद्धार, ग्रामोद्योग, साफ-सफाई याही गोष्टी विधायक कार्यकर्त्यांनी आपल्या नित्य कर्तव्याच्या म्हणून केल्या पाहिजेत, असा त्यांचा आदेश होता पण तो पाळला जात नसे. चरखावाले हरिजनसेवेबाबत उदासीन राहात तर हरिजनसेवावाले ग्रामोद्योगाची काळजी करीत नसत. या सगळ्या विधायक कार्याची सांगड पुन्हा राजकारणाशी घातलेली असे. महात्मा गांधींच्या वेळेपासूनच एकेका विधायक कार्यात भाग घेणारे कार्यकर्ते तेवढे एकच आपले कार्य असे समजून वागत. तुरुंगात सूत कातीत बसणाऱ्यांबद्दल मला आदर न वाटता त्यांची

कीव वाटत असे, याचे कारण हेच. चरखामहात्म्य राजकारणात भलत्याच थराला त्या वेळी गेलेले होते. ठाणे जिल्ह्यातील एका जिल्हा परिषदेमध्ये श्री. शंकरराव देव हे त्या परिषदेचे अध्यक्ष असताना अध्यक्षीय स्थानावरून सतत चरखा चालवीत असलेले पाहिल्या वेळेपासून माझ्या मनात चरख्याबद्दलच्या स्थानाला धक्का बसला.

तुरुंगात चालू असणाऱ्या चर्चेत राजकारणाला प्राधान्य असले तरी इतरही विषय प्रसंगानुसार चर्चिले जात. बाहेरून येणाऱ्या पत्रांतून राजकारण अर्थातच वर्ज्य असे. पण इतर गोष्टींसंबंधी होणाऱ्या चर्चेला प्रतिबंध नसे. बाहेरून मला तशी बरीच पत्रे येत. ही पत्रे नात्याच्या माणसांपेक्षा सार्वजनिक कार्यातील ऋणानुबंधींची असत. असेच एकदा एका थोर विचारी गृहस्थांचे मला पत्र आले. या पत्रात तुरुंगातील माझ्या प्रकृतीबाबत चौकशी होती. आणि त्या चौकशीनंतर मला जरा अडचणीत टाकणारा प्रश्न त्यांनी विचारला होता.

तुरुंगात तेव्हा आलेल्या तरुणांत अनेक ध्येयवादी, कर्तृत्ववान अशा तरुणांचा भरणा बराच होता. काहींची घरची आर्थिक परिस्थितीही चांगल्यापैकी असे. अशा या विद्यासंपन्न, ध्येयवादी नि वडिलोपार्जित अर्थसंपन्न अशा मुलांकडे मुलींचे पालक स्थळ म्हणून पहात असल्यास नवल नाही. अशाच एका पालकाने मला लिहिलेल्या पत्रांत माझ्या आजूबाजूच्या समवयस्क कार्यकर्त्यांत सुविद्य व संपन्न असा कोणी असल्यास त्याची माहिती कळविण्यास सांगितले होते. ही चौकशी त्यांनी आपल्या बहिणीसाठी केली होती. ही चौकशी साधी सहज म्हणून केली होती. तुरुंगातल्या कैद्याला मजकूर लिहायचा तरी काय, अशाही हेतूने केली असेल. मी त्या वेळी नुकतेच एक अमेरिकनांच्या जीवनाविषयींचे, विशेषतः श्रीमंत अमेरिकनांचे जीवन कसे असते याविषयींचे पुस्तक वाचले होते. त्या पुस्तकात श्रीमंत वर्गातील विवाहासंबंधाने काही बुद्धीला पटण्यासारखी विधाने होती. त्यात म्हटले होते की श्रीमंत मुलांमुलींची लग्ने म्हणजे दोन जीवांचे एकमेकांशी मीलन नसते; दोन कुटुंबांचे एकमेकांशी संबंध जुळत असतात. दोन प्रतिष्ठित कुटुं-

बांनी आपल्या तोलामोलाकडे पाहून जुळविलेले हे संबंध असल्याने त्यात वैयक्तिक मनमिळवणीपेक्षा प्रतिष्ठेलाच अधिक महत्त्व असते ! तुरुंगात आलेले तरुण कार्यकर्ते हे कोणत्याही पक्षात असले तरी त्यांना ध्येयवादाची आवड असते. या ध्येयवादाची काहीच जाणीव नसलेल्या मुलीबरोबर सारे जीवन घालवण्यास ते सहसा तयार होणार नाहीत. यशस्वी सांसारिक जीवनाची व्यवहारी दृष्टी ठेवणाऱ्या मुलींच्या व त्यांच्या पालकांच्या कल्पना आणि ध्येयवाद साकार व्हावा म्हणून साधे जीवन पत्करू पाहणाऱ्या मुलांच्या कल्पना यात साधर्म्य असण्याची शक्यता फारशी नसल्याने तुरुंगाच्या आवारात असल्या विवाहेच्छूंची चौकशी न करणेच बरे, असा काहीसा सल्ला मी त्या पत्राचे उत्तर लिहिताना दिला.

१५९५५

कानाच्या आजाराने जरा जास्त उचल केली की जेलचे डॉक्टर मला इस्पितळात दाखल करून घेत. माझ्या या दुखण्यासाठी मला मुंबईस पाठवून जरूर तो इलाज करवावा, म्हणून माझ्या तुरुंगांतील मित्रांनी प्रयत्न केले. डॉक्टरांना याबाबत त्यांनी सूचनाही केल्या. हा आजार मामुली उपचारांनी बरा होणारा नाही, हे तुरुंगातील डॉक्टरांनाही पटले होते. कानावर उपचार करून घेण्यासाठी म्हणून माझी मुंबईस रवानगी होणार अशाही वार्ता ऐकू येऊ लागल्या. नाशिक तुरुंग हा लांब मुदतीच्या कैद्यांसाठी असल्याने येथे दाखल झाल्यानंतर येथून शिक्षा पुरी भोगल्यानंतर सुटका होणार होती. कानाच्या आजारावर इलाज करण्यासाठी मुंबईस नेण्यात आले तरी ते इलाज पुरे झाल्यानंतर मुदत संपेपर्यंत मला पुन्हा नाशिकरोडच्या तुरुंगांत यावे लागणार असेही कानावर आले. पुन्हा काहीतरी बदल होणार अशी मनोराज्ये उभारण्यात मन दंग झाले. काही दिवसांनंतर बदलीची ही सारी मनोराज्ये वाळूच्या किल्ल्यासारखी असल्याचे समजून आले. माझा कानाचा आजार हा तुरुंगात आल्यानंतर निर्माण झालेला नसून तो तुरुंगात येण्यापूर्वीचा असल्याने तो बरा करण्याची जबाबदारी जेलच्या अधिकाऱ्यांवर नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. कानाचे दुखणे हे माझ्याबरोबर कायमचे राहणार, तुरुंगातून बाहेर पडल्यावर ते माझ्याबरोबर बाहेर येणार, एवढाच मला यातून बोध झाला.

तुरुंगाच्या इस्पितळात जेव्हा जेव्हा मी आलो तेव्हा तेव्हा युसुफ

मराठा ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थलांक
क्रमांक ७५८३६ दिः .....

मेहेरअल्ली, सॉ. नगीनदास मास्तर, यांचा व कधी कधी कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचा सहवास मला लाभत असे. नगीनदास मास्तर हे आपल्या गोड वाणीने माझी नेहमी चौकशी करीत. त्यांना दर पंधरवड्यास घरून भेटी येत. ते स्थानबद्ध असल्याने घरचे अन्न, तसेच फळफळावळ त्यांना भरपूर येत असे. आपल्या बरोबरच्या सहकाऱ्यांना ते याचा आस्वाद न चुकता देत असत.

इस्पितळातील एका भागात गुन्हेगार कैद्यांपैकी जे आजारी असत त्यांना ठेवलेले असे. ते आमच्यात मिसळू शकत नसत. त्या 'क' वर्गाच्या कैद्यांसाठी रोज सकाळी 'कंजी'चा ड्रम येत असे. तीस सालच्या तुरुंगात या कंजीची चव मी चाखली होती. आता आम्हाला कंजीऐवजी चहा मिळत असे. पण तो कंजीचा ड्रम सकाळी आत आला की कंजीचा वास सर्वत्र पसरे आणि माझ्या स्मृती चाळवल्या जात. आमचे नगीनदासजी एका लहानशा वाटीत थोडी कंजी वॉर्डरकडून मागून आणीत. त्या कंजीत दूध आणि साखर घालून ती आपल्या जवळच्या स्टोव्हवर गरम करीत नि एक प्रकारची गोड लापशी करून पीत. स्थानबद्धांना स्टोव्ह वापरण्याची व त्यांना हवी ती वस्तू शिजवण्याची सवलत असे. या सवलतीचा फायदा सुस्थितीतील राजबंदी अर्थातच घेत असत. आम्हांला पावाबरोबर खाण्यासाठी लोणी मिळत असे. या लोण्यावर पुष्कळदा गार झालेला भात काहीजण परतून घेत. या भाताची चव काही वेगळीच लागे. हे सारे हॉस्पिटलमध्ये शक्य होई.

२० शिस्तप्रिय अधिकारी नि माणुसकी

रिकामा वेळ कसा घालवायचा हा तुरुंगात मोठा प्रश्न असतो. त्याच माणसांशी तेच तेच विषय बोलून कंटाळा आलेला असतो. वाचन एकसारखे करून करून तेही काही काळ बंद ठेवावेसे वाटते. आमच्यापैकी काहींनी हिंदी शिकण्यास सुरुवात केली होती.

हा रिकामा वेळ सार्थकी लावण्यासाठी मन नाना प्रकारच्या युक्त्या योजीत असे. स्वस्थ बसल्यानंतर, विशेषतः रात्रीच्या वेळी, मन तुरुंगाच्या साऱ्या भिंती ओलांडून बाहेरच्या जगात वावरू लागे नि परिचयाच्या साऱ्या माणसांशी हितगुज करीत बसे !

एकतर्फी चालणाऱ्या या हितगुजाच्या प्रकाराला एके दिवशी रात्री मी वेगळेच स्वरूप दिले. हातात एक कागद घेतला नि त्यावर सर्व परिचित माणसांची नावे लिहून काढली. या नावांतून अगदी वरवरच्या प्रासंगिक ओळखीची नावे बाजूस सारून ज्यांची या ना त्या कारणाने वारवार गाठभेट होत असे अशी निवडक नावे पुन्हा लिहून काढली. या नावांपुढे त्या त्या व्यक्तीकडून माझ्या काय अपेक्षा होत्या याचा आढावा घेतला. हा आढावा घेतल्यानंतर त्या व्यक्तीपैकी प्रत्येक व्यक्ती माझ्याकडून काय अपेक्षा बाळगीत असेल याचा विचार करू लागलो. या मनोव्यापारात मला गंमत वाटू लागली ! ही आपली परिचित मंडळी आपल्या अंगच्या योग्यतेपेक्षा फार मोठ्या अपेक्षा आपणाकडून करीत आहेत असे दिसून आले. राजकारणाच्या क्षेत्रात जिल्हा पातळीवर व प्रांतिक पातळीवर राजकीय नेत्यांच्या मोठेपणाबाबत त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाबाबत माझ्या ज्या अपेक्षा होत्या त्या किती फोल होत्या हे बाहेरच्या अनुभवाने मला समजून आले होते आणि तेच या मनाच्या रिकामटेकड्या उद्योगाने स्पष्ट झाले होते.

उन्हाळा, पावसाळा नि हिवाळा यांचे बाहेरच्या जगात जे अर्थ आहेत त्यापेक्षा जेलच्या वातावरणात त्यांना आणखी एक अर्थ प्राप्त होतो आणि तो म्हणजे त्याच त्याच वातावरणाला कंटाळलेल्या कैद्याला काही नवीन वातावरणाची जाणीव करून देणे. कोठल्याही तुरुंगात पावसाळा हा मोठासा सुखावह वाटत नाही. पाऊस पडू लागला की खोलीच्या बाहेर सर्व ओले ओले होते; कपडे वाळत घालण्याची पंचाईत पडते; जेवण, चहा कधीच गरम मिळत नाही. पावसाळ्यात थंड चहाबद्दल अनेकदा तक्रारी होत असत. ब्हरांड्यात बसल्या बसल्या बाहेर पडणाऱ्या पावसाकडे पहात असता, नजरेपुढे येते ते सारे तुरुंगाबाहेरील परिचित विश्व. पावसाने हवेत सर्वत्र जो कुंदपणा भरतो त्याची जाणीव तुरुंगात जास्त होते. दूरवर पडणाऱ्या त्या जलधारांकडे

तुरुंगाच्या व्हरांड्यात उभे राहून टक लावून पहात बसायला कोणाचीच आडकाठी नसते. निळ्या नभातून, काळ्या मेघांच्या चाळणीतून धरणीवर कोसळणाऱ्या अगणित जलधारांपैकी एकीवरच लक्ष केंद्रित केले तर ती अधांतरी जमिनीवर कोसळताना मधेच कुठे तरी लुप्त होते असे वाटते. जमिनीवर थुईथुई नाचणाऱ्या त्या जलधारांचा वरचा भाग न्याहळताना मोठी मौज वाटते.

पावसाळ्यामागून हिवाळा हा नाशिक तुरुंगात वेगळाच अनुभव देई. हिवाळ्यात एक गरम कुडते देत असत. पांघरण्यास जाड ब्लँकेटही असे. सकाळच्या चहाला विशेष लज्जत या थंडीच्या दिवसांत येत असे. थंडीच्या दिवसांत सकाळच्या कोवळ्या उन्हात बसण्याची मौज तुरुंगातच अनुभवण्यास मिळते. मात्र तो तुरुंग ध्येयवादी राजकीय कैद्यांनी भरलेला हवा. मग 'ब' वर्ग वा इतर सवलती असोत वा नसोत.

उन्हाळा हा नाशिकला तसा फारसा जाणवला नाही. मुंबईच्या उन्हाळ्यातील घामाच्या धारांना कंटाळलेल्यांना नाशिकचा बिनघामाचा उन्हाळा अर्थातच एक चांगला बदल वाटला. बदलत्या ऋतुमानात बाहेर ज्या घडामोडी होत त्यांचा तुरुंगाच्या भिंतींना स्पर्श होत नसे. निरनिराळे उत्सव नि आनंदाचे दिवस यांचे पडसाद आत येणाऱ्या वृत्तपत्रांतून काय उमटत तेवढेच. तरीपण तुरुंगातील बाह्य वातावरणात थोडाफार बदल घडवून आणण्यास बदलते ऋतुमान हे निश्चित उपयोगी पडते.

या ना त्या आजाराचे निमित्त साधून सायंकाळी गटागटाने इस्पितळात जाणे हा तुरुंगातील अनेकांचा आवडता छंद असे. मला कानाच्या आजारामुळे मधूनमधून इस्पितळात राहावे लागत असल्यामुळे हा छंद लावून घेण्याची फारशी गरजच पडली नाही.

इस्पितळ हे तुरुंगाच्या विविध भागात राहणाऱ्या कैद्यांच्या भेटीचे, परस्परांना माहिती देण्याघेण्याचे केंद्रच बनले होते. त्या ठिकाणी पुस्तकांची देवघेव तर उघडउघड होत असेच, पण त्याबरोबरच घरचे अन्न आणण्याची

सवलत असलेले सुस्थितींतील स्थानबद्ध 'ब' वर्गात आपल्या स्नेह्यांसाठी काही खास खाण्याच्या वस्तू आणीत. ती देवघेवही इस्पितळातच होत असे.

एकदा या इस्पितळाच्या आवारात ओल्या नारळाच्या करंज्या का असाच काही तरी गोड पदार्थ खाण्याचा मिळाला होता. या करंज्या कोणाच्या म्हणून चौकशी केल्यावर कळले की वैयक्तिक सत्याग्रह सुरू होण्याच्या अगोदरच काही राजकीय गुन्ह्याखाली शिक्षा झालेल्या पुढाऱ्यांची येरवडा जेलमधून सुटका होताच ते वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतील अशा अटकळीने त्यांना लगेच स्थानबद्ध करून नाशिकला धाडण्यात आले. त्यांच्यावरोबर त्या करंज्या आल्या होत्या.

एकाद्या रविवारी स्थानबद्धांच्या भागात काही गोडधोड पदार्थ मोठ्या प्रमाणावर करण्यात येत. रविवारी सर्वच तुरुंगातून नेहमीच्या शिस्तीतला कडकपणा पुष्कळच सौम्य होत असल्याने स्थानबद्धांच्या विभागातून आमच्या यार्डात काही तसे पदार्थ येत असत. तोचतोचपणा हा तुरुंगाचा स्थायीभाव असल्याने जेवणाचे पदार्थही ठराविक दिवशी तेच तेच असत. पालेभाज्या आणि डाळी यांच्या वेळा व दिवस ठरलेले असत. आषाढी–कार्तिकी एकादशी, शिवरात्र या सार्वत्रिक उपोषणाच्या दिवशी उपास करणारांना उपासाचे पदार्थ मिळत असत. नेहमीच्या अन्नात बदल घडवून आणणारा दिवस म्हणजे उपास, हा अर्थ तुरुंगात चांगलाच अनुभवास येतो.

नियम म्हटला की त्याला अपवाद हा असायचाच. यातून तुरुंगांतील कडक शिस्तही सुटलेली नसते. एका शिवरात्रीला शंकराच्या शांभवीचा प्रसादही तुरुंगांत आल्याचे कळले. लांब मुदतीचे गुन्हेगार कैदी हे तुरुंगाच्या परिभाषेत 'काळापोटी' म्हणून ओळखले जातात. यांचा नि त्यांच्यावर देखरेख करणाऱ्या पोलिसांचा चांगलाच संबंध जुळलेला असतो. पोलिसांच्या मध्यस्थीने किंवा त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे तुरुंगाबाहेरच्या जगातील वाटेल ती वस्तू हे काळाटोपी आत आणू शकतात.

तुरुंगाचा अधिकारी ही एक अधिकाऱ्यांची वेगळीच जात आहे. ब्रिटिश सरकारने तुरुंगखाते हे स्वतंत्र खाते केल्यानंतर यात नोकरी करणाऱ्या साध्या पोलिसापासून तो मुख्य तुरुंगाधिकाऱ्यांपर्यंत (Inspector General of Prisons) साऱ्या नोकरांचे एक स्वतंत्र तुरुंग पोलिस खातेच निर्माण केले. तुरुंगाच्या आवारांतील व्यवस्था या पोलिस खात्याकडे असते. आरोपी गुन्हेगार ठरून त्याला एकदा बाहेरच्या पोलिसांनी तुरुंगाच्या आवारांत सोडला की त्यांचे काम संपले. आतील कारभारात बाहेरच्या पोलिसाला हात घालता येत नाही. कैद्याला तुरुंगातून कोर्टात खटल्यासाठी नेण्या-आणण्यास, एका तुरुंगांतून दुसऱ्या तुरुंगांत पोहोचविण्यास बाहेरचे पोलिस येतात. जेलचे रक्षक हे खास कारागृहाच्या भिंतीच्या आत सत्ता गाजवितात आणि सत्तेचे क्षेत्र जितके संकुचित तितकी सत्ता अमर्याद, असा अनुभव तुरुंगात येतो. तुरुंगाच्या भिंतीआड गेलेल्या कोणत्याही माणसाबद्दल सर्वांना जी कणव वाटते तिचे कारण तुरुंगांत सत्ता चालविणारे माणुसकीच्या फारसे जवळपास नसतात, असा झालेला साधार समज हे आहे. सरकारी नोकरीतील माणूस नियमांच्या शाब्दिक अर्थावर बोट ठेवून चालणारा अतएव ठोकळेबाज बनतो, याचा अनुभव चार भिंतीआड महिनेच्या-महिने काळ कंठण्याची ज्यांना संधी वा दुर्भाग्य लाभले त्यांना आल्याशिवाय राहात नाही. इतर सरकारी नोकरांना आपली सारासारबुद्धी वापरण्याला जितका वाव असतो तितका तो तुरुंगखात्यात काम करणारांना नसतो. तुरुंगात माणूस नंबराने ओळखला जातो. या अधिकाऱ्यांच्या बागणुकीला जेल मॅन्युअलमधील नियमांनी बंधन घातलेले असते. राजकीय चळवळे म्हणून जे तुरुंगात आले त्यांपैकी काहीना या जेल मॅन्युअलची माहिती होती. अशांचे जेलच्या अधिकाऱ्यांबरोबर खटके उडत.

राजसत्तेच्या पोलादी चौकटीची जाणीव तुरुंगात क्षणाक्षणाला होते. खाकी, कडक इस्त्रीचे कपडे घातलेले, गंभीर चेहरेपट्टीचे, हातात उगीचच वेताची छोटी काठी खेळवीत असलेले जमादार, सुभेदार, जेलर जेव्हा लवाजम्यानिशी तुरुंगांत हिंडतात, तेव्हा त्यांच्या रूपाने साक्षात् दहशत साकार झाल्यासारखी वाटते. १९३० साली ही दहशत ज्या प्रमाणांत जाणवली त्या प्रमाणांत तिचा

आढळ १९४० साली झाला नाही. तुरुंगातली शिस्त अंमलात आणण्यात जुलमीपणा कमी झाला; पण तो अमलात आणणाऱ्यांतील निर्बुद्धपणा त्यांना सोडून गेला नव्हता. करड्या, कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या अंगी माणुसकी नसल्याची उदाहरणे पाहिली की या कायद्याच्या राज्यकारभाराची माणूस या दृष्टीने असणारी निरर्थकता प्रतीत होई. ठाण्यास १९४० साली एक जेलर असे होते. कडक शिस्तीबद्दल यांची ख्याती सर्वत्र पसरली होती. ते कचेरीत काम करीत असता अती आजारी, मरणाच्या दारी असलेल्या त्यांच्या मुलीचा आजार गंभीर झाला असल्याची बातमी आली तरी हा गृहस्थ हातांतले काम पुरे झाल्याशिवाय उठला नाही. भगवद्गीता याला तोंडपाठ असे. त्याने शंभरावर वर खुनी इसमांच्या फाशीचा दोर स्वतःच्या हाताने ओढून मांगाचे काम केले होते; व त्या कामाचा मोबदला घेतला होता. बोलायला अघळ-पघळ अशा या माणसाच्या अंतरंगाची ही बाजू कळताच "एकांगी कडक शिस्तीने माणुसकी गमाविलेला अधिकारी" असे उद्‌गार तो लांबून दिसताच निघत.

राजकीय कैदी मोठ्या संख्येने तुरुंगात येऊ लागल्यावर तीस साली अनुभवास आलेले तुरुंगातील काही नियम शिथिल झाल्याचे आढळले. तीस साली तुरुंगात आलेल्या प्रत्येक कैद्याला प्रथम देवी, कॉलरा, विषमज्वर यांची बाधा होऊ नये व तुरुंगांत हे सांसर्गिक आजार पसरू नयेत म्हणून त्यांना व्हॅक्सिन व इंजेक्शन देत. ही प्रथा चाळीस साली अनुभवास आली नाही. तसेच दर पंधरा दिवसांनी कैद्याचे वजन करण्याचा नियमही काटेकोरपणे अमलात येत नव्हता. राजकीय कैद्यांच्या बाबतींत साऱ्याच नियमांची टोके जरा बोथट झाली होती आणि याचा परिणाम इतर गुन्हेगार कैद्यावर होऊ नये म्हणूनच की काय, राजकीय कैद्यांना अलग ठेवण्यात येत होते.

२१ तुरुंगातून बाहेर

नाशिकच्या तुरुंगवासाचे एक वर्ष हा हा म्हणता संपून गेले आणि बाहेर जाण्याचे वेध लागले. तसे पाहिले तर एक वर्ष पुरे होण्याच्या आधीच मला व माझे सहकारी श्री. नाथ ताम्हणे यांना बाहेर जाण्यास मिळाले असते. आम्हांला झालेला दोनशे रुपयांचा दंड भरला असता तर तो दंड न भरल्यामुळे भोगावी लागणारी चार महिन्यांची शिक्षा टळली असती व तुरुंगातील चांगल्या वागणुकीबद्दल व नियमांप्रमाणे इतर मिळणारी अनेक दिवसांची सूट वजा जाऊन आम्ही एक वर्ष संपण्याच्या आतच सुटलो असतो. पण दंड भरावयाचा नाही असे आमचे ठरले होते. सहजासहजी दंड भरण्याइतकी माझी आर्थिक स्थिती चांगली होती असा याचा अर्थ नाही. पण माझा दंड भरण्याची तयारी 'नवाकाळ'चे मालक श्री. खाडिलकर यांनी दाखविली होती, असा मला तुरुंगात निरोप मिळाला होता. मी १९३२ पासून 'नवाकाळ'चा ठाणे जिल्ह्याचा वार्ताहर म्हणून काम करीत असल्याने तुरुंगाच्या काळातही माझे मानधन सुरुच होते व त्यातून हा दंड सहज भरला गेला असता. पण जणू प्रासाद बनलेल्या बंदीशाळेत लाभलेला सज्जनांचा सहवास आपणहून कमी करायला नि बाहेर गेल्याबरोबर खर्चा-वयास लागणाऱ्या पैशांचा भरणा आपणहून सरकारच्या तिजोरीत करायला मी अर्थातच नकार दिला.

अखेर शिक्षेचे एक वर्ष नि वरच्या चार महिन्यांची मुदत संपून बाहेर जाण्याची तारीख समजली आणि इतके महिने शांत असलेल्या मनात चल-बिचल सुरु झाली. वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीला आता ओहोटी लागली होती. काँग्रेसचा दुसऱ्या जागतिक युद्धाला असलेला तात्त्विक विरोध या लढ्यामुळे ब्रिटिशांना चांगलाच जाणवला होता. पण या लढ्याला मर्यादा

होत्या. काँग्रेसचा एक सेवक या नात्याने मला योग्य वाटलेली व माझ्या सहकाऱ्यांनी पसंत केलेली कामगिरी मी बजावली होती. त्या कामगिरीला सरकारकडून मिळालेला प्रतिसाद त्या कृतीचे महत्त्व सांगत होता.

पण सरकारने जी शिक्षा म्हणून दिली ती शिक्षाच माझ्या आयुष्यातील एक सुसंधि ठरली. आता सुटकेचा दिवस जवळ येताच तुरुंगांतील कमाईचा मी आढावा घेऊ लागलो. सुशिक्षित, कर्तृत्ववान, त्यागी अशा अनेक लहानथोर देशभक्तांचा सहवास लाभला. निरनिराळ्या विषयांवर त्यांच्याशी ज्या प्रसंगानुसार चर्चा झाल्या त्यांतून निरनिराळ्या राजकीय व सामाजिक प्रश्नांवर मार्गदर्शन झाले.

सगळ्यांत मोठा फायदा म्हणजे चांगल्या पुस्तकांचे भरपूर वाचन करायला मिळाले. नाशिकरोडच्या त्या बाराही महिने सुसह्य नि उत्साही हवेत, कसल्याही चिंतेची व अपेक्षेची मनाला ओढ नाही अशा अवस्थेत वाचन, चिंतन, मननाची संधी रामदासांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या पंचवटीच्या परिसरात साधून गेली. लहानमोठी शंभर दीडशेवर पुस्तके या काळात वाचून झाली. काही पुस्तकांची टिपणेही काढून झाली. राजकारणावरील बरीचशी पुस्तके, ज्या रशियन क्रांतीने पददलित जनतेच्या आशाआकांक्षा सुफलित केल्या होत्या त्या क्रांतीसंबंधी होती. त्यांतच कम्युनिझमच्या तत्वज्ञानात अनुस्यूत असलेल्या दोषांचे, उणीवांचे दिग्दर्शन करणारीही पुस्तके होती. काही चांगल्या कादंबऱ्या नि विशेष म्हणजे गुलाब-मोगऱ्याच्या फुलांच्या सुगंधित वातावरणात गुणगुणाविशी वाटणारी 'रविकिरण मंडळा'ची काही प्रकाशनेही हाती आली होती. एकंदरीने वर्षापेक्षा अधिक मुदतीचा हा काळ ' काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ' असाच गेला नि म्हणून तो कारणी लागला.

सुटकेची तारीख बाहेर कळताच एक अनपेक्षित असे पत्र बाहेरच्या सहकाऱ्यांकडून आले. ठाण्याच्या विद्यार्थी संघाने ठाण्यात आमचे जाहीर स्वागत व सत्कार करण्याचे ठरविले होते. या स्वागताचे नि सत्काराचे स्वरूप एक मिरवणूक व नंतर सभा असे होते. अशा प्रका-

रचा सत्कार व स्वागत स्वीकारू नये असे मला वाटत होते. तुरुंगात कोणतीही गोष्ट वैयक्तिक स्वरूपाची अशीच असूच शकत नाही. आमच्या परिचित मंडळीत याबर चर्चा सुरु झाली. मला ही सत्कार–स्वागताची कल्पना मुळीच टत नव्हती. सत्कार करून घेण्यासारखे आपण काही केले आहे असे मला वाटत नव्हते. आमच्याबरोबरच्या ज्येष्ठ राजकारणी नेत्यांचा सल्ला पडला कीं, " या सत्काराने व स्वागताने ज्या कार्यासाठी तुम्ही तुरुंगात आलात त्या कार्याला जर जोर येणार असेल, विद्यार्थ्यांत राष्ट्रीय जागृतीबाबतची आस्था वाढण्यात जर मदत होणार असेल तर जरूर या समारंभास रुकार द्यावा. हे स्वागत व्यक्तींचे नसून कार्याचे आहे. " या स्वागत–सत्कार समारंभातील एक तपशीलाचा प्रश्न मनाला बराच खटकत होता. स्वागत समारंभ संध्याकाळी ठाणा स्टेशनवरून निघणाऱ्या मिरवणुकीने होणार असल्याने ठाण्यास संध्याकाळी पोहोचणे आवश्यक होते. वास्तविक आम्ही तुरुंगातून सुटल्यावर दिवस नाशिक शहरात घालवून रात्रीच्या गाडीने निघून सकाळी ठाण्यास पोहोचलो असतो. पण या स्वागतासाठी ठाणे स्टेशनवर न उतरता पुढे दादरला जाऊन तेथे काही तास थांबून सायंकाळी ठाण्यास यायचे होते. स्वागत–सत्कारासाठी येवढा द्राविडी प्राणायाम करणे ही न पटणारी गोष्ट होती. पण अनेक न पटणाऱ्या गोष्टींना परिस्थिती संमती द्यायला लावते आणि आम्ही संमती दिली.

नाशिक शहरात गेल्यावर सुटकेच्या दिवशी जेवणाचे आमंत्रण, आमच्याबरोबर असलेले पण अगोदर सुटून गेलेले श्री. माधवराव जानोरकर यांनी दिले होते. ते अर्थातच सहर्ष स्वीकारले.

नाशिकच्या तुरुंगातील ' ब ' वर्गातले दिवस चांगल्या रीतीने गेले. पण त्यांचे स्वरूप ' तुरुंगातील दिवस ' असेच असल्याने त्या तुरुंगातून सुटका हीण्याचा दिवस जवळ येताच मनाला कसे हलके हलके वाटू लागले. माझ्या बाहेर जाण्यात घरची अशी फारशी ओढ नव्हतीच. चौदा महिन्यांपूर्वी मला अटक झाली ती जागाही आता माझी राहिली नव्हती. तुरुंगात आल्यानंतर एकदोन महिन्यांचेही जागेचे भाडे भरण्याची माझी आर्थिक पात्रता नव्हती. सुटकेचा आनंद मनाला जाणवत असतानाच सुटल्यानंतर पुढे काय

हाही प्रश्न मनात पिंगा घालू लागला. पण या पिंग्याने मन उदास मात्र झाले नाही. ज्या आप्तस्वकीयांनी व सहकाऱ्यांनी आजवर आपल्याला हात दिला ते यापुढेही देतील, ही खात्री होती. या खात्रीचा बयाणा तुरुंगात आल्यावर स्नेह्यांनी व सहकाऱ्यांनी सद्भावनायुक्त अशी पत्रे व निरोप पाठवून सादर केला होता. तसे म्हटले तर बाहेर पडल्यावर निश्चित काय करायचे ते ठरविले नव्हते. माझ्याबरोबर तुरुंगात असलेले अनेक सहकारी घराची सावली सोडून पूर्णवेळ विवक्षित राजकीय पक्षाचे काम करीत व पक्षनेते जे काही अल्पस्वल्प मानधन देत त्यावर गुजराण करीत. या काही कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करताना पक्षकार्यकर्त्यांनी एकत्र राहावे व कमीत कमी खर्च करून पक्षाचे काम करावे, असे विचार पुष्कळदा बोलले जात. पक्षाच्या प्रचाराच्या दृष्टीने चांगल्या साप्ताहिकाची तेव्हा फार गरज भासत होती. मला वृत्तपत्रांचा बऱ्याच वर्षांचा अनुभव असल्याने मी अशा कामासाठी पक्षाला सहकार्य करावे, अशाही गोष्टी चालत. पण कोणत्याही पक्षाशी एकरूप होऊन त्या पक्षातील दोषांना गुण म्हणण्याची माझी मनोवृत्ती नसल्याने बाहेर पडल्यावर माझ्या निर्वाहाचा मार्ग स्वतंत्रपणे चोखाळून, आवडता छंद म्हणूनच मी राजकारणाचे वा पक्षाचे काम करणार, या विचारावर अनेक दिवसांच्या चिंतनाने मन स्थिर झाले.

राष्ट्रकार्यासाठी तुरुंगात येण्याची व तुरुंगातून सुटण्याची ही दुसरी खेप होती. पहिल्या खेपेस विलेपार्ले येथील घोडबंदराच्या सत्याग्रही छावणीत भल्या पहाटे झालेली अटक ही जशी अनपेक्षित होती तशीच त्यावेळी विसापूराहून झालेली सुटकाही अनपेक्षित होती. अनपेक्षित सुटकेचा आनंद काही औरच असतो व तो मी त्या वेळी अनुभवला होता. पण अनपेक्षित सुटकेच्या वेगळ्याच आनंदाबरोबर काही गैरसोयीही तेव्हा वाट्यास आल्या होत्या. त्यापैकी एक गैरसोय म्हणजे ज्या कार्यकर्त्यांबरोबर कारावासात अनेक दिवस नि रात्री घालवल्या त्या सर्वांचा रीतसर निरोप न घेता बाहेर पडावे लागले होते आणि त्याहीपेक्षा एक वैयक्तिक अडचण मला तेव्हा जाणवत होती आणि ती म्हणजे तुरुंगाच्या कोठीत कित्येक दिवस अंगावरच्या कपड्यांचे बांधून ठेवलेले बोचके तसेच उलगडून

ते कपडे अंगावर घालावे लागले होते. या खेपेस मला स्वच्छ कपडे मिळणार होते.

या खेपेची अटक जरी अनपेक्षित झाली तरी सुटकेचा दिवस आधी समजल्याने तुरुंगातील स्नेहीसोबत्यांच्या गाठीभेठी, त्यांचे निरोप घेता आले. नव्याने ओळखी झालेल्या कित्येकांनी आग्रहाने आपल्या घरी बोलाविले होते. माझ्या कानाच्या विकारावर अनेकांनी अनेक प्रकारचे इलाज बाहेर गेल्यावर करून घेण्यास सांगितले होते. साथी युसुफ मेहेरअल्लींनी मुंबईच्या एक प्रख्यात डॉक्टरांना देण्यासाठी मजजवळ पत्र दिलें होते. याचप्रमाणे अनेकांचे अनेक प्रकारचे निरोप तुरुंगातून बाहेर नेणे सोपे असते. पण काही भानगडीची पत्रे घेऊन जाणे धोक्याचे असते! विशिष्ट वृत्तीची माणसेच ती बिनबोभाटपणे नेऊ शकतात. राजकीयदृष्ट्या आक्षेपार्ह मजकुराच्या, तसेच तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या सहीने लिहिण्यास दिलेल्या वह्यांव्यतिरिक्त इतर वह्या बाहेर नेणे कठीण असते.

माणसांच्या व्याख्या अनेक आहेत. त्या व्याख्यात संग्रह करतो तो माणूस, अशीही एक व्याख्या आहे. हीच व्याख्या दुसऱ्या शब्दात सांगायची झाली तर घर करतो तो माणूस, असे म्हणता येईल. एकट्या माणसाला सहारा वाळवंटात सोडले तरी तो तेथे देखील आपल्या संग्राहक वृत्तीने नक्कीच घर करू शकेल! माणसाच्या या वृत्तीला तुरुंगाची कोठडी अपवाद नाही, असा माझा अनुभव मला सांगतो.

सुटण्याच्या आदल्या संध्याकाळी माझ्या कोठडीच्या भल्या मोठ्या कुलुपाला जमादाराने नेहमीप्रमाणे चावी लावली आणि तो निघून गेला. उद्या आपल्या खोलीचे दार कोणी बाहेरून बंद करणार नाही, आपणच जरूर तर ते आतून बंद करू, हा विचार मनात आला नि मी आवराआवर करण्यास लागलो.

आत येताना बरोबर नसलेले असे पुष्कळसे सामान माझ्याबरोबर बाहेर जाणार होते. वह्या, पुस्तके, पेटीचरखा, रिकामपणी कातलेल्या सुताच्या साठएक गुंड्या आणि इतर सटरफटर वस्तू जमल्या होत्या. तुरुंगात कैद्याजवळ

पेटी, कुलूप, डबे, पिशवी अशी सामान ठेवण्याची साधने नसतात. माझ्या कल्पकतेने मी दोन पिशव्या मात्र तयार केल्या होत्या. मला डॉक्टरांच्या खास परवानगीने गंजीफ्रॉक घालण्यास परवानगी मिळाली होती. तुरुंगांत कैद्याजवळ सुई दोरा राहू शकतो. मी खादीच्या दोन गंजीफ्रॉकांची खालची बाजू शिवून टाकली आणि पिशव्या तयार केल्या. यात त्या सुताच्या गुंड्या भरल्या. बाजूलाच तुरुंगातील धोब्याने माझे घरचे कपडे धुवून इस्त्री करून आणून दिले होते. तिकडे लक्ष गेले नि विसापूरहून सुटताना अंगावर घालावे लागलेल्या न धुतलेल्या नि चुरगळलेल्या कपड्यांची आठवण झाली.

त्या रात्री किती तरी वेळ मनात विचारांनी गर्दी केली होती. त्यात भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांची सरमिसळ झाली होती. बऱ्याच उशीरा झोप आली नि तीही स्वप्नांची पखरण पसरून.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे जमादाराने खोलीचे कुलूप उघडण्याच्या आधी नेहमीपेक्षा लौकरच उठलो. मच्छरदाणी गुंडाळून घडी केली. सर्व वस्तू नीट बांधून घेतल्या. खोलीच्या साऱ्या भिंतीचा कोपरानकोपरा न्याहाळून घेतला. तेथे काही चुकून राहिले असेल म्हणून नव्हे. त्या खोलीने मला स्वास्थ्याचा नि ज्ञानार्जनाचा जो लाभ करून दिला त्याबद्दल मी जणू त्या जागेचे मनोमन आभार मानीत होतो! हीच खोली फुलांच्या हंगामात रात्री मोगऱ्याच्या वासाने दरवळून जात असे. याच खोलीत रात्रीच्या वेळी चहाचा थर्मास उघडत असे नि कधीही न मालवल्या जाणाऱ्या विजेच्या दिव्याखाली तासनतास वाचन होत असे. ही बिनभाड्याची खोली मी आज सोडणार होतो आणि तेथून बाहेर पडणारे पाऊल नक्की कोणत्या ठिकाणी स्थिर होईल याचा अंदाज नव्हता. त्या तुरुंगाच्या खोलीबद्दल वाटणारी ही जवळीक माणसाच्या अंगी वसणाऱ्या कृतज्ञतेच्या भावनेची द्योतक होती की तो एक वेड्या भावनेचा, भावनांच्या भोंगळपणाचा प्रकार होता, हे सांगणे कठीण होते! स्नेह्यांसोबत्यांचा निरोप घेऊन जमादाराबरोबर तुरुंगाच्या कचेरीत आल्यावर, प्रथम तुरुंगात दाखल होताना अंगावरच्या ज्या जन्मखुणा नोंदल्या होत्या त्या अधिकाऱ्यांनी तपासून,

पाहिल्या. जेलच्या ताब्यात असलेली अल्पस्वल्प शिल्लक रक्कम परत दिल्यावर तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी फार दिवस घरी राहिलेल्या पाहुण्यास निरोप द्यावा तसा निरोप दिला. बरोबरचे सामान–बह्यासुद्धा–त्यांनीं जवळ जवळ न तपासताच माझ्या स्वाधीन केले. उगीचच साध्या गोष्टीचा बाऊ करण्याच्या माझ्या मनोवृत्तीला अनुसरून मी या तपासणीला भीत होतो. पण ती अगदी सहजरीत्या पार पडल्यावर तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी दिलेला सुटकेचा दाखला घेऊन नाशिकच्या तुरुंगाचा–म्हणजेच कॉलेज विद्यार्थ्यांच्या वसतीगृह भासणाऱ्या त्या राजबंद्यांच्या बंदीशाळेचा–निरोप घेतला. ही बंदीशाळा लक्षणार्थाने नव्हे तर वाच्यार्थानेही प्रासाद ठरली होती !

o o o

प्रासाद आम्हा बंदीशाळा



३



२२ तुरुंगातील शिस्त संपुष्टात आली

बारा वर्षांच्या काळात ठाण्याच्या बंदीशाळेत कैदी म्हणून प्रवेश करण्याची ही माझी तिसरी खेप होती. इजा, बिजा आणि तिजा म्हणतात ते खरे ठरले होते. आता या तिसऱ्या खेपेनंतर ज्या कारणासाठी तुरुंगाकडे पावले वळली ते साध्य होवो, म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळो असा विचार या वेळी मनात येऊन गेला. बेचाळीस सालचे 'चले जाव' आंदोलन सुरु झाल्यानंतर काही दिवस भूमिगत राहून मी ऑगस्टच्या अखेरीस ठाण्याच्याच रस्त्यावर एके दिवशी सकाळी पकडला गेलो नि एकदीड तासाच्या आत तुरुंगाच्या कचेरीत पोलिसांनी आणून दाखल केले. मागील दोन्ही खेपेस

१९३० साली नि १९४० साली रीतसर कोर्टात खटला चालून, शिक्षा होऊन तुरुंगात आलो होतो. या खेपेस कोर्टकचेरीची मधली पायरी गाळून सरकारने स्थानबद्ध म्हणून तुरुंगात डांबून ठेवले.

तुरुंगाचे अधिकारी नि वातावरण परिचयाचे होते. आतील कडक शिस्त मात्र आता जवळ जवळ लुप्त झाली होती. राजकीय कैद्यांना तुरुंगाबाहेर जाता येणार नाही एवढी काळजी घेतली म्हणजे आपले काम संपले, असेच जणू तुरुंगाचे अधिकारी मानीत. स्थानबद्ध ही कैद्यांची वर्गवारी नवीनच होती नि ती फार मोठ्या प्रमाणावर अंमलात आली होती. स्थानबद्धांना तुरुंगात कोणतेच काम देत नसत. त्यांना घरचे कपडे, घरचे अन्न मागवता येत असे. आपल्या स्वतःच्या पैशातून तुरुंगाच्या पोलिसांमार्फत आपणास हव्या त्या खाण्याच्या वस्तू व इतर आवश्यक जिनसा बाजारातून आणता येत असत. आपले घरचे पैसे मागवून ते तुरुंगाच्या कचेरीत आपल्या नावावर ठेवून त्यातून अशा वस्तू आणता येत असत. अशा या नवीन स्थानबद्ध वर्गात माझी गणना होऊन ठाणे तुरुंगातील 'काळा पाणी' नावाच्या यार्डातील बराकीत रवानगी झाली.

या यार्डातील बराकीना 'काळा पाणी' नाव पडण्याला तसाच इतिहास होता. फार मागे लांब मुदतीचे कैदी अंदमान बेटातील तुरुंगात पाठवीत. साऱ्या मुंबई राज्यातील असे लांब मुदतीचे कैदी प्रथम ठाणे तुरुंगात एकत्र करीत नि मग त्यांना मुंबईस नेऊन बोटीवर चढवून अंदमानात धाडण्यात येई. अंदमान येथील तुरुंग 'काळा पाणी' या नावाने ओळखला जात असल्याने तिकडे जाण्याच्या अगोदरची कैद्यांची राहण्याची जागा म्हणून या विभागाला 'काळा पाणी' म्हणत. स्वातंत्र्यवीर सावरकर अंदमानला जाण्याच्या अगोदर याच 'काळा पाणी' यार्डात ठाण्याच्या तुरुंगात होते. १९३७ साली स्वातंत्र्यवीरांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटका झाल्यावर ते ठाण्यास आले असताना सध्याच्या पोलिसांच्या मैदानावर या किल्ल्याजवळच त्यांचे जाहीर भाषण झाले. या भाषणात त्यांनी किल्ल्याच्या (याच किल्ल्यात त्रिंबकजी डेंगळ्यांना इंग्रजांनी कैदेत ठेवले होते व तेथून तो त्यांच्या हातावर तुरी देऊन

निसटला होता. याच किल्ल्याचे रूपांतर आता ठाण्याच्या तुरुंगात झाले असले तरी ठाणेकर या जागेस किल्ला म्हणूनच ओळखतात) भिंतीकडे हात करून जे भावनोत्कट भाषण केले ते अविस्मरणीय झाले. त्या वेळेपासून या 'काळा पाणी' विभागाबद्दल एक प्रकारची मानसिक आपुलकी निर्माण झाली होती.

बाहेरच्या वातावरणातील राजकीय अस्वस्थ वातावरणाचे पडसाद बेचाळीसच्या या आंदोलनात तुरुंगाच्या कराल भिंती ओलांडून आत आले असल्याने आम्हा राजकीय कैद्यांच्या विभागात तुरुंगाच्या शिस्तीचा पूर्ण अभाव होता. पहिले काही महिने तर सर्वत्र अराजकच होते.

'करेंगे या मरेंगे' असा निर्वाणीचा आदेश देणाऱ्या महात्मा गांधींनीच या अंतीम लढ्यात कोणी कोणाचा अनुयायी नाही नि नेता नाही, असे स्पष्ट बजावल्यामुळे तुरुंगात आल्यावरही ज्याला या आदेशांचा जसा अर्थ समजला त्याप्रमाणे तो वागत असे. काहींनी तुरुंगात येताच अन्नसत्याग्रह सुरू केला. काही दिवसानंतर हे अन्नसत्याग्रह आपोआपच थांबले. काहींनी तुरुंगाचे नियम पाळायचे नाकारले. ९ ऑगस्टचे स्मरण म्हणून सामुदायिक झेंडावंदन सुरू होते. पुढे मग त्या त्या यार्डात झेंडावंदन होऊ लागले. हे राजबंदींच्या विभागात होणारे सामुदायिक झेंडावंदन पोलिसांनी वारंवार अडथळे आणून बंद पाडण्याचा प्रयत्न केला. एकदा तर मासिक झेंडावंदनाचे वेळी आम्ही सर्व एकत्र जमलो असता आम्हाला बराकीत नेऊन कोंडणे तुरुंगातल्या नेहमीच्या पोलिसांना अशक्य झाल्यावर त्यांनी बाहेरच्या पोलीसांची कुमक मागवली. जेलची धोक्याची घंटा घणघण वाजू लागली. ठाणे हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने कलेक्टरसाहेब स्वतः तेथे आले. प्रसंग मोठा आणीबाणीचा होता. सगळ्या राजबंदींच्या भोवती पोलीसांनी कडे केले होते. पण कलेक्टरांनी फार समंजसपणा दाखविला. त्यामुळे लाठीहल्ल्यासारखा गैरप्रकार न घडता राजबंदी आपापल्या बराकीत गेले. त्या दिवशीच्या झेंडावंदनाचे अगोदर सकाळीच तुरुंगाच्या आवारात एका उंच आम्रवृक्षावर काँग्रेसचा तिरंगी ध्वज डौलाने फडकत होता. या दंगलीनंतरही तुरुंगात नऊ तारखेला झेंडावंदने होत, पण त्या वेळी सगळे राजबंदी एकत्र न येता वेगवेगळ्या विभागात ती होत असत.

तुरुंगातील अस्वस्थ वातावरणात गप्पा चालत त्या सगळ्या बाहेरच्या भूमिगतांच्या हालचालीबद्दल. माथेरान-कर्जत भागात भाई कोतवालांच्या गटाने चालविलेल्या धाडशी कृत्यांच्या बातम्या तुरुंगात नव्याने येणाराकडून कळत असत. भूमिगत अवस्थेत काही काळ राहून अकस्मात पकडले गेल्याने जे आत येत त्यांच्याकडून बाहेरच्या हालचालींची बातमी समजत असे. सारा दिवस या बाहेरच्या बातम्या नि भोवतालचा गोंधळ यांनी गजबजलेला असे. रात्र पडली तरी गप्पांना ऊत असे. अंथरूणावर पडल्यावर मात्र मनात बाहेरचे विचार येत असत. मी नाशिकच्या तुरुंगातून सुटल्याला अवघे सात–आठ महिने झाले होते. हा सात–आठ महिन्यांचा काळ मी माझ्या एका काँग्रेसप्रेमी स्नेह्याकडे राहून काढला होता. नाशिक तुरुंगातून मी सुटून येण्याच्या अगोदरच माझी राहण्याची सोय ठाणे येथील माझ्या स्नेह्यांनी केली होती. माझी पूर्वीची जागा माझ्याकडे नव्हती, नि खिशात पैसेही यथातथाच. 'नवाकाळ' कडून बातमीदार म्हणून मिळणाऱ्या अल्पस्वल्प रकमेवर दुपारी एकदा जेवून रात्री अनेकदा उपवासही या सात-आठ महिन्यांच्या काळात घडले. पुढे काय हा प्रश्न उभा असताना एकीकडे काँग्रेसचे काम चालूच होते.

चाळीस सालची वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ आता ओसरली होती. काँग्रेसच्या भूमिकेवर येऊन भारतीय जनतेस स्वातंत्र्य देण्याबाबत कोणतेच निश्चित आश्वासन ब्रिटिश सरकार देत नव्हते. काँग्रेसने अखेर चळवळ करण्याचे ठरवले; पण चळवळीचे स्वरूप निश्चित होत नव्हते. या साऱ्या अनिश्चित वातावरणाचा शेवट करण्यासाठी मुंबईस गोवालिया टँक मैदानावर ७ ऑगस्ट १९४२ पासून तीन दिवस अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. काँग्रेसच्या साऱ्या अधिवेशनात अत्यंत स्फूर्तिप्रद नि क्रांतिकारी स्वरूपाचे हे अधिवेशन ठरले. काँग्रेसने या अधिवेशनात महात्मा गांधींना सर्वाधिकार देऊन लढ्याचे स्वरूप व कार्यक्रम आखण्याचे त्यांच्यावर सोपविले. ता. ८ ऑगस्टच्या सायंकाळी महात्माजींनी अखिल भारतीय काँग्रेससमोर केलेले भाषण ऐकत असताना एक प्रकारचे वेगळेच वातावरण निर्माण होत आहे असे भासले. महात्माजी निर्धारपूर्वक भाषेत बोलत होते. निर्वाणीचे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघत होते. 'करा किंवा मरा' असा जणू

शेवटचा संदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिला नि यापुढे 'ज्याचा तो पुढारी' राहील असेही सांगितले.

ता. ९ ऑगस्ट १९४२ चा दिवस उजाडला तो वेगळ्याच वातावरणात. काँग्रेसच्या साऱ्या पुढाऱ्यांना मध्यरात्री अटक करण्यात आली होती. मी ठाण्यास परत न जाण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसच्या बैठकीसाठी मुंबईच्या एका खेड्याकडे मुक्काम होता. कांही काँग्रेस समाजवादी कार्यकर्ते पुढे काय करायचे याचा विचार करण्यासाठी दादर येथे जमले. मी ठाण्यास जाऊ नये असा मला सल्ला मिळाला. दहा तारखेस मी पुण्यास गेलो. दिवसा भरधाव धावणाऱ्या लष्करी गाड्या, त्या गाड्यांतून शहरवासीयांवर बंदुका रोखून असलेले सैनिक नि रात्रीची संचारबंदी असे तेव्हा पुण्याचे दृश्य होते. मुंबईचे निरोप पुण्यास, पुण्याचे मुंबईस असा कार्यक्रम काही दिवस चालू होता. पालघरला मामलेदार कचेरीवर गेलेल्या मिरवणुकीवर गोळीबार होऊन एक स्वातंत्र्यवीर कामास आला. त्या प्रकरणी काही चौकशी करण्यास मी सातपाटीस गेलो होतो. नंतर ठाण्याजवळील कळवे गावी एका कार्यकर्त्याच्या घरात शिरून पोलिसांनी केलेल्या मारहाणीची चौकशी करण्यासाठी, त्याबाबत काही कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी म्हणून सहकाऱ्यांच्या सांगण्यावरून ठाण्यास गेलो असता अचानक अटक झाली होती.

भूमिगत अवस्थेत वावरताना पहिली भेट दादरच्या बाजारात एका तयार कपड्यांच्या दुकानाला द्यावी लागली होती. अंगावरचे खादीचे कपडे बाजूस सारून त्या दिवसापासून पकडला जाईपर्यंत वेगळे कपडे घालावे लागले होते. तुरुंगात आल्यावर बाहेरच्या मित्रांनी माझे घरचे खादीचे कपडे पाठवून दिल्यावर मध्यंतरी घातलेले गिरणीच्या कापडाचे तलम कपडे पुन्हा बाजूस पडले. एक दिवस आम्हांला बराकीचे वातावरण एकदम तंग झालेले आढळले. 'चले जाव' ठरावाला पाठिंबा देणारा ठराव ठाणे नगरपालिकेने मंजूर केला होता. या ठरावाच्या बाजूने मत देणाऱ्यांना सरकारने अलगत उचलून तुरुंगात आणून ठेविले होते. हे सर्वजण काही काँग्रेसचे अनुयायी नव्हते. देशप्रेमाचा मक्ता एका पक्षाकडे कधीच नसतो,

असेच त्यांनी सिद्ध केले होते. या सदस्यांपैकी एकावर घरच्या मंडळीचे अवास्तव वजन पडल्यामुळे तो माफी मागणार असल्याची बातमी काही लोकांना समजली. तेव्हा त्यांनी बाहेर त्या जाऊ पाहणाऱ्या माणसाच्या नावाने अक्षरशः शिमगा सुरू केला. त्याचे जिवलग समजणारे दोस्त तुरुंगात होते. त्याने माफी मागू नये म्हणून त्यांनी शिकस्त केली. पण काही उपयोग झाला नाही. आपल्या कुळातील एक माणूस तुरुंगात गेल्याने आपल्या कुळाला जणू डाग लागला, असे त्या सदस्याच्या घरच्या लोकांना वाटत होते. अनेकांनी अनेक प्रकारे त्याची समजावणी केल्यानंतरही जेव्हा त्याने ऐकले नाही तेव्हा त्याची खूप निर्भर्त्सना करण्यात आली. त्याने बाहेर जाताना आपली शिल्लक साखर एका स्नेह्याला देऊ करताच त्याने ती साखर अक्षरशः मातीत फेकून दिली. अती सज्जन, परोपकारी अशा त्या गृहस्थाने केवळ घरच्या दडपणाने राष्ट्राच्या लढ्यास कमीपणा आणावा, याचा आमच्या बराकीतील सर्वच विचारी माणसांना विषाद वाटला.

बेचाळीसच्या 'चले जाव' लढ्यात आघाडीचे स्वातंत्र्यवीर तर सगळे आलेच. यांपैकी जे बाहेर राहिले ते पोलिसपहारा चुकवून स्वातंत्र्ययज्ञात सारख्या समिधा टाकून तो धगधगीत ठेवण्यासाठी राहिले. या अखेरच्या क्रांतिसंग्रमात कोणत्याही पक्षाच्या वळचणीला उभे नसलेले पण देशप्रेमी नि स्वातंत्र्यप्रेमी असेही असंख्य लोक आत आले. काहीना स्वातंत्र्यप्रेमी लोकांना आश्रय दिल्याच्या संशयावरून आणून डांबून ठेवले होते. पण अशा अनेकांनी कसल्याही तऱ्हेची कुरकूर न करता, माफी मागण्याची भाषाही न उच्चारता देहदंड भोगला. त्यांच्या या कृतीत देशप्रेमाइतकीच त्यांना वाटणारी घराण्याची जिद्द दिसून आली. एवीतेवी सरकारने आमच्यावर देशभक्तीचा आळ घेतला आहे, तर आता आम्ही त्या पवित्र कर्तव्याला साजेल असेच वागणार असा निर्धार अनेकांनी केला होता नि तो पाळलाही गेला. एक व्यापारी गृहस्थ 'चले जाव' ला पाठिंबा देणाऱ्या नगरपालिकेच्या ठरावाला संमती दिली म्हणून तुरुंगात आले. त्यांनी आपला तुरुंगातील वेळ तर आनंदात घालवलाच, पण रोज घरून उत्तम जेवण भरपूर आणून इतरांनाही आनंदाने राहाण्यास मदत केली. राष्ट्राची इज्जत म्हणजे

काय याचा अनुभव या लब्धाने दिला. या ठाण्याच्या तुरुंगात खुद्द ठाण्यातील असे सुखवस्तू घरांतील जे स्थानबद्ध तुरुंगात होते त्यांची खाण्याच्या वस्तूंबाबतची सरबराई चांगली होत असे. आपल्या घरातील माणूस राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी तुरुंगात आहे याचे भूषण घरच्या माणसांना तेव्हां वाटत असे नि त्याचा पुरावा त्यांच्याकडून तुरुंगात येणाऱ्या अनेकविध वस्तूंच्या रूपाने मिळत असे.

नाशिकच्या तुरुंगवासात मी आपणहून तुरुंगाधिकाऱ्यांकडून फुलझाडांना पाणी घालण्यासाठी झारी मागून घेतली होती. झाडांना पाणी घालण्याचे काम पत्करल्याने वेळही चांगला गेला व गुलाब–मोगऱ्याचा भरपूर सुगंधही मिळाला. बेचाळीसचे आंदोलन तीव्र व वातावरण सदा तापलेले असल्याने त्या 'कालापाणी' विभागात काही मोगऱ्याची झुडपे असूनही त्यांना पाणी घालण्याचा विचारही मनात आला नाही. पण तेथे दुसरेच काम चालून आले नि माझा वेळ चांगला जाण्यास अनपेक्षितरीत्या मदत झाली. स्थानबद्ध कैद्यांना आपल्या पैशाने रोज दूध घेण्याची सवलत तुरुंगाधिकाऱ्यांनी दिली होती. हे दूध तुरुंगाच्या अधिकाऱ्यामार्फत न येता खाजगी रीतीने येत असे. मीही एक पावशेर दूध घेत असे. दूध घेऊन येणारा भय्या तुरुंगाच्या दाराच्या आत येऊन एका आंब्याच्या झाडाखाली ठराविक वेळी उभा राही. आमच्या विभागातील पंधरावीस लोक खाजगी दूध घेत. त्या सर्वांचे दूध मावेल एवढे भांडे जेलच्या वॉर्डरजवळ देऊन मी त्या आंब्याच्या झाडाखाली जाऊन दूध घेऊन वॉर्डरजवळ देत असे. स्थानबद्ध कैद्याला स्टोव्ह अगर शेगडी वापरण्याची परवानगी असली तरी फार थोडे राजबंदी या सवलतीचा फायदा घेत. त्यामुळे दूध तापवून मिळावे असा आम्ही आग्रह धरला. हे दूध तापवण्यासाठी जेलच्या हॉस्पिटलमधील चुलीवर न्यावे लागे. दूध तापत असताना येणारी साय दूध ढवळून त्यातच विरघळवण्याची खबरदारी मी घेत असे. या दूध वाटण्याच्या कामावर देखरेख करण्याच्या निमित्ताने मला रोज हिंडायला मिळे.

२३ स्वातंत्र्यसंग्रामात मुलांनी खाल्लेला मार

ठाण्याचा तुरुंग हा खास नव्याने बांधलेला नाही. जुना पोर्तुगीजांचा ठाण्याच्या खाडीच्या काठावर बांधलेला, तटाबाहेर खंदकाची मोकळी जागा असलेला हा किल्ला आहे. हॉस्पिटल वरच्या मजल्यावर असल्याने तेथून तुरुंगाच्या प्रवेशद्वारासमोर असलेले मारुतीचे देऊळ व पिंपळाचा पार, पलीकडचे तळे दिसत असे. मी रोज दूध तापवण्यासाठी हॉस्पिटलच्या चुलीच्या खोलीत वॉर्डरबरोबर जात असल्याने कधी कधी बाहेरच्या बाजूचे हे मोकळे दृश्य दिसत असे. तुरुंगात पिवळा टोपीवाला वॉर्डर हा शिपायाच्या खालोखाल महत्त्वाचा असतो. शाळेच्या वर्गातील मॉनिटर वर्गात शिस्त राखण्यास, जुजबी कामे करण्यास शिक्षकाला मदत करतो व शिक्षकाच्या गैरहजेरीत ताठ मानेने वागतो. तसाच प्रकार या वॉर्डरचा असतो. दीर्घ मुदतीचे हे गुन्हेगार कैदी चांगले ताकदवान आणि चलाख असतात. अनेक वेळा हे वॉर्डर तुरुंगाधिकाऱ्यांना डोईजड होऊन बसतात. रात्रीच्या वेळी कैद्यांच्या बराकीत पहारा करणारा, हॉस्पिटलधील डॉक्टरचा मदतनीस, कचेरीत लहान सहान कामे करणारा, कैदी काम करीत असता त्यांच्यावर देखरेख ठेवणारा वॉर्डर म्हणजे एक भांडणांचे, कारस्थानांचे, तुरुंगात बंदी असलेल्या पदार्थांच्या देवघेवीचे माध्यम असते. हे वॉर्डर लोक गरजू कैद्यांना विडी-सिगरेट बाहेरून आणवून पुरवतात व त्या मोबदल्यात त्यांच्याकडून भरपूर पैसे वसूल करतात. हे पैसे लपवून ठेवण्याच्या त्यांच्या अनेक क्लृप्त्या असतात. त्यांच्या पायात दोन अडीच इंची भक्कम वहाणा असतात, या वहाणाच्या टाचेतील छोट्या पोकळीत ते दहा दहा रुपयाच्या नोटा ठेवतात, असे मला एका हवालदाराने सांगितले होते. या वॉर्डरच्या मोठ्या वाटोळ्या टोपीतून काय काय चिजा जेलच्या

एका भागातून दुसऱ्या भागात जात असतील हे सांगणे कठीण होते. इकडील चिठी तिकडे पाठविणे, प्रसंगी बाहेरच्या माणसांना कोणाच्याही मार्फत पोहचती करणे यांना सहज शक्य होते. आपल्या पगडीतून ते तुरुंगाच्या आवारात विड्यांच्या बंडलांची देवाण घेवाण तर करीतच पण खाण्याच्या जिनसांचीही ने-आण करीत.

ठाण्याच्या तुरुंगात 'अ' आणि 'ब' वर्गाच्या कैद्यांची सोय नाही म्हणून १९४० साली मला 'ब' वर्ग असल्याने नाशिक तुरुंगात धाडण्यात आले. स्थानबद्धांच्याही बाबतीत सरकारने सर्वसाधारण स्थानबद्धांपेक्षा एक वरचा 'अ' वर्ग केला होता. आमच्या यार्डातील अनेकांची खटपट या 'अ' वर्गात जाण्याची चालली होती, काहींना तर ते भरीत असलेल्या इन्कमटॅक्सच्या रकमेच्या आधारावर 'अ' वर्ग मिळाला तर काहींनी बाहेर आपल्या लेख्यांसोबत्याकडून कलेक्टर कचेरीत खटपट करून वरच्या वर्गात प्रवेश केला. कार्यकर्ता देशाच्या कामासाठी तुरुंगात गेल्यावर तो ज्या प्रमाणात कष्ट भोगतो, हाल सहन करतो त्या प्रमाणात बाहेर जागृती होते, आणि यालाच आत्मक्लेशाने होणारी जनजागृती मानली जाई. पण हे सारे त्यागाचे तत्त्वज्ञान भोगवाद्यांच्या बाबतीत थिटे पडले व ते येनकेन प्रकारेण 'अ' वर्गात जाऊन बसले. अर्थात् सर्व स्थानबद्धांनी असे प्रयत्न मुळीच केले नाहीत. अनेक स्वाभिमानी श्रीमंत व वरच्या श्रेणीचे पुढारी स्थानबद्धांच्या साधारण वर्गातच राहिले होते. बेचाळीसच्या आंदोलनात अगदी वरच्या श्रेणीचे पुढारी सोडले तर प्रांतिक व जिल्हा पातळीवरचे पुढारी गांधींच्या आदेशाप्रमाणे 'करा किंवा मरा' याचे कसलेच पालन न करता बिछाना बांधून तुरुंगात जाण्याची जणू वाटच पहात होते. अशा पुढाऱ्यांपैकी आलेल्या काहींचे 'अ' वर्गात जाण्याचे प्रयत्न सुरू व्हावे हे स्वाभाविकच होते. बऱ्याच दिवसांच्या चर्चेनंतर 'अ' वर्गात जाणाऱ्यांची यादी आली. आमच्यातले काहीजण नाशिकच्या तुरुंगात गेले. आणि बरेच दिवस चाललेली खळबळ शांत झाली.

या बेचाळीसच्या आंदोलनाचा प्रकार गंगा नदीला आकस्मात पूर यावा व सर्वत्र पाणीच पाणी व्हावे, तसा असल्याने विविध प्रवृत्तीचे लोक आंत आले

होते. उत्साहाच्या भरात स्वातंत्र्याच्या या अखेरच्या लढ्यात भावनाप्रधान तरुण मुले आणि मुली आपणहून सतीचे वाण घेऊन आल्या होत्या. आपणास कोणत्या प्रकारचे काम करावे लागणार आहे याची काहीच कल्पना नसताना क्रांतिकारकांच्या मेळाव्यात दाखल झालेल्या तरुणांनी त्यांना जी जी कामे सांगण्यात आली ती तपशिलाची चौकशी न करता पार पाडली. असाच एक धनिक मारवाडी युवक आत आला होता. काही सामानाची, निरोपांची भूमिगताकडे ने-आण केल्यामुळे तो पकडला गेला. फौजदाराने त्याला फडाफड चपराका लगावल्या. त्या वीराने त्या धैर्याने सहन केल्या होत्या...त्याची आठवण सांगताना त्याने उद्‌गार काढले होते की, " आईने कधी माझ्या गालावर चार बोटे उठविली नाहीत; पण त्या फौजदाराने मात्र सपासप मारले ! " असे एक ना दोन असंख्य युवक मातृभूमीच्या दास्यशृंखला तोडण्यासाठी तेव्हा मार खात होते.

ठाण्याचा तुरुंग, त्यांतल्या त्यात आमचा काळापाणी यार्ड मला घरच्यासारखाच वाटत होता. सनवयस्क राजकीय कार्यकर्ते अवती भवती होते. तुरुंगात काय, बाहेर काय, चहाच्या ठिकाणाकडे माझे पाय आपोआप वळत. स्थानबद्धांच्या आमच्या भागात घाटकोपरला हिंदुमहासभेच्या भवनांत राहणारे कार्यकर्ते आले होते. ते अती मेहनती होते. पहाटेपासून त्यांची शेगडी निखाऱ्यांनी फुललेली असे. चहाप्रेमी लोकांची भल्या पहाटेस त्या शेगडीभोवती बैठक असायची. त्यांच्या शेगडीवर काही लोकांची भाजीही शिजत असे. स्थानबद्धांना काम मुळीच नसल्याने काही जणांनी सैंपाक सुरू केला होता. काहींचे घरून डबे येत. तुरुंगातच दाट परिचय झालेल्या एका पारशी स्नेह्याला त्याच्या घरून डबा येत असे. त्या डब्यातील भाज्या व इतर काही चांगले पदार्थ मला मिळत असत. तीस किंवा चाळीस सालच्या तुरुंगातील पद्धतीप्रमाणे सर्व कैद्यांची रांग एकदम जेवायला बसत नसे. अपापल्या मित्रमंडळींचा स्वतंत्र गट करून हे कार्यकर्ते गप्पा गोष्टी करीत जेवत. विशेष सणाचे प्रसंगी सर्वांची जेवणे एकाच वेळी होत. ' करा किंवा मरा ' सारखा गंभीर लढा पण तुरुंगात आल्यावर सारे स्वातंत्र्यसैनिक नेहमीच काही गंभीर वातावरणात नसत. हास्य, विनोद, चमचमीत जेवण हेही चालत असे. असेच एकदा बाहेरून परस्पर श्रीखंड-

पुरी आणून मोठे जेवण झाले. ही श्रीखंड–पुरी मुंबईच्या लॅमिंग्टन रोड-वरील चापेकर दुग्ध मंदिरातून रीतसर आली होती. त्याच दुग्ध मंदिराच्या चालकांच्या आमच्याबरोबर तुरुंगात असलेल्या एका स्वातंत्र्य सैनिकाने ही सोय केली होती. रविवारी मांसाहारी लोक आपला तिखटाचा दिवस साजरा करीत.

जहाल मवाळ हा भेद बाहेरच्या राजकारणात जितक्या तीव्रतेने भासतो त्यापेक्षा तुरुंगाच्या आवारात त्याचे स्वरूप जास्त उग्र होते. एकदा बाहेर काय राजकारण करायचे ते केले, तुरुंगात त्यामुळेच आलो, आता पुन्हा त्याच असंतोषाच्या कृती तुरुंगाच्या बंदिस्त वातावरणात करून आपणच आपला मनस्ताप नि प्रसंगी शरीरताप कशाला वाढवून घ्या, असे म्हणणारी मंडळी असत. त्याचप्रमाणे सरकारला जसे बाहेर तसेच आतही सतावीत राहिले पाहिजे, नव्हे, तसे करीत राहण्याचा आदेश खुद्द गांधीजींनी दिला आहे, असे आग्रहाने प्रतिपादन करून तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना सतावणारेहि स्वातंत्र्य सैनिक होते. कधी कधी उत्साहाच्या भरात ते अशा काही गोष्टी करीत की, त्याचा परिणाम तुरुंगाधिकाऱ्यांना सतावण्यात होई तितकाच तो तुरुंगात आलेल्यांनाही त्रास देणारा ठरे. अनेक वेळा संध्याकाळ होऊन सगळीकडे विजेचे दिवे लागल्यावर कोणीतरी आमच्यातलाच विद्युत्तज्ञ असा काही उद्योग करी की, त्यामुळे आमच्या भागातील बीज बंद पडून अंधार होई. मग जेलच्या अधिकाऱ्यांची धावपळ होऊन बाहेरून सरकारी इले-क्ट्रिक खात्याच्या इन्स्पेक्टरला बोलावण्यात येई. हा बाहेरून येणारा माणूस आम-च्या पैकी अनेकांच्या ओळखीचा असल्याने त्याच्याबरोबर बाहेरच्या माण-सांना अर्थातच निरोपही जात. पण हा तंत्रज्ञ घरून निघून तुरुंगाच्या आवारात येऊन विजेच्या तारातील बिघाड दुरुस्त करीपर्यंत सहज दीड दोन तास जात. हा सारा वेळ अंधारात जाई. अशाच एका अंधाराचे प्रसंगी मी सूत कातण्यासाठी आणलेल्या कापसाची वात केली, डोक्याला लावण्यासाठी आणलेल्या तेलात ती भिजवली आणि डब्याच्या झाकणात ठेवून खोलीत उजेड केला. इतर काहीजणांनी माझ्या या कृतीचे अनुकरण केले. अडचण माणसाला आपल्याजवळच्या पदार्थांचा उपयोग करायला शिकवते, हा अनु-भव तुरुंगात काय नि बाहेर काय, पदोपदी येतो.

बेचाळीसच्या या तुरुंगवासाच्या काळात नवयुवकांची बरीच ओळख झाली. चाळीस सालच्या माझ्या तुरुंगवासाला कारण एका मुलींच्या सरकारी हायस्कुलात युद्धमदतीसाठी होणारा नाट्यप्रयोग हे झाले होते. त्या तुरुंगवासातून सुटल्यावर विद्यार्थ्यांनी सत्कारही केला होता. त्यामुळे माझा विद्यार्थ्यांशी थोडाफार संबंध आलेला होताच. तुरुंगात ध्येयवादी भावनाप्रधान युवक आले असल्याने स्वातंत्र्यसंपादनाच्या मार्गातील अडचणी, काँग्रेसचे नेतृत्व, समाजवादाचे भवितव्य, कम्युनिस्ट पक्षाचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबाबतचा दृष्टिकोन अशा विषयांवर चर्चा होत. काही विद्यार्थी तर इंग्रजी सहावी सातवीचे होते. जरा परिचय वाढल्यावर त्यातील एकाने मला विचारले, " तुमचा पोशाख अगदी साधा कसा ? माझी कल्पना होती की, तुम्ही विजार घालणारे मोठे पुढारी असाल." बेचाळिसच्या आंदोलनात आसपासचे तारांचे मोठे खांब पाडण्याच्या उद्योगात पकडले गेलेले सात-आठजण एकदम आत आले होते. त्यांच्यापैकी हा तरुण विद्यार्थी होता. ह्या तरुणांनी एक हस्तलिखित मासिक काढण्याचे ठरवले नि माझ्याकडे संदेशाची मागणी केली. ते दिवस दिवाळीचे होते. संदेश देण्याइतका मी मोठा नसतानासुद्धा त्या मुलांच्या आग्रहावरून मी सहज लिहून दिले— " प्राप्त कर्तव्य आनंदाने करणाराला रोजचीच दिवाळी ! "

२५ स्वातंत्र्य सैनिकाचे बलिदान

तुरुंगातील कैदी—मग तो स्थानबद्ध असो वा शिक्षा झालेला असो, तो एक प्रकारे सरकारी पाहुणाच असतो. त्याला अन्न, वस्त्र, निवारा एवढेच काय, पण त्याचे औषधपाणीही सरकारला करावे लागते. तुरुंगात ज्या गोष्टी सरकारी खर्चाने होत असतात त्यात दाढी करून घेणे व केस कापणे हेही बिनपैशाने होत असते. जे कोणी

गुन्हेगार कैदी या व्यवसायातील असतात त्यांना सक्तमजुरी म्हणून हेच काम तुरुंगात देतात. रोज ठराविक वेळी आपली जुजबी हत्यारे घेऊन केश कर्तनकार आमच्या बराकीत यायचे. सुशिक्षित पांढरपेशा वर्गातील बहुतेक स्थानबद्ध चेहरासफाईची कारागिरी आपल्याबरोबरच्या साहित्याने आपल्या हाताने करीत. त्यासाठी वेळही भरपूर असे. पण डोक्यावरील केस कापण्यासाठी मात्र महिन्या दोन महिन्यातून एकदा या केशकर्तनकारापुढे बसावे लागे. १९३० साली डोक्यावर केस ठेवण्यास परवानगी मिळत नसल्याने दर सात दिवसांना डोक्याचा चमन गोटाच करून घ्यावा लागे. तेव्हा साऱ्या डोक्याची नुसती आग व्हायची. पुढे चाळीस व बेचाळीस साली केस कापून घेण्याची सक्ती होत नसे तरी स्वच्छतेसाठी व नीटनेटकेपणासाठी स्थानबद्ध आपण होऊन केस कापून घेत. हे केस कापणारे तीनचार जण एकदम यार्डात येत. ते सर्वच आपल्या कामात वाकबगार असत असे नाही. अशाच एका कारागिरापुढे मी माझ्या डोक्यावरचा भार उतरवून घेण्यासाठी बसलो. त्याने केस कापण्याचे यंत्र भराभर फिरवण्यास सुरवात केली. ते मशीन अजब होते. त्याने काही केस कापले जात, तर काही उपटले जात. मी त्याला 'थांब थांब' म्हणून सांगत असता त्याने क्रिकेटच्या पीचवरील हिरवळ कापणारे यंत्रच आपण चालवीत आहो अशा थाटात आपले काम पुरें केले. माझा चेहरा नव्हे डोके पाहण्यालायक झाले. कमी जास्त प्रमाणात कापले गेलेले ते केस पाहून मी कपाळाला हात लावला. माझ्याजवळ त्या वेळी मिळणारे जय ब्रिलियंटाईन होते. माझ्या डोक्याची ती अवस्था पाहून एका परिचिताने "आता तुमच्या डोक्यावरचे केस वाढणारच नाहीत." असे धूर्तपणाचे भाष्य करून ती सुवासिक ब्रिलियंटाईनची डबी मागून घेतली ! अकुशल कारागिराशी गाठ पडल्याची जणू ती किंमतच होती. कधी न मागणाऱ्याने मागितली म्हणून मी ती दिलीही.

तुरुंगात कंटाळा येत असतो तो त्याच त्याच माणसांचा व एकाच जागेत फार काळ राहण्याचा. संबंध तुरुंगाचे आवार तसे विस्तृत होते. दररोज त्या आवारात हिंडायला मिळाले तर कंटाळ्याचा ताण कमी झाला असता. रोज दुपारी यार्डातल्या यार्डात हिंडून, बसून वेळ जात नसे. अशा वेळी आपल्या यार्डाच्या बाहेर जाण्यास मिळाले असते तर

फार बरे वाटले असते. पण मग त्या जागेला तुरुंग म्हणता आले नसते. यार्डाच्या बाहेर जायला मिळे ते तुरुंगाच्या अधिकाऱ्याच्या परवानगीने शिपाई अगर वॉर्डर बरोबर घेऊन.

तुरुंगात शिस्तपालनावर जोर असल्याने सर्वत्र शिपाई आणि वॉर्डर यांचा बंदोबस्त असल्याने उगाचच इकडून तिकडे जाणे मनात आले तरी शक्य नसे. शिस्तीत जी ढिलाई होती ती वार्डाच्या आवारात स्थानबद्धांच्या वागणुकीबाबत. पण एकदा बाहेरून माझे एक सहकारी मित्र पकडले जाऊन आत आले. बेडर वृत्ती नि परिणामाची तमा न बाळगण्याचा स्वभाव यामुळे भूमिगत असताना जवळ छोटी शस्त्रेही हा स्नेही वापरी. भूमिगत अवस्थेत त्याने मला एकदा जूहूच्या किनाऱ्यावर ओहोटीच्या वेळी उघड्या पडणाऱ्या खडकावर भेटीस बोलावले होते. मी त्याला तेथे म्हटले, "तुला कोणी इथे पकडील असे नाही वाटत ?" त्याने लगेच जाकिटातून रामपुरी चाकू बाहेर काढून "हा जवळ असता कोण माझ्याजवळ येईल ?" असे उलट मलाच विचारले !

हा मित्र आत आल्यावर एके दिवशी दुपारच्या वेळी त्याने मला तुरुंगाच्या विभागातून हिंडवून आणले. तुरुंगातील दादा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुन्हेगार कैद्यांचे मधून मधून सलाम घेत तो चाललेला पाहून शस्त्रधारी बेडर भूमिगतांची जात वेगळीच असल्याच्या माझ्या अनुभवाला पुष्टी मिळाली. जेलच्या तटापलीकडील ठाण्याची खाडी व त्या पलीकडील सारे दृश्य नयनमनोहर वाटत होते. त्या वेळी येरवडा व इतर काही तुरुंगातून स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या तुरुंगाचे तट ओलांडून बाहेरच्या स्वतंत्र वातावरणात प्रवेश केला होता. माझा हा साथी त्याच जातीचा असल्याने त्याने तटाची पहाणी त्याच दृष्टीने केली असावी.

स्वातंत्र्यसैनिक म्हणून तुरुंगात आलेले सगळेच लोक एका श्रेणीचे नसत. भावनाप्रधान अननुभवी विद्यार्थ्यांपासून तो वयोवृद्ध पुढाऱ्यांपर्यंत अनेक थराचे कार्यकर्ते होते. पण हे सारे स्वातंत्र्यभक्त होते. महात्मा गांधींच्या 'करा किंवा मरा' या आदेशाने प्रभावित झालेले होते. त्यांची देशप्रेमाची वृत्ती बाहेर अनेक प्रकारे दिसून आली होती. अशा साऱ्यांची

तुरुंगात गाठ पडल्यावर त्यांच्यात ऐक्यभाव निर्माण व्हावा हे स्वाभाविक होते. पण बाहेरच्या चळवळीत जे कधीच कोणत्याही राजकीय आंदोलनात पुढे आले नाहीत, इतकेच नव्हे तर ज्यांची वर्तणूक संशयास्पद असे, जे पोलिस नि सरकारी अधिकाऱ्यांसमवेत विशेष आढळत असे लोकही देशाभिमानी बनून तुरुंगात आले, याचे आश्चर्य कार्यकर्त्यांस वाटत होते. अशांच्या वागणुकीवर तुरुंगात कार्यकर्ते बारीक नजर ठेवीत. त्यांचा उल्लेख 'खबरी' पोलिसचे हेर असा व्हायचा. बाहेरच्या चळवळीबाबत ज्या काही चर्चा आत होत असत त्यावरून बाहेरच्या भूमिगतांच्या कार्यक्रमाचा पत्ता लागावा, या उद्देशाने सरकारने त्यास मुद्दाम पकडून आमच्या मेळाव्यात आणून सोडले असावे. अशा माणसांचा एकदा संशय आला की त्याला संपूर्ण वाळीत टाकण्यात येई. एवढ्यानेच भागत नसे, तर कित्येकदा त्या माणसाच्या अनेक भानगडींचा उल्लेख त्याच्या आसपास बोलत राहून करण्यात येई. उघड उघड त्याला तू काय राष्ट्रकार्य केलंस? म्हणून विचारून हैराण करीत. या माणसाचा तुम्ही संशय घेता पण अशा संशयाने निरपराधी माणसाला अन्याय होण्याची शक्यता असते असं कोणी म्हणू लागला तर त्याला उत्तर मिळे की, "या माणसाचे बाहेरचे जीवन आम्हाला माहीत आहे. आणि त्याही उप्पर याच्यावर अन्याय झाला तरी चालेल, पण लढ्याचे नुकसान होण्याची शक्यता आम्हाला सहन होणार नाही." अशा प्रकारे सरकारचा हेर असल्याचे आरोप तुरुंगात ज्याच्यावर येत त्याचे रक्षण करण्याचे सामर्थ्य कोणातही नसे. सर्वांपासून दूर राहण्याची त्याच्यावर पाळी येई.

स्थानबद्ध कैद्यांना भारत संरक्षण कायद्यान्वये अटक करण्यात आल्याने दुसरे जागतिक युद्ध संपेपर्यंत अगर काँग्रेसचे युद्धाबाबतचे असहकाराचे धोरण बदलेपर्यंत त्यांची सुटका होणे शक्य नव्हते. केवळ संशयावरून किंवा भूमिगतांना मदत केल्याच्या आरोपावरून, युद्धाबाबत अफवा पसरविल्याच्या पुराव्यावरून काहींना स्थानबद्ध केले होते. अशांच्या मनाची स्थिती मोठी चमत्कारिक होत असे. आपणास कधी सोडणार याचा त्यास अंदाजच करता येत नसे. ज्याचे बाहेर काही उद्योगधंदे असत त्यांची स्थिति अधिकच अनुकंपनीय होई.

तुरुंगात किती काल रहावे लागणार याचा काहीच अंदाज नसल्याने प्रथमच तुरुंगात आलेल्या स्थानबद्धांपैकी कांही अस्वस्थ झाले होते. बाहेर बायको मुले यांचा परिवार, देशभक्तीचा टिळा कपाळावर नाही, प्राप्ती बेताची नि बाहेर कधी जायला मिळणार याबाबत अनिश्चितता, यामुळे काहीही करून सुटका करून घेण्याचे विचार त्यांच्या मनात येत. असेच लोक माफी मागून बाहेर जाण्याचा मागील दरवाजाचा मार्ग पसंत करीत. सरकारने सरसकट धरपकड केल्याने भलेबुरे सारेच आत आले होते ते या अनिश्चिततेला घाबरून माफी मागायला तयार झाले. सरकारलाही अशा अर्धवटांच्या माफीचा उपयोग राजकीय कारणासाठी करता येत असे. अमुक अमुक लोकांनी माफी मागितली, त्यांनी चळवळ सोडली, असे सरकार जाहीर करी. लहान मुलांच्या बाबतीत पालकांवर दडपण आणण्याचे प्रयत्न झाले, पण ते सारे फुकट गेले. पोलिसांचे खबरी म्हणून जे आत असत ते अशा अर्ध्याकच्च्या लोकांची माहिती सरकारला देत असावेत अशीही त्यांच्याबाबत शंका घेतली जाई.

स्वातंत्र्याच्या प्रत्येक लढ्यात अनेकांनी निष्ठेने भाग घेतला होता, पण पैशाने गरीब असलेल्या अनेकांना या लढ्यात फारच त्रास सहन करावा लागला. हा त्रास पोलिसांच्या जाचाचा किंवा शिक्षेच्या कडकपणाचा नसून त्यांच्या घरच्या गरिबीमुळे होणाऱ्या मनस्तापाचा होता. ठाण्याच्या तुरुंगातील त्या वेळचे एक उदाहरण आहे. मोखाड्याहून काँग्रेसचा एक निष्ठावंत कार्यकर्ता स्थानबद्ध म्हणून आमच्यात आला होता. मोखाड्यासारख्या अति मागास भागात निष्ठेने काम करून त्याने तेथे राजकीय जागृती केली होती; पण उदरनिर्वाहाचे साधन फारच अपुरे. धंदा शिंपी कामाचा. सतत वर्षानुवर्षे सकस अन्न न मिळता शिंपी काम करणारांना होणारा आजार, क्षय रोग, त्याला झाला होता.घरची गरिबी.पण ते अठराविश्व दारिद्र्य त्याच्या देशभक्तीला बांध घालू शकले नाही.दारिद्री संसारात राहूनही त्याने त्या आदिवासी मुलुखातल्या गावात स्वातंत्र्याच्या लढ्याचा झेंडा उंच ठेवण्याचा अविरत प्रयत्न केला होता नि परिणामी स्थानबद्ध होऊन त्याला तुरुंगात यावे लागले होते. त्याचा आजार वाढत होता. शेवटी त्याला सरकारी हॉस्पिटलमध्ये हालविण्यात आले व तेथेच त्याचा अंत

झाला. भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत अशा प्रकारच्या निष्ठेच्या, त्यागाच्या असंख्य तरुणांनी असीम कष्ट उपसून बलिदान केले आहे. काहींना स्वातंत्र्याचा लढा हा आपला मोठेपणा वाढविण्याची संधी वाटली तर काहींना ते आत्मबलिदानाचे यज्ञकुंड वाटले. या यज्ञकुंडात प्राणाहुती दिलेल्यांनी स्वातंत्र्य लढ्याचे अंतिम यश निश्चित करून ठेविले होते.

२५ अशोभनीय वागणूक

बेचाळीसचे आंदोलन का घडले असा प्रश्न आम्हा कार्यकर्त्यांत वारंवार चर्चिला जात असे. ते आंदोलन केले असे मानल्यास त्याचा कर्ता कोण असा प्रश्न उपस्थित होई. काँग्रेस कार्यकर्ते अर्थातच महात्मा गांधी व काँग्रेस ही नावे घेत. तांत्रिकदृष्ट्या ते बरोबर असले तरी तत्त्वतः नि व्यवहारात त्यांचे म्हणणे पटत नसे; आणि म्हणूनच वादाला सुरुवात होई. हे आंदोलन चालविण्याचे अधिकार काँग्रेसने म. गांधीना दिले व त्यांनी पकडले जाण्यापूर्वीच्या आपल्या भाषणात 'करा किंवा मरा' असा आदेश दिला होता. सरकारच्या युद्धप्रयत्नांना मदत करू नका नि देशाचा कारभार चालविण्याच्या कामी सरकारशी असहकार करा, असा तपशीलही त्या आदेशात होता. पण हे सारे मार्गदर्शन स्थूल स्वरूपाचे होते. देशात राजकीय क्रांती घडवून आणण्यासाठी बद्धपरिकर झालेल्या काँग्रेसने जनतेसमोर ब्रिटिशांची राजसत्ता हिसकावून घेण्याच्या दृष्टीने प्रभावी असा कोणताच कार्यक्रम ठेवला नव्हता आणि म्हणूनच 'करा किंवा मरा' या संदिग्ध आदेशातून ज्याला जसा हवा तसा प्रत्येकाने अर्थ काढला. वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ थंड पडत चालल्यानंतर काँग्रेसला सरकाराविरुद्ध काहीतरी प्रभावी कृती करावी लागणार हे

हे स्पष्ट होते. ही प्रभावी कृती करणारांना अहिंसेचे पथ्य पाळूनही स[illegible] पाणी सोडून सरकारशी सामना द्यावा लागणार, अशी स्पष्ट कल्पना मुंबईच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीपूर्वी फारच थोड्या लोकांना आली होती. ही जाणीव असलेल्यांत काँग्रेस संघटनेतच वावरत असलेल्या काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे असंख्य कार्यकर्ते होते. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई बैठकीपूर्वी जुलै महिन्याच्या अखेरीस पुण्यास फर्ग्युसन कॉलेज रोडवरील एका वसतिगृहात महाराष्ट्र व मुंबईच्या काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या या कार्यकर्त्यांची बैठक भरून आगामी लढ्यात सोशलिस्ट कार्यकर्त्यांनी पकडून न घेता तुरुंगाबाहेर भूमिगत राहायचे, स्वातंत्र्याची चळवळ चालवायची, असा निर्णय घेतला होता. पुष्कळसे प्रथम व द्वितीय श्रेणीचे काँ. सोशलिस्ट कार्यकर्ते महिनेन् महिने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन भूमिगत राहिले याचे कारण त्यांनी अगोदरपासून त्या बाबतीत केलेली तयारी हेच होते.

म. गांधी, वर्किंग कमिटीचे सारे सदस्य, हजार दीड हजार प्रथम–द्वितीय श्रेणीचे काँग्रेस कार्यकर्ते यांना सरकारने त्यांनी काही कृती करण्याचे अगोदर पकडले व अटकेत ठेवले त्यामुळे त्याच्या कर्तृत्वाची झाकली मूठ सव्वा लाखाची झाली होती. ब्रिटिश सत्तेचा कारभार बंद पाडण्याच्या दृष्टीने आपल्या सर्वशक्तीनिशी प्रयत्न करणारे क्रांतिकारक घातपाताची कृत्ये करण्याच्या प्रयत्नात पकडले गेले नि स्थानबद्ध म्हणून आत आले की, त्यांच्या आधी तुरुंगात येऊन बसलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांबरोबर त्यांचे खटके उडत. "तुम्ही काही न करता तुरुंगात येऊन गांधीजींच्या 'करा किंवा मरा' या आदेशाला हरताळ फासलात" असे ते त्यांना म्हणत. काँग्रेस कार्यकर्तेही कमी पडत नसत. ते म्हणत, "आमच्यावर तुम्ही निष्क्रियतेचा आरोप करता तो खरा नाही. भारतातील सहस्रावधी श्रेष्ठ दर्जाच्या काँग्रेस नेत्यांची धरपकड झाल्याने साऱ्या जगाला समजून चुकले आहे की, ज्या लोकशाहीच्या रक्षणासाठी हिटलर–मुसोलिनीबरोबर युद्ध पुकारल्याचा इंग्लंडचा दावा आहे, त्याच लोकशाही राजवटीची मागणी करणाऱ्या हिंदुस्थानातील लोकांना इंग्लंडने तुरुंगात डांबले आहे, हा इंग्लंडचा मोठा नैतिक पराभव आहे.!"

पण या काँग्रेसनिष्ठांचे खरे दुखणे वेगळेच होते. 'करा किंवा मरा' यात काय करा आणि कसे करा, याचा स्पष्ट अर्थ त्यांना त्यांच्या नेत्यांनी कधीच सांगितला नव्हता. मरायचे ते कशासाठी आणि काय करून हे त्यांना उमगायच्या आतच ते तुरुंगात आले होते. बाहेर राहिलेल्यानी आपल्या समजुतीप्रमाणे ब्रिटिश सत्ताधीशांना बोचकारे काढण्याचे, त्यांना सुखाने झोपू न देण्याचे काम चालविले होते आणि ते जनतेकडून शाबासकी मिळवीत होते.

आमच्या या यार्डात सगळेच काही काँग्रेसच्या 'चले जाव' आंदोलनातून आले नव्हते. 'भारत संरक्षण कायदा' हा युद्धप्रयत्नांना विरोध करणाऱ्या सर्वांविरुद्ध असल्याने ब्रिटिशांनी स्थानबद्ध केलेले दोन अरब आमच्यात होते. त्यांपैकी एकजण व्यापारी होता. दुसरा आति चळवळ्या, सर्व जेलभर हिंडणारा, वॉर्डर व शिपाई यांशी दोस्ती करणारा, कचेरीतील वार्ता आणणारा असा होता. त्याला हिंदी भाषा बोलता येई. काबूल-कंदाहारकडून सुका मेवा विशेषतः खजूर मोठ्या प्रमाणात आणून तो इकडे विकण्याची योजना त्याच्याशी बोलताना अनेकांनी आखली होती. त्यांच्याकडील अनेक गोष्टींची माहिती करून देताना तिकडच्या तुरुंगांतील सैपाकाबद्दल त्याने उपयुक्त माहिती दिली. अरब तुरुंगात दहा दहा बारा बारा माणसांचा गट करून त्या प्रत्येक गटाचे अन्न शिजवण्यासाठी एक एक आचारी असे. या पद्धतीने शेकडो हजारो कैद्यांचा एकदम सैपाक करण्याचा व सारे अन्न बेचव नि कच्चे खाण्याचा प्रसंग त्या कैद्यांवर येत नाही असे त्याने सांगितले.

स्वच्छतेच्या व आरोग्याच्या दृष्टीने खरोखर ही पद्धत चांगली आहे. तुरुंगात प्रत्येक कैद्याला मिळणारे अन्न तोलून मापून दिलेले असते. असा कोरडा शिधा बारा बारा माणसांचा गट करून देण्यात आला व तो शिजवून घेण्याची साधने कैद्यांना दिली तर खरोखरच तुरुंगात ती एक अती आवश्यक अशी सुधारणा होईल यात शंका नाही. अन्न हे परब्रह्म मानण्यात येते. ते तयार करताना ज्या स्वच्छतेची आवश्यकता असते तिचा संपूर्ण अभाव तुरुंगात असतो. भाकऱ्या कच्च्या किंवा करपलेल्या, वरणात अनेक वेळा आळ्या, भात कच्चा, भाजी बेचव, हा नित्याचा

प्रकार असतो. तुरुंगातील ज्या न्याय्य तक्रारी असतात त्यांतील अर्ध्या-अधिक खराब अन्नाबद्दल असतात. आणि म्हणून बारा बारा कैद्यांच्या गटाचे अन्न स्वतंत्र शिजवण्याची सोय तुरुंगात जरूर असावी, असे मत व्यक्त करण्यापलीकडे या माहितीचा काही उपयोग प्रत्यक्षात होणारा नव्हता.

तुरुंगात स्वतंत्रपणे अन्न शिजवण्याची सवलत गुन्हेगार कैद्यांना नसते. पण आम्हा स्थानबद्धांना ती असूनही सगळ्यांना तिचा फायदा घेता येत नसे. आणि याचे कारण कार्यकर्त्यांची गरिबी. जे कोणी आपल्या सुस्थितीचा फायदा घेऊन आपापल्या खोलीत उंची पदार्थ शिजवून खात त्यांना खोलीत आडपडदा लावून अन्न शिजवावे लागे. आमच्यापैकी काहीनी जेलच्या अन्नाला पूरक म्हणून पालेभाज्या शिजवण्याचा उपक्रम केला होता.

काहीना ठाण्यातून घरचे डबे येत. या घरच्या डब्यांमुळे एकदा एक असे काही गंभीर प्रकरण उद्‌भवले की त्यामुळे आमच्यावर जेलच्या अधिकाऱ्यांपुढे खाली माना घालण्याची पाळी आली. जिल्हा पातळीवरील एका पुढाऱ्याला घरून डबा येई. या गृहस्थांना काही आजार असल्यामुळे बराकीतील एका जवळ असलल्या सार्वजनिक स्वरूपाच्या शेगडीवर ते काही पथ्याच्या भाज्या शिजवून घेत. या भाज्या जेलच्या मळ्यातून वॉर्डरच्या मार्फत ते आणवीत. एवढ्यावर थांबते तर काही फारसे बिघडले नसते. पण पुढे त्या शेगडीच्या मालकाने कुरकुर करायला सुरुवात केली नि त्यांच्या भाज्या शिजवून देण्याचे नाकारले. त्यांनी त्यावर उपाययोजना केली आणि तीच पुढे अंगलट आली. जेलच्या मळ्यातील भाज्यांचे बारीक तुकडे करून ते जेवणाचा रिकामा डबा परत जाई तेव्हा त्यात घालून ते पाठवीत. डबा जड लागल्यामुळे पाहाऱ्यावर नवीन आलेल्या शिपायाने तो तुरुंगाधिकाऱ्याकडे नेला. त्याने उघडून पाहिल्यावर त्यात ताज्या वांग्यांचे तुकडे आढळले. त्या अधिकाऱ्याने लगेच आमच्या बराकीतील काही प्रतिष्ठांना कचेरीत बोलावून नेले नि त्यांच्यासमोर ते डबे उघडून दाखविले. गप्प राहून अधिकारी जे काही बोलला ते ऐकून घेण्यापलीकडे त्यांना काही करता आले नाही. तुरुंगात राजकीय कैद्यांना मिळणाऱ्या सवलती या असल्या

प्रकारामुळे अर्थातच कमी होत आल्या. गुन्हेगार कैद्यांतही यामुळे राजकीय कैद्यांबद्दलच्या आदराला ओहोटी लागली.

असाच एक प्रकार दुसऱ्या बाबतीत झाला. स्थानबद्धांना तुरुंगाच्या कचेरीत त्यांच्या नावावर असलेल्या पैशातून पोलिसांमार्फत बाजारातून किरकोळ वस्तू विकत आणता येत. त्यासाठी लागणारा पैसा त्यांना स्वतःजवळ मात्र ठेवता येत नसे. तुरुंगात येताच स्थानबद्धांचा मान राखून त्यांची अंगझडती न घेता काही पैसे व इतर वस्तू जवळ असल्यास त्या मागून घेऊन कचेरीत त्यांच्या नावावर ठेवल्या जात. एका पुढाऱ्यांनी आपणाजवळ पैसे नसल्याचे सांगितले. पण पुढे त्यांनी जवळचे पैसे खर्च करण्यास सुरुवात केली आहे असे जेव्हा अधिकाऱ्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी त्याची खरड काढली आणि पुढाऱ्याचा चेहरा पाहण्यासारखा झाला.

२६ तक्कचात आक्षेपार्ह वाङ्मय

बेचाळीस सालचा स्वातंत्र्यसंग्राम हा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेला अखेरचा लढा होता. आठ ऑगस्ट १९४२ रोजी सायंकाळी मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून महात्मा गांधीनी आपल्या अनुयायांना 'करा किंवा मरा' असा ज्वलंत आदेश दिला. बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी काही केलेही नाही आणि म्हणून मरण्याचा प्रश्नच त्यांच्या बाबतीत उद्भवला नाही. जे सच्चे स्वातंत्र्यभक्त होते त्यांनी 'करा किंवा मरा' या आदेशातील 'किंवा' ऐवजी 'आणि' हा शब्द स्वतःच्या कृतीने या आदेशांत घातला. त्या काळात चाललेल्या हिंसाहिंसेच्या शुष्क चर्चेत न सापडता त्यांनी प्रत्यक्ष कार्यालाच हात घातला होता. ब्रिटिशांची सत्ता जुमानायची नाही हा त्यांचा बाणा होता. आपल्याला अटक करावयास आलेल्या पोलिसांना

दाद न देता महिनोन् महिने ते स्वतंत्र राहिले आणि ब्रिटिशांच्या पाशवी सत्तेला त्यांनी आव्हान दिले. अशा वीरांनी गनिमी काव्याच्या लढ्याचा स्वीकार केला होता.

कुलाबा जिल्ह्यातील कर्जत–नेरळचा परिसर भाई कोतवाल व त्यांचे सहकारी यांनी आपल्या कर्तबगारीने दणाणून सोडला होता. ठाणे तुरुंगाच्या दारावर येऊन आतील स्थानबद्धांना बाहेरची बातमी पुरविणारे काही परिचित भूमिगत भाई कोतवालांच्या टोळीत होते. या टोळीतील स्वातंत्र्य सैनिक सशस्त्र असत. एकदा तर त्यांना पकडण्याच्या कामगिरीवर असलेल्या पोलिसांना बेसावध गाठून त्यांनी त्यांच्या बंदुका हस्तगत केल्या होत्या. भाई कोतवाल व त्यांचे सहकारी यांचे वास्तव्य दरी–कपारी असे. पुण्याकडे जाणारा बोरघाट, ठाणे जिल्ह्याचा डोंगरी भाग, पुणे जिल्ह्यांतील जुन्नरला जोडणारा नाणे घाट, नेरळपासून पंधरा–वीस मैलांवर असलेला सिद्धगड हा फरारी लोकांचे आश्रयस्थान बनलेला दुर्गम डोंगरी मुलुख यात त्यांचे वास्तव्य असे. लढ्याचे अगोदर गरीब शेतकऱ्यांसाठी भाई कोतवालांनी खेड्यापाड्यांतून सहकारी तत्त्वावर धान्य कोठारे उघडली होती. सावकारांनी नाडलेल्या कुळांची कोर्टात वकिली करून त्यांचा दिलासा संपादन केला होता. या पुण्याईच्या जोरावर सह्याद्रीच्या या दऱ्याखोऱ्यांत त्यांनी आपले प्रभुत्व स्थापन केले होते.

भाई कोतवाल व त्यांचे सहकारी यांच्या कार्याची चर्चा आम्हा स्थानबद्धांत प्रसंगानुसार होत असे. ऑगस्टच्या क्रांतिकालात असंख्य स्वातंत्र्य-सैनिक ब्रिटिश सत्तेला आव्हान देऊन स्वतंत्रपणे आपापल्या कुवतीप्रमाणे नोकरशाहीला सतावीत होते. त्यांच्यापैकी रोज कोणीना कोणी तरी पोलिसांच्या हाती सापडत व काही काळाने तुरुंगात येत. पण अशा प्रकारे आत आलेल्यांना आमच्यात मिसळू देत नसत. घातपाती कृत्यांत भाग घेतल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवून त्यांना प्रथम पोलिसांच्या कोठडीत नेत. कोर्टाने हुकूम केल्यास तुरुंगात कच्च्या कैदेत ठेवीत. त्यांच्यावरील खटल्यात ते निर्दोषी ठरल्यास त्यांना स्थानबद्ध करीत. हे स्थानबद्ध आमच्यात आले की भूमिगत वीरांच्या पराक्रमांची गाथा सुरू होई.

१९४२ साल संपतांच नव्या वर्षाची पहिली धक्का देणारी बातमी आली. सिद्धगड डोंगराच्या पठारावर ठाणे जिल्ह्याच्या पोलीस अधिकाऱ्याने गोळ्यांचा वर्षाव करून भाई कोतवाल आणि त्यांचे एक सहकारी यांचा निर्घृण बळी घेतला होता. भाई कोतवालांना व त्यांच्या सहकाऱ्याला वीरोचित मरण आले. आणि त्यांच्यावर हल्ला करणारांची जनतेने खुनी म्हणूनच निर्भर्त्सना केली. कारण त्या दिवशी सकाळी भाई कोतवाल नि त्यांचे सहकारी निवांतपणे आपल्या विश्रांतीच्या जागी बसले असता कोणा फितुरी माणसाने केलेल्या दगाबाजीमुळे पोलिसांनी डोंगराला वेढा घातला व बंदुका हातांत घेण्याची संधी न देताच त्यांच्या अधिकाऱ्याने गोळ्यांचा वर्षाव करून भाई कोतवाल व हिराजी पाटील यांचा बळी घेतला !

भाई कोतवाल व त्यांचे सहकारी यांना जिवंत पकडणे शक्य असता त्यांना सूडबुद्धीने निर्दयपणे मुद्दाम ठार मारण्यात आले, असे भाई कोतवालांच्या बरोबर असलेल्यांचे म्हणणे होते. पहिली गोळी लागल्यावर आपली बंदूक हाती घेत असतांना त्यांच्यावर पुन्हा गोळीबार करण्यात आला. ती सारी हकीकत वृत्तपत्रांतून व खाजगी माहितीवरून कळल्यावर आमच्या बॉर्डातील भाई कोतवालांच्या या कार्याशी परिचित असलेल्या मंडळीत खिन्नतेचे वातावरण पसरले. सकाळच्या वेळी ती बातमी येताच अनेकांचे चेहरे गंभीर झाले. मला तर १९४२ च्या जुलैच्या अखेरीस पुण्यात भरलेल्या काँग्रेस समाजवादी पक्षाच्या बैठकीस हजर असलेले भाई कोतवाल नजरेसमोर दिसू लागले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्माहुती दिलेल्या वीरांत त्यांचे आणि हिराजी पाटलांचे नाव अजरामर झाले. काही वेळाने झालेल्या चहापानामुळे खिन्नतेचे वातावरण हळूहळू निवळले.

सार्वजनिक कार्य करणाऱ्याच्या जीवनात कौटुंबिक भावनांचा संकोच होत असतो आणि त्याच प्रमाणात समान आचारविचार बाळगणाऱ्या सहकाऱ्यांचा नवा परिवार साकार होत असतो. तीस साली मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्यापासून माझे आई–वडील, भाऊ–बहीण यांजबरोबरचे घरगुती संबंध चांगले असले तरी बाहेरच्या कामांच्या वाढत्या व्यापामुळे घरच्या माणसांबाबत इतर चारचौघांप्रमाणे मला माझे कर्तव्य पार पाडता

आले नव्हते. एका बाबतीत मी समाधानी होतो. मी अमुक एक गोष्ट करावी किंवा करू नये याविषयी आईवडिलांनी कधीच आग्रह धरला नाही. एकदा तसा प्रसंग आला होता. जातपात–तोडक मंडळामार्फत १९३५ च्या सुमारास हरिजनांबरोबर झुणकाभाकर खाण्याचे सार्वजनिक समारंभ होत. कल्याण येथे अशाच एका समारंभात मी भाकरी खाल्ली होती. रोटीबंदी मोडणाऱ्यांच्या यादीत माझेही नाव वर्तमानपत्रांत आले. खेड्यात राहणाऱ्या माझ्या आईवडिलांना ते तत्परतेने कोणी तरी कळविले. एवढ्यावरच प्रकरण थांबले नाही. "तुमच्या मुलाने हरिजनांबरोबर भाकरी खाल्ल्याबद्दल प्रायश्चित्त घेतले नाही तर आम्ही तुमच्या घरी धर्मकार्यासाठी येणार नाही" असे स्थानिक वैदिक ब्राह्मणांनी माझ्या वडिलांना सांगितले. मी माफीपत्र लिहून दिल्यास ब्राह्मणांचे समाधान होणार होते. पण समजून उमजून जाणीवपूर्वक केलेल्या कृतीबद्दल माफी मागण्यास मी तयार नव्हतो. त्या वेळी–आईवडिलांनी मला दोन गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. पण पुढे भिक्षुकांनी बहिष्कार घातलाही नाही आणि ते प्रकरण मिटले.

या साऱ्या घरच्या आठवणी त्या दिवशी दुपारी तुरुंगाच्या कचेरीत जाताना माझ्या मनात गोळा होत होत्या. "वडील आजारी असल्याने तुम्हांस पॅरोलवर सोडण्यात येणार आहे. कचेरीत चला" असे शिपायाने मला सांगितले व मी कचेरीत निघालो. नुसत्या पायांचे नव्हे तर कोणत्याही वाहनाचे साहाय्य घेऊन होणाऱ्या प्रवासापेक्षा मनाची गती किती जलद असते याचा अनुभव नेहमीच येतो. पण संभाव्य घटनांचे नक्की स्वरूप कळले नाही म्हणजे ही गती जास्तच वाढत असावी!

कचेरीत माझे एक स्नेही वाट पहात होते. त्यांनी बाहेरूनच माझी पॅरोलवर सुटका व्हावी यासाठी प्रयत्न केले होते.

तुरुंगाच्या दारातून बाहेर पडताना पुन्हा पंधरा दिवसांनी येथे परत यावयाचे आहे ही जाणीव होती. बेचाळीस सालच्या जानेवारीपासून ऑगस्टपर्यंत ज्या मित्राकडे मी रहात होतो ती जागा फार दूर नसल्याने मी मित्राबरोबर पायीच त्यांच्या घरी गेलो. तेथे जाऊन बसल्यावर वडील

निवर्तल्याची वार्ता मला त्याने सांगितली. ते वृत्त ऐकताच मला एकदम रडू कोसळले. ताबडतोब खेडेगावी जाण्याच्या तयारीस लागलो. वडील नसलेल्या घरात प्रवेश करताच पोरकेपणाची जाणीव झाली. आई, वडील भाऊ, बहीण सारी म्लान वदनाने माझी वाट पहात होती. वडील वारल्याला मी सुटेपर्यंत पाच-सहा दिवस झाले होते. पॅरोल मिळायला उशीर लागला. वडिलांचे अंत्यसंस्कार क्रियाक्रर्मांतर वडील भावाने केले होते. तेराव्या दिवशी रात्री गावातील वारकरी सांप्रदायाच्या लोकांनी आमच्या घरी येऊन कीर्तन केले. घर ही एकत्र राहण्याची, खाण्यापिण्याची, बसण्या-उठण्याचीच नुसती जागा नसून ती संस्कारांचें संवर्धन करणारी संस्था आहे याची जाणीव, मला वाटते, घरात बालक जन्माला येते त्या वेळीं होत नाही इतकी कर्त्या माणसाच्या निधनामुळे होते.

खेड्यातून पुन्हा शहरात येताच वेगळे संबंध, वेगळी कार्ये सुरू झाली. बाहेर राजकीय पक्ष उघडपणे वावरत नव्हते. काँग्रेसचे नाव घेण्यासारखे पुढारी कोणी मोकळे नव्हते. भूमिगत कार्यकर्त्यांशी संपर्क साधणारे अनेक मित्र भेटले. त्यांच्यामार्फत तेव्हा भूमिगत असलेले श्री. प. स. भागवत यांना मी मुंबईस त्यांनी ठरवलेल्या जागी भेटलो. श्री. भागवत मला तेव्हा भूमिगत असलेले नानासाहेब गोरे यांच्या भेटीस घेऊन गेले. पॅरोलची मुदत संपल्यावर परत तुरुंगात न जाता बाहेर राहून काम करण्याची तयारी असल्यास तशी व्यवस्था करता येईल असे मला माझ्या सहकाऱ्यांनी सुचवले. पण भूमिगत राहून काम करण्याचे धैर्य अगर वृत्ती म्हणा माझे अंगी नसल्याने मी ती सूचना विचारात घेतली नाही. पॅरोलची मुदत संपण्याच्या आत मी आणखी काही स्नेहीमंडळींना भेटलो. तुरुंगात पुस्तकांची फार उणीव भासत असे. राजकीय कार्यकर्त्यांत श्री. पां. वा. गाडगीळ फार लोकप्रिय होते. त्यानी लिहिलेल्या वादविवेचन मालेतील पुस्तकांचा एक सेट मला माझ्या एका स्नेह्याने दिला. माझ्या जवळचीही काही पुस्तके मी तुरुंगात नेण्यासाठी घेतली.

अखेर पॅरोलचे दिवस संपले. वडिलांच्या शेवटच्या आजारात त्यांची भेट झाली नाही ही रुखरुख मनाला होती. मित्रांनी परस्पर खटपट करून

पॅरोलची व्यवस्था केल्याने घरच्या सर्व लोकांना भेटण्याची संधी मिळाली, हा मनाला बरे वाटणारा व्यावहारिक विचार करीत मी तुरुंगात परत जाण्याची तयारी विमनस्क अवस्थेत करीत होतो. माझ्या राजकारणातील सहकाऱ्यांनी 'पॅरोल' बुडवून भूमिगत राहण्याची तयारी असल्यास तशी सोय करण्याची सूचना केली होती; त्याचबरोबर उलट दुसरी सूचना माझ्याविषयी जिव्हाळा, आपुलकी वाटणारांनी केली. कसल्याही प्रकारची माफी न मागता यापुढे मी सरकारविरोधी गोष्टी करणार नाही, असे लिहून दिले तर सुटका होणे शक्य आहे असे त्यांचे म्हणणे होते. "चळवळीचा जोर ओसरत आहे, आंदोलनाची दिशाही बदलण्याची शक्यता आहे, मग तुम्ही पुन्हा तुरुंगात का जाता?" ही त्यांची विचारसरणी होती. ती शरणागतीच्या मार्गाची असल्याने मी त्यांस स्पष्ट नकार दिला आणि परत तुरुंगात जाण्याच्या तयारीला लागलो.

तीस, एकेचाळीस नि बेचाळीस साली मी तुरुंगात होतो. आता बेचाळीसच्या स्थानबद्धतेतून आकस्मिक दुःखद कारणाने मिळालेला पॅरोल हा नाटकाच्या दोन अंकांमधील मध्यंतराच्या वेळेसारखा होता. 'मध्यंतर' संपले म्हणजे प्रेक्षकांची पावले आपोआप पुढचा प्रवेश पाहण्यासाठी प्रेक्षकगृहाकडे वळतात तितक्या सहजपणे मी पुन्हा ठाण्याच्या तुरुंगाकडे पाहू लागलो. या खेपेस माझ्या तयारीला जास्त वेळ लागला. पुस्तके नि वह्या बरोबर घेतल्या. कोऱ्या वह्यांबरोबर नाशिकच्या तुरुंगात वाचलेल्या पुस्तकांची टिपणे काढलेल्या वह्याही मुद्दाम पुन्हा वाचण्यासाठी घेतल्या. स्थानबद्ध म्हणून असलेल्या सवलतीमुळे हे सारे सामान रीतसर आत जाणार होते. पण सरळ आत जाऊ न शकणारे असेही काही सामान मला आत न्यायचे होते. त्यात भूमिगत कार्यकर्त्यांकडून बाहेर वाटले जाणारे, तेव्हाच्या सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह असे बरेच वाङ्मय होते. या वाङ्मयात तेव्हा भूमिगत असलेल्या साने गुरुजींचे बरेच साहित्य होते. भाई कोतवालांवर त्यांनी केलेला एक पोवाडाही होता. हे सारे लिखाण रीतसर उघडपणे आत गेले नसते. त्यासाठी मी माझ्याबरोबरच्या मच्छरदाणी आणि इतर अशाच सामानात एक भरपूर कापूस भरलेला तक्क्या घेतला. हा तक्क्या अगोदर उसवून कापसाच्यामध्ये हे सारे आक्षेपार्ह वाङ्मय दडवून ठेवले. जेलमध्ये प्रवेश कर-

ण्याची वेळ आतील कैद्यांची 'गिनती' मोजणी व्हायच्या आधीची, संध्याकाळची होती. स्वतःहून तुरुंगाच्या दारात हजर व्हायचे होते. बरोबर शिपाई असणार नव्हते. जाण्याच्या अगोदर मित्राच्या घरी जेवणाचा आग्रह झाला. कुठेही जायचे म्हणजे आधीच पोट भरून येते. तीच अवस्था या जेवणाची झाली. जेलमधून थोड्या काळासाठी का होईना बाहेर का आलो, आत परत का जात आहे, आतील सहकारी बाहेरच्या बातम्यांसाठी किती उत्सुक असतील, हे सारे विचार डोक्यात गर्दी करीत होते. पॅरोलवर बाहेर येताना सहज बाहेर फिरायला जावे असा चालत आलो होतो. आत जाताना सामान बरेच झाल्याने टांगा करून जावे लागले. तुरुंगात पोचलो तेव्हा ठरलेल्या वेळेपेक्षा उशीर झाला होता. कचेरी बंद झाली होती. म्हणून बरोबरचे सगळे सामान आत नेण्यास परवानगी मिळाली नाही. मच्छरदाणी, काही कपडे आणि तक्क्या आत नेता आला. मला धाकधूक तक्क्याचीच वाटत होती. वास्तविक अशा गोष्टी माझ्या स्वभावाला जुळणाऱ्या नव्हत्या. यार्डात प्रवेश करताच सामानाबरोबर असलेला तक्क्या पाहताच ही पेशवाई बैठकीतली चीज पाहून 'अहो हा तुरुंग आहे. पुण्यातला पेशवाईतला वाडा नाही' असेही एकाने म्हटले.

२७ आंदोलनाची उग्रता कमी झाली पण–

पॅरोल संपला नि परत तुरुंगात आलो. त्या वेळी मला तुरुंग असा जाणवलाच नाही. टांग्यातून सामान तुरुंगाच्या कचेरीत आणल्यावर त्यातील पुस्तकांचा गठ्ठा तपासण्यासाठी मागे ठेवण्यांत आला नि बरोबरचे कपडे नि इतर सामान–तक्क्या, मच्छरदाणी वगैरे माझ्याबरोबर थेट यार्डात आले. त्या रात्री भोवतालच्या मित्रांना बाहेरच्या हकीकती सांगत असताना माझ्या नजरेपुढे वडिलांच्या

मृत्यूनंतरचे घर उभे रहात होते. कारण घराकडे मी इतर चारचौघांप्रमाणे कधीच पाहिले नव्हते. सारी जबाबदारी वडील भावावर होती. पक्ष्यांची पिले पंख फुटेपर्यंत घरट्यात असतात नि एकदा पंख फुटले की पिले घरट्याबाहेर जातात ती त्याच घरट्यात राहण्यास येत नाहीत. भारताच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या त्या काळात नि त्याच्याही आधी अनेक वर्षे असंख्य तरुणांनी वैयक्तिक संसाराचे विचार बाऱ्यावर सोडून घरादारांचा स्वतःहून त्याग केला होता. या साऱ्यांच्या मनात घराबद्दल जे विचार अशा प्रसंगी आले असतील तशाच प्रकारचे विचार माझ्या मनात घोंघावत होते. पण काही काळातच मन पुन्हा आमच्या त्या यार्डातल्या वातावरणात रमले. घरचे विचार पुन्हा एकदा मागे पडले.

माझ्याबरोबरचे आक्षेपार्ह वाङ्मय वाचण्याची उत्सुकता माझ्या काही सहकाऱ्यांना विशेष होती. वादविवेचन मालेची व इतरही काही पुस्तके मी आणली याचा आनंद साऱ्या तरुण कार्यकर्त्यांना झाला. त्यांना काही चांगले वाचायला हवे होते. काहीतरी, केवळ वेळ घालवणारे, मनोरंजनपर वाङ्मय वाचून त्यांचे समाधान होत नव्हते. भारताचा स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी घडून येणे आवश्यक आहे हे समजून घेण्यास ते उत्सुक होते. भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीची त्यांना माहिती हवी होती. काँग्रेससंघटनेतील जे जुने आणि जाणीते कार्यकर्ते आमच्या यार्डात होते ते या नवीन मंडळींशी तितके समरस होत नसत. घातपाती कृत्यांशी संबंध आणून, तशी कृत्ये करून जे स्थानबद्ध झाले ते म. गांधीप्रणीत काँग्रेसच्या परिवारात मोडत नाहीत आणि म्हणून त्यांच्याशी साध्या बोलण्यापलीकडे, त्यांच्याबरोबर काही खेळ खेळण्यापलीकडे त्यांचे आपले काही संबंध नाहीत, अशा वृत्तीने ते वागत. या तरुण मुलांनी भावनेच्या भरात स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली असल्याने त्यांच्या या भावनेला काही तात्त्विक बैठकीचा आधार योग्य वेळीच न मिळाला तर देशाच्या नुसत्या राजकारणाबाबत नव्हे तर साऱ्या सार्वजनिक कामाबाबत त्यांची वृत्ती निराशाजनक होईल असे मला वाटत होते. देशासाठी तुरुंगात आल्यावर देशभक्तीचे काम पुरे होत नाही तर पुढील कामकाजाची मानसिक तयारी

तुरुंगवासाच्या काळातच होत असते. देशभक्तांना तुरुंगात डांबून ठेवण्याचा सरकारचा उद्देश त्यांच्या देशभक्तीच्या चळवळी बंद पडाव्या हा असतो. काही अल्प काळ सरकारला हा उद्देश साध्य झाल्याचा आनंद मिळतो, पण देशभक्तांना तुरुंगात डांबण्याने त्यांची देशभक्ती 'तोडिता तरु फुटे आणखी भराने' या न्यायाने वाढतच जाते. निरनिराळ्या देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या कथा नि देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग दाखवणारे वाङ्मय यांचा अभ्यास याचसाठी आवश्यक असतो.

आस्ते आस्ते ठाणा तुरुंगात बाहेरून येणाऱ्या स्थानबद्धांची संख्या वाढत होती. तीस साली ठाणा, येरवडा, विसापूर तुरुंगांत मोठमोठ्या बराकीतून काही दशकांनी मोजता येतील अशा क वर्गीय राजबंद्यांसमवेत दिवस काढले होते. चाळीस साली नाशिकला चौदा-पंधरा महिने स्वतंत्र खोली राहण्यासाठी मिळाली. त्यामुळे वाचन झाले नि विश्रांती भरपूर लाभली. बेचाळीसच्या तुरुंगवासाची सारी शान वेगळीच होती. ठाणा तुरुंगाच्या त्या जुनाट खोल्यांत तीन तीन, चार चार स्थानबद्ध असत. दिवसा त्या खोल्यांत क्वचितच कोणी रहात असत. सारा दिवस व्हरांडा अगर समोरचं अंगण यांत सामुदायिक मुक्काम असायचा. तुरुंगात बाहेरच्या मानाने स्वच्छता चांगली असली तरी डासांचा उपद्रव होतच असे. अंधाऱ्या खोल्यांत संध्याकाळी हे डास घोंघावत असत. पॅरोलवरून परत तुरुंगात येताना मी निवांत झोप मिळावी म्हणूनच मच्छरदाणी बरोबर आणली होती. एकेका वस्तूची काय गंमत असते पहा. हीच मच्छरदाणी ४० साली ठाणे तुरुंगात असलेले साथी एस्. एम्. जोशी यांच्यासाठी मी बाहेरून पाठविली होती. पुढे मीच ४० साली नाशिक तुरुंगात 'ब' वर्गातील कैदी म्हणून गेल्याने मच्छरदाणी वापरण्याची परवानगी होती, तेव्हा हीच मच्छरदाणी मला पुन्हा मिळाली. आता बेचाळीस साली ठाणे तुरुंगात ही मच्छरदाणी पुन्हा आली होती. खोलीसमोरील दोन खांबांच्या-मध्ये ती लावीत असताना नाशिक तुरुंगातील ती स्वतंत्र खोली, विजेचा दिवा, पुस्तकांचा भारा, शेजारी चहाचा थर्मास हे दृश्य नजरेसमोर आले. दोन्ही तुरुंगच. पण स्थानमाहात्म्याने पडलेला फरक क्षणभर जाणवला. दिवसा व्हरांड्याच्या खांबाला टेकून बसताना आता तक्क्याचा उपयोग होत होता.

बाहेरच्या वार्ता आता कमी होत होत्या नि त्याबाबतची उत्सुकता-ही फारशी कोणाला वाटत नसे. अगदी कोणी निकटवर्ती स्नेही बाहेर भूमिगत असला तर त्याच्याबाबत त्या त्या विशिष्ट गोटात त्याच्या बातमी-विषयी उत्सुकता दिसून येई. 'करा किंवा मरा' या आंदोलनाने उडवून दिलेली प्रचंड खळबळ आता शांत झाली होती. सर्वसामान्य जनतेची अंतःकरणे या आंदोलनाने उचंबळून आली. भारतांतील ब्रिटिशांची सत्ता त्यांच्या संगिनीच्या जोरावरच टिकून राहिली आहे हे पुन्हा भारतीयांनी साऱ्यांच्या प्रत्ययास आणून दिले. दुसऱ्या जागतिक महायुद्धात हिटलर-विरुद्ध चाललेल्या लढाईत ग्रेट ब्रिटन नि अमेरिका यांना भारतीयांचे स्वयंस्फूर्त सहकार्य हवे असेल तर भारत आधी स्वतंत्र झाला पाहिजे, ही काँग्रेसची भूमिका न्यायतः बरोबर होती, पण ती ब्रिटिशांच्या गळी उतरविण्यास काँग्रेसचे सामर्थ्य अपुरे पडले हे स्पष्ट झाले होते. असे असले तरी नैतिक भूमिकेवर काँग्रेसने मिळविलेला विजय कोणीच नाकारू शकत नव्हते. काँग्रेसच्या चळवळीत झालेल्या हिंसक कृत्यांबाबत भारत सरकारने एक पुस्तिका प्रसिद्ध केली. या पुस्तकातील एकतर्फी माहितीचा दंभस्फोट नंतर महात्माजींनी एका वाक्यात केला. म. गांधी हिंसक कृत्यांचा पुरस्कार कदापि करणार नाहीत याबाबत निश्चित असणाऱ्या ब्रिटिश सरकारची घुंदी या वाक्याने साफ उतरली. गांधीजी म्हणाले, "जनतेने हिंसक कृत्ये केली पण सरकारने इतक्या मोठ्या प्रमाणावर केलेल्या अत्याचारांचा तो परिणाम होता." जनआंदोलनाची उग्रता फार काळ टिकून राहू शकत नाही" हाच अनुभव आता आला होता. पण तुरुंगात असलेले काँग्रेस नेते नि असंख्य स्वातंत्र्य-सैनिक हे साऱ्या जगाला सांगत, पटवून देत होते की, हिटलरच्या जुलमी आक्रमक शक्तीला पायबंद घालण्यास पुढे सरसावलेले ग्रेट ब्रिटन भारताच्या पायातील गुलामगिरीची शृंखला तोडण्याबाबत मूग गिळून स्वस्थ बसले होते. बाहेरचा चळवळीचा गोळा थंड होत असता तुम्ही तुरुंगात राहून काय साधता, असे विचारणाऱ्यांना मी तरी हे उत्तर तेव्हा देत असे.

मी बरोबर आणलेल्या पुस्तकांत माझ्या काही टिपणवह्याही होत्या. नाशिक तुरुंगात वाचलेल्या पुस्तकांवर काढलेली ती टिपणे ठाण्याच्या त्या

तुरुंगात अनेकांनी वाचली. तुरुंगात नवीन ओळखी आपोआपच होत असतात. आमच्या यार्डात बदलापूरचे लक्ष्मणराव चाफेकर हेही स्थानबद्ध झाले होते. माझ्या एका टिपणवहीत मी नाशिक रोडच्या तुरुंगात असताना वाचलेला एक निबंध होता. 'साम्राज्य विरोधी लढ्यात वाङ्मयाचे स्थान' हा त्या लेखाचा विषय होता. वाङ्मय, कला, आर्थिक लढे अशा बऱ्याच विषयांवरील मतांची चर्चा त्या लेखात होती आणि कलेसाठी 'कला' म्हणणाऱ्यांवर टीका केली होती. 'कलेसाठी कला' हा सिद्धान्त खोडून टाकणारा जो मजकूर होता तेथे लक्ष्मणरावांनी 'सत्याविण जी जी कला। ती ती जाणावी अवकळा ॥' असे समर्थ रामदासांचे वाक्य लिहून ठेवले.

तुरुंगात समानशील मित्रांशी चर्चा करण्याचा आनंद काही वेगळाच असतो. नाशिकच्या तुरुंगात केशव – बंडू – गोरे यांच्याशी केलेल्या चर्चा नि वार्तालाप हा त्या तुरुंगातील एक विशेष सांगता येईल. त्या वेळी आदर्श मराठी साप्ताहिक कसे असावे याविषयी खूप खूप बोललो व तसे एक सुरू करण्याचे संकल्पही केले. या खेपेस श्री. चाफेकर यांच्याशी माझे बरेच बोलणे होई. ठाणे जिल्ह्यातील प्रश्नांची चर्चा करणारे साप्ताहिक आवश्यक आहे असे आमचे मत होते व तशा तऱ्हेचे एक साप्ताहिक तुरुंगातून बाहेर आल्यावर काढण्याचे मनसुबेही आम्ही रचले. आर्थिकदृष्ट्या साप्ताहिकाचा खर्च परवडण्याच्या दृष्टीने ते पुण्यास त्यांच्या आर्यसंस्कृती मुद्रणालयातून छापून घ्यायचे इतका तपशीलही ठरला.

काही दिवसांनी बऱ्याच भूमिगतांना एकदम अटक झाल्याची बातमी आली. बॉंबे सेंट्रल स्टेशनजवळ मोठ्या रस्त्याच्या आतील बाजूस एका जागेत बरेच भूमिगत कार्यकर्ते रहात असत. आसपास खिश्चन वस्ती होती. याच ठिकाणी मी पॅरोलवर असताना श्री. ना. ग. गोरे यांना भेटण्यास गेलो होतो. माझ्या या भेटीनंतर दोन-तीन महिन्यांनी ती अशुभ बातमी आली. भूमिगतांच्या या निवासस्थानाचा पोलिसांना पत्ता लागला. या ठिकाणचा नुसता पत्ताच लागला असे नसून त्या ठिकाणी भरणाऱ्या एका गुप्त सभेची वेळही त्यांना समजली. पोलिसांनी वेळ साधली. खोलीवर ती विशिष्ट सभा भरण्याच्या आत त्यांनी छापा घातला. तेथे सापडले त्यांना,

तर त्यांनी अटक केलीच, पण ती अटक झाल्यावर ते तेथेच दबा धरून बसले व त्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी अटक केली. या प्रकाराने एकदम बरेच कार्यकर्ते पोलिसांच्या हाती लागले. त्यांच्यामार्फत चालू असणारे काम एकदम थंडावले. पकडलेल्यांचे अनन्वित हाल करून त्यांच्या कडून भूमिगत कार्याची माहिती काढून घेण्याचा प्रयत्न पोलीस नेहमीच करीत. भूमिगत कार्यकर्ता जितका उशिरा हाती सापडे तितकी त्याची चौकशी जास्त असा ढोबळ नियम होता.

याबाबतची चर्चा अनेक दिवस चालू होती. या चर्चेत या धरपकडीची तुलना केली जाई सापळा लावून उंदीर पकडण्याशी; आणि या धरपकडीचा उल्लेख 'मूषक महालातली धरपकड, असाच होत असे.

२८ अशांततेचा अजबखाना

ठाणे तुरुंगातील राजकीय कैद्यांना-स्थानबद्धांना तेथून हलवून वरळीच्या चाळीत उघडलेल्या तात्पुरत्या तुरुंगात धाडणार, अशा बातम्या येऊ लागल्या. रोजच्या परिस्थितीत बदल घडवून आणणारी कोणतीही बातमी ही तुरुंगांत 'सनसनाटी'च्या सदरात मोडते. बदली होण्याची शक्यता आहे आणि ती लौकरच होणार, हे समजताच आपले नाव 'या बदलीच्या यादीत असावे असा काहींचा प्रयत्न सुरू झाला, तर बरोबर त्याच्या उलट आपली बदली न होता आपल्याला ठाण्याच्याच तुरुंगात राहायला मिळावे, अशी काहींची खटपट चालू झाली.

स्थानबद्धांपैकी एक दोघे तुरुंगाच्या कचेरीशी संपर्क राखून काही दैनंदिन अडीअडचणी पाहात असत तर काहींची थेट जेलच्या सुपरिंटेंडेंटपर्यंत घसट असे. बरच्या लोकांच्या ओळखी मुद्दाम करून घ्यायच्या व टिकवायच्या

असा कार्हींचा जणू उपजतच स्वभाव असतो. अशा स्वभावाच्या माणसांचे प्रमाण राजकीय चळवळीतील कार्यकर्त्यांत जास्त असते. तुरुंगाधिकाऱ्यांशी सलगी असलेल्यांना अशा बदलीच्या प्रसंगी फार महत्त्व येई. आपणास वरळीच्या तुरुंगात पाठवावे असे म्हणणारात मुंबईतून ज्यांची धरपकड झाली होती असे बरेच होते व आपण आहो तेथेच बरे आहो म्हणणारात खद्द ठाण्याचे स्थानबद्ध जास्त होते. ज्यांना घरून रोज किंवा अधून मधून खाण्याचे पदार्थ येत, तसेच ज्यांच्या घरच्या माणसांना त्यांच्या भेटीस येणेही सुलभ होत असे अशांची अर्थातच ठाणे तरुंग सोडून जाण्याची इच्छा नसणे साहजिक होते. ठाण्याच्या एका गृहस्थांना मुंबईच्या तुरुंगात धाडले असता ते मुद्दाम ठाण्यास परत आले होते.

कोणी कोणत्या तुरुंगात रहावे हे कैद्यांच्या इच्छेवर अवलंबून नसून तुरुंगाधिकाऱ्यांच्या मर्जीचा तो प्रश्न होता. पण हे झाले तत्त्व. या तत्त्वाला काही बाबतीत मुरड घातली गेली आणि ज्यांना वरळीला जाण्याची इच्छा होती त्यांची नावे वरळीच्या यादीत गेली. मी कसलीच इच्छा प्रकट केली नाही. तरी मनातून मला बदली झाली तर बरे असेच वाटत होते. कारण तीस सालापासून ठाणे, येरवडा, विसापूर, नासिक रोड येथील तुरुंग पाहून झाले होते. आता तात्पुरता, चाळीतील तुरुंग, वरळीला बघायला मिळाला तर बरे असे वाटत होते आणि तसेच झाले. एके दिवशी सकाळी पोलिसांनी आणलेल्या बंद मोटारीतून सामानासह आमची रवानगी वरळीच्या चाळीतील तुरुंगात झाली.

ठाणा तुरुंगातून वरळीच्या तुरुंगातील प्रवासात बाहेरच्या जगाचा संबंध आला नाही. स्टेशनवरून आगगाडीने न नेल्याने एकदा मोटारीत चढल्यावर वरळीच्या तुरुंगाच्या आवारात पाऊल टाकीपर्यंत आम्ही स्थानबद्ध आणि आमच्यावर देखरेख करणारे शिपाई यांजव्यतिरिक्त कोणाशी आमचा सबंध आला नाही. वरळीचा तुरुंग हा कोणत्याही अर्थाने तुरुंग या शब्दाने मनासमोर येणाऱ्या कोणत्याही चित्राशी जुळणारा नव्हता. कामगारांसाठी बांधलेल्या काही चाळी सरकारने ताब्यांत घेऊन त्यांच्याभोवती काटेरी तारांचे कुंपण उभारून बनविलेला तो माणसांचा कोंडवाडा होता. लहानपणी आमच्या गावात उनाड

व उपद्रवी जनावरांना अडकवून ठेवण्याचा कोंडवाडा शाळेशेजारी असे. एका प्रशस्त जागेभोवती लाकडी कुंपण घालून तो उभारलेला होता. त्याचे लाकडी दार उघडून रस्त्यावर भटकत असलेली किंवा दुसऱ्याचे पीक खाणारी गुरे त्यात आणून ठेवलेली असत. आत ती मोकळी असत व त्यांच्यापुढे चारा पडलेला असे. त्यांना पिण्यास पाणीही दिले जाई. वरळीचा हा तुरुंग पाहताच मला त्या कोंडवाड्याची आठवण झाली. भोवतालच्या काटेरी तारांच्या कुंपणातून चाळीतील राजबंद्यांचे दर्शन बाहेरच्यांना नित्य घडत असे. काटेरी तारांजवळ बाहेर स्थानबद्धांचे परिचित आणि ताराच्या आत स्थानबद्ध यांचे मोठ्याने ओरडून भाषणही होऊ शके. अर्थात ते पहाऱ्याबरील शिपाई दूर गेला आहे हे पाहूनच. या तारा ओलांडून बाहेर जाण्याचा कोणी यत्न करू नये म्हणून विजेचा प्रवाह तारातून खेळविला होता. तुरुंगाची कचेरी स्वतंत्र अशी नव्हतीच. तीन चाळींपैकी एका चाळीच्या तळमजल्यावरील खोल्या तुरुंगाधिकाऱ्यांच्या कचेऱ्या म्हणून सजविल्या होत्या. जेल डॉक्टराचा दवाखानाही तेथेच होता. या चाळी बराकीवजा नसल्याने चाळीच्या खोल्यांतून तीन तीन पाच पाच स्थानबद्धांची सोय केली होती. दोन चाळीच्या मधली मोकळी जागा खेळण्यासाठी वापरीत असत.

तुरुंगात नेहमी जास्त तक्रारी अन्नाबाबत असत. वरळीच्या या चाळीतील स्थानबद्धांना अन्न पुरवण्याची—अर्थात् जेलच्या नियमानुसार—जबाबदारी-मुंबईच्या एका देशभक्त कंत्राटदाराने घेतली होती. दोन्ही वेळचा चहा आणि दोनदा जेवण हे जेलच्या नियमात बसेल एवढ्याच पदार्थांचे देत असत.

या आवारात शिरताच स्वातंत्र्य-सैनिकांच्या एका मोठ्या मेळाव्यात आपण वावरत आहो असा भास होई. भोवताली ठाण्याच्या तुरुंगासारखे तट नाहीत, सगळे मोकळे वातारण. दोन दोन मजल्याच्या चाळी असल्याने वर खाली कुठेही हिंडता फिरता येत असे. नळाला पाणी भरपूर. त्यामुळे आंघोळ, कपडे धुणे, जेवणानंतरची भांडी घासणे हे सारे व्यवस्थित होत असे. वरळीच्या तुरुंगात अनेक नवे मित्र भेटले. सर्वच अनोळखी; पण डोळ्यात उत्सुकता, कुतूहल असलेले अनेक तरुण प्रथमच तुरुंगात आले

होते. यापैकी पुष्कळसे घातपाताच्या गुन्ह्याबाबत संशयावरून पकडलेले होते. त्यांना तुरुंगात यायच्या अगोदर बराच काळ पोलिसांच्या कच्च्या कैदेत काढावा लागला होता. घातपाती कृत्यांचा तलास लागावा, त्यांच्या सूत्रधारांची समग्र माहिती मिळावी म्हणून कच्च्या कैदेतील या तरुणांची उलट-तपासणीही कधी अत्यंत सुखासीन वातावरणात तर कधी अती ऊग्र, तप्त वातावरणात होत असे. बाहेर जखमा दिसणार नाहीत अशा तऱ्हेने मारहाण करण्याचे अनेक किस्से या अग्निदिव्यातून पार पडलेल्या शूर जवानांनी सांगितले. डॉक्टर, इंजिनीयर, वकील या पेशांचा अभ्यास करणारे विद्यार्थी, तसेच या व्यवसायातील प्रौढ मंडळीही आत भेटली. स्वतः क्रांतिकारी कामे करणे नि क्रांतिकारकांना आसरा देणे या दोन्ही गोष्टी सरकारच्या दृष्टीने भारतरक्षण कायद्याचा भंग करणाऱ्या असल्याने या सर्वांना या युद्धकाळात भारतातील कोणत्या तरी तुरुंगात कोंबण्यांत आले होते. ९ ऑगस्ट १९४२ नंतर १५ दिवसांनी अटक झालेले बहुतेक सारे काँग्रेसच्या शिस्तीत वाढलेले देशभक्त नसून स्वातंत्र्याच्या भावनेने, भारताच्या स्वातंत्र्याचा हा अखेरचा लढा आहे या जाणीवेने सर्वस्वसमर्पणाच्या भावनेने आलेले होते. भूमिगत राहून घातपाती क्रांतिकार्यात भाग घेणारे पुष्कळसे काँग्रेससमाजवादी, फॉरवर्ड ब्लॉकवाले, नेमस्त काँग्रेसवाले नि बाकीचे कोणत्याच पक्षांत नसलेले स्वातंत्र्यप्रेमी होते.

चहापान हा साऱ्याच तुरुंगांतून खेळीमेळीचा नि आनंदाचा प्रसंग असतो, असा माझा अनुभव होता. वरळीचा तुरुंग त्याला अपवाद नव्हता. सकाळी व दुपारी चहाच्या वेळी आपापली भांडी घेऊन सारेजण खोलीच्या दारांत बसत. चहाचे पाणी सर्वांना सारखे दिले जाई. साखर व दूध स्वतंत्र पणे वाटीत. चहा न पिणारा कोणी एकाद्या गटात असला तर त्याचे शतशः आभार मानून त्याच्या वाटणीचे चहाचे पाणी इतर चहाभक्त घेत असत.

वरळीच्या तुरुंगात ठाण्याच्या मानाने एक मोठी अडचण भासली. वरळीला स्टोव्ह बाळगण्याची परवानगी नव्हती, त्यामुळे वेळीअवेळी चहा करून घेणारांची मोठी पंचाईत व्हायची. वरळीच्या चाळवजा तुरुंगात बाहेरच्या आवारात व आतील व्हरांड्यात विजेचे दिवे असत. पण खोल्याखोल्यां-

तून दिव्यांची सोय नसल्याने स्थानबद्धांना रॉकेलचे कंदील पुरविण्यात येत. तीस साली कैद्यांना झिंकची जाड भांडी—एक वाटी व एक उभट भांडे—मिळत असत. बेचाळीस साली सारी भांडी ॲल्युमिनियमची असत. स्थानबद्धांना घरची भांडी वापरण्याची सवलत असे. अशा परिस्थितीत रात्री कधी चहाची तलफ आली तर कंदिलाचे झाकण काढून ॲल्युमिनियमच्या पातळ तळाच्या भांड्यात एक दोन कप पाणी उकळत ठेवायचे, कंदिलाची वात मोठी करून भांड्याखालील उष्णता वाढवायची नि एकीकडे गप्पा सुरू करायच्या. तासाभरात पाणी उकळी येण्यापर्यंत तापले अशी समजूत करून घेऊन त्या पाण्याचा चहा बनवायचा व तो मोठ्या चवीने घ्यायचा, हा वरळी तुरुंगातील काही चहाशोकिनांचा खास उद्योग होता.

आमच्यापैकी एकजण सायन्सचा ग्रॅज्युएट होता. त्याने एका डब्याच्या तळाला लहान मोठे दगड काही विशिष्ट रचना करून ठेवले. त्यावर रॉकेल ओतून तो ती यांत्रिक चूल पेटवी व त्यावर पाणी फार लौकर उकळत असे. पण अधून मधून खोल्याखोल्यांतून होणाऱ्या पोलिसांच्या तपासणीत ती यांत्रिक चूल जप्त झाली ती कायमचीच ! या जादा होणाऱ्या चहासाठी लागणारी चहासाखर स्थानबद्ध आपल्या पैशांतून आणीत. पुढे साखर रेशनिंगमध्ये जाण्याची पाळी आली. पण त्या आधीच तुरुंगाधिकाऱ्यांनी मोठ्या औदार्याने लौकरच साखरेचे रेशनिंग सुरू होणार आहे, तरी ज्या कुणाला साखर विकत घ्यायची असेल ती त्याने आताच घ्यावी असे कळविले. मी एक मोठा डबाभर साखर घेऊन ठेवली. इतरही काहीजणांनी घेऊन ठेवली. रिकामपण नि कार्यव्यापृतता या दोन्ही वेळा चहा पिण्यास योग्य असतात नि तुरुंगात रिकामपण सदैव असल्याने चहाला मागणी फार असे.

वरळी तुरुंगात चर्चा, वाचन, अभ्यास याला काही सुरुवात झाली होती. मार्क्सवाद्यांच्या क्रांतीचा दृष्टिकोन, गांधीवाद्यांची राजकीय, आर्थिक व सामाजिक क्रांतीची कल्पना यावर काहीजण एकत्र बसून चर्चा करीत; तर काही मंडळी दुपारच्या वेळी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत यांसारखे ग्रंथ वाचून आत्मचिंतन करीत. काही थोडे लोक आपला अर्धवट राहिलेला विद्यापीठाच्या परीक्षेचा अभ्यासही करीत. अर्थात या सर्व

अभ्यासवर्गात खाजगी अभ्यास फार कमी वेळ चालत असून बहुतेक सारा वेळ चर्चा, गप्पागोष्टी, बाहेरच्या हकीकती समजून घेण्याचा हव्यास, यांतच खर्च होई. काही कलेचे अभ्यासू तरुण आत आले होते. अशांमध्ये आता दिवंगत झालेला पेडणेकर नावाचा काँग्रेसच्या विधायक कार्यात गुंतलेला खामगावच्या राष्ट्रीय शाळेचा विद्यार्थी होता. तो खामगावच्या पंधे गुरुजींच्या शिक्षणकार्याची माहिती सांगत असे. त्याने स्वतःची नखे नखचित्रे काढण्यास उपयुक्त ठरावीत अशा प्रकारे वाढविली होती. कातड्यावर तो एका तीक्ष्ण अशा छोट्या हत्याराने विविध आकृती कोरीत असे. चामड्याच्या पैशांच्या पाकिटावर तीं चित्रे उठावदार दिसत. त्याच्या स्मृतीचे चिन्ह म्हणून त्याने मला असे एक चित्र दिले होते.

वरळीच्या तुरुंगात बाहेरून पुस्तके मागविण्याची व्यवस्था होत असे. ठाण्याच्या तुरुंगात खुद्द ठाण्यात राहणाऱ्या सुखवस्तू स्थानबद्धांची जशी जेवणाखाण्याबाबत सोय होई तशीच वरळीच्या तुरुंगात मुंबईत राहणारांची होत असे. या वरळीच्या तुरुंगात रात्रीचे काही तास वगळले तर नेहमी अशांतता, आरडाओरडा आणि गोंधळ यांचेच राज्य होते. शांत, चिंतनशील माणसाच्या स्वभावाला जुळेल असे वातावरण येथे नव्हतेच.

२९ ढेकणांचा सुळसुळाट

वरळीचा तुरुंग सिमेंटच्या दुमजली चाळीचा, मध्ये व्हरांडा व दोन्ही बाजूस एकेक प्रशस्त खोली असा होता. कामगारांसाठी स्वस्त भाड्याच्या बांधलेल्या या इमारती. कामगारांचे संसार या खोल्यांतून वर्षानुवर्षे चालत आले होते. अवती-भवती सारे वातावरण गिरणगावाचे. चाळीच्या खिडक्यातून, मधल्या व्हरांड्याच्या दोन्ही टोकाला असलेल्या मोठ्या गजांतून बाहेरची सारी मुंबई दिसत असे.

दिवसा बाहेर बघण्याइतपत स्वस्थपणा क्वचितच असायचा. संध्याकाळच्या वेळी पहिल्या मजल्यावरील व्हरांड्याच्या एका बाजूस मुंबईत राहणारे स्थानबद्ध येऊन उभे राहात. खाली रस्त्यावर दूर अंतरावर त्यांचे आप्त-स्वकीय, स्नेहीसोबती तुरुंगातील नियमांना संमत नसलेली लांबवरची नजरभेट घेत असत. काहीजण आपणास हव्या असणाऱ्या वस्तूंची नावेही या मार्गाने बाहेर कळवीत.

या चाळीत ढेकणांनी मात्र अक्षरशः सतावले होते! 'बाबा ढेकणांनी मजला पिसाळले' असेही कोणी गुणगुणताना आढळत. रात्री ढेकणांचा हल्ला आपल्यापर्यंत पोहोचू नये म्हणून आंथरुणाभोवती रॉकेलचे पट्टे ओढण्याचा उपक्रम काहीजण करीत. हे रॉकेल रात्री खोल्यांतून ठेवण्यासाठी जे कंदील देत त्यांतले असे.

या ढेकणांमुळे नि पुढे उन्हाळ्यातील उकाड्यामुळे रात्री झोप आली नाही की व्हरांड्याच्या गजांकडे पाय वळत. मध्यरात्रीचा सुमार झाला की भोवतालच्या शांत रस्त्यांना जाग येत असे. रात्रपाळीचे कामगार घराकडे परत येताना दिसत. जगात सगळ्याच लोकांना कोणते ना कोणते तरी काम करावे लागते. सारा दिवस माणसे काम करीत असतातच. पण दिवसा काम करणाऱ्या माणसाबद्दल विशेष असे काही वाटत नाही. पण तेच काम करून रात्रपाळीचा कामगार अपरात्री घराकडे परत जाताना दिसला की त्याच्याबद्दल काही विशेष वाटू लागते. वाटते हा माणूस लोकांना अंगावर घालायला कपडे मिळावेत म्हणून रात्री-अपरात्री काम करून आता घरी जात आहे. त्याने दिवसा काम केलेले नसते, संध्याकाळी साडेतीन चार वाजता तो कामाला लागला आहे हे सारे माहीत असूनही रात्री बारा वाजता कामावरून घरी परतणारा कामगार हा खरा कष्टकरी, सेवेकरी वाटतो. विशेषतः कोणतेच काम करावे न लागता रोज दोनदा चहा व जेवण नियमित मिळणाऱ्या संवेदनाशील राजबंद्यांना ते दृश्य विशेषच जाणवत असे!

तुरुंगात माझा असा गट नव्हताच. त्यामुळे सर्वच गटातील कार्यकर्त्यांशी संबंध येत असे. पूर्वी कधीच कोणत्याही राजकीय पक्षात जाण्याइतके ज्यांचे

वय नव्हते असे युवक या स्वातंत्र्याच्या आंदोलनात लहानमोठी कामे करून तुरुंगात आले होते. वरळीला भेटलेल्या अशा युवकांपैकी अनेक जणांनी पोलिस कस्टडीची हवा चाखली होती. गुन्हेगाराची अटक आणि तो गुन्हेगार ठरून त्याला कोर्टाकडून शिक्षा मिळण्याचा समय याच्या मधला काळ, गुन्हा जामिनावर सुटण्याच्या स्वरूपाचा नसेल तर पोलिसांच्या पहाऱ्यातील कैदेत जात असतो. यालाच कच्ची कैद म्हणत. या कच्च्या कैदेत जरा बड्या-बड्या व कमी डोक्याचा माणूस पोलिसांच्या हातात सापडला म्हणजे गुप्त खात्याचे धूर्त अधिकारी त्याला चक्क 'मामा' करून त्याच्याकडून हवी असणारी हकीकत कशी काढून घेत असतील याची कल्पना अनेकाकडून ऐकलेल्या या कच्च्या कैदेतील चौकशीच्या सुरम्य, सुरस व साहसी कथा ऐकल्यावर आली ! अपक्व कार्यकर्त्यांची स्तुती करून त्याच्याकडून त्याच्या-पुढाऱ्याबद्दलची राजकीय व इतर माहिती काढण्याचा आव आणून शेवटी आपणांस हवी तीही माहिती मिळविण्याची पोलिस कोशीस करीत. भूमिगत राजकारण हे एकाएकी अंगावर येऊन पडले म्हणजे करता येण्यासारखे नसून त्यासाठी लायक माणसे असावी लागतात व त्या लायक माणसांना गुप्तपणे काम करण्याच्या विशिष्ट तंत्राचीही शिकवण असावी लागते. काही झाले तरी आपले तोंड उघडून काही न बोलणारे कार्यकर्ते हे सापडले गेले तरी बाहेर राहिलेल्या इतरास धोकादायक ठरत नाहीत हा या कामात पडलेल्यांचा अनुभव लक्षात ठेवण्यासारखा होता. उघड उघड राजकारण करण्यासाठी एकत्र येणाऱ्या कार्यकर्त्यांत जे संघटन असते त्यापेक्षा कितीतरी अधिक संघटन गुप्त नि तेही घातपाती वळणाचे राजकारण करणाऱ्यात आढळते. बेचाळीसच्या आंदोलनात योगायोगाने एखादे घातपाताचे काम करण्यासाठी एकत्र आलेले कार्यकर्ते परस्परांतील गुणसमुच्चयामुळे एकमेकांकडे इतके ओढले गेले की, त्यांची मैत्री आता आमरण राहणार असेच त्या विशिष्ट गटातील कार्यकर्त्यांकडे पाहून वाटू लागे. या घातपाती राजकारणाचे बरेवाईट परिणाम अनेक असतील, पण त्यात एक अपप्रवृत्ती विशेष आढळून आली व ती म्हणजे गटप्रमुखाबाबतची आंधळी निष्ठा. या वैयक्तिक निष्ठेने अनेकांची पक्षाच्या मूलभूत सिद्धांतावरील निष्ठाही बरीच पातळ झाली.

तुरुंगात भांडणांना कधीच तोटा नसे. भांडणे जशी आपापसात क्षुल्लक कारणावरून होत तशीच ती तुरुंगाधिकाऱ्यांबरोबर काही तात्त्विक मुद्यावरून होत. गंमत ही की, क्षुल्लक भांडणावरून आपापसात भांडणारे, अबोला धरणारे सारे तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी भांडावयाचा प्रसंग उद्‌भवला की एक होत असत. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी जे खटके होत त्यांपैकी बरेचसे राजकीय कैद्यांचा स्वाभिमान डिवचला गेल्यामुळे होत. वाईट प्रकारचे अन्न पुरविल्यामुळे अनेकदा झगडे झाले. कित्येक वेळा स्थानबद्धांनी जेवण न घेता आलेले अन्न परत धाडले. कच्च्या चपात्या आणि न निवडलेल्या डाळीचे वरण कधी कधी येई. त्यावर तरंगणारे किडे पाहिले की, सारी भूक कुठल्याकुठे नाहीशी होई आणि त्या भुकेल्यापोटी निर्माण झालेला राग अधिकाऱ्यांना खाऊ की गिळू असे स्वरूप धारण करी.

वरळीच्या तुरुंगात आल्यावर अन्नाबाबतच्या तक्रारी कायमच्या मिटल्या नाहीत तरी त्यांचे प्रमाण पुष्कळच कमी झाले. पण वाईट अन्नामुळे जेवण नाकारण्याचे प्रसंग फारसे आले नाहीत, तरी अन्य तक्रारींचा परिणाम अनेकदा सामुदायिकरीत्या जेवण नाकारण्यात होत असे. मी व्यक्तिशः जेवण नाकारण्याला संमती देत नसे. एखाद्या स्थानबद्धाचा काही अपमान झाला की सर्वांनी जेवण नाकारायचे व तेही एक वेळेपुरते. हे जेवण नाकारून त्या अन्यायाबद्दल सविस्तर तक्रार नोंदविली की स्थानबद्धांच्या संतापाचा पारा खाली येत असे. त्या तक्रारीचे निवारण पूर्णतः होत नसे.

एकदा असेच सर्वांनी उपोषण करून एका अन्यायाबाबत तुरुंगाधिकाऱ्यांकडे निषेधपत्र पाठविले. "आम्ही आमचे एक वेळचे जेवण नाकारून हे निषेधपत्र पाठवीत आहो" असे त्या अर्जात म्हटले होते. तुरुंगाचे अधिकारी हे नैतिक मूल्ये जाणणारे नसतात. 'छोडो भारत' हा ब्रिटिश राजवटीबरोबरचा अखेरचा लढा सुरू झाल्यावरही पोटाची खळगी भरण्यासाठी ब्रिटिश सरकारची नोकरी नि तीही स्वातंत्र्य सैनिकांना अटकेत ठेवण्याची ते करीत होते. अशांना उपाशी राहून केलेल्या निषेधाची कितपत तमा वाटणार होती हे स्पष्टच होते! उपास करूनही शेवटी लेखी निषेध-

पत्रच सादर करायचे तर ते जेवून केले म्हणून काय बिघडले, अशी माझी भूमिका होती आणि म्हणून त्या सामुदायिक निषेधपत्रावर सही न करता मी माझा स्वतंत्र तक्रारअर्ज धाडला. अशा अर्जांची गत अनेकदा ते फाडले जाण्यातच होत असे.

ठाण्याच्या तुरुंगात स्थानबद्धांची संख्या बेताची असल्याने सामुदायिक जेवणाखाण्याचे प्रसंग वारंवार येत. वरळीला तसे फारसे घडले नाही. तिथे विविध गटांचे जणू एक संघराज्य निर्माण झाले होते. तीन चाळींचे स्थूल-मानाने तीन आणि चाळीच्या आत पुन्हा पोटभेद असा प्रकार वरळीला आढळला. गरीब-श्रीमंत हा भेद राजकीय कैद्यांच्या बाबतीत तुरुंगाच्या भिंती ओलांडून आत येत असल्याने वरळीच्या तुरुंगातही तो आढळला. एक चाळच मुळी बड्यांची, मोठ्यांची म्हणून ओळखली जाई.

अशाही परिस्थितीत विवक्षित गटांची सामुदायिक जेवणे मधून मधून होत. आमच्या चाळीत आम्ही एकदा असेच एक एकत्र जेवण केले. तुरुंगाचा नेहमीचा भत्ता ज्याला त्याला मिळालाच. त्या भत्त्याला पूरक म्हणून आम्ही केळ्यांच्या शिकणीचा बेत केला होता. बारा डझनपेक्षा अधिक हिरव्या सालीची केळी त्यासाठी आणली होती. त्या जेवणासाठी स्टोव्ह वापरण्याची परवानगी मिळविली असल्याने आणखी काही पदार्थ करणे शक्य झाले. शिकणीसाठी सर्व केळी सोलल्यानंतर चांगल्या स्थितीतील हिरव्या सालीच्या त्या ढिगाऱ्याकडे लक्ष गेले आणि कार्यकर्त्यांच्या मनात या हिरव्या सालींचाही काही उपयोग करावा असे आले. त्या साली पाण्याने स्वच्छ धुतल्या. त्यांचे बारीक तुकडे केले नि मोठ्या भांड्यात तेलाची भरपूर फोडणी करून बटाट्याच्या कापाप्रमाणे त्या परतून काढल्या. मीठ, मिरची, ओले खोबरे, कोथिंबीर यांचा भरपूर उपयोग केलेली ती केळ्यांच्या हिरव्या सालींची भाजी जेवणारांनी आवडीने, रुचीने खाल्ली. ती केळ्याच्या सालींची भाजी होती हे मागाहून सांगितले तेव्हा कार्यकर्त्यांच्या सुगरणपणाला त्यांनी धन्यवाद दिले.

वरळी तुरुंगात बाहेरच्या जगाचा संपर्क येण्याचे आणखी साधन उपलब्ध झाले. तुरुंगात कैद्यांना औषधपाणी देण्यासाठी कायम स्वरूपाचा दवाखाना

नसल्याने डॉक्टर कैद्यांची पाहणी करण्यासाठी जेव्हा जेव्हा येत तेव्हा त्यांना कैद्यात काही विशिष्ट आजार दिसून आला तर त्याला उपचारासाठी ते जे. जे. हॉस्पिटलमध्ये बोलावीत. रोज अनेक रोगी हॉस्पिटलमध्ये पोलिसांच्या गाडीतून जात आणि येत. एकदा हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तेथे त्यांच्या बाहेरच्या लोकांशी गाठीभेठी अर्थातच होत. काही स्थानबद्ध आपण अमुक वाजता हॉस्पिटलमध्ये येणार असल्याचे आपल्या घरी अगावू कळवीत व रोगावर उपचार करण्याच्या निमित्ताने घरच्या माणसांची किंवा चळवळीतील कार्यकर्त्यांची भेट घेत. हॉस्पिटलमध्ये रोगी नेण्याचा हा दुरुपयोग होत असल्याचे लक्षात आल्यावर हॉस्पिटलमध्ये जाण्यावर कडक बंधने घालण्यात आली.

मला या बंधनांतूनही एकदा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले नि तेहि दुखरा दात काढून घेण्यासाठी. पोलिसच्या गाडीतून इस्पितळात जाऊन सरकारी खर्चाने एक दात काढून घेण्याचा कार्यक्रम मी पार पाडला तेव्हा पोलिसची बंदिस्त गाडी नि बाहेरचे मोकळे वातावरण यांत किती अंतर आहे हे समजून आले. हा काढलेला दात नवा तयार करून बसविण्यासाठी मला पुन्हा तीन वेळा इस्पितळात जावे लागले. विशेष गंभीर स्वरूपाचे नसलेले दुखणे तुरुंगात सुखसोयीच्या दृष्टीने स्वागतार्ह असते, हा अनुभव चाळीस साली नासिक रोड तुरुंगात मला आला होताच.

३० सार्वजनिक पैशाचा अपहार

वरळीच्या जांबोरी मैदानाच्या बाजूस असलेल्या त्या तुरुंगाच्या चाळीतून पोलिसांच्या बंदिस्त गाडीतून जे. जे. हॉस्पिटलमध्ये जाताना जे रस्ते लागत ते पूर्वी मी कधी पाहिले नव्हते. पोलिसांच्या शेजारी बसून बंद गाडीच्या जाळीतून बाहेर बघताना जे. जे.

हॉस्पिटलच्या रस्त्याला लागेपर्यंत सारे काही मला नवीन वाटे. जे. जे. हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर परिचित ठिकाणी आल्यासारखे वाटले, तरी मोटारीतून उतरल्यावर इकडे तिकडे हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य मला नव्हते. पोलिसांच्या पहाऱ्यात मी होतो व इस्पितळातील दाताच्या विभागाकडे त्यांच्या मागून मला जायचे होते. हातात बेड्या नव्हत्या, नेहमीचा घरचा पोषाख अंगावर होता नि म्हणून त्रयस्थाला मी कैदी आहे असे वाटलेही नसेल. पण दुसऱ्याच्या वाटण्यावर आपले स्वातंत्र्य अवलंबून नसते.

मला ही परतंत्रता तेव्हा विशेष जाणवली. कारण त्या इस्पितळावरच्या तळमजल्यावर मी पोलीस पहाऱ्यांत श्री. युसूफ मेहेरअल्लींना आणल्याचे पाहात होतो. तेही कैदीच होते. तसे म्हटले तर दोघांमध्ये अंतर फार नव्हते. पण परिस्थितीचे अंतर अनुल्लंघनीय होते. इस्पितळात येणारे बरेच राजकीय कैदी बरोबरच्या पोलिस अधिकाऱ्यांशी संधान बांधून कमीअधिक स्वातंत्र्याने वागत हे मला माहीत होते. पण अशा तऱ्हेने पोलिसांजवळ संबंध जोडणे मला मानवणारे-जमणारे नव्हते.

नवीन दात बसविण्याचे काम ज्या डॉक्टरांकडे होते ते आम्हा राजबंद्यांशी फार चांगले वागत. डॉक्टरमंडळी सर्वच राजकीय कार्यकर्त्यांना चांगले वागवितात असा सर्वसाधारण अनुभव राजकीय कैद्यांना सरकारी इस्पितळातही आला. दात नवे बसविल्याने तोंडाने होणाऱ्या शब्दोच्चारांत फरक पडू शकतो असे ते म्हणाले. मात्र इष्ट फरक पडेल अशा रीतीने दातांची पुनर्रचना करायची ती कैदी या नात्याने, परस्वाधीनतेत सरकारी इस्पिळात येऊन होणे शक्य नाही, ही जाणीव त्यांना होती व तसे त्यांनी बोलूनही दाखविले.

तुरुंगांतून इस्पितळात व इस्पिळातून परत तुरुंगांत हा सारा प्रवास व मधला इस्पितळातील वेळ मिळून चार-पाच तास तुरुंगाबाहेर काढायला या दाताच्या दुखण्यामुळे मिळत असत. परत बरळीच्या चाळीत आल्यावर बाहेर काय काय पाहिले याची माहिती ऐकण्यास आतील सहकारी उत्सुक असत. जे डॉक्टरांचे निमित्त करून इस्पितळात आपल्या आप्तेष्टांना भेटायला जात त्यांच्याकडून अशी माहिती भरपूर येई.

तुरुंगात भांडणांना कधीच तोटा नसे. भांडणे जशी आपापसात क्षुल्लक कारणावरून होत तशीच ती तुरुंगाधिकाऱ्यांबरोबर काही तात्त्विक मुद्यावरून होत. गंमत ही की, क्षुल्लक भांडणावरून आपापसात भांडणारे, अबोला धरणारे सारे तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी भांडावयाचा प्रसंग उद्‌भवला की एक होत असत. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी जे खटके होत त्यांपैकी बरेचसे राजकीय कैद्यांचा स्वाभिमान डिवचला गेल्यामुळे होत. वाईट प्रकारचे अन्न पुरविल्यामुळे अनेकदा झगडे झाले. कित्येक वेळा स्थानबद्धांनी जेवण न घेता आलेले अन्न परत धाडले. कच्च्या चपात्या आणि न निवडलेल्या डाळीचे वरण कधी कधी येई. त्यावर तरंगणारे किडे पाहिले की, सारी भूक कुठल्याकुठे नाहीशी होई आणि त्या भुकेल्यापोटी निर्माण झालेला राग अधिकाऱ्यांना खाऊ की गिळू असे स्वरूप धारण करी.

वरळीच्या तुरुंगात आल्यावर अन्नाबाबतच्या तक्रारी कायमच्या मिटल्या नाहीत तरी त्यांचे प्रमाण पुष्कळच कमी झाले. पण वाईट अन्नामुळे जेवण नाकारण्याचे प्रसंग फारसे आले नाहीत, तरी अन्य तक्रारींचा परिणाम अनेकदा सामुदायिकरीत्या जेवण नाकारण्यात होत असे. मी व्यक्तिशः जेवण नाकारण्याला संमती देत नसे. एखाद्या स्थानबद्धाचा काही अपमान झाला की सर्वांनी जेवण नाकारायचे व तेही एक वेळेपुरते. हे जेवण नाकारून त्या अन्यायाबद्दल सविस्तर तक्रार नोंदविली की स्थानबद्धांच्या संतापाचा पारा खाली येत असे. त्या तक्रारीचे निवारण पूर्णतः होत नसे.

एकदा असेच सर्वांनी उपोषण करून एका अन्यायाबाबत तुरुंगाधिकाऱ्यांकडे निषेधपत्र पाठविले. "आम्ही आमचे एक वेळचे जेवण नाकारून हे निषेधपत्र पाठवीत आहो" असे त्या अर्जात म्हटले होते. तुरुंगाचे अधिकारी हे नैतिक मूल्ये जाणणारे नसतात. 'छोडो भारत' हा ब्रिटिश राजवटीबरोबरचा अखेरचा लढा सुरू झाल्यावरही पोटाची खळगी भरण्यासाठी ब्रिटिश सरकारची नोकरी नि तीही स्वातंत्र्य सैनिकांना अटकेत ठेवण्याची ते करीत होते. अशांना उपाशी राहून केलेल्या निषेधाची कितपत तमा वाटणार होती हे स्पष्टच होते! उपास करूनही शेवटी लेखी निषेध-

पत्रच सादर करायचे तर ते जेवून केले म्हणून काय बिघडले, अशी माझी भूमिका होती आणि म्हणून त्या सामुदायिक निषेधपत्रावर सही न करता मी माझा स्वतंत्र तक्रारअर्ज धाडला. अशा अर्जाची गत अनेकदा ते फाडले जाण्यातच होत असे.

ठाण्याच्या तुरुंगात स्थानबद्धांची संख्या बेताची असल्याने सामुदायिक जेवणाखाण्याचे प्रसंग वारंवार येत. बरळीला तसे फारसे घडले नाही. तिथे विविध गटांचे जणू एक संघराज्य निर्माण झाले होते. तीन चाळींचे स्थूल-मानाने तीन आणि चाळीच्या आत पुन्हा पोटभेद असा प्रकार बरळीला आढळला. गरीब-श्रीमंत हा भेद राजकीय कैद्यांच्या बाबतीत तुरुंगाच्या भिंती ओलांडून आत येत असल्याने बरळीच्या तुरुंगातही तो आढळला. एक चाळच मुळी बड्यांची, मोठ्यांची म्हणून ओळखली जाई.

अशाही परिस्थितीत विवक्षित गटांची सामुदायिक जेवणे मधून मधून होत. आमच्या चाळीत आम्ही एकदा असेच एक एकत्र जेवण केले. तुरुंगाचा नेहमीचा भत्ता ज्याला त्याला मिळालाच. त्या भत्त्याला पूरक म्हणून आम्ही केळ्यांच्या शिक्रणीचा बेत केला होता. बारा डझनपेक्षा अधिक हिरव्या सालीची केळी त्यासाठी आणली होती. त्या जेवणासाठी स्टोव्ह वापरण्याची परवानगी मिळविली असल्याने आणखी काही पदार्थ करणे शक्य झाले. शिक्रणीसाठी सर्व केळी सोलल्यानंतर चांगल्या स्थितीतील हिरव्या सालीच्या त्या ढिगाऱ्याकडे लक्ष गेले आणि कार्यकर्त्यांच्या मनात या हिरव्या सालींचाही काही उपयोग करावा असे आले. त्या साली पाण्याने स्वच्छ धुतल्या. त्यांचे बारीक तुकडे केले नि मोठ्या भांड्यात तेलाची भरपूर फोडणी करून बटाट्याच्या कापाप्रमाणे त्या परतून काढल्या. मीठ, मिरची, ओले खोबरे, कोथिंबीर यांचा भरपूर उपयोग केलेली ती केळ्यांच्या हिरव्या सालींची भाजी जेवणारांनी आवडीने, रुचीने खाल्ली. ती केळ्याच्या सालींची भाजी होती हे मागाहून सांगितले तेव्हा कार्यकर्त्यांच्या सुगरणपणाला त्यांनी धन्यवाद दिले.

बरळी तुरुंगात बाहेरच्या जगाचा संपर्क येण्याचे आणखी साधन उपलब्ध झाले. तुरुंगात कैद्यांना औषधपाणी देण्यासाठी कायम स्वरूपाचा दवाखाना

नसल्याने डॉक्टर कैद्यांची पाहणी करण्यासाठी जेव्हा जेव्हा येत तेव्हा त्यांना कैद्यात काही विशिष्ट आजार दिसून आला तर त्याला उपचारासाठी ते जे. जे. हॉस्पिटलमध्ये बोलावीत. रोज अनेक रोगी हॉस्पिटलमध्ये पोलिसांच्या गाडीतून जात आणि येत. एकदा हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तेथे त्यांच्या बाहेरच्या लोकांशी गाठीभेठी अर्थातच होत. काही स्थानबद्ध आपण अमुक वाजता हॉस्पिटलमध्ये येणार असल्याचे आपल्या घरी अगावू कळवीत व रोगावर उपचार करण्याच्या निमित्ताने घरच्या माणसांची किंवा चळवळीतील कार्यकर्त्यांची भेट घेत. हॉस्पिटलमध्ये रोगी नेण्याचा हा दुरुपयोग होत असल्याचे लक्षात आल्यावर हॉस्पिटलमध्ये जाण्यावर कडक बंधने घालण्यात आली.

मला या बंधनांतूनही एकदा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले नि तेहि दुखरा दात काढून घेण्यासाठी. पोलिसच्या गाडीतून इस्पितळात जाऊन सरकारी खर्चाने एक दात काढून घेण्याचा कार्यक्रम मी पार पाडला तेव्हा पोलिसची बंदिस्त गाडी नि बाहेरचे मोकळे वातावरण यांत किती अंतर आहे हे समजून आले. हा काढलेला दात नवा तयार करून बसविण्यासाठी मला पुन्हा तीन वेळा इस्पितळात जावे लागले. विशेष गंभीर स्वरूपाचे नसलेले दुखणे तुरुंगात सुखसोयीच्या दृष्टीने स्वागतार्ह असते, हा अनुभव चाळीस साली नासिक रोड तुरुंगात मला आला होताच.

३० सार्वजनिक पैशाचा अपहार

वरळीच्या जांबोरी मैदानाच्या बाजूस असलेल्या त्या तुरुंगाच्या चाळीतून पोलिसांच्या बंदिस्त गाडीतून जे. जे. हॉस्पिटलमध्ये जाताना जे रस्ते लागत ते पूर्वी मी कधी पाहिले नव्हते. पोलिसांच्या शेजारी बसून बंद गाडीच्या जाळीतून बाहेर बघताना जे. जे.

हॉस्पिटलच्या रस्त्याला लागेपर्यंत सारे काही मला नवीन वाटे. जे. जे. हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर परिचित ठिकाणी आल्यासारखे वाटले, तरी मोटारीतून उतरल्यावर इकडे तिकडे हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य मला नव्हते. पोलिसांच्या पहाऱ्यात मी होतो व इस्पितळातील दाताच्या विभागाकडे त्यांच्या मागून मला जायचे होते. हातात बेड्या नव्हत्या, नेहमीचा घरचा पोषाख अंगावर होता नि म्हणून त्रयस्थाला मी कैदी आहे असे वाटलेही नसेल. पण दुसऱ्याच्या वाटण्यावर आपले स्वातंत्र्य अवलंबून नसते.

मला ही परतंत्रता तेव्हा विशेष जाणवली. कारण त्या इस्पितळावरच्या तळमजल्यावर मी पोलीस पहाऱ्यांत श्री. युसूफ मेहेरअल्लींना आणल्याचे पाहात होतो. तेही कैदीच होते. तसे म्हटले तर दोघांमध्ये अंतर फार नव्हते. पण परिस्थितीचे अंतर अनुल्लंघनीय होते. इस्पितळात येणारे बरेच राजकीय कैदी बरोबरच्या पोलिस अधिकाऱ्यांशी संधान बांधून कमीअधिक स्वातंत्र्याने वागत हे मला माहीत होते. पण अशा तऱ्हेने पोलिसांजवळ संबंध जोडणे मला मानवणारे-जमणारे नव्हते.

नवीन दात बसविण्याचे काम ज्या डॉक्टरांकडे होते ते आम्हा राजबंद्यांशी फार चांगले वागत. डॉक्टरमंडळी सर्वच राजकीय कार्यकर्त्यांना चांगले वागवितात असा सर्वसाधारण अनुभव राजकीय कैद्यांना सरकारी इस्पितळातही आला. दात नवे बसविल्याने तोंडाने होणाऱ्या शब्दोच्चारांत फरक पडू शकतो असे ते म्हणाले. मात्र इष्ट फरक पडेल अशा रीतीने दातांची पुनर्रचना करायची ती कैदी या नात्याने, परस्वाधीनतेत सरकारी इस्पिळात येऊन होणे शक्य नाही, ही जाणीव त्यांना होती व तसे त्यांनी बोलूनही दाखविले.

तुरुंगांतून इस्पितळात व इस्पिळातून परत तुरुंगांत हा सारा प्रवास व मधला इस्पितळातील वेळ मिळून चार-पाच तास तुरुंगाबाहेर काढायला या दाताच्या दुखण्यामुळे मिळत असत. परत वरळीच्या चाळीत आल्यावर बाहेर काय काय पाहिले याची माहिती ऐकण्यास आतील सहकारी उत्सुक असत. जे डॉक्टरांचे निमित्त करून इस्पितळात आपल्या आप्तेष्टांना भेटायला जात त्यांच्याकडून अशी माहिती भरपूर येई.

ही माहिती पुष्कळशी बड्या राजबंद्यांच्या घरच्या व्यवहाराची, धंद्या-बाबतची असे. क्वचित कोणी बाहेरच्या राजकारणात भाग घेणाऱ्या कार्य-कर्त्यांची मुलाखत घेत असे व अशी मुलाखत झाली म्हणजे आम्हाला हकीकत ऐकण्यात विशेष रस वाटे.

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. कार्यकर्ता, मग तो कोणत्याही पक्षाचा असला तरी, त्याच्याबद्दल कमीअधिक आदर सर्वांनाच वाटतो. बेचाळीस सालच्या लढ्यात अटक झालेल्यांबद्दल ही आदराची भावना विशेषच वाढली होती. कारण भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी महात्मा गांधींनी पुकारलेला हा अखेरचा अंतिम लढा होता. या लढ्यात भाग घेणारा काँग्रेस संघटनेचा सदस्य असलाच पाहिजे असे बंधन नव्हते. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात सत्याग्रहींची यादी खुद्द महात्माजी मंजूर करीत. १९४२ साली ८ ऑगस्टला त्यांनी सर्व भारतीयांना 'तुम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक आहा' असेच समजून वागण्याचा आदेश दिला. असंख्य लोकांनी तो तंतोतंत पाळला. पण त्यामध्येही काही गणंग निघालेच. पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकीला विठ्ठलाच्या दर्शनास जमलेल्यात सगळेच काही विठ्ठलाचे खरे भक्त नसतात. त्या वारकऱ्यांच्या मेळाव्यात काही अर्थलाभाच्या हेतूने आलेलेही असतात व ते खिसेकापूचा वाटमारीचा उद्योग चालूच ठेवतात. भारताच्या या स्वातंत्र्य लढ्यात तुरुंगात आलेल्यांमध्ये असेही काही हरीचे लाल होते की जे स्वातंत्र्यसंग्रामाच्या पेटलेल्या त्यागवन्हीतील निखाऱ्यावर आपल्या स्वार्थाच्या विड्या पेटवीत होते. 'भारत छोडो' चळवळीला जे भूमिगत स्वरूप आले, त्यामुळे या चळवळीसाठी असंख्य लोकांनी आपली थैली मोकळी करून, कार्यकर्त्यांनी मागितले तेवढे पैसे त्यांच्या स्वाधीन केले. या पैशाचा हिशेब ठिशेब साराच भूमिगत असे. ज्याच्या हातात पैसा टाकला त्याची दानत हीच दात्याला मिळालेली पावती. या साऱ्या पैशाचा शंभर टक्के विनियोग स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी झाला नाही. या पैशाचा बराचसा भाग काही अप्रामाणिक कार्यकर्त्यांनी स्वतःसाठी वापरला. ज्यांच्या ज्यांच्या खाचरात हे सार्वजनिक पैशाचे पाणी मुरले होते त्यांच्या अपकृत्यांना तुरुंगात वाचा फुटली होती.

साधारणपणे तुरुंगात सर्वच एकत्र खेळीमेळीने वागत. काही गट

तयार होत पण ते विशिष्ट विचारसरणीचे. गरीब-श्रीमंत राहणीचे असेही गट तुरुंगात प्रवेश करीतच. ते बाहेरच्या समाजाचे आतील प्रतिबिंब समजले जाई. पण भूमिगत कार्यात बाहेरच्या जगात एकमेकांच्या हातात हात घालून वागलेले कार्यकर्ते तुरुंगात आल्यावर त्यांच्यातहि गट निर्माण झाले याचे मला जरा नवल वाटले. पुढे पुढे अधिक माहिती कळल्यावर ते नवल तर नाहीसे झालेच, पण उलट मन खिन्न झाले, विषाद वाटला. भूमिगत कार्य करणारांपैकी काहीनी त्यांना त्या कार्यासाठी मिळालेल्या पैशांचा दुरुपयोग केला होता. पैसे नुसते अनाठायी वापरले असते, कार्यासाठी आवश्यकतेपेक्षा अनभिज्ञतेने जास्त खर्च केले असते तर त्याबद्दल विशेष काही वाटले नसते. पण काहीनी त्या सार्वजनिक पैशाचा चक्क अपहार केला होता. ज्यांच्या हातांत पैसे होते व ज्यांनी ते खर्च केल्याचे सांगितले असे सर्वजण तुरुंगात आल्यावर या अपहाराची वार्ता घटकर्णी झाली. राजकीय कार्यकर्त्यांवरील आरोपाप्रत्यारोपांचे पीक यानंतर बरेच आले. काही लोकांभोवतालचे वातावरण संशयाने भरून गेले. स्वातंत्र्यलढ्यातील ज्यांच्या साहसाच्या कथांनी मनावर चांगला परिणाम केला होता त्यांच्या चांगुलपणाला चांगलेच तडे गेले. चकाकते ते सारे सोने नव्हे, याचा प्रत्यय आला नि मन उद्विग्न झाले. भाग्याची गोष्ट एकच की, असे प्रकार फार थोडे होते. पण म्हणूनच त्यांची वाच्यता जास्त होत असे.

सार्वजनिक पैशाचा अपहार केल्याचा ज्यांच्यावर अंदेशा येई त्यांना राजबंदींच्या मेळाव्यात मानाचे स्थान कधीच मिळत नसे. पण या साऱ्या भूमिगत आंदोलनात कोणाचे नाव घेऊन पैसे खाल्ल्याचा आरोप जाहीरपणे कधीच होत नसे. साराच मामला भूमिगत असल्याने बिनतोड पुरावा सादर करणे कठीण हेच त्याचे कारण असावे !

माझ्या मनाला सतत खटकत राहणारी एक घटना या वरळीच्या तुरुंगात घडली. मी स्वतः सांगूनही कोणाला खरी न वाटणारी अशी ती घटना होती. मी एका मोठ्या मुलाच्या गालावर माझी चार बोटे उमटवली होती !

तो सारा इतिहास तुरुंगाच्या वातावरणाचा एक भाग होता अनेक तरुण मुले या लढ्यात आघाडीवर होती. मिरवणुका काढणे, आक्षेपार्ह

पत्रके वाटणे इथपासून तो स्फोटक द्रव्यांची ने आण करणे, भूमिगत नेत्यांचा बाहेरच्या जगाशी संबंध चालू ठेवणे, ही कामे तरुणांनी केली होती. अशा धाडसी युवकांपैकी एकजण आमच्या मंडळीत आला होता. सर्वांशी बरोबरीने वागणे, हसतखिदळत राहणे आणि जेलमध्ये जितक्या आनंदात वावरता येईल तितक्या मजेत हिंडणे फिरणे हे त्यांचे कार्यक्रम असत. तुरुंगातील वातावरणात वयाचा फरक हा सहसा जाणवत नाही. सर्वच सर्वांशी बरोबरीच्या नात्याने वागतात. या नियमाला अपवाद असलेले आपल्या खोल्यांत बसून वाचन करीत किंवा चरख्यावर सूत कातीत. अशा या वातावरणात कोणाच्या डोक्यावर टप्पल मार, कोणाच्या पोटावर टिचकी दे असे याचे उद्योग चालत. हे सारे प्रकार गंमतीचे म्हणून सहन केले जात. पण गमतीतही काही मर्यादा असते. लहान थोर वयोमर्यादा न पाहता आणि फाजील प्रमाणावर केलेल्या या गमतीला अनेकजण कंटाळले होते. पण मुलाला सांगावे कोणी आणि कसे !

एके दिवशी दुपारी हे कसे आणि कोणी सांगावे हा प्रश्न आकस्मिकपणे सुटला. दुपारचे जेवण झाल्यानंतर काही काळ वामकुक्षी करणे हा तुरुंगातील वेळ घालवण्याचा आरोग्यदायक नियम मी बहुधा पाळीत असे. नाशिकच्या चौदा महिन्याच्या 'ब' वर्गाच्या तुरुंगवासात अंगवळणी पडलेली ही सवय ठाणा-वरळीच्या स्थानबद्धतेत पुन्हा सुरू झाली होती. दुपारी झोपेतून उठल्यावर मी हातात पाण्याने भरलेले टमरेल घेऊन संडासाकडे चाललो होतो. मागा-हून तो खेळकर वृत्तीचा युवक आला व थट्टा म्हणून त्याने माझ्या डाव्या हातातील भांड्यावर हात मारला. भांडे खाली पडले. त्या सिमिटच्या चाळीतील दुसऱ्या मजल्यावर ते भांडे पडल्याचा आवाज मोठा झाला. पुढे काय घडत आहे याची जाणीव होण्याच्या आतच माझ्या डाव्या हाताची बोटे त्या युवकाच्या गालावर उमटली. साराच प्रकार अनपेक्षित होता. तो युवक बाजूच्या खोलीत जाऊन बसला. भांड्याच्या आवाजाने शेजारच्या खोलीतील कार्यकर्ते, सहकारी बाहेर आले. पण झाला प्रकार पाहून तेही पुन्हा आत गेले.

मला कमालीचे वाईट वाटले. " काय केलं मी हे ! " असे माझे मन

मला विचारू लागले. झोपेतून उठल्यावर, अर्धवट झोपेच्या सुस्तीत अनवधानाने, पूर्वी कधी हातून न घडलेला प्रकार घडला होता. मला विशेष वाईट वाटण्याचे कारण त्या मुलाला वडील नव्हते. माझे मन मला एकसारखे खाऊ लागले. त्या मुलाच्या निकटवर्ती सहकाऱ्यांत जे वयाने मोठे व तुरुंगातले त्याचे हितकर्ते होते त्यांच्याकडे मी गेलो व म्हटले, "मला त्या मुलाची माफी मागायची आहे. तुम्ही सांगाल तशी माफी लिहून देतो."

त्यांना सारा प्रकार कळला होता. तो मुलगा त्यांना अधिक परिचित होता. प्रेमळ, भावडा पण लाडावलेला. सांगाल ते काम करणारा पण वडीलधाऱ्या माणसांच्या वडीलपणाची बूज न ठेवणारा असा होता तो. त्याला कशी तरी थोडी जरब बसणे जरूर आहे असे त्यांना वाटत होते. माझी आपणहून माफी मागण्याची तयारी पाहताच "तशी माफी मागण्याचे काहीच कारण नाही. तुमच्या चपराकीचा त्या मुलावर चांगला परिणाम होण्याची शक्यता आहे, तुम्ही म्हणता तशी माफी मागितली तर परिणाम होणार नाही! तरी माफी मागण्याचा हा विचार सोडून द्या." असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले.

या प्रकरणाची पुढे वाच्यता झाली नाही आणि मला आनंदाची नि समाधानाची वाटणारी गोष्ट म्हणजे त्या मुलाचे नि माझे संबंध पूर्ववत् चांगले खेळीमेळीचे राहिले.

३१ कलकलाटास मन विटले

वरळीच्या तुरुंगात ठाण्याच्या तुरुंगासारखी चटकन एकमेकांना भेटण्याची सोय नव्हती. याचा अर्थ तेथे चौक्यापहारे जास्त होते नि आत पोलिसांचा जाच होता असा नाही. जी अडचण होती ती वरळीच्या चाळीतील निवास पद्धतीची.

या चाळी दोन मजली नि एकेका खोलीच्या होत्या. दोन खोल्यांमध्ये सामायिक रस्ता. एका खोलीत तीन चार स्थानबद्ध असत. दहा-बारा माणसांना खेळीमेळीने एकत्र बसायला, जमायला तेथे पटांगण असले तरी त्या पटांगणात जाण्यासाठी जिना उतरावा लागे. पटांगणात झाडझुडुप काही नसल्याने ते उजाड भासे. चटकन समोरच्या चाळीतील माणसाला हाका मारून बोलावणे शक्य नसे. ठाण्याच्या तुरुंगातील यार्डात यापेक्षा अधिक मोकळेपणा सकाळ संध्याकाळ वाटे. वरळीच्या दोन चाळींमधील जागेत सायंकाळी प्रत्येक चाळीचा तळमजला, पहिला व दुसरा मजला यात राहणारे सर्वच खाली येत असल्याने सहजच गर्दी होई. अंधार पडल्यावर अंगणात हिंडता फिरता येत नसे. ठाणे तुरुंगात रात्री देखील यार्डात हिंडता येत असल्याने मोकळे वाटे.

ठाण्याहून वरळीला आल्यावर एका मोठ्या पिंजऱ्यात अडकल्यासारखेच झाले होते. निवांतपणा गेला होता. अशाही अवस्थेत काही अभ्यास वर्ग सुरू झाले होते. वकिलीचा अभ्यास अर्धवट टाकून तुरुंगात आलेल्या एका स्थानबद्धाने कायद्याची जाडजूड पुस्तके वाचण्यास सुरुवात केली होती. रिकाम्या वेळाचे काय करावे हा तुरुंगात मोठा यक्षप्रश्न असतो. महात्मा गांधींनी राजकीय कार्यकर्त्यांना चरखा फिरवून सूत कातण्याची दीक्षा दिली. त्यामुळे तुरुंगात गेल्यावर सक्तमजुरीची शिक्षा नसल्यास राजकीय कैद्याचा वेळ कारणी लागू शकतो, असे १९४० साली नाशिकच्या तुरुंगात दिसून आले होते. कारण त्या वैयक्तिक सत्याग्रहात आलेल्या बहुतेक सर्वांजवळ पेटीचरखा असे व रिकाम्या वेळी ते सूत कातीत असत.

वरळीला सूत कातणारे अल्पसंख्य होते. बहुतेक सारे गप्पासप्पा नि थोडेफार वाचन यात वेळ घालवीत. काही स्थानबद्धांनी एकत्र बसून ज्ञानेश्वरी वाचनाचा उद्योग सुरू केला होता. काही आपल्यातील श्रेष्ठ कार्यकर्त्यांची बौद्धिके ठरवून ती ऐकत असत. पण याबाबत साऱ्या तुरुंगाला लागू पडणारा असा शिस्तबद्ध कार्यक्रम कोणताच नव्हता.

या सक्तीच्या रिकामपणातूनच रिकामटेकड्या गप्पांना ऊत येत असे. भूमिगत राहून मागाहून पकडलेले असे बरेच कार्यकर्ते वरळीच्या तुरुंगात आले

होते. ते बाहेरील आपल्या भूमिगत आंदोलनातील किस्से आपापल्या परिचित वर्तुळात ऐकवीत असत.

श्रद्धावान काँग्रेसवाले नि स्वातंत्र्यनिष्ठ 'छोडो भारतवाले' असे गट ठाण्याप्रमाणेच वरळीलाही पडले. भूमिगत राहून काहीतरी सरकारविरोधी हालचाली करून आत आलेले लोक ९ ऑगस्ट १९४२ ला धरपकड झालेल्या काँग्रेसवाल्यांना निष्क्रिय म्हणत, तर हे काँग्रेसवाले भूमिगतांना आततायी नि हिंसक समजत. भारत संरक्षण कायद्याखाली अटक झालेल्यांना आपली सुटका कधी होणार हे निश्चितपणे माहीत नसे आणि या अनिश्चितपणामुळे काहीजण बेचैन असत. आपण तुरुंगात असल्याने भारताचे स्वातंत्र्य खरोखरच जवळ येत आहे का, असा प्रश्न त्यांच्या मनात उत्पन्न झाला की, बाहेर जाण्याचे विचार त्यांच्या डोक्यात येत. ज्या कच्च्या मडक्याच्या कार्यकर्त्यांच्या डोक्यात असे विचार येत त्यांना सोडवून घेण्याची तयारी त्यांचे बाहेरचे नातेवाईक करीत. ही तयारी म्हणजे "छोडो भारत आंदोलनात भाग घेण्याची माझ्याकडून चुकी झाली व मला सोडल्यास मी पुन्हा या आंदोलनात भाग घेणार नाही" असे सरकारला लिहून देणे! ठाणे तुरुंगात बेचाळीसचे आंदोलन ऐन भरात असताना एकाने अशा प्रकारची माफी देऊन सुटका करून घेतली तेव्हा आमच्या यार्डात फार अस्वस्थता माजली होती. तसाच प्रसंग वरळीच्या चाळीतही घडला. पेणच्या काही स्थानबद्धांनी माफी मागून आपली सुटका करून घेण्याचा विचार चालविला असल्याची कुणकुण चाळीतील स्थानबद्धांना लागताच त्यांनी प्रसंगी त्यांच्या वाटेत आडवे पडून त्यांना जाऊ द्यायचे नाही, असा बेत आखला. पण माफी मागून जाताना होणारी अप्रतिष्ठा सहन करूनही पेणच्या त्या लोकांनी आपली सुटका करून घेतलीच. असा एखादा प्रकार घडला की तीन चार दिवस त्या घटनेच्या धाग्यादोऱ्यांचा उकल संबधित राजबंद्यांत होत असे.

माणसाच्या जीवनात अनेक गोष्टींना कमीअधिक महत्त्व असते. या गोष्टींपैकी आहाराला व खाद्यपेयाच्या वस्तूंना पहिले स्थान द्यावे लागेल. तुरुंगाचे तुरुंगपण ज्या अनेक कारणावर आधारलेले असते त्यात निकृष्ट दर्जाचे नि

अपुरे अन्न हेही एक कारण आहे. स्थानबद्ध कैद्यांना आहाराबाबत बऱ्याच सवलती असत. घरचे अन्न तुरुंगात आणता येई. अर्थात या सवलतीचा फायदा सगळ्यांना घेता येत नसे. घरची सुस्थिती असलेल्यांनाच तो घेता येई.

खुद्द मुंबईचे जे स्थानबद्ध होते त्यांना मधून मधून घरच्या भेटी येत. आमच्यात एक डॉक्टर होते. त्यांचे नुकतेच लग्न झालेले होते. त्यांना घरून येणाऱ्या भेटीचे आणि त्याहीपेक्षा त्या भेटीबरोबर येणाऱ्या पत्राचे फार कौतुक वाटायचे. त्यांच्या भेटीतील पत्र त्यांच्या स्वाधीन करून त्या पत्राबरोबरच्या खाद्यपेयांचा समाचार त्यांचा मित्रपरिवार नियमाने घेत असे. प्रेमपत्रे अगर जिव्हाळ्याने अंतःकरण मोकळी केलेली पत्रें ही वास्तविक ज्याला ती येतात ती आपली आपणच वाचतो व मनात उल्हसून जातो. सहसा दुसऱ्याच्या हाती ती तो देत नाही, पण तुरुंगाच्या वातावरणात हीही पत्रे मित्रपरिवारात फिरत रहात.

राजकीय कार्यकर्ते तुरुंगात गेले की त्यांचे सारे चिंतनविषय राजकीय स्वरूपाचे असतात असे मुळीच नसते. 'आपण केवळ स्वातंत्र्याचा लढा म्हणूनच आंदोलनात उडी घेतली. यापुढे आपला आणि राजकारणाचा संबंध येणार नाही' असे आपल्या मनातले विचार मोकळेपणाने बोलून दाखविणारे स्थानबद्ध अनेक होते. अशांचे तुरुंगातील दिवस एखाद्या व्रती राष्ट्रसेवकापेक्षा निराळे असावे यात काही आश्चर्य नव्हते. विडी–सिगरेट तर काही मंडळी हमेशा ओढीत. अधून मधून होणाऱ्या सामुदायिक राष्ट्रीय स्वरूपाच्या कार्यक्रमांना हजर रहात. पण स्थानबद्धांपैकी काही कार्यकर्ते स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळातील कार्यकर्त्यांचे कर्तव्य यासंबंधी जेव्हा चर्चा करीत व बाहेर गेल्यानंतरचा आपला कार्यक्रम काय रहावा याचा विचार करीत तेव्हा ही स्वातंत्र्य आंदोलनाच्या लाटेबरोबर आलेली मंडळी घरून कोणकोणती पक्वान्ने पुढच्या आठवड्यात मागवायची या चर्चेत दंग झालेली आढळत. चार–आठ दिवसांनी नित्य नवे खाद्यपदार्थ त्यांच्यासाठी बाहेरून येत. असा पदार्थ एकदा आत आला की बहुधा तो विशिष्ट मित्रमंडळींच्या सामायिक मालकीचा बने. अशी अनेक पक्वान्ने मला वरळी तुरुंगात मिळाली. त्यापैकी 'निनाव' या नावाने ओळखला जाणारा गोड खाद्यपदार्थ माझ्या आठवणीत चांगलाच राहिला!

सारे काही अस्थिर आहे, माणूस एका ठिकाणी सातत्याने रहात नाही याचा अनुभव मला तीस सालच्या अल्प मुदतीच्या शिक्षेच्या कालात आला तसाच तो या बेचाळीसच्या आंदोलनातही आला. ठाण्यास शिक्षेचे काही महिने काढल्यावर माझी बदली वरळीला झाली. वरळी तुरुंगाचा अजबखाना आरंभी रुचिपालट म्हणून बरा वाटला तरी पुढे तेथील स्थानबद्धांच्या वागणुकीत दिसून येणारा भेदभाव, तुरुंगात लाभणाऱ्या शांततेचा पूर्ण अभाव, चाळीतील तो उकाडा नि रात्री होणारा ढेकणांचा त्रास यामुळे हे या मुंबईतील तुरुंगाचे वैभव पाहून येथून दुसरीकडे जाण्यास मिळेल तर बरे असे वाटू लागले.

वरळीला मुंबईतील नव्या दमाच्या कार्यकर्त्यांच्या ओळखी झाल्या. ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रात मोडत असल्याने मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या, तसेच मुंबईच्या काँग्रेस समाजवादी पक्षकार्यकर्त्यांचा नि माझा परिचय फारसा नव्हताच. आमचे राजकीय सगेसोयरे पुण्यास राहणारे. वरळीच्या वास्तव्यामुळे मुंबईच्या कार्यकर्त्यांची, तसेच पेण, रोहा, पनवेल, कर्जत या भागांतील कार्यकर्त्यांची ओळख झाली. पण तुरुंगात रोज तीच तीच माणसे महिनेन् महिने सतत डोळ्यांपुढे असल्यावर काही बदल होईल तर बरे, असे आपोआपच वाटू लागते. मला तसे वाटू लागले. आणि मग हा बाहेर घडत असलेल्या हालचालीचाच पडसाद होता असे लौकरच दिसून आले.

वरळीच्या चाळीतील स्थानबद्धांची संख्या कमी करण्याचा हुकूम आल्याने ठाण्याहून वरळीला आलेल्यांना पुण्याच्या येरवडा तुरुंगात पाठविण्याचे ठरत होते. येरवड्यास जाणाऱ्यांच्या नावांच्या याद्या तयार होत होत्या. पुन्हा ठाण्यास आलेल्या अनुभवांची पुनरावृत्ती होत होती. वरळीला असल्यामुळे ज्यांना घरच्या माणसांचे दर्शन घडत होते, घरचे डबे उघडता येत होते ते साहजिकच पुण्याला जाण्यास तयार नव्हते. अशा हितसंबंधीयांनी आपली नावे येरवडा तुरुंगात जाणारांच्या यादीत असणार नाहीत अशी व्यवस्था केली! मला मुंबईत काय अगर इतर कुठेच काय, म्हणण्यासारखे हितसंबंध नव्हते आणि तसे असते तरी ते टिकवून

धरण्यासाठी विनंती-अर्जाचा मार्ग मी स्वीकारला असताच असेही नाही. अखेर येरवड्यास जाणारांच्या यादीत माझे नाव दाखल झाले.

येरवड्यास जाण्याचे ठरताच बरळी तुरुंगात चैतन्य आल्याचा मला तरी भास झाला. ओळखीच्या मित्रांचे निरोप घेणे, त्यांना पुन्हा न विसरता भेटण्याच्या आणाभाका होणे, काही अडीअडचणी आल्यास मदतीचे आश्वासन देणे-घेणे हा सोहळा तीन-चार दिवस चालला होता. अशा प्रसगीं मागे राहणारे जाणाऱ्यांना चहापार्टीही देत असत. तसे म्हटले तर तुरुंगात रोज सकाळ-संध्याकाळ चहापार्टीच असे. कारण चहापान हे सामुदायिक होत असे. पण खास चहापार्टी ही विवक्षित गटापुरती मर्यादित असावयाची.

बरळीहून निघताना जे सामान होते ते सारे एकत्र करून बांधून पोलिसांच्या ताब्यात दिले. पुस्तके बरोबर घेतली. आम्हांला पोलिसांच्या मोठ्या मोटारीतून भायखळा स्टेशनवर आणून तेथे आगगाडीत पोलीस पहाऱ्यात बसविण्यात आले. परत एकदा प्रवासाची अवीट गोडी चाखायला मिळाली होती. 'छोडो भारत' आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिक म्हणून पोलीस पहाऱ्यातून प्रवास करताना जनता आपल्याकडे आदराच्या भावनेने पहात आहे हे दिसून येताच तुरुंगवासाचे व भोगलेल्या हालअपेष्टांचे चीज होत आहे असे समाधान वाटे. स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतल्याची बिदागी जनता साभार नजरेने देत असलेली पहाणे हे एक मोठे भाग्याचे लक्षण आहे. या भाग्याचे आम्ही धनी झालो होतो. निरपेक्ष सेवा करणारांबद्दल जनता नेहमीच कृतज्ञतेची भावना बाळगीत असते व संधी मिळताच ही भावना व्यक्त होते. साऱ्या मानसन्मानात जनतेचा हा कृतज्ञतेच्या भावनेचा मूक आविष्कार सर्वश्रेष्ठ आहे. या आविष्काराचा साक्षात्कार ज्यांच्या आयुष्यात घडला व ज्यांना तो प्रतीत झाला ते धन्य होत.

खडकी स्टेशनवर उतरवून आम्हांला पोलिसांच्या गाडीतून येरवडा तुरुंगाकडे नेत असताना माझे मन बारा वर्षांपूर्वीचा भूतकाळ धुंडाळू लागले. त्या वेळी मी बावरल्या मनाने येरवड्याकडे जात होतो. आता ताठ मानेने त्याच ठिकाणाकडे झेप घेत होतो. हे स्थित्यंतर बारा वर्षांतील राजकीय घडामोडींनी तसेच माझ्यात घडून आलेल्या बदलांनी झाले होते. ते

दल आर्थिक स्थैर्य वा मानसन्मान यात घडून आले नसून ध्येयप्रातीच्या निर्धारात व्यक्त झाले होते.

या खेपेस येरवडा तुरुंगाच्या उंच तटाकडे आम्हाला नेले नाही. येरवडा तुरुंगाबाहेर तंबूच्या बराकी उभारल्या होत्या तिकडे नेले. हा तात्पुरता तुरुंग येरवडा तुरुंगाचा वाढीव भाग म्हणून उभारला होता. आम्ही स्थानबद्ध होतो त्यामुळे बारा वर्षांपूर्वी येरवडा तुरुंगाच्या अरुंद दारातून आत प्रवेश करताना कैद्यांची गिनती करण्याच्या मिषाने तुरुंगाधिकाऱ्याने माझ्या मानेवर जी जोराची थप्पड मारली ती या खेपेस बसली नाही. उलट स्वागत साश्रित वदनानेच झाले. वरळीच्या चाळीतून मोकळ्या मैदानावरील तंबूच्या घरात राहण्यास आलो होतो. येथे नजरेला अटकाव करणारे तट वा इमारती आजूबाजूस नव्हत्याच. या मोकळ्या वातावरणामुळे इतके दिवस वरळीच्या सिमिटाच्या चाळीत उबगलेल्या जिवाला कितीतरी प्रसन्न वाटले !

३२ मध्यरात्री आंथरुणाजवळ विंचू

१९३० साली येरवडा तुरुंगात असताना मला पक्क्या तुरुंगातून बाहेर उभारलेल्या तंबूच्या तुरुंगात पाठविले होते त्याची आठवण आता पदोपदी होत होती. त्या वेळेला 'क' वर्ग असून सक्तमजुरीची शिक्षा होती. त्या वेळच्या कडक शिस्तीत आता पुष्कळच फरक पडला होता. या खेपेस मी स्थानबद्ध या सदराखाली कैदेत असल्याने पुष्कळच सवलती होत्या. मुळात दिवसभर काहीच काम नसे. सकाळचा चहा, दुपारचे जेवण, मधल्या वेळचा चहा व संध्याकाळचे जेवण हेच दिवसाचे मुख्य कार्यक्रम असत. बाकीचा वळ आपापल्या तबूंच्या बराकीतील स्नेहीसोबत्यांबरोबर गप्पा मारणे अगर वाचन करणे यात जात असे.

तंबूची निवासस्थाने ही तात्पुरत्या वनविहाराला योग्य वाटली तरी सतत राहण्याच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीची असल्याचा अनुभव येत होता. कैद्यांसाठी उभारलेले तंबू लांबच लांब असले तरी त्यांची दोन्ही पाखी जमिनीकडे उतरती असल्याने या तंबूत बाजूबाजूने जाताना अडचण वाटे. वडारी लोक झाडाखाली पाले उभारून राहातात त्याच प्रकारचे पण फार लांबीचे असे हे तंबू होते. तंबूच्या आतील मधल्या काठीखालून चालत जाण्याची वाट व त्या वाटेच्या दोन्ही बाजूस स्थानबद्धांचे पसरलेले बिस्तरे असा हा कापडी घराचा थाट होता. येरवड्याच्या या माळावर वाळवीचा तसाच सरपटणाऱ्या इतर कृमिकीटकांचा चांगलाच उपद्रव होता. या खेपेस माझ्या सामानात मच्छरदाणी होती. वरळीच्या तुरुंगात तिची गरज भासली नाही. पण येरवड्याच्या माळरानावर मच्छरदाणी हे मोठे संरक्षण वाटले.

रात्री आमच्या डोक्यावर शंभर पॉवरचा विद्युत दीप प्रकाशत असे. या दिव्यावर अनेक लहानमोठ्या आकाराची पाखरे झेप घेत. एवढ्या मोठ्या दिव्याच्या प्रकाशात झोप येणे पुष्कळदा कठीण होत असे. डोळ्यांना दिव्याच्या प्रकाशाचा त्रास होऊ नये म्हणून डोळ्यांवर काळ्या फडक्यांची घडी करून ती बांधून ठेवण्याचा उपक्रम अनेक जण करीत. ज्यांची अंथरुणे दिव्या पासून जरा लांबवर असत त्यांना प्रखर प्रकाशाचा एवढा त्रास होत नसे. पण ज्यांना दिव्याच्या अगदी खाली किंवा जरा बाजूला झोपावे लागे त्यांना नको हा प्रकाश असे होऊन जाई. ही भडक प्रकाशाची सोय आम्हा स्थानबद्धांची गरज लक्षात घेऊन करण्यात आली नव्हती, तर रात्री पहाऱ्यावर असणाऱ्या शिपायांना कैद्यांची गिनती करण्याला सोपे जावे, हा या प्रकाशाचा उद्देश होता.

रात्री बराकीच्या आवाराला बाहेरून कुलूप लावण्यापूर्वी व सकाळी बराकीचे आवार खुले करताना अशी दोनदा कैद्यांची गिनती होत असे. सकाळच्या गिनतीच्या वेळी बहुतेक स्थानबद्ध अंथरूणात असत. पुष्कळदा अंगावरील पांघरूण बाजूस करून पहाऱ्यावरील शिपाई त्यांची मोजदाद करीत. काही स्थानबद्धांनी येरवडा तुरुंगातून बाहेर पलायन केले असल्याने व देशात तुरुंगातून निसटून जाण्याचे बरेच प्रकार घडल्याने गिनतीबाबत

पोलीस बरेच जागरूक राहात. सकाळी काही संडासात गेलेले असत. त्यांची तेथेच बाहेरून मोजणी होई. तीस सालच्या तुरुंगात ही सकाळ संध्याकाळची गिनती बराकीतील साऱ्या कैद्यांना एका रांकेत उभे करून प्रत्येकाला अनुक्रमे एक–दोन–तीन असे उच्चारायला लावून होत असे. त्या वेळी माझ्या वाटणीचा क्रमांक उच्चारला जाताच मला मोठे काम उरकल्यासारखे वाटे. आता त्याच येरवडा तुरुंगातले हे गिनतीचे काम पहाऱ्यावरचे शिपाई आम्हा स्थानबद्धांना कसलीच तोशीस लागू न देता पार पाडीत होते. हा सारा प्रतिक्षणी बदलत असलेल्या कालाचा महिमा होता. 'कालाय तस्मै नमः'!

रात्री डोक्यावर भडक प्रकाश देणाऱ्या विजेच्या दिव्यामुळे निवांत झोप येत नसे. त्या दिव्याचा आम्हाला फार राग येई. पण एकदा माझ्या बाबतीत या दिव्याच्या प्रकाशात जन्मभर आठवण राहील अशा लाल विंचवाच्या दर्शनाचा, अंगावर शहारे उभे करणारा पण त्याच्या दंशापासून वाचविणारा प्रकार घडला आणि तेव्हापासून मी त्या प्रकाशाला धन्यवाद देऊ लागलो.

माळावरच्या या कापडी तंबूंच्या बराकी उघड्या माळरानावर उभारलेल्या असल्याने जमिनी अक्षरशः माळरानाच्या नैसर्गिक अवस्थेत पण सपाट होत्या. या जमिनीवर रात्री पसरलेले काथ्याचा अरुंद चटईचे आंथरूण सकाळी गोळा केले की पुष्कळदा अंथरूणाच्या खालच्या बाजूस पांढरी वाळवी आढळे. ती पाहताच मनात धस्स होई नि काथ्याच्या जाड चटईमुळे ही वाळवी आपल्या अंगापर्यंत पोचली नाही, हा विचार मनात येऊन जाई. अशा या भयाकुल जमिनीवर रोज अंथरूण घालताना जरा भीतीच वाटे. सारे कपडे नीट झटकून घ्यावे लागत. मच्छरदाणीच्या दोऱ्या तंबूच्या काठ्यांना बांधून मच्छरदाणीचे खाली लोंबणारे कापड आंथरूणाखाली दडपून त्या कापड-घरात झोपताना मच्छरदाणीच्या जाळीदार कापडाचे संरक्षण लाभल्याचा दिलासा वाटे.

नित्याप्रमाणे मच्छरदाणीच्या जाळीतून तंबूच्या कापडाकडे पहात डोक्यात काही विचार घोळवीत असताना एके रात्री नेहमीसारखी झोप

आली. मध्यरात्रीनंतर एकाएकी जाग आली. मच्छरदाणीतून बाहेर जमिनीकडे नजर जाताच नांगीची कमान ऐटीत वळवून उभा असलेला लाल विंचू दिसला ! मी हळूच मच्छरदाणीतून बाहेर आलो तरी जणू समाधी लागलेल्या त्या विंचवाने कसलीच हालचाल केली नाही. विंचू पाहताच मी चांगलाच घाबरलो. आजूबाजूस सर्व सहकारी झोपलेले होते. पायालगतची वहाण घेऊन त्याला मारण्याचा मला धीर होत नव्हता व विंचू आंथरुणाशी असताना झोप येणेही सुतराम् अशक्य होते.

अशा अवस्थेत काही मिनिटे गेली. शेवटी मी शेजारच्या स्नेह्याला उठविले व विंचवाकडे बोट दाखविले. त्याने न बोलता एखाद्या यांत्रिक माणसासारखी हालचाल करून आपली बाजूची वहाण हातात घेतली व माणसाच्या परिसरात येण्याचे धारिष्ट केल्याचे प्रायश्चित्त म्हणून त्या विंचवास ठार मारले.

दुसऱ्या दिवशी सकाळी विंचू मारल्याची हकीकत साऱ्या यार्डात पसरली. रात्री त्याच ठिकाणी नेहमीप्रमाणे आंथरूण घालताना मनात घर धरून बसलेला विंचू मला त्या जागी पुन्हा दिसू लागला. पण तुरुंगात आपली जागा बदलण्याचे स्वातंत्र्य नसल्याने मला त्याच जागी आंथरुण घालावे लागले. विंचू पुन्हा निघण्याची धास्ती वाटत असताही माझी आंथरुणाची जागा बदलू शकत नव्हती. परिस्थितीची अपरिहार्यता, या बोजड शब्दांचा अर्थ प्रत्यक्षांत स्पष्ट होण्यासारखे जे प्रसंग जीवनात उभे राहतात त्यांतलाच हा एक प्रसंग होता.

बेचाळीसच्या आंदोलनात ठाणे तुरुंगात पाऊल टाकताच ज्या यार्डात मला नेण्यात आले त्या यार्डातील बहुतेक सारे माझ्या निकट परिचयाचे होते. कारण ते स्थानबद्ध प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील होते. पुढे वरळीला गेल्यावर जेवढे लोक ठाण्याहून वरळीस गेलो तेवढे आम्ही निकट परिचयाचे होतो. मुंबईचे व इतर ठिकाणचे स्थानबद्ध ओळखीचे झाले. क्षेत्र वाढले पण निकट परिचितांची संख्या मर्यादित राहिली. वरळीहून येरवड्याला जाताना ठाण्याहून वरळीला आलेला सगळाच्या सगळा गट येरवड्याला आला नाही. त्यात काही बदल झाला. तरी बरेचसे निकटवर्ती परिचित

त्यात होते. येरवड्याच्या माळरानावरील त्या बराकीत असलेले बहुसंख्य स्थानबद्ध माझ्या परिचयाचे नव्हते. त्यामुळे मुद्दाम आपल्या बराकीचे आवार सोडून इतर बराकीत जाण्याचे कारण पडत नसे. क्वचित कुठे दूरच्या बराकीत कोणी ओळखीचा आहे असे समजले की मग जरा आनंद वाटे व त्याच्याबरोबर होणाऱ्या गप्पांत वेगळेपणा येई. येरवडा तुरुंगात अशा पाच-दहा ओळखी निघाल्या व बाहेरच्या काही समान मित्रांसंबंधीच्या आठवणींना उजाळा आला. येरवड्याच्या या तुरुंगात अभ्यास, वाचन असे फारसे झाले नाही.

बेचाळीसच्या 'छोडो भारत' आंदोलनातील चळवळीला अशांततेचे एवढे तुफान आले होते की, त्याचे पडसाद तुरुंगात वारंवार उमटत असत. सत्याग्रह, उपोषणे तुरुंगात मधूनमधून उद्भवत आणि त्यातच बाहेर चाललेल्या भूमिगत आंदोलनांच्या वार्तांची भर पडे. यामुळे क्वचित सुरू होणारा अभ्यासवर्ग व चर्चा यांना कधीच स्थिरता लाभत नसे. कोणीही नवा स्थानबद्ध आत आला की, त्याच्याकडून बाहेरच्या बातम्या ऐकायला मिळत; त्याचप्रमाणे तुरुंगाचे कडक पहारे चुकवून बाहेर बंदी असलेले 'छोडो भारत' लढ्यास प्रोत्साहन देणारे वाङ्मयही आत मोठ्या प्रमाणावर येत असे. अशा वाङ्मयाचे वाचन बहुतेक सर्व बराकींतून होत असे. या वाङ्मयाची देवघेव व वाचन करताना जी सावधगिरी बाळगावी लागे त्यामुळे या वाचनास महत्त्व आले होते.

माथेरानचे भाई कोतवाल यांस सिद्धगडच्या पठारावर ब्रिटिश सरकारच्या पोलीस अधिकाऱ्याच्या गोळ्या लागून मृत्यू आला. त्यांच्या व त्यांचे सहकारी हिरोजी पाटील यांच्या या बलिदानावर व भूमिगत असताना त्यांनी केलेल्या कार्यावर रचलेली काव्ये या येरवड्याच्या वास्तव्यात वाचायला मिळाली. मी माझ्या स्नेह्यांकडून बाहेरून काही पुस्तके मागविली होती. त्यांच्याकडून उत्तर आले की माझी लौकरच सुटका होण्याची वार्ता ऐकल्यामुळे त्यांनी पुस्तके पाठवली नाहीत. बाहेरच्या या सुटकेच्या वार्तेचा आत मला कसलाच सुगावा नव्हता.

येरवड्याच्या या तंबूच्या तुरुंगवजा कोंडवाड्यात स्थायी स्वरूपाची अशी

औषधोपचाराची योजना नव्हती. येरवडा तुरुंगातील डॉक्टर ठराविक पेटंट औषधांच्या रंगीत पाण्याने भरलेल्या बाटल्यांचे खोके कैद्याच्या डोक्यावर देऊन आमच्या तंबूतून फेरफटका करीत. कोणाची काही तशी विशेष तक्रार असल्यास व तिथल्या तिथे ती दूर करण्याची काही सोय नसली तर ते त्या रोग्यास ससून इस्पितळात पाठवावे, अशी सूचना तुरुंगाच्या अधिकाऱ्यांस करीत व मग पोलीस त्या स्थानबद्धाला ससून हॉस्टिलमध्ये इलाजासाठी घेऊन जात.

माझा दात एकदा फार दुखू लागला. रोज फेरफटका करणाऱ्या डॉक्टरांनी दुसऱ्या दिवशी ससून हॉस्पिटलात जाणाऱ्यांच्या यादीत माझे नाव दाखल केले. ससूनमध्ये स्थानबद्धांना घेऊन जाण्यासाठी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पोलिसांची मोटार येत असे. त्या वेळेवर तयार राहण्याची सूचना स्थानबद्धांना मिळे तशीच ती कैद्यांचे जेवण तयार करणाऱ्या मुदपाकखान्याकडे कैद्याचे नाव व नंबर देऊन दिली जात असे. कारण तुरुंगातील जेवणाची वेळ सामान्यतः साडेदहाची असे व त्या अगोदर हॉस्पिटलला गेलेल्या कैद्याला दुपारचे जेवण मिळणे त्यामुळे शक्य नसे. यावर तोड म्हणून तुरुंगाधिकारी अशा कैद्यांचे जेवण त्यांना साडेआठ–नऊ वाजता मिळावे अशी व्यवस्था करीत.

मला त्या दिवशीच सकाळी ९ च्या सुमारास कढत भाकरी नि कोरडे पिठले असे मिळाले. जेलमध्ये पिठले मिळाले नव्हते ते अनपेक्षितपणे पुढे आल्यावर रुचिपालटाबद्दल मला आनंद वाटला, भाकरी–पिठले खाऊन झाल्यावर मी पोलिसांच्या गाडीची वाट पहात बसलो. पण त्या दिवशी काही कारणाने पोलिसची गाडी आली नाही. मला त्याचे वाईट वाटले नाही. कारण दात दुखायचा थांबला होता नि हॉस्पिटलला जाण्यासाठी म्हणून कैक महिन्यांनी मला कोरडे पिठले खाण्यास मिळाले होते !

येरवड्याच्या माळावरील तंबूत रहात असताना खरे म्हणजे आम्ही तंबूच्या बाहेर उघड्यावरच दिवसभर वावरत होतो. पावसाळा नुकताच संपून गेला होता. तंबूत दिवसा बसणे मुळीच प्रशस्त वाटत नसे. बरेचसे स्थानबद्ध आपले जेवण व चहासुद्धा बाहेरच घेत. हे बाहेर हिंडणे फिरणे तेवढे मुक्त स्वरूपाचे नसे. तंबूंच्या चारी बाजूस काही मोकळे अंतर सोडून काटेरी तारांचे कुंपण घातलेले होते. हे कुंपण ओलांडून बाहेर जाता येत नसे. बाहेर पडण्यास दरवाजा होता व त्या दारावर पोलीस पहारा असे. मात्र सगळ्याच तंबूंभोवती अशी काटेरी कुंपणे असल्याने आजूबाजूस सर्वत्र दूरवर पहाता येत असे. तंबूचा उपयोग रात्री निजण्यापुरताच खऱ्या अर्थाने होत असे. चांदण्या रात्री टिपुर चांदणं पडल्यावर तर तंबूबाहेरच बसण्यास बरे वाटे. मग मला दोन वर्षांपूर्वीच्या नाशिकच्या तुरुंगातील बंदिस्त खोलीतल्या रात्री आठवू लागत. तेव्हा त्या खोलीत मऊ गादी, मच्छरदाणी, बाजूला चहाचा थर्मास, कोपऱ्यात पाण्याच्या भांड्यात संध्याकाळी तुरुंगाच्या आवारातील मोगऱ्यावर आलेल्या खुडून ठेवलेल्या कळ्यांचे रूपांतर आस्ते आस्ते फुलात होत असे नि साऱ्या खोलीभर मोगऱ्याचा सुगंध दरवळे; पण त्या सुखात खोलीच्या दाराला बाहेरून भले जाड कुलूप लावलेले दृष्टीस पडताच कैदेची जाणीव होई. खोलीच्या मागच्या भितीत उंचावर असलेल्या झरोक्यातून पौर्णिमेच्या आगेमागे चंद्रप्रकाश दिसला की मन बाहेर जाण्यास निघे, पण शरीर कोठडीत अडकून राही. आता येरवड्याच्या माळावर चंद्रप्रकाश भरपूर होता आणि कैदेत असूनही मित्रपरिवारात बसून गप्पागोष्टी करू शकत होतो.

'करेंगे या मरेंगे' असा निर्वाणीचा आदेश महात्माजींनी दिल्यावर दशात काही महिने जे अशांततेचे महाभारत घडले ते आता आस्ते आस्ते शांत होत होते. अनेक स्थानबद्धांच्या सुटकाही होऊ लागल्या होत्या. या

सुट्का आता बिनशर्त असत. आंदोलनाची धार बोथट होत असल्याचे सरकारच्या लक्षात येत होते. तसेच कार्यकर्त्यांच्याही ध्यानी येत होते. काँग्रेस संघटना अजूनही बेकायदा असल्याने सुटका झालेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांना बाहेर गेल्यावर काँग्रेसचे काम अधिकृतपणे करता येत नसे. अनेक निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांना यावेळी तुरुंगातून बाहेर गेल्यावर विधायक कामाला सुरुवात करता आली. बेचाळीसच्या लढ्यात विस्कटलेली खादी ग्रामोद्योगाच्या कार्याची घडी पुन्हा नीट बसविण्याच्या गोष्टी माझ्या आसपास होऊ लागल्या तर इतर विधायक कार्यात लक्ष घालणारे बाहेर पडताच कार्याची सूत्रे हाती घेण्याचे बेत करीत. स्वातंत्र्याचा अखेरचा लढा या भावनेने लढ्यात प्रथमच आलेल्यांना या गोष्टीचे फारसे महत्त्व वाटत नसे. लढ्यात भाग घेण्यापूर्वी त्यांचे जे उद्योग अथवा विद्याभ्यास चालू होते तेच बाहेर गेल्यावर पुन्हा सुरू होणार होते. ठाणा, वरळी येथे आमच्याबरोबर असलेले काही तरुण कार्यकर्ते एव्हाना सुटून बाहेर गेले होते व ते तुरुंगातील परिचितांच्या भेटीलाही येत. 'करा किंवा मरा' या लढ्यात अपरिपक्व विचाराचे, अतिरेकी स्वभावाचे जे तरुण आले होते त्यांच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारे काही प्रसंग या सुटका झालेल्यांबाबत ऐकू येऊ लागले. स्थानबद्धांना घरचे कपडे वापरण्याची मुभा मिळाल्याने अनेकांनी आपले बाडबिस्तरे तुरुंगात आणले होते. पण असे भाग्यवान थोडे होते. बहुतेकांनी तुरुंगात मिळणारे आंथरूण, पांघरूण वापरले. प्रथम प्रथम तुरुंगात मिळणारी ब्लँकेटे चांगल्या दर्जाची असत. काही स्थानबद्धांनी सरकारचे नुकसान करण्याच्या विपरीत कल्पनांनी बाहेर जाताना ब्लँकेटे बरोबर नेण्याचा उद्योग केला. ही मोठी सबंध ब्लँकेटे नेण्याचे ज्यांना जमल नाही त्यांनी ती फाडून त्यांचे मोठे तुकडे बाहेर नेण्याचे प्रयत्न केले. या वार्ता आत आल्यावर लढ्याच्या महापुराबरोबर तुरुंगात काय काय वाहून आले होते याची कल्पना आली.

येरवडा तुरुंगातील माझे वास्तव्य काही दिवसांचेच ठरले. एक दिवस आम्ही सकाळी उठतो तो आमच्या पलीकडेच तंबूचे कापडी घर भस्मसात होऊन त्याची राख जमिनीवर पडलेली दिसली. विजेच्या प्रवाहाच्या शॉर्ट

सर्किटन तंबू जळला होता. आत फारसे स्थानबद्ध नव्हते. जे होते ते सारे बचावले होते. हा तंबू अपघाताने जळला का कोणी मुद्दाम जाळला याची चर्चा नंतर सुरू झाली. तंबू कसा जळला याचे खरे कारण कळले नाही. पण त्याचा परिणाम आमची रवानगी विसापूरला करण्याच्या निर्णयात झाला. ठाण्याहून वरळी, वरळीहून येरवडा आणि आता तेथून विसापूर अशी माझी तुरुंगयात्रा सुरू होती. सरकारी हुकमाने होणाऱ्या कैद्यांच्या प्रवासात कैद्याला स्वतःला काहीच करावयाचे नसते. पुष्कळदा त्याला आपणास कुठे नेत आहेत हेही अधिकृतपणे समजलेले नसते. एखाद्या मोठ्या सभा-समारंभात लाकडी खुर्च्या, टेबले, बैठका यांसारखे सामान इकडून तिकडे हालवताना त्या सामानाची संमती जशी कोणी विचारीत नाही आणि इकडून तिकडे हालवताना जशी काही तोशीस पडत नाही तशाच प्रकारे कैद्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हालवीत असतात. जड सामान हमालांच्या डोक्यावरून वाहून नेले जाते आणि कैदी आपल्या पायाने पोलिसांच्या मागे व पुढे चालू लागतात इतकाच फरक. आम्हांला विसापूरला नेणार असल्याची कुणकुण लागली नि लगेच अंमलबजावणीही झाली. एके दिवशी आतापावेतो परिचित झालेल्या पोलिसांच्या मोठमोठ्या काळ्या मोटारी बाहेर येऊन उभ्या राहिल्या. आमचे बांधलेले सामान व नंतर आम्ही त्या मोटारीत जाऊन बसलो.

या सबंध बेचाळीसच्या आंदोलनात एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात नेताना किंवा इतर वेळीही माझ्या हाताला हातकडी कधी लागली नाही. तशी ती तीस सालीही लागली नव्हती. लागली फक्त एकदाच ४० साली ठाणे तुरुंगातून कलेक्टर कचेरीत खटल्यासाठी नेताना.

विसापूरला जाण्यासाठी पुण्याच्या स्थानकावर आम्हास आणण्यात आले. तेथे पुण्यातील काही मंडळी आपल्या आप्तेष्टांना येरवडा तुरुंगातून विसापूरला नेण्यात येत असल्याचे कळल्यावरून आलेली होती. एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात जाताना होणारा प्रवास हा कैद्यांच्या जीवनक्रमात एक चांगलाच बदल असतो, याचा पुन्हा अनुभव येत होता.

पुण्याच्या स्थानकावर विसापूरच्या गाडीत बसेपर्यंत उगीच इकडे तिकडे पाहण्यात व बरोबरच्या सहकाऱ्यांशी गप्पागोष्टी करण्यातच वेळ गेला. आमच्या बरोबरीचे शिपाई आमची गिनती करण्यात व आम्हांला व्यवस्थितपणे गाडीत बसविण्यात बरीच जास्त काळजी घेत होते. या तुरुंगबदलीच्या प्रवासात एखाद दुसरा कैदी निसटून जाण्याचा धोका असतो. याचा पूर्वी अनुभव आल्याने काही तासांच्या या प्रवासात शिपाई पुन्हा पुन्हा आमची मोजणी करून पहात.

विसापूर स्टेशनवर उतरून आमचा फैल तुरुंगाच्या वाटेला लागल्यावर मी आजूबाजूस चौकस नजरेने पाहत होतो. बारा वर्षांपूर्वी याच तुरुंगाची वाट मी कैदी म्हणून चालत होतो. आता दुसऱ्यांदा या ठिकाणी मी येत होतो. जे प्रथमच विसापूरला येत होते त्यांना जुना आणि जाणीता या नात्याने मी आजूबाजूची माहिती करून देत होतो. ३० साली या तुरुंगात शिस्त कडक असे, पण तलावात अंघोळ करण्याची सोय होती. मोकळ्या पाण्यात शिरून अंघोळ करायला मिळण्याचा आनंद बाहेर वाटतो त्यापेक्षा तुरुंगात जास्त वाटत असतो. पण आता तुरुंगाच्या बराकीवजा इमारतीत प्रवेश केल्यावर विसापुराच्या जुन्या तुरुंगात खूपच बदल झालेला आढळला. तळ्यावरील अंघोळी संपूर्ण बंद झाल्या होत्या. प्रत्येक बराकीच्या बाहेर पाण्याच्या टाक्या नि नळ होते. तेथेच अंघोळी व कपडे धुणे उरकावे लागे.

विसापूरचे वातावरण खरेच तुरुंग वाटावा असे कोंदट होते. प्रसन्नपणा असा तेथे कधी वाटलाच नाही. कदाचित माझ्या या तुरुंगाच्या बारा वर्षांपूर्वीच्या स्मृती याला कारण असतील. येथे वाचन-लेखनाला अनुकूलता असूनही मनावरच औदासीन्याची दाट छाया असल्याने गप्पांचा काथ्याकूट नि दोन वेळेला जेवण नि चहापाणी यांतच दिवस व्यतीत होत असत. विसापूर जेलमध्ये स्थानबद्धांना चहा हे त्यांचे आवडते पेय विसापूर नि हवे तेव्हा मिळायचे. चहा आणि गप्पा, गप्पा आणि चहा असे चक्र सतत सुरू असायचे. संध्याकाळी सहा वाजले की बराकीच्या भोवतालच्या अरुंद चिंचोळ्या भागातून पायांनी फिरत राहणे नि तोंडाने गप्पा मारणे हा बहुतेक सर्वांचा नियमित चालणारा कार्यक्रम होता.

सापूरची हवा मुळातच रोगट. मलेरिया या भागात कायमचा वस्ती करून राहिलेला. रोगट हवेला आमच्याजवळ तात्पुरते उत्तर चहापान हे होते. पिणाऱ्याला तरतरी आणण्याचा चहाचा गुण विसापूरला खूपच आढळून आला. चहापान हे मुळातच एकमेकांत असलेला स्नेह वाढवणारे आणि नवे स्नेही मिळवून देणारे पेय आहे. मात्र त्यावर निष्ठा पाहिजे. चाळीसच्या आंदोलनात अंतःस्फूर्तीने भाग घेऊन तुरुंगात गेलेले, जीवनात राजकारणाचे प्रामुख्याने आकर्षण नसलेले, अबोल स्वभावाचे भा. रा. भागवत यांचा विसापूरला विशेष परिचय झाला तो त्यांच्या व माझ्या चहावरील प्रेमामुळेच होय.

विसापूरला गेल्यावर काही काळानंतर मला तुरुंगात हिवताप सुरू झाला. कानाच्या दुखण्याने मला यापूर्वी चांगलाच त्रास दिला होता. पण त्यामुळे आंथरुणावर निजून राहण्याची पाळी कधी आली नव्हती. ते दुखणे हिडते फिरते राहून त्रास देणारे होते. पण हा सुरू झालेला हिवताप मला आंथरुणावरून उठून हिंडू फिरू देईना. अंगात ताप कधी कधी फारच चढे. एकदा तर तापाच्या भरात मी असंबद्ध बडबड करू लागलो. या वेळी अनेक स्नेह्यांनी मला मदत केली. काय हवे नको याची चौकशी केली. तुरुंगाच्या डॉक्टकडून औषधपाणी देवविले. आजाराने अधू झालेल्या मनाला धीर देण्याचे काम केले.

नाशिकच्या तुरुंगात मी १९४०साली असताना तेथे जे आम्हांला डॉक्टर होते ते आता विसापूरला सुपरिंटेंडेंट म्हणून आले होते. त्यांना माझ्या कानाच्या आजाराची माहिती चांगलीच होती. सारखा वाढता असलेला ताप पाहून त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माझी पॅरोलवर सुटका करावी अशी सूचना केली होती. माझा ताप बरा झाल्यानंतर या अर्जाचे होकारार्थी उत्तर आले आणि माझी विसापूर तुरुंगातून पॅरोलवर सुटका झाली.

बेचाळीस आंदोलनात पॅरोलवर सुटका होण्याची ही माझी दुसरी वेळ होती. ठाण्याच्या तुरुंगात असताना वडिलांच्या निधनाचे वेळी बाहेरच्या मित्रांनी खटपट केल्याने पंधरा दिवसांच्या पॅरोलवर सुटका झाली होती.

अखेर सुटलो !

आता तुरुंगाधिकाऱ्यांनीच या बाबतीत पुढाकार घेतला होता. कोर्टाचा हुकूम होताच अगर सरकारने स्थानबद्धतेचा हुकूम लागू करताच जशी तातडीने त्या माणसाची तुरुंगात रवानगी होते त्याच त्वरेने तुरुंगातून मुक्त करण्याचा हुकूम आल्यावर त्याची तामिली होते. बेचाळीस सालची माझी अटक ठाण्याच्या रस्त्यात एका सकाळी अचानक झाली तशीच विसापुरातून पॅरोलवर झालेली सुटका अनपेक्षित ठरली.

पॅरोल म्हणजे परत तुरुंगात येण्याच्या अटीवर ठराविक मुदतीसाठी तुरुंगातून केलेली सुटका. पुन्हा परत विसापूरला यायचे असल्याने माझी पुस्तके व सहकाऱ्यांना हवे असलेले इतर सामान मी माझ्याबरोबर विसापूर सोडताना बाहेर नेले नाही. पुन्हा परत यायचे या जाणीवेने सहकाऱ्यांचे त्याच्या घरी सांगण्याच्या निरोपांचे भलेमोठे गाठोडे घेऊन मी विसापूर तुरुंगातून बाहेर पडलो. पॅरोल म्हणजे एक प्रकारची बाहेरच्या वातावरणातील नजरकैदच असते. माझ्यावर पोलीस कचेरीत जाऊन हजेरी लावण्याची अट नसली तरी बाहेरचे पोलीस पॅरोलवर आलेल्या माणसाच्या हालचालीवर लक्ष ठेवीत असतात.

माझ्यावर पोलिसांनी लक्ष ठेवण्याचे हेही काम एक दिवस संपले. मला विसापूर तुरंगाच्या अधिकाऱ्यांकडून पत्र आले. त्यात म्हटले होते "तुमची तुरुंगातून मुक्तता केल्याचा सरकारचा हुकूम आला असल्याने तुम्ही पुन्हा विसापूरच्या तुरुंगात येण्याची आवश्यकता नाही!" भारत संरक्षण कायद्याखाली मला झालेली अटक आता संपली होती. पुन्हा परत तुरुंगांत जाण्यासाठी विसापूरच्या तूरुंगातून बाहेर पडलो. पण ते बाहेर पडणे कायमचेच ठरले. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सोसलेला माझा तिसरा कारावास हा अशा अनपेक्षित रीतीने संपुष्टात आला.

o o o

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाधीन
क्रमांक ...६५६३६ दि. १२/७/८५
वर्ग क्र. ...२९४.५ नोंद दि. ...१३/७/८५

REFBK-0015955